# दुर्दम्य सेवाव्रती

## सामान्यातले असामान्य

संकल्पना व संकलन– डॉ. दिलीप खानखोजे



दुर्दम्य सेवाव्रती

संकल्पना व संकलन – डॉ. दिलीप खानखोजे



कै. डॉ. दिलीप खानखोजे
१९४९–२०१२

या पुस्तकाचे लेखक कै.डॉक्टर दिलीप खानखोजे आम्हा सर्वांचे जिवश्च–कंठश्च स्नेही होते आणि ‘अन्नपूर्णा’ च्या संशोधन केंद्राचे आधारवड होते. तुम्हा वाचकांचीही या पुस्तकरूपात त्यांच्याशी भेट होते आहे.

डॉ. खानखोजे हे एक आगळे वेगळे रसायनच होते. साधा सरळ निष्कपट स्वभाव, संशोधकाची चौकस बुद्धी आणि सच्च्या समाजसेवकाची आस्था व कळकळ, या तिन्हींचा अनोखा त्रिवेणी संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला होता. त्यांनी लिहिलेल्या प्रत्येक लेखातून आणि त्यांच्या समाजकार्यातून याचा प्रत्यय येतो. हे पुस्तकही त्यांच्या या स्वभावविशेषांचे प्रतीक आहे. डॉक्टरांच्या लेखनशैलीचे वैशिष्ट्य असे की या पुस्तकात ते स्वत: त्यांच्या लेखांच्या चरित्रनायक–नायिकांशी प्रत्यक्ष संवाद साधताहेत असे चलचित्रच वाचकाच्या डोळ्यांसमोर उभे राहते.

अशा डॉक्टरांनी आपल्या आयुष्यात नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ बँक मॅनेजमेंट या संस्थेत भूषविलेल्या संशोधक आणि प्राध्यापक या पदांना एक नवा आकार आणि अर्थ दिला होता.

दुर्दैवाने हे पुस्तक छापील स्वरूपात प्रकाशित झालेले पाहण्यास डॉक्टर आता आपल्यात नाहीत. आपल्या अचानक जाण्याने किती जणांच्या आयुष्यात कसली पोकळी निर्माण होईल ते न पाहताच निरोप घेण्याची इतकी घाई त्यांनी का केली ते कळत नाही. कदाचित यामागे देवाचाच काही स्वार्थ असावा.



प्रकाशक :
दादा पुरव रिसर्च अॅन्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट
पुणे

# दुर्दम्य सेवाव्रती

## सामान्यातले असामान्य

संकल्पना व संकलन

डॉ. दिलीप खानखोजे



दादा पुरव रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट

**प्रकाशक :**
दादा पुरव रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट
अन्नपूर्णा परिवार,
शुभम हाइटस्, सर्व्हिस रोड, वारजे, पुणे - ४११०५८
फोन नं. ८८८८८६३४५८ / ९५५२५५५२०९

**सर्व अधिकार सुरक्षित :**
© डॉ. मेधा पुरव सामंत

**प्रकाशन :**
१८ ऑगस्ट २०१३

**मुद्रक :**
साठे प्रकाशन
७६५, सदाशिव पेठ, फडतरे चौक, पुणे
फोन नं. ०२०-२४४७९७२८

**मुद्रणस्थळ :**
प्रभात प्रिंटिग वर्क्स
४२७, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७

**अंतर्गत सजावट :**
केतन दाते

**मूल्य :**
₹१००/-

# अर्पणपत्रिका

*या पुस्तकाचे लिखाण डॉक्टर खानखोज्यांनी त्यांच्या मृत्यूअगोदरच करून ठेवले होते. आम्ही त्याच्यावर आवश्यक ते संस्कार करून ते पुस्तकाच्या रूपात छापले आहे.*

*हे पुस्तक आपल्या आईस व सासूबाईंना अर्पण करावे अशी इच्छा डॉ. खानखोजेंनी व्यक्त केली होती. त्यानुसार आम्ही हे पुस्तक श्रीमती प्रतिभा खानखोजे व श्रीमती लीला गद्रे यांना आणि डॉ. खानखोजेंच्या स्मृतीला अर्पण करीत आहोत.*

# मनोगत

मध्यंतरी एका महान व्यक्तीचे चरित्र वाचनात आले. जवळपास एका बैठकीतच ते संपवून पूर्ण केले, इतके त्याने मला खिळवून ठेवले. मी त्या चरित्राने जणू झपाटला गेलो होतो. ते हातावेगळे केल्यावर मनात विचारांचे काहूर माजले. काय असे होते या लोकोत्तर महान व्यक्तीमध्ये, ज्यामुळे ती मानवी समाजाकरता एवढे उत्तुंग कार्य करू शकली? या प्रश्नाला उत्तर शोधणे मला सोपे जात नव्हते. ते शोधता शोधता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या नानाविध पैलूंनी गाठलेली असामान्य उंची नजरेपुढे उलगडू लागली व त्याची यादी मारूतीच्या शेपटाप्रमाणे वाढू लागली. ध्येय, विचारांची स्पष्टता, उद्दिष्टांचा आवाका, ध्येयासक्ती, वास्तवाची जाणीव, परिस्थितीचे आकलन, महत्त्वाकांक्षा, दूरदृष्टी, निस्पृहता, आत्मविश्वास, प्रसंगावधान, स्वत्व, धैर्य, समाजाभिमुखता, नीतीमत्ता, मूल्यांची जाण व चाड, चारित्र्य, चिकाटी, मनाची एकाग्रता, निरिच्छता, निरासक्ती वगैरे आणि अशा अनेक पैलूंमुळे यादी लांबतच होती. एक प्रश्न मनात येऊन गेला, पण या पैलूंच्या मांदियाळीत सर्वात महत्त्वाचा कोणता? माझ्या मते सर्वप्रथम स्थान जर कोणत्या पैलूला असेल तर तो पैलू म्हणजे समाजाच्या उन्नतीकरता झटण्याची अतिशय प्रबळ उर्मी व इच्छाशक्ती. या पैलूला केंद्रस्थानी मानून त्याच्याभोवती मग इतर पैलूंमध्ये समन्वय आणि ताळमेळ साधत साधत एकमेकांना पूरक ठरतील अशा प्रकारे त्यांचा सदुपयोग करीत स्वत:च्या जाज्वल्य इच्छाशक्तीला ते वास्तवातील प्रत्यक्ष स्वरूप देऊ शकले. एकूणच समाजाभिमुखतेचा जणू उत्तम दाखला.

सहजच म्हणून मी जवळच्या मित्रमंडळींना बोलता बोलता माझ्या मनात चाललेला घोळ बोलून दाखवला. त्यावर आलेल्या प्रतिक्रिया पाहण्यासारख्या आहेत.

'अरे बाबा, ही फार मोठी माणसे, ते कुठे आणि आपण कुठे? आपण आपले वाचावे, त्यांच्या महत्तेची स्तुती करावी, मनातल्या मनात अचंबित होऊन कौतुक करावे आणि विसरून जावे.'

'ही माणसे इतकी महान, त्यांचे कर्तृत्त्व एवढे उत्तुंग की त्यांच्या माार्गाने आपण जाऊ तर शकतच नाही पण त्यांचे सद्गुणही आचरू शकत नाही, मग कशाला तिकडे पहा?'

'मी इतका छोटा आहे, की मी स्वत: तर काहीच करू शकत नाही.'

'अरे, परिस्थितीशी झगडता झगडता माझ्या नाकी नऊ आले आहेत, मी त्यातच गुंतलेला आहे, मला काही नको सांगूस. मी या सगळ्यात अनभिज्ञ आहे.'

या प्रतिक्रिया पाहताना मला जाणवले की अशा व्यक्तींच्या मागे असलेले महानतेचे वलय हे आम्हा सामान्यांना जणू मोठे गूढ वाटते. अनाकलनीय वाटते. त्याकडे बघायचा दृष्टीकोनच मुळी 'नकोरे बाबा, एवढी मोठी माणसे, त्यांची राहणीसाहणी, आचारविचार, सद्भावना, बुद्धीची झेप, अंगी असणारे गुण काय आपल्याला झेपणारे आहेत? आपण तर सामान्य'. ही विचारांची दिशा आणि थोरांची वलयांकितता जणू आमची मती कुंठित करून जाते. आपण हे विसरतो की ही मोठी माणसेही कोणे एके काळी सामान्यच होती. नदी जशी उगमस्थानाजवळ लहान असते तशी. त्यातल्या अनेकांनी कामाची सुरूवातही एकट्याने केलेली होती. अगदी एकला चलो रे याप्रकारे. ज्येष्ठ समाजसेवक श्री. अण्णा हजारे यांनी कार्याची सुरूवात त्यांच्या गावाच्या देवळाचे आधार असणाऱ्या लाकडाच्या खांबांच्या चोरीला विरोध करून केली, तेव्हा ते एकटेच होते. रेल्वेच्या डब्यात गाणे म्हणत हात पसरून झालेली मिळकत स्वत:पुरती न ठेवता बरोबरीने इतर समदु:खितांमध्ये वाटून घेणाऱ्या सौ.सिंधुताई सपकाळांनीही सुरूवात एकट्यानेच केलेली होती. त्यावेळी तर ही मंडळी सामान्यांहूनही सामान्य होती. त्यांच्यातील दडलेल्या असामान्यत्वाची व त्यामागील पायाभूत अशा नानाविध सद्पैलूंची न त्यांना जाणीव होती न इतरेजनांना. त्यांना असामान्य बनवणारे अगदी तमाम सगळे सद्पैलू त्यांच्यात सुरूवातीपासून नसतीलही. एक सामान्य माणूस म्हणून त्यांचे कर्तृत्व तसेच कार्य जसजसे फुलून येऊ लागले तसतसे ते सद्गुण उभारून येऊन त्यांना त्यांची जाणीव झाली असावी आणि त्यांच्या कार्यप्रणालीत त्यांनी त्यांचा चपखलपणे व खुबीने वापर

केला.तात्पर्य म्हणजे सुरूवात केली तेव्हा ही मंडळीही तुमच्याआमच्यासारखीच सामान्य होती. ते लोक वेगळे जाणवतात ते एका बाबतीत, ती म्हणजे समाजाकरता, देशाकरता, लोकांकरता सेवाभावनेने व निरीच्छपणे काही करायची दुर्दम्य अशी उत्स्फूर्त स्वयंप्रेरणा, प्रबळ इच्छाशक्ती व उसळती उर्मी.

मनात असे आले की ही विशेषता काय फक्त मोठ्या समाजसेवकांपुरतीच मर्यादित आहे? हळूहळू असे दिसून येऊ लागले की आम जनतेत जरी ती विशेषता सर्वसाधारणपणे दिसून येत नसली तरी ती जतन करणारे व त्यानुसार काम करणारे लोक सर्वसामान्यांमध्ये आढळून येत नाहीत असे निश्चितच नाही. वेगवेगळ्या अंगांनी पाहिल्यास भले त्यांच्या कार्याचा एकूण आवाका मोठा नसेल किंबहुना बरेचदा तो लहानही किंवा नगण्य असेल पण ते आधारलेले असते ते या विशेषतेवरच. नाहीतर भटक्या गुराढोरांना रोज पाच हजार लिटर पिण्याचे पाणी फुकट वाटणाऱ्या नाशिकच्या अशोक पंजाबींच्या कृतीचे काय समर्थन करणार? ज्या काही मिळतील त्या देणग्यांचा आधार घेत घेत स्वपुंजीतून गरीबांना दोन रूपयात जेवण उपलब्ध करून देणाऱ्या हडपसरच्या जोडप्याला काय म्हणावं? दिवसा शाळेत शिकवून मग संध्याकाळी तीन तास दहा बाय दहाच्या पत्र्याच्या खोलीत गरीब विद्यार्थ्यांचा मोफत वर्ग घेणाऱ्या पिंपरी चिंचवडच्या शिक्षकांची मनोभूमिका कोणती? अवती भवती अशी काही उदाहरणे आपल्याला अधूनमधून दिसत असतात.

विचार करता करता लक्षात येते की सामान्यांमधील असामान्य गुणांची ती आपल्याला जाणीव करून देतात. एका प्रकारे खात्रीच पटवून देतात की सामान्यांमध्येही अलौकिक असे काही गुण असतात. आणि अशा प्रकारची माणसे आपल्यातील अंगभूत किंवा कमावलेल्या असामान्य गुणांच्याद्वारे (त्यांच्या सकारामत्मक व कुशल वापराने) समाजाकरता आवश्यक असलेले असे उपयुक्त कार्य करू शकतात. आणि याची सुरूवात बहुतांश वेळा एकट्या व्यक्तीपासून होते. हाती घेऊ पाहात असलेल्या उपक्रमावरील त्यांची निष्ठा दुर्दम्य असते व विश्वास अढळ असतो. त्यांचे कार्य पुढे प्रगतीपथावर जात असताना ते अनेकदा त्याचे रूपांतर स्वयंसेवी संस्थेमध्ये करतात. या प्रक्रियेमध्ये स्वयंसेवकांचा चमू त्यांच्याभोवती जमा होतो. दिशा अधिक ठाम होते व जास्त स्पष्ट दिसू लागते. बरेचदा कार्याची कक्षा, आवाका यांची व्याप्ती विस्तारत जाते. कार्य आणखी सुकरपणे व चांगल्या प्रकारे पार पाडण्याच्या दृष्टीने नवीन नवीन पैलू व पद्धती विचारपूर्वक अंगिकारल्या जातात. उपक्रमाचा पाया अधिकाधिक बळकट होऊ लागतो. हातातले कार्य एक निश्चित आकार घेऊ लागते. उपक्रमाची सकारात्मकपणे परिणाम करण्याच्या दिशेने वाटचाल अधिक दृढ होत जाते.

मग शोध सुरू झाला अशा व्यक्तींचा जे तुमच्याआमच्यासारखे सामान्य तर आहेतच पण ज्यांनी अशा अलौकिकतेच्या माध्यमातून समाजसेवेचे प्रत्यक्ष धडे आम लोकांपुढे उलगडले आहेत. स्वत: अशा उपक्रमांचा श्रीगणेशा केला आहे. वर उल्लेखलेली प्रक्रिया थोड्याफार फरकाने पण स्वत: सुरू करून अनुभवलेली आहे आणि अव्याहतपणे आजही तिचा भाग बनून आहेत. आजही लोकसेवेचे यज्ञकुंड त्यांनी निवडलेल्या आपापल्या कार्यक्षेत्रात व कर्मभूमीत सातत्याने चालू आहे. उपक्रमाचा निश्चितस्वरूपी परिणामही जाणवत आहे. अशा व्यक्तींच्या शोधार्थ इंटरनेटद्वारे केलेल्या प्रयत्नांतून देशभरातून सुमारे दीडशे व्यक्ती आढळल्या. (अर्थात हा प्रयत्न सर्वसमावेशक व परिपूर्ण नाही. माझ्या स्वत:च्या व काही अंशी संगणकाच्या त्रुटींमुळे आणखी व्यक्तींचा समावेश करण्याला मर्यादा पडल्या). त्यापैकी वीस व्यक्तींची निवड केली. त्यामागील मुख्य निकष होता त्यांच्या कार्याच्या दिशेतील आणि अंगिकारलेल्या उपक्रमांतील आगळेपणा व नाविन्यपूर्णता, जेणेकरून सामान्यांनी राबवलेल्या अशा उपक्रमातील वैविध्यपूर्णताही वाचकांच्या नजरेत भरेल व तिला योग्य न्याय दिल्याचे आंतरिक समाधानही मिळेल. उपक्रमातील वैविध्यावर व त्या अनुषंगाने ते राबवण्याच्या यंत्रणांचा तुलनात्मक स्वरूपाचा प्रयत्नही उपयुक्त ठरू शकेल.

'मी एकटा काय करू शकतो समाजाकरता? मी एक सामान्य माणूस आहे. मी या बाबतीत असहाय्य आहे. थोरामोठ्यांच्या कार्यातून मी पामर काय धडे गिरवू शकतो?' सर्वसामान्यांच्या मनातील समाजसेवेबद्दलच्या अशा घुसमटीतून त्यांच्यासारख्याच सामान्यांच्या धडपडीमध्ये मार्ग शोधण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न.

माझ्या या प्रयत्नांत मला अनेकांची साथ मिळाली. माझे मित्र श्री. अविनाश भगली यांनी प्रामाणिक समीक्षकाच्या भूमिकेतून मला सहकार्य दिले. एनआयबीएममध्ये कार्यरत सौ. मंजिरी कुलकर्णी यांनी टंकलेखन केले. सौ. कीर्तिताई मराठे यांनी लेखनाची सुसूत्र मांडणी केली. माझे मेव्हणे व बहीण श्री. अनिल व प्राची गुर्जर यांचे प्रोत्साहन मोलाचे होते.

या पुस्तकाची निर्मिती हा माझ्याकरता एक नवीन प्रवास होता. या प्रवासात अनेक लोक भेटले आणि मी असंख्य अनुभवांनी श्रीमंत झालो, याकरता मी अत्यंत आभारी आहे. आणि अर्थातच हा जीवन समृद्ध करणारा अनुभव घेण्याची प्रेरणा ज्यांनी दिली ते – या पुस्तकाचे 'रियल हीरोज्' – यांचा मी आजन्म ऋणी असेन.

**— डॉ. दिलीप खानखोजे**

वर लिहिलेले मनोगत स्वत: डॉ. खानखोजे यांनी त्यांच्या जीवनकाळात लिहिले होते. त्यात त्यांनी हे पुस्तक लिहिण्यामागची लेखक म्हणून असलेली भूमिका विशद केली आहे. दीनदुबळ्यांची सेवा करणाऱ्या सेवाव्रतींचे पुस्तक लिहावे हे डॉक्टरांचे स्वप्नच होते. दुर्दैवाने हे पुस्तक छापून प्रकाशित झालेले पाहण्यास आता ते आपल्यात नाहीत. म्हणून त्यानंतरचा भाग मी त्यांची पत्नी म्हणून पूर्ण करते आहे.

त्यांच्या लिखाणाचे पुनर्वाचन संस्करण करण्यास काही वेळ लागला कारण कामाची व्याप्ती मोठी होती. डॉक्टरांचे 'अन्नपूर्णा परिवार' या स्वयंसेवी संस्थेशी व या संस्थेच्या अध्वर्यु डॉ. मेधा सामंत यांच्याशी नुसतेच घनिष्ठ संबंध नव्हते तर त्यांनी अन्नपूर्णाच्या कामासंबंधी काही संशोधनप्रबंधही लिहिले होते. 'अन्नपूर्णा' चे काम, त्यामागची प्रेरणा व पद्धती हे डॉक्टरांच्या अगदी जिव्हाळ्याचे विषय होते. त्यामुळे 'अन्नपूर्णा' ने हे पुस्तक प्रसिद्ध करावे हा एक अमृतयोगच.

हे पुस्तक प्रसिद्ध करण्याच्या अवस्थेत येण्यात आमच्या जिवलग स्नेह्यांचा हातभार लागला आणि डॉ. मेधा सामंत या पुस्तक छापायला लगेच तयार झाल्या. त्या सर्वांचे आभार मानणे ही फारच औपचारिकता होईल. उलट मी या सर्वांच्या ऋणात राहणेच पसंत करेन. मला वाटते डॉक्टरांनी स्वत:ही हेच पसंत केले असते.

**— उत्तरा खानखोजे.**

# प्रकाशकांचे दोन शब्द

डॉ. दिलीप खानखोजेलिखित 'दुर्दम्य सेवाव्रती' या पुस्तकाचे प्रकाशन करत असताना मनात संमिश्र भावना आहेत. 'डॉ. खानखोजे आपल्यात नाहीत' ही दु:खद भावना आणि त्यांचे शेवटचे पुस्तक प्रकाशित करण्याची संधी आमच्या 'दादा पुरव रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट'ला मिळणं ही आनंदाची भावना.

डॉ. दिलीप खानखोजे हे आमच्या रिसर्च सेंटरच्या महत्त्वाच्या आधारस्तंभांपैकी एक होते. 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँक मॅनेजमेंट' या विख्यात संस्थेचे ते सन्माननीय प्राध्यापक होते. मी स्वत: एनआयबीएममध्ये पाहुणी व्याख्याती म्हणून गेल्या १०-१२ वर्षांपासून जात असल्यामुळे डॉ. खानखोजेंशी अतिशय चांगले स्नेहसंबंध जुळलेले होते. ते एनआयबीएम मधून निवृत्त झाल्यानंतर वर्षभरातच अशा प्रकारे या जगाचा निरोप घेतील अशी शंकासुद्धा मनात नव्हती. उलटपक्षी निवृत्त झाल्यानंतर'दादा पुरव रिसर्च सेंटर'ला जास्त वेळ ते देतील असा संवाद आमच्यामध्ये झालेला होता.

असेच कधीतरी ते बोलता बोलता म्हणाले होते, 'मेधाताई जरा हे वाचून पहा बरं, सहज म्हणून लिहिले आहे. अहो, काय साधी माणसं, काय विलक्षण समाजकार्य करताहेत हो! अशा व्यक्तींवर लिखाण व्हायला पाहिजे, म्हणून लिहितोय.'

त्यावेळी त्यांनी दिलेल्या, त्यांच्या हस्ताक्षरातील एकदोन कथा मी वाचल्या होत्या. मलाही असं वाटून गेलं की अगदी साध्यासुध्या व्यक्ती एका भावनिक उर्मीतून किती जगावेगळं कार्य करून जातात.

अशा प्रकारच्या २०-२१ व्यक्तींवर डॉ. खानखोजे यांनी लिहिलेल्या लेखांचं हे पुस्तक 'दुर्दम्य सेवाव्रती'. यातील माहिती डॉ. खानखोजेंनी काही

लेखांमधून, काही वर्तमानपत्रांमधून, काही इंटरनेटवरून अशी घेतलेली आहे. त्यापैकी काही व्यक्तींना ते स्वत: भेटलेले आहेत, तर काही व्यक्तींना त्यांनी पाहिलेलंसुद्धा नाही.

या ‘दुर्दम्य सेवाव्रतीं’ इतकंच कौतुक डॉ. खानखोजे यांच्याबद्दल वाटतं, की अशा व्यक्तींवर लेख लिहावे, त्यांचं संकलन करावं हे त्यांच्या मनात आलं, कुठल्याही फायद्यासाठी नव्हे, तर केवळ आत्मिक आनंदासाठी !

याच भावनेने आम्ही ‘दादा पुरव रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट’तर्फे हे पुस्तक प्रकाशित करत आहोत. त्या ‘दुर्दम्य सेवाव्रतीं’ ना आणि डॉ. खानखोजेंना आमची ही मानवंदना मानावी.

श्रीमती उत्तरा खानखोजेंनी डॉ. खानखोजेंचं हस्तलिखित आमच्यापर्यंत पोचवले आणि विश्वासाने पुस्तकाचे काम आमच्यावर सोपवले. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी राहू. श्री. अविनाश भगली आणि श्रीमती कीर्ति मराठे यांनी या पुस्तकाचे हस्तलिखित तपासणे, टंकित करणे अशी जबाबदारी उत्साहाने सांभाळली. आमच्या विश्वस्त मंडळाचे श्री. धोपेश्वरकर, श्री. पिसाळ यांनी मौलिक सूचना केल्या. आमच्या सेंटरच्या श्रीमती सुजाता भट यांनी नेहमीप्रमाणेच पुस्तकाच्या अथपासून इतिपर्यंतच्या प्रवासाची जबाबदारी पेलली. साठे प्रकाशनने पुस्तकाच्या छपाईचा कार्यभार सांभाळला. या सर्वांचा ऋणनिर्देश करणे एवढेच मी करते.

सरते शेवटी श्री. विकास आमटे यांचा सन्माननीय ऋणनिर्देश. त्यांचे कार्य आपण सर्व वाचक जाणताच. डॉ. खानखोजेंचे व त्यांचे अनेक वर्षांचे स्नेहबंध! त्यामुळे या पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्याचे त्यांनी मान्य केले आणि ती वेळेत लिहून दिली याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच!

तर आता ‘दुर्दम्य सेवाव्रती’ वाचकांना अर्पण करून थांबते.

**— डॉ. मेधा पुरव सामंत**
**दादा पुरव रिर्सच ॲन्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट**

**महारोगी सेवा समिती, वरोरा**
स्थापना १९४९
मु. पो. आनंदवन,
तालुका: वरोरा, जिल्हा: चंद्रपूर
महाराष्ट्र राज्य, (भारत), पिन : ४४२ ९१४
ई मेल : anandwan@gmail.com दूरध्वनी : ०७१६-२८२०३४
वेबसाईट : www.anandwan.in फॅक्स : ०७१६-२८२१३४

आनंदवन : जुलै १३ – गुरू: ८४०६
चार : जुलै : दोन हजार तेरा.....

सामान्यांचे
असामान्य अमोघ कर्तृत्व ।।

या कथा आहेत...
आपल्याच सभोवती वावरणाऱ्या सामान्य पण असामान्यत्वाचे लेणे परिधान केलेल्या व्यक्तिंच्या...आणि त्यांच्या लोकोत्तर कार्याच्या! त्यांच्याही जीवनात सुख-दु:खाचे डोंगर आले, अपयशाने खचून जाण्याची वेळ आली, अवहेलनेला आणि पराकोटीच्या संघर्षाला सामोरे जावे लागले, निराशेचे कढही त्यांना पचवावे लागले पण ना ते नाऊमेद झाले ना परिस्थितीचा दास! ज्यांच्या अस्तित्वावर समाजाने प्रश्नचिन्ह उभारले त्या घटकांच्या उत्थानासाठी त्यांनी आपले अवघे जीवन समर्पित केले. कर्तृत्वाने असामान्य झालेल्या व्यक्तिंना प्रकाशझोतात आणण्याचे महत्कार्य केले आहे ते स्व.डॉ.दिलीप खानखोजे यांनी!!

**या अनामिक व्यक्तिंत** कामगार वाहतूक संघर्ष समिती स्थापन करून, कचरा वाहतूक करणाऱ्या, हीन दर्जाची वागणूक मिळणाऱ्या असुरक्षित कामगारांची संघटना बांधणारे आणि त्यांना इतरेजनांप्रमाणे प्रतिष्ठेने जीवन जगण्यासाठी अहोरात्र झटणारे **श्री.मिलींद रानडे!** त्यांच्यावर प्रभाव पडला तो कम्युनिस्ट पक्षाचे सर्वेसर्वा दिवंगत कॉ. श्री.अ.डांगे आणि कॉ.दत्ता सामंत यांचा! त्यांच्या प्रभावाने कार्यरत झालेले श्री. मिलींद रानडे असंघटित कामगारांचे आराध्य दैवत झाले. विमान अपघातात पत्नी आणि दोन्ही मुलांच्या निधनाने सर्वस्व गमावलेल्या आंध्र प्रदेशच्या **डॉ. चंद्रशेखर संकुरत्री** यांनी आकाश कोसळले असतानाही स्वत:चे दु:ख बाजूला सारून दारिद्र्यात पिचलेल्या मुलांसाठी उत्तम शाळा काढल्या, शिक्षणाबरोबरच शिस्तीचे महत्त्व त्यांना पटवून दिले. शिक्षणाच्या सुसंस्काराने संस्कारित झालेली ही मुले आज विविध क्षेत्रांत उच्च पदावर विराजमान झाली आहेत. शिक्षणासमवेतच डोळ्यांचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन त्यांनी डोळ्यांचे इस्पितळ उभारले आणि लाखो गरीब रूग्णांच्या जीवनात प्रकाशाचा किरण पोहोचवला. ‘आंध्रप्रदेश सुपुत्र’ हा बहुमान त्यांना देण्यात आल्याने या पुरस्काराची शान अधोरेखित झाली.

‘शाळा-शाळा’ या छोट्या खेळातून प.बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यातील **बाबर अली** या जगातील सर्वात छोट्या वयाच्या शिक्षकाने बालमजूर, कामवाल्या छोट्या

मुलामुलींसाठी शाळा सुरू केल्या...जगाच्या दृष्टीने अननुभवी असलेला तो मोठमोठ्या शैक्षणिक संस्थांना आज लाजवतो आहे. प्लॅस्टिकच्या भस्मासुराला कामाला लावून जाड प्लॅस्टिकचे पेन होल्डर, कागद ठेवायची फोल्डर्स बनवणारी **अनिता अहुजा** आणि तिची 'कंझर्व' ही संस्था, घरोघरी शौचालये बांधून आदर्श गावाची संकल्पना प्रत्यक्षात उभारणारी **श्रीमती मुळा देवी**, 'मोबाइल क्रेश'शी निगडित असलेली **श्रीमती मीरा महादेवन**, उपाशी पोटी...अन्नाला मोताद झालेल्या गरिबांसाठी अन्नदानाचा उपक्रम राबविणारे मदुराईचे **श्री. नारायणन् कृष्णन**, 'माणदेशी फाऊंडेशन' च्या माध्यमातून दारिद्र्यग्रस्त स्त्रियांचे जीवनमान उंचावणाऱ्या **श्रीमती चेतना सिन्हा**, 'बेटर इंडिया' ची संकल्पना राबविण्याचा **श्री.धीमंत** आणि **श्रीमती अनुराधा पारीख** यांचा अभिनव उपक्रम, शेतकऱ्यांनी, शेतकऱ्यांकरता चालवलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे जनक **श्री. पाद्रे**...या साऱ्या व्यक्ती कधी न कधी तरी आपल्या जीवनात येऊन गेलेल्या असतीलही, पण कोणतेही पाठबळ नसताना स्वत:च्या क्षमतेचा, कल्पनाशक्तिचा आणि प्रगल्भ बुद्धिचा वापर करून या व्यक्ती सर्वसामान्य जनतेचे आगळे वेगळे विश्व उभारतात तेव्हा त्यांच्या व्यक्तिमत्वासमोर आणि त्यांच्या कार्यासमोर नतमस्तक होण्यातही आगळे समाधान लाभते.

**स्व. डॉ. दिलीप खानखोजे** यांनी या सर्व व्यक्तिंचा ओघवत्या भाषाशैलीतून करून दिलेला परिचय आणि त्यांच्या लोकोत्तर कार्यावर टाकलेला प्रकाशझोत केवळ डोळे दिपवणारा नसून डोळे उघडावयास लावणारा आहे. या व्यक्ती ना राजकीय नेत्या होत्या ना राजकीय वलय त्यांच्या मागे होते...'दिग्गज'या शब्दाची व्याख्याही त्या जाणत नव्हत्या. त्यांचा जीवनप्रवासही सुकर नव्हता. त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा होता तो प्रवास आणि गाठावयाचे होते ते शिखराचे कळस ! मार्गातील अडथळे, खाचखळगे, गतिरोधक त्यांनाही पार करावे लागले, पण ते त्यांच्या खिजगणतीतही नव्हते, हेच खरे!! सामाजिक सेवाकार्यात येवू इच्छिणाऱ्या होतकरू तरूणाईला मार्गदर्शन करणारे हे साहित्यशिल्प आजच्या तरूणांना समाजकार्यासाठी उद्युक्त करेल...त्यांचेही जीवन या व्यक्तिंच्या कार्याने उजळून निघेल यात शंका नाहीच!!

आनंदवन परिवाराशी अतूट ऋणानुबंध असलेल्या
**स्व. डॉ. दिलीप खानखोजे** यांना आनंदवनातील रुग्ण बांधवांवर - कार्यकर्त्यांवर प्रकाशझोत टाकावयाचा होता...आम जनतेला त्यांचे पैलू उघडून दाखवायचे होते, पण काळाने त्यांना रोखले आणि तेथेच त्यांच्या जीवनाचा प्रकाशदीप शांत झाला.



**डॉ. विकास आमटे,**
**सचिव :** महारोगी सेवा समिती, वरोरा
**सदस्य :** कार्यकारी समिती, 'यशदा', पुणे.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | श्री. आनंदकुमार - 'सुपर थर्टी' | ...१४ |
| २. | श्री. नारायणन कृष्णन | ...२६ |
| ३. | श्रीमती अनिता अहुजा - 'कंझर्व' | ...३४ |
| ४. | श्री. मिलींद रानडे - 'कचरा वाहतूक संघर्ष समिती' | ...४१ |
| ५. | श्री. बस्तु रेगे - 'संतुलन' | ...४७ |
| ६. | श्रीमती मधु सिंघल - 'मित्र ज्योती' | ...५६ |
| ७. | डॉ. संजीवनी केळकर - 'आरोग्यदूत' | ...६४ |
| ८. | श्री. श्रीकृष्ण पाद्रे - 'अडीके पत्रिके' | ...६९ |
| ९. | श्रीमती जेरू बिलिमोरिया - 'चाइल्डलाइन' | ...७६ |
| १०. | श्री. अंशु गुप्ता - 'गूँज' | ...८१ |
| ११. | श्रीमती यज्ञेश्वरन - 'ट्री फॉर फ्री' | ...८९ |
| १२. | डॉ. मधुकर देशपांडे - 'विज्ञानवाहिनी' | ...९७ |
| १३. | बाबर अली | ...१०२ |
| १४. | डॉ. चंद्रशेखर संकुरत्री | ...१११ |
| १५. | श्रीमती चेतना सिन्हा - 'माणदेशी फौंडेशन' | ...११९ |
| १६. | श्रीमती श्वेता गोपालचारी - 'टॉय बँक' | ...१२८ |
| १७. | श्रीमती मुळादेवी | ...१३९ |
| १८. | 'मोबाइल क्रेश' | ...१४५ |
| १९. | श्री. राजा | ...१५२ |
| २०. | 'दि बेटर इंडिया' वेबसाईट | ... १६१ |

# श्री. आनंदकुमार-'सुपर थर्टी'

*गणितात विलक्षण गती असलेल्या पाटण्याच्या श्री. आनंदकुमार यांना केंब्रिजमधील उच्च शिक्षणाच्या संधीवर पैशांच्या अभावी पाणी सोडावे लागले. तेव्हाच त्यांचा विचार ठाम झाला की पैशांच्या कमतरतेमुळे अत्यंत हलाखीतील बुद्धिमान मुलांना उच्च शिक्षणापासून वंचित राहायला लागू नये म्हणून मी मनःपूर्वक प्रयत्न करीन. त्याचे मूर्त स्वरूप म्हणजे त्यांच्या 'रामानुजन् इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिक्स' चा 'सुपर थर्टी' उपक्रम. शेतमजूर, वीटभट्टी कामगार, सायकल रिक्षा चालक अशा अत्यंत कंगाल स्तरातून आलेले विशेष बुद्धिवंत असे तीस विद्यार्थी कडक निकषांवर निवडून त्यांना आय.आय.टी.त प्रवेशाकरता तयार करणे म्हणजे 'सुपर थर्टी'. आठ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या उपक्रमात प्रवेशाकरता दारिद्र्यपीडित वर्गातील सुमारे दहा हजार विद्यार्थ्यांपैकी फक्त तीस निवडले जातात. अंदाजे दहा महिने ते अगदी गुरूकुल पद्धतीवर श्री. आनंदकुमार यांच्याकडे राहतात व रोज सोळा सोळा तास फक्त अभ्यास एके अभ्यास करतात. या काळात त्यांना कसलाही खर्च करावा लागत नाही - अगदी राहण्याखाण्याचाही. ती संपूर्ण जबाबदारी असते श्री.आनंदकुमार यांची. सुरूवातीच्या चार वर्षांतच मिळालेल्या घवघवीत यशानंतर पुढील चार वर्षांत सर्वच्या सर्व म्हणजे तीसच्या तीस विद्यार्थ्यांना आय.आय.टी.त प्रवेश मिळाला. त्यांच्या यशोगाथेची लहानशी झलक म्हणजे हे विद्यार्थी 'नासा' त जाऊन विश्वनिर्मितीचे गूढ उकलण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून आहेत.*



ही कथा आहे एका झपाटलेल्या व्यक्तीची, जिच्या आयुष्याचे सार आहे अतीगरीब वर्गातील बुद्धिमत्तेचा शोध घेऊन अशा मुलांना घासून पुसून त्रिखंडात 'सर्वोत्तम' असा दबदबा असलेल्या आय.आय.टी. संस्थेमध्ये त्यांच्या प्रवेशाकरता प्रयत्न करणे. त्यांचे नाव आहे 'श्री. आनंदकुमार' आणि ते आहेत मागासलेल्या बिहार राज्यातील पाटण्याचे. भल्याभल्यांना त्यांनी आणि त्यांच्या 'सुपर थर्टी' या उपक्रमाने अचंबित केले आहे.

दरवर्षी आनंदकुमार अत्यंत गरीब परिस्थितीतील ३० बुद्धिवंत मुलांना अगदी पद्धतशीर चाचणी परीक्षा घेऊन निवडतात आणि त्यांना आपल्या रामानुजन् इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिक्स संस्थेत दाखल करून घेतात. बिहारमधील सुमारे १०००० मुले या चाचणी परीक्षेला बसतात. त्यातून २०० जण प्रथम चाळणी पार करतात. त्यामधून शेवटचे ३० जण निवडले जातात. आनंदकुमारांच्या देखरेखीखाली आय.आय.टी. प्रवेश परीक्षेकरता या तीस बुद्धिवंतांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या या उपक्रमाला संबोधतात 'सुपर थर्टी'. वशिलेबाजी, राजकारण्यांची लुडबूड वगैरेपासून चाचणी शंभर टक्के मुक्त असते. दोन बाबींचा सुरूवातीसच उल्लेख करणे गरजेचे आहे.

१. फक्त दारिद्र्यपीडित असलेल्या मुलांपुरताच हा उपक्रम मर्यादित आहे. त्यांचे पालक शेतमजूर, सायकलरिक्षाचालक, रस्त्यावरचा कचरा गोळा करणारे किंवा तत्सम वर्गातील असतात. त्यांनी आय.आय.टी. चे नावही कधी ऐकलेले नसते.

२. निवडलेल्या मुलांना दहा-अकरा महिने आनंदकुमारांजवळ राहावे लागते. या काळात या सर्व तीस मुलांची राहणे, खाणेपिणे, वह्यापुस्तके इत्यादीची व्यवस्था व संपूर्ण खर्च ते आपल्या खिशातून करतात. मुलांना हे सर्व मोफत दिले जाते.

पहिल्याच वर्षी, म्हणजे २००३ साली, तीस पैकी अठरा जण आय.आय.टी. प्रवेशपरीक्षा पास झाले. नंतरच्या तीन चार वर्षांत २२ ते २८ विद्यार्थी अशी चढती भाजणी होती. २००८ ते २०१० अशा सलग तीनही वर्षी तीसच्या तीसही मुले आय.आय.टी. करता निवडली गेली. खायची भ्रांत असलेल्या घरातील अशिक्षित किंवा निरक्षर पालकांची समाजातील मागासलेल्या स्तरातील ही मुले विश्वविद्यालय पातळीवर जगातील सर्वात कठीण परीक्षेत एवढे मोठे यश सातत्याने कसे मिळवू शकतात? (आय.आय.टी.च्या

संयुक्त प्रवेशपरीक्षेकरता २०१० साली सुमारे ४,७०,००० परीक्षार्थी बसले होते. त्यातील केवळ तीन टक्के मुले प्रवेश मिळवू शकली. हार्वर्ड, प्रिन्स्टन, येल अशा जगप्रसिद्ध विश्वविद्यालयात प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या इच्छुकांच्या ९ ते १० टक्के एवढी असते.) कोण आहे यामागचा सूत्रधार? यामागचे सूत्रधार आहेत श्री.आनंदकुमार.वय वर्षे ३७. त्यांचा अभेद्य दृढनिश्चय आणि अतीखडतर तपश्चर्येशिवाय असे निखळ सोन्यासारखे झळाळणारे यश पदरी पडणे अशक्यच.

आनंदकुमारांचे वडील टपाल खात्यात कारकून होते. आर्थिक परिस्थिती अगदी तोळामासाच. शाळेपासूनच गणित विषयात त्यांचा अगदी हातखंडा. गणितातील त्यांची गती त्यांच्या प्राध्यापकांच्या नजरेत भरली. पदवी घ्यायच्या आधीच त्यांची ही गणितातील चुणूक परदेशांतही पोचली होती. त्यांनी केलेल्या कामासंबंधित लेख आंतरराष्ट्रीय नियतकालिकांत प्रसिद्ध झाले होते. १९९२ साली, विद्यार्थी असतानाच त्यांनी रामानुजन् या जगप्रसिद्ध गणितज्ञांचे नाव देऊन गणितात रस असलेल्यांकरता एक विनावर्गणीचा क्लब स्थापन केला व तो सर्वांना खुला होता.

आनंदकुमारांनी चांगल्या प्रकारे पदवी मिळवली. त्यांना केंब्रिजसारख्या प्रसिद्ध विश्वविद्यालयात उच्च शिक्षणाकरता प्रवेशही मिळाला होता. पण म्हणतात ना, 'दैव देते आणि कर्म नेते'. त्याच सुमारास त्यांच्या वडिलांचे निधन झाले व त्यामुळे आर्थिक बाजू पार ढासळली. शिष्यवृत्ती वगैरे मिळवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न अयशस्वी ठरले.

एक वेळ अशी होती की त्यांनी त्यांच्या आईने तयार केलेले पापड दारोदारी हिंडून विकले. पण सकाळी पदव्युत्तर महाविद्यालय आणि संध्याकाळी किरकोळ पापड विक्रेता अशा त्रांगड्यात ते डगमगले नाहीत. त्यांनी त्यांच्या क्लबचे परिवर्तन एका शिक्षण संस्थेत केले. तिचे नामकरण 'रामानुजन् इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिक्स' असे ठेवले आणि वेगवेगळ्या स्पर्धात्मक परीक्षांकरता विद्यार्थ्यांना तयार करणे सुरू केले. (विशेष करून गणित व अभियांत्रिकीसंबंधित). त्यांच्या संस्थेत प्रवेश मिळवणे अतिशय कठीण असते. कारण एक म्हणजे शिक्षणाचा अत्युच्च दर्जा आणि दुसरे म्हणजे अत्यंत कमी फी.

त्यांच्या एकट्याच्या स्वप्नपूर्तीवरच समाधान मानण्याइतके ते छोट्या मनाचे नाहीत तर ज्यांना मोठी स्वप्ने पाहणे आजन्म अशक्य आहे, त्यांना ती पहायला लावून ती प्रत्यक्षात उतरवणारे एक द्रष्टे आहेत. अक्षरश: रस्त्यावरच्या गरीब मुलांमधील प्रज्ञा ओळखून त्यांना आय.आय.टी.त प्रवेश मिळवून देणारे ते एक कृपावंत आणि निष्ठावान योगी आहेत. घवघवीत, निखळ कर्मपूर्तीचे दावेदार आहेत.

आनंदकुमारांच्या 'रामानुजन् इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिक्स' चा हेतू आहे – गणिताचा अभ्यास, संशोधन आणि गणित व विज्ञान विषयांत विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांकरता तयार करणे. त्यामुळे हे विषय गुणात्मक रीत्या उच्च दर्जाने विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्यावर त्यांचा भर आहे. याचाच एक भाग म्हणून गणितज्ञ रामानुजन् यांची जयंती दरवर्षी नेमाने साजरी केली जाते. त्यावेळेस गणितावरील समस्यांविषयी सात ते दहा दिवसांची कार्यशाळा घेतली जाते, स्पर्धा आयोजित केल्या जातात.

सुपरथर्टीमध्ये समाविष्ट होऊ न शकलेल्या गरीब मुलांकरता आय.आय.टी.च्या प्रवेश परीक्षेकरता फुकट शिक्षणाचे, १२ दिवसांचे काही वेगळे वर्ग चालवले जातात. इतर प्रवेशेच्छूंनाही वंचित ठेवले जात नाही. फक्त २५ रूपये इतक्या नाममात्र शुल्कावर त्यांच्याकरता हे शिक्षण दिले जाते. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च आणि भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर यांच्या सहकार्याने गणितातील ऑलिंपियाड स्पर्धेसाठीही इन्स्टिट्यूट बुद्धिवंत मुलांना तयार करते. याशिवाय इतर स्पर्धात्मक परीक्षांकरता (गणित व अभियांत्रिकी) विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो तो वेगळाच.

इतर क्लासेसद्वारे बाहेर आकारल्या जाणाऱ्या फीच्या तुलनेत येथील फी फक्त १० ते १५ टक्के इतकी आहे. बाजारभावाप्रमाणे फी आकारणे अगदी सहज शक्य असतानाही व सुपर थर्टी उपक्रमाच्या संपूर्ण खर्चाचा भार उचलत असतानाही अगदी नाममात्र फी आकारली जाते. अनेक गरीब विद्यार्थ्यांकडून कसलीही फी घेतली जात नाही. कितीतरी नामांकित उद्योजकांनी व व्यावसायिकांनी त्यांना देणगीरूपाने व इतर प्रकारची मदत देण्याची तयारी दर्शवली आहे. आनंदकुमार स्पष्टपणे म्हणतात, 'पैसा कमावणे हे माझे उद्दिष्ट नाही. म्हणूनच मी नाममात्र फी घेतो व त्यातच मला आनंद आहे. चांगल्या दर्जाचे शिक्षण मुलांना देणे यासारखे परमसुख मला दुसरे कशातही नाही. मी हाडाचा शिक्षक आहे. त्यामुळे हे काम मला अतीव समाधान देते.' याचा प्रत्यय म्हणजे 'हातच्या कांकणाला आरसा कशाला', असे दर्शवणारी ही दोन उदाहरणे.

१. शंभर जणांच्या वर्गामध्ये बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५०० च्या जवळपास असते.
२. एका उच्चपदस्थाच्या मुलाने गरीब असल्याचे नाटक वठवून क्लासमध्ये भरती होण्याचा केलेला अयशस्वी प्रयत्न.

'सुपर थर्टी' उपक्रमाची सुरूवात होण्यास एक प्रसंग कारणीभूत ठरला. एका गरीब शेतकऱ्याचा मुलगा पूर्ण फी भरू शकत नव्हता. पीक कापल्यानंतर उरलेले पैसे देईन अशी गयावया करीत होता. परीक्षा होती आय.आय.टी. प्रवेशाची. त्या मुलात त्यांनी स्वत:ला पाहिले. केंब्रिजला जाऊ न शकल्याचे नैराश्य त्यांनी पुन्हा एकदा वेगळ्या स्वरूपात पाहिले. गरीबांमधील बुद्धिवंतांची चमक ही झळाळलीच पाहिजे, पैशांअभावी ती अंधारात राहता कामा नये. 'जे मला भोगावे लागले ते इतर होतकरू दारिद्र्यपीडित तरूणांच्या वाट्याला येऊ नये' ही मनातली खदखद जोरात उफळी मारून पुढे आली. तेव्हाच त्यांनी ठरवले की केवळ पैशांअभावी गुणवत्ता वाया जाऊ न देण्याकरता मी ठोस काम करेन.

सुपर थर्टीच्या विद्यार्थ्यांकरता आनंदकुमार जे करतात ते एखाद्या गुरूकुलापेक्षा वेगळे नाही. ही तीस मुले १०-११ महिने दिवसाचे चोवीस तास त्यांच्याकडे राहतात. झपाटल्याप्रमाणे वागतात. सकाळी चार तास अभ्यास, मग तीन तासांची तिन्ही विषयांची चाचणी परीक्षा, मग तीन तास पुन्हा अभ्यास. संध्याकाळी ६ ते ९ पुन्हा वर्गात विषयाचे शिक्षण, मग रात्री दोन वाजेपर्यंत दुसऱ्या दिवशीच्या चाचणीचा अभ्यास, असा भरगच्च कामाचा दिवस कधी संपतो ते मुलांना कळतही नाही. सुपरथर्टीच्या विद्यार्थ्यांच्या राहण्याखाण्याची सोय आनंदकुमारांनी विनाशुल्क केलेली आहे. राहण्याची व्यवस्था जवळच्या वसतीगृहात असते. या तीस मुलांच्या गरजेकडे आनंदकुमार व त्यांचे कुटुंबीय जातीने लक्ष पुरवतात. त्यांच्या दुखण्याखुपण्याकडे व इतर समस्यांकडे त्यांचा भाऊ लक्ष देतो. जेवणाखाण्याची व्यवस्था स्वत: आनंदकुमारांच्या मातोश्री करतात.

तीस मुलांचा तांडा चोवीस तास सांभाळणे ही काही सोपी बाब नव्हे. कोणाच्या काही वैयक्तिक अडचणी असतात. आईवडिलांना सोडून तसेच आपल्या गावापासून दूर अनोळखी वातावरणात ही मुले पहिल्यांदाच राहात असतात. ती लाजरी, बुजरी, भेदरलेली, घाबरट तसेच अंतर्मुख असतात.



बहुतेकांमध्ये सुरूवातीला आत्मविश्वासाचा, धिटाईचा अभाव असतो. एक प्रकारचे दडपणही असते. त्यातून अभ्यासाचा भार मानसिक परिस्थितीवर विपरीत परिणाम करतो, उदा. मानसिक थकवा. या तीस मुलांचे आपापसातील संबंध व एकत्र राहण्यामुळे त्यावर पडणारा ताण अशा निरनिराळ्या समस्यांकडे लक्ष पुरवून मुलांचे संतुलन कायम राखण्याचे कठीण काम आनंदकुमार व त्यांचे भाऊ एखाद्या कसरतीचा अनुभव घेत यशस्वीपणे पार पाडतात. या सगळ्या बाबींचा अभ्यासावर परिणाम होतो याची सतत जाणीव मनात ठेवून ते या मुलांची काळजी घेतात. त्यांचे स्वत्व आणि स्वाभिमान जपतात. त्यांचा आत्मविश्वास वाढवतात. ही खास अशी तारेवरची कसरत करण्यात त्यांना यश मिळते आहे हे निर्विवाद. कारण आजवर एकही जण सुपरथर्टी कार्यक्रम अर्धवट सोडून गेलेला नाही.

आनंदकुमारांकडील १०-११ महिन्यांच्या वास्तव्यात या मुलांना क्षणाचीही उसंत नसते. त्या काळात त्यांचा जगाशी काहीही संबंध नसतो. ते दूरचित्रवाणी पहात नाहीत, वर्तमानपत्रे तसेच नियतकालिकेसुद्धा चाळत नाहीत. सणासुदीलासुद्धा पालकांना भेटायला जात नाहीत. ते स्वत:ला स्वयंअभ्यास, चर्चा, उहापोह, वर्ग, चाचणी परीक्षा, त्याची तयारी यात आकंठ बुडवून घेतात. ही मुले स्वयंप्रेरणेने कष्ट करतात. दिवसाला सुमारे सोळा सोळा तास शिक्षकांकडून तर ते ज्ञान मिळवतातच, पण आपापसातील चर्चा, उहापोह यांद्वारेही ती स्वत:चा फायदा करून घेतात. त्यामुळे वातावरणही अभ्यासाचे व खेळीमेळीचे राहते.

विद्यार्थ्यांना शिकण्यात कायम रस वाटत राहावा व शिक्षण कंटाळवाणे होऊ नये म्हणून सोप्या व शिकण्याची उत्कंठा सतत वाढती राहील अशा प्रकारे शिक्षक शिकवतात. त्याकरता ते खास वेगळे असे कष्ट घेतात, पण ही बाब नजरेआड होऊ देत नाहीत. पारंपरिक पद्धतींचा (घोकंपट्टी, पोपटपंची इत्यादींचा) वापर कटाक्षाने टाळला जातो. संभाषणात्मक पद्धतीने शिकवणे हा 'सुपर थर्टी' चा श्वास आहे. वेगवेगळ्या संकल्पना सखोलपणे समजावून त्यांच्या उपयुक्ततेवर तसेच जगात होणाऱ्या वापरावर प्रकाश टाकला जातो. याकरता रोजच्या जीवनातील उदाहरणे व अनुभव यांचे दाखले विद्यार्थ्यांपुढे ठेवले जातात. इन्स्टिट्यूटच्या मते पाठ्यपुस्तक मुलांना एका विशिष्ट पद्धतीने विषय शिकवते, पण एखादी गोष्ट करण्याचे अनेक मार्ग असू शकतात व ते मार्ग

शोधायचे कौशल्य मुलांमध्ये रूजवण्यावर इन्स्टिट्यूट भर देते. त्यामुळे विद्यार्थी कोणतेही प्रश्न सोडवू शकतात. या पद्धतीने शिकवण्यात शिक्षकांचीही कसोटी लागते. विद्यार्थ्यांनी आपापल्या प्रकारांनी सोडवलेल्या प्रश्नांचा उहापोह करून त्यातील योग्य व बरोबर कोणते व का याची चर्चा करण्याकरता त्यांना सतत जागरूक राहावे लागते. थोडक्यात सांगायचे तर, मुलांच्या विचारशक्तीला पैलू पाडणे हे सूत्र महत्त्वाचे. मुलांना वेगवेगळ्या प्रकारच्या चाचणी परीक्षांना सामोरे जावे लागते. अशा चाचण्या हा विद्यार्थ्यांच्या दिनचर्येचा अविभाज्य घटक असतो. आठवड्याच्या शेवटी दोन मोठ्या चाचण्यांचा सामना त्यांना करावा लागतो. त्या अक्षरश: मेंदूला झिणझिण्या आणणाऱ्या असतात. त्यामुळे मग नंतर आय.आय.टी. प्रवेशपरीक्षा देणे त्यांना फारसे त्रासदायक वाटत नाही. आणि का वाटावे? कारण आनंदकुमार दररोज स्वत:चे चार तास प्रत्येक आठवड्याच्या चाचण्यांकरता नाविन्यपूर्ण व अधिकाधिक आव्हानात्मक प्रश्नसंच तयार करण्यात खर्च करतात. (या कामी पत्नीच्या सहकार्याचा ते मुद्दाम उल्लेख करतात.) या मुलांची चांगली शिकवणी घेणे एवढ्याचपुरत्या समस्या मर्यादित नाहीत. त्याची जाणीव आनंदकुमारना व त्यांच्या सहकाऱ्यांना आहे.

आजही दिवसाकाठी ठराविक वेळ आनंदकुमार स्वत:च्या अभ्यासाकरता व संशोधनाकरता राखून ठेवतात. स्वत:च्या मनन व चिंतनाला ते अपरिहार्य गोष्ट समजतात.आजही अमेरिकेतील एम.आय.टी. या जगप्रसिद्ध विश्वविद्यालयातील त्यांचे मित्र त्यांना निवडक अशा लेखांची कात्रणे नियमित पाठवतात. गणितविषयक आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियतकालिकांकरता एक लेख लिहिण्याचा आटापिटा ते कळकळीने व नित्यनियमाने करतात. अमेरिकेतील गणित व शास्त्रातील दोन अग्रगण्य संस्थांनी त्यांचे गहन चिंतन व विचार ऐकण्यासाठी त्यांना खास करून बोलावले. इंग्लंड व ऑस्ट्रेलियातील नामवंत आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियतकालिकांनी त्यांचे गणितविषयक लेख प्रसिद्ध केलेत.

आनंदकुमारांचे ठाम मत आहे की प्रज्ञावंतांचा शोध दहावी व नंतर या स्तरावर घेण्याऐवजी शाळेतच घेतला जावा म्हणजे आश्चर्यजनक परिणाम दिसून येतील. म्हणून गरीब मुलांकरता शाळा काढण्याचा त्यांचा विचार आहे. त्यामुळे योग्य वयात मुलांचे औत्सुक्य व कुतूहल जागृत होऊन विषयांत गोडी निर्माण होईल. गणित व शास्त्र नाविन्यपूर्ण पद्धतीने शिकवून त्यात मुलांना रस वाटू शकतो. वेगवेगळ्या ऑलिंपियाड परीक्षांकरता तसेच स्पर्धात्मक आव्हानांकरता त्यांना तयार करता येऊ शकेल. गणित शिकवण्याबद्दल ते म्हणतात, ‘यात बरेच काही करता येण्यासारखे आहे.’ फार रूक्षपणे शिकवल्या जाणाऱ्या गणिताबद्दल बऱ्याच विद्यार्थ्यांची स्थिती ‘जमलं तर सूत, नाही तर भूत’ अशी असते. बहुतेक विद्यार्थ्यांनी त्याचा धसका घेतलेला असतो. अभ्यासक्रम लक्षात घेऊन पाठ्यपुस्तकाप्रमाणेच तो शिकवला जातो. गणित का शिकावे व दैनंदिन जीवनात त्याचा काय उपयोग, हे मुलांना नीट समजावले जात नाही. मग नुसती घोकंपट्टी काय कामाची? शिक्षकांनी गणित शिकवताना वास्तववादी राहून विद्यार्थ्यांच्या रोजच्या आयुष्यातील घटनांचा गणिताशी संबंध लावत लावत या प्रक्रियेत सहभागी करून घेतले पाहिजे. त्यामुळे विद्यार्थ्यांची उत्सुकता जागृत होणे सोपे जाते. त्यांची आकलनशक्ती वाढीस लागते, बुद्धीला चालना मिळते आणि गणिताची भीती पळून जाते. ‘सुपर थर्टी’ ला शिकवण्याचा अनुभवच जणू त्यांनी सारांशरूपाने सांगितला आहे.

देशाचे पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंह यांच्या आमंत्रणावरून झालेल्या भेटीत आनंदकुमारांनी सूचना केली की शहरांतील व खेड्यांतील शिक्षणाच्या दर्जात फार फरक असल्यामुळे गरीब व ग्रामीण भागातील मुलांना आय.आय.टी.च्या प्रवेशपरीक्षेस बसण्याची संधी दोनऐवजी तीन वेळा मिळावी. तसेच या परीक्षेच्या निकालाबरोबरच साधारण ५०,००० मुलांची अतिरिक्त गुणवत्ता यादी प्रसिद्ध होते व त्याचा गैरफायदा घेऊन खाजगी क्लासवाले ग्रामीण भागातील मुलांना ती प्रवेश यादी असल्याचे भासवून फसवतात. तेव्हा ही अतिरिक्त यादी प्रवेश यादीनंतर काही दिवसांनी जाहीर करावी. साधारण व हुशार विद्यार्थ्यांकरता वेगवेगळे अभ्यासक्रम असावेत असे त्यांनी सुचवले. तसेच ‘सुपर थर्टी’ च्या धर्तीवर सरकारने फक्त आय.आय.टी. करताच नव्हे पण इतर स्पर्धात्मक परीक्षांकरताही गरीब बुद्धिमान मुलांकरता प्रशिक्षण वर्ग चालवावेत व या मुलांचा सर्व खर्च करावा असे प्रांजळ मत दिले.

इन्स्टिट्यूटने आता चांगलेच नाव मिळवले आहे. तेथील शिक्षणाचा दर्जा असामान्य असल्याची कीर्ती बिहारभर आणि बाहेरही पसरलेली आहे. दोन विद्यार्थ्यांसहित सुरूवात केलेल्या संस्थेत आज प्रवेश मिळावा म्हणून हजारो विद्यार्थी प्रयत्नशील असतात. त्याकरता संस्थेतील अतिशय कमी साधनसामग्री (अपुरी असलेली जागा, कुरकुरणारे बाक इ.) हा अडथळा त्यांना नगण्य भासतो. उभे राहून शिकण्याचीसुद्धा त्यांची तयारी असते.

एकूणच तुटपुंज्या अशा मिळकतीवर ही संस्था चालवली जाते. पाणी तुंबणाऱ्या एका लहानशा गल्लीत, टिनच्या दोन मोठ्या शेडस्‌मध्ये, लाकडी बाकांच्या रांगा असलेल्या अवस्थेत आनंदकुमारांचे वर्ग चालतात. एका बाजूला फळा, जुने जळमटलेले पंखे आणि बाबा आदमच्या जमान्यातील माईक व स्पीकर्स ही त्यांची आयुधे!

संस्थेच्या 'सुपर थर्टी' ची व आनंदकुमारांची कीर्ती जगभर पसरली आहे. डिस्कव्हरी वाहिनीने त्यावर एक तासाचा माहितीपट तयार केला आहे. 'दि न्यूयॉर्क टाइम्स' ने अर्धे पान या उपक्रमाकरता खर्च केले. बी.बी.सी. ने ही त्यांची दखल घेतली.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट या अहमदाबादच्या संस्थेने आनंदकुमारांना मुद्दाम निमंत्रित केले होते. तेथील अनुभवाचे वर्णन आनंदकुमारांनी कॅलिफोर्नियात कथन केले. टाइम नियतकालिकाचा 'बेस्ट ऑफ एशिया-२०१०' हा पुरस्कार 'सुपर थर्टी' ने पटकावला आहे. बिहारच्या मुख्यमंत्र्यांनी दोन वेळा संस्थेला भेट दिली आहे.

आनंदकुमारांच्या भविष्यकालीन योजनांपैकी काहींनी मूर्त रूप घ्यायलाही सुरूवात केली आहे. २०१० सालापासून तीस मुलांपर्यंत सीमित ठेवलेल्या 'सुपर थर्टी' मध्ये एकूण साठ मुलांना प्रवेश दिला जाणार आहे. पंजाब, झारखंड व उत्तरप्रदेशातही हा उपक्रम राबविला जाणार आहे तर आसामातही २०१० पासून सुरूवात झाली आहे. अमेरिकेतील एका फाऊंडेशनच्या मदतीद्वारे पंजाबातही त्याचवेळी 'सुपर थर्टी' चा श्रीगणेशा झाला आहे.

दीर्घ पल्ल्याच्या योजना म्हणजे 'रामानुजन् इन्स्टिट्यूट'ला विश्वविद्यालयाचा दर्जा मिळवण्या इतक्या उंचीवर नेऊन अगदी प्रगत देशांतील संशोधक, विद्वान मंडळी व हुशार विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर आकर्षित करायचे आहे. स्वत:ची इमारत व वसतीगृह असलेली शाळा स्थापन करून तिथे गणित व विज्ञान नाविन्यपूर्ण प्रकारे शिकवायचे आहे व त्यातील काहींना तरी ऑलिम्पियाड स्पर्धांना उतरवायचे आहे.

संस्थेला इतक्या उंचीवर न्यायचे की तिच्या वटवृक्षाची भव्यता पाहून तिला एक विश्वविद्यालयाचा दर्जा दिला जाऊन तेथे दूरवरून (अगदी प्रगत देशांतूनसुद्धा) अभ्यासू मंडळी व विद्यार्थ्यांचा कायम राबता असेल असे त्यांचे दीर्घकालीन स्वप्न आहे.



आनंदकुमारांचे घवघवीत यश इतरांच्या डोळ्यात सलले नसते तरच नवल. प्रवेशपरीक्षेकरता तयारी करून घेणाऱ्या इतर क्लासेसच्या धंद्यावर विपरीत परिणाम झाला. त्यांनी जिवे मारण्याच्या धमक्या वगैरे दिल्या. हल्ल्याचा अयशस्वी प्रयत्नही झाला. क्लासमधील एका कर्मचाऱ्याला भोसकण्यात आले. क्लास बंद पाडू अशी ताकीदही मिळाली. आनंदकुमारांनी या सर्वांकडे दुर्लक्ष केले. आपला मार्ग त्यांनी बदलला नाही. काही झालेच नाही अशा थाटात त्यांनी इन्स्टिट्यूटचे कामकाज चालूच ठेवले. त्यांनी पोलीस संरक्षण मागितले व ते त्यांना मिळालेही. तिथल्या वर्गात प्रवेश मिळण्याच्या प्रक्रियेत काही मोठ्या राजकारण्यांनीही आपापल्या पद्धतीने हस्तक्षेप करण्याचे जोरदार प्रयत्न केले. पण आनंदकुमारांनी प्रकरणे नीटपणे हाताळून ते यशस्वी होऊ दिले नाही.

कोणालाही वाटणे साहजिक आहे की आनंदकुमार संस्था एके संस्था आणि गणित एके गणित करतच आयुष्य कंठत असतील, पण वस्तुस्थिती तशी नाही, हे जाणण्याकरता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या इतर काही पैलूंवर नजर टाकणे आवश्यक आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते कविताही करतात. तबला वादनातही त्यांनी बक्षिसे मिळवली आहेत. तसेच ते विवेकानंद, रामकृष्ण परमहंस, ओशो यांचे लिखाण आवडीने नियमितपणे वाचतात. त्यांना शिकवलेल्या दोन प्राध्यापकांचे स्थान त्यांच्या लेखी द्रोणाचार्यांचे आहे. त्यांचा संस्थेवर कायमरूपी असलेला आशीर्वादरूपी सहवास आनंदकुमारांना मौल्यवान वाटतो.

आय.आय.टी.त जाऊन पास झालेले 'सुपर थर्टी' चे जुने विद्यार्थी संस्थेशी संबंध ठेवून आहेत. त्यांच्यापैकी काहीजण जमेल तसे व जमेल तेव्हा संस्थेत येऊन मुलांना संबोधतात. आय.आय.टी. मधील त्यांच्या विद्यार्थ्यांची उमेद आहे ती अमेरिकेतील 'नासा'त जाऊन जगापलिकडील विश्वाचे विश्लेषण करण्याची. एका निखळ शिक्षकाची याहून अधिक काय अपेक्षा असू शकते? आनंदकुमार म्हणतात, 'केंब्रिज किंवा येलसारख्या प्रख्यात ठिकाणी शिकवण्याची माझी इच्छा होती. पण माझ्या पदरात अपेक्षेपेक्षा जास्त पडले आहे. 'सुपर थर्टी' ने माझ्या आयुष्याची दिशाच बदलून टाकली आहे. आज माझे विद्यार्थी परदेशात मोठमोठ्या विश्वविद्यालयात अधिक उच्च शिक्षण घेत आहेत. मला दुसरे काय हवे?'

'सुपर थर्टी' तून आय.आय.टी.त प्रवेश मिळाल्याच्या बाबीचे गावातल्या समाजावर सर्वदूर परिणाम होतात. एक मुद्दाम नमूद करण्यासारखी बाब म्हणजे

'सुपर थर्टी' द्वारा आय.आय.टी. त प्रवेश मिळवल्यामुळे फक्त तो विद्यार्थी व त्याचे कुटुंबीय यांचेच जन्माकरता भले होते असे नाही. त्याच्या खेड्यात त्या विद्यार्थ्याला एक आदरणीय व्यक्ती म्हणून कौतुकमिश्रित नजरेने पाहिले जाते. त्याचा एक प्रकारचा दबदबा तर वाढतोच, आजूबाजूच्या लोकांमध्ये, वस्त्यांमध्ये वातावरण आनंदी व उत्साही होते. ते एक वेगळीच उभारी देऊन जाते. आमच्यातीलच एकजण एवढ्या उंचीवर पोहोचू शकतो, हे पाहून आपणही काहीतरी मिळवून दाखवू शकतो अशी उमेद व उर्मी इतर मुलांमध्ये जागृत होते. गरीबी, आईबापांची निरक्षरता व असहाय्यता यांतून मार्ग निघू शकतो असा विश्वास त्यांच्यामध्ये निर्माण होतो. सकारात्मक विचारांना दिशा मिळून व्यसनाधीनता वगैरे बाबी दुर्लक्षित होतात. मुख्य म्हणजे 'आम्हाला सर्वांनाही चांगले दिवस येऊ शकतात.' हा विश्वास व दृढ आशा आनंदकुमारांना खेड्यांमधील गरीबांत, अशिक्षितांत स्पष्टपणे दिसून आले आहेत. समाजाला निर्मळ व निरोगी घडविण्यात, अप्रत्यक्षपणे समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेला, अनाहूतपणे का होईना, 'सुपर थर्टी' चा थोडाफार पण निश्चितस्वरूपी हातभार लागतो आहे, हे निर्विवाद.

आनंदकुमार हे रसायनच वेगळे आहे. समाजातील गरीब व तळागाळातल्यांचा शिक्षणाकरता उद्धार करणे, हा जणू त्यांनी घेतलेला वसा आहे. त्याकरता तन, मन, धन अर्पण करून ते त्यातून आयुष्याची सार्थकता मिळवत आहेत. या वर्गाला चांगले दिवस दाखवायच्या, अनोख्या काट्याकुट्यांनी भरलेल्या उपेक्षित वाटेवरून ते मार्गक्रमण करीत आहेत. 'सुपर थर्टी' च्या शिलेदारांना या वाटेची ओळख करून देत आहेत. त्याकरता अत्यंत अशिक्षित वर्गातील पालकांची संमती, त्यांचा मागासलेपणा, आर्थिक विवंचना, मानसिक दौर्बल्य, सामाजिक उपेक्षा, शारीरिक दुर्बलता इत्यादी अडचणींशी यशस्वीरीत्या झगडत यशोशिखर गाठणे हे केवळ अतुलनीय नव्हे तर सामान्यांकरता अनाकलनीयही आहे.

सामाजिक उत्तरदायित्त्वाची इतकी प्रखर जाणीव असलेली उदाहरणे अगदी अपवादानेही किती दिसतात? कितीतरी नामांकित उद्योग व्यावसायिकांनी त्यांना देणगीरूपी व इतर प्रकारची मदत देण्याची तयारी दर्शवली आहे. पण त्यांनी हेतुपुरस्सर त्यांचा स्वीकार केला नाही. त्यामुळे स्वायत्ततेवर मर्यादा येतात व कित्येकदा अनावश्यक व विचारसरणीशी विसंगत अशा गोष्टी स्वीकृत करण्याची



हतबलता अनुभवावी लागते, म्हणून ते यापासून मुद्दामच चार हात दूर राहिलेले आहेत.

त्यांच्या आयुष्यातील परमोच्च क्षण कोणता? जेव्हा 'सुपर थर्टी' मधून यशस्वी झालेला एक मुलगा त्याच्या वीट भट्टीतील मजूर वडिलांना घेऊन भेटायला आला, तेव्हा त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रूंचा पूर वाहू लागला, तो क्षण. त्यांनी आणलेली मिठाई अमृताहून अधिक गोड होती.

❋❋

# श्री. नारायणन कृष्णन

*उपासमार, उपाशी राहायला लागणे, पोटभर खायला न मिळणे वगैरे गोष्टींचा तुमचा आमचा कधी तसा प्रत्यक्ष संबंध येत नाही. आपल्याला त्या ऐकीव गोष्टी असतात. पण आज आपल्या अवती भोवती असे अनेक लोक दिसतात, जे दारिद्र्यपीडित आहेत, कंगाल आहेत, निराधार व बेघर आहेत, रस्त्यावर पडलेले आहेत (त्यात मानसिक संतुलन हरवलेलेही असतात). नातेवाइकांनी व समाजानेही ठोकरलेले आहेत. त्यातले बरेच जण अन्नाला मोताद झालेले असतात. एक वेळच्या खायची देखील मोठी भ्रांत त्यांना असते, पण सामान्य माणसाच्या हातून आपले दैनंदिन रहाटगाडगे सांभाळत अशा गरजूंना दयेपोटी अन्नदानासारखी कृतीदेखील फक्त कधीमधीच घडते.*

*म्हणूनच श्री. नारायणन कृष्णन यांचा पूर्णपणे विनामूल्य अन्नदानाचा उपक्रम अनोखा ठरतो. रोज अशा चारशेहून अधिक लोकांना ते तिन्ही त्रिकाळ सकस, साधे, शाकाहारी अन्न (सकाळचा नाश्ता व दोन वेळचे जेवण) त्यांच्याकडे जाऊन देतात, जे स्वत:हून खाण्याच्या परिस्थितीत नसतात (मानसिक किंवा शारीरिक अवस्थेमुळे). त्यांना ते लहान मुलाप्रमाणे भरवतात देखील. सुरूवातीपासून आजपर्यंत बारा लाखाहून अधिक जेवणे पुरवणाऱ्या या कार्यात ऊन, पाऊस, वादळ, सणवार, सुट्या अशा अडथळ्यांची त्यांनी पर्वा केलेली नाही. इतक्या वर्षांत अगदी एकही वेळच्या जेवणाचा खंड या सेवाव्रतात पडलेला नाही.*

---



'आणि त्या प्रसंगाने माझे आयुष्य बदलून गेले' हे वाक्य अधून मधून आपल्या कानावर पडत असते. असे प्रसंग बऱ्याच मंडळींच्या लेखी नगण्य असतात तर काहींसाठी मात्र ते आयुष्याची दिशाच बदलून टाकतात. आता हेच पहा ना, अन्नान्नदशा झालेले, रोगग्रस्त, असहाय्य, अंगावरच्या कपड्यांचेही नीट भान नाही असे बेघर, विकलांग, वैफल्यग्रस्त कंगाल आपल्याला रस्त्यावर अनेकदा दिसतात. बाब तशी नित्याचीच. 'रोज मरे त्याला कोण रडे !', त्यामुळे लोक तिकडे लक्षच देत नाहीत. जाणाऱ्या येणाऱ्यांच्या खिजगणतीतही ते लोक नसतात. फार तर जाता येता काहीजण त्यांच्यापुढे भिकेचे नाणे फेकतात व पटकन पुढे जातात. कित्येकदा तर कटाक्षसुद्धा न टाकता. या दुर्भागी जिवांचा रस्त्यावरचा मुक्काम ही तर रोजचीच बाब. कदाचित म्हणूनच तुमच्या आमच्या लेखी अती नगण्य. पण ही क्षुल्लक गोष्टच आहे अती महत्त्वाची व अती उदात्त – तुमच्या आमच्यातील एका २९ वर्षांच्या तरूणाकरता, तिने त्याच्या आयुष्याचा आराखडाच परत लिहिला. जीवनाचे गणितच मूलत: बदलून टाकले. त्यांचे नाव आहे श्री. नारायणन कृष्णन.

श्री. नारायणन कृष्णन मूळचे तामिळनाडूमधील मदुराईचे. तुम्हा आम्हाला मदुराई माहीत आहे ते मीनाक्षी देवळाकरता आणि तेथील भव्य गोपुरांकरता. एवढे प्रसिद्ध देवस्थान असल्यामुळे की काय, पण त्या शहरात असहाय्य, निराधार, बेघर, कंगाल वगैरे मंडळींचे अस्तित्व प्रकर्षाने जाणवते. याकडे नेमके लक्ष वेधले गेले ते श्री. नारायणन यांचे. त्यावेळी त्यांचे वय होते जेमतेम २१–२२ वर्षांचे. हुशार, उत्साही व सुसंस्कृत असलेला हा तरूण केटरिंग महाविद्यालयातून बाहेर पडला तो उत्तम यश संपादूनच. पंचतारांकित हॉटेल समूहात बक्षीस जिंकलेला होतकरू कर्मचारी म्हणून त्याला गौरवलेले होते. कारकिर्दीतील पुढचे पाऊल म्हणजे स्वित्झर्लंडमध्ये पंचतारांकित हॉटेलात पटकावलेली मानाची अधिकाराची जागा. तिथे जाण्यापूर्वी आईवडिलांना भेटून जावे म्हणून ओझरत्या भेटीकरता ते मदुराईला आले होते. सहज रस्त्यातून जात असताना त्यांना पुलाखाली एक बेघर, दारिद्र्यग्रस्त, पूर्णपणे उध्वस्त झालेला माणूस अन्नाकरता तडफडत असलेला दिसला. तो इतका अगतिक व असहाय्य होता की आपली स्वत:ची विष्ठा चाचपडून त्यातून काही खायला अन्नाचे कण मिळतात का ते शोधत होता. श्री. नारायणन ते पाहू शकले नाहीत. त्यांच्या हृदयाचे पाणी पाणी झाले. त्यांनी त्याला खाऊपिऊ घातले. त्यांच्यातील अंतस्थ

'माणसा' ने रस्त्यावरच्या त्या जिवात माणूस पाहिला. द्रवणाऱ्या अंत:करणाने जणू काही 'शोधिशी मानवा राऊळी मंदिरी, नांदतो देव हा आपुल्या अंतरी' ही अनुभूती त्यांनी घेतली.

त्या क्षणी त्यांनी पूर्ण आयुष्याची वाटचाल बदलून या स्तरावरील मानवांची अन्नपूर्णेच्या कृपादृष्टीने व तिच्या माध्यमातून आजन्म सेवा करायचे ठरवले. त्याकरता त्यांनी लाथ मारली ऐषोआरामाच्या राशीवर, आयुष्यभर लोळता येईल अशा नोकरीवर व कारकिर्दीवर. ते म्हणतात, 'त्या क्षणी मनात पडलेली ठिणगी आजही अंतरंगात वसत आहे. तिचा तेजस्वीपणा आजही जाणवतो आहे.'

अगदी सुरूवातीला तर प्रत्यक्ष जन्मदात्या आईवडिलांचासुद्धा आपल्या या चिरंजीवांच्या उठाठेवीला पाठिंबा नव्हता. तो असे काहीतरी करतो आहे हे पाहून त्यांचे मन फार व्यथित झाले. त्यांनी नारायणांच्या शिक्षणाकरता खूप पैसे खर्च केले होते, बरेच कष्टही उपसले होते. त्याचे फळ मिळायचा काळ आता आला होता. तो परदेशात जाईल, स्वत:च्या कर्तृत्वावर नाव कमवेल, भरपूर पैसा मिळवेल अशी त्यांची साहजिकच अपेक्षा होती. ऐषोआरामात राहील, मानमरातब मिळवेल अशी परिस्थिती त्यांनी स्वत:च्या हुशारीने व स्वकर्तृत्त्वाने निर्माण केली आहे. मग आता त्यांनी या सर्वांपासून वंचित का म्हणून राहायचे, असा साधा सरळ विचार आईवडिलांनी केला होता. व्यावहारिकपणे जगाच्या दृष्टीने पाहता त्यांचे विचार काही चुकीचे नव्हते. बाकीच्या लोकांसारखी नाकासमोरची धोपट वाट चोखाळून मजेत आयुष्य उपभोगावे एवढी त्यांची अपेक्षा अगदी रास्त होती.

एकीकडे स्वत: तर असहाय्य, दरिद्री मनोरूग्णांच्या सेवेचा वसा घेतलेला व दुसरीकडे आईवडिलांना ते पसंत नाही, अशा कोंडीत श्री. नारायणन पकडले गेले नसते तरच आश्चर्य. एकीकडे अंतर्मनाचा आदेश तर दुसरीकडे मातापित्यांचे विचार यातील विरोधाभासामुळे होणारी मानसिक घुसमट त्यांना स्वस्थ बसू देईना. कसा सोडवायचा हा तिढा? विचारांती त्यांनी ठरवले की आपली मानसिक स्थिती आईवडिलांपुढे मांडायची आणि त्यानंतर सुसंवादाच्या सहाय्याने काही उपाय शोधायचा प्रयत्न करायचा. त्यांनी आईला विनंती केली, अगदी गळच घातली म्हणा ना, की 'तू माझ्याबरोबर संपूर्ण एक दिवस घालव, मी नेमके काय करतो, कशाकरता व कशा प्रकारे करतो ते बघ, माझ्या कामाचे



स्वरूप व आराखडा समजून घे. माझ्या कामाचा फायदा काय व कोणाला होतो ते आपल्या डोळ्यांनी पहा. घरी परत ये आणि त्यावर विचार कर. नंतर आपण साधक बाधक चर्चा करू.' या प्रस्तावाला आईने मान्यता देऊन त्याप्रमाणे मुलाबरोबर संपूर्ण दोन दिवस घालवले. त्या परत आल्या त्या मुळी अंतर्बाह्य बदलूनच. त्यांच्या देहबोलीतून एकच अर्थ तेव्हा निघत होता, 'पुत्र व्हावा ऐसा'. त्यांनी हिरवा कंदील दाखवून सांगितले की 'तू हेच काम करीत रहा. मी तुझ्याबरोबर आहे. तुझी आयुष्यभराची राहण्याखाण्याची सोय करायची जबाबदारी माझी. आगे बढो.'

हितचिंतक, मित्रमंडळी, शेजारीपाजारी वगैरेंना तर जीभ सैल सोडून टीकेचे अस्त्र सोडायला भरपूर वाव मिळाला. त्यांनी नारायणांना वेड्यातच काढले. 'चांगली स्वित्झर्लंडमधली ऐषोआरामाची नोकरी, तिच्यावर पाणी सोडून हे कुठले भिकेचे डोहाळे?' 'डोके ठिकाणावर आहे ना?' 'काय मिळणार आहे यातून? शिवाय एवढे शिक्षण वाया जाणार ते वेगळेच'.'आता ठीक वाटतंय पण काही दिवसांनी भ्रमनिरास होईल तेव्हा समजेल, पण तोवर वेळ निघून गेलेली असेल'.'रोज फुकट खायला मिळाल्याने ही मंडळी सोकावतील.' वगैरे वगैरे. नारायणांनी सर्व या कानाने ऐकले व त्या कानाने सोडून दिले – कामावरचे चित्त अजिबात विचलित होऊ न देता. त्यांच्या लेखी एकच महत्त्वाचे होते, ते म्हणजे अन्नान्न दशा झालेल्या असहाय्य कंगालांच्या पोटात उसळणारा भुकेचा डोंब व तो शमवू पाहणारी लाखमोलाची शिदोरीसकृत अन्नपूर्णा.

आता नारायणन यांचा दिवस सुरू होतो पहाटे चार वाजता. मग होते स्वयंपाकाची सुरूवात. ते व त्यांचे सहकारी मिळून मग शिजवलेले सकस, साधे शाकाहारी अन्न घेऊन देणगी रूपाने मिळालेल्या मोटारव्हॅनमध्ये चढतात. दिवसाला सुमारे १२५ मैलांची रपेट ही मंडळी मारतात. मदुरेच्या उकाड्यात अव्याहतपणे वर्षातील ३६५ दिवस, एका नाष्ट्याजेवणाचाही खंड न करता, ऊन, पाऊस, वादळ अशा निसर्गनिर्मित अडचणींना दाद न देता व दंगेधोपे, दहशतवाद वगैरेंसारख्या मानवनिर्मित संकटांना न जुमानता त्यांचे हे गरीबांना जेवण देण्याचे रोजचे यज्ञकुंड चालूच आहे. सुट्टी, रजा, रविवारी बंद अशी परिभाषा त्यांच्या खिजगणतीतही नाही. सुरूवात केली तेव्हापासून माता अन्नपूर्णेच्या कृपेने सादर होत असलेली त्यांची सेवा अविरतपणे कंगाल, निराधार, मनोरूग्ण इत्यादींच्या ठायी रूजू होत आहे. दोन हजार तीन साली

नारायणन यांनी या उपक्रमाकरता एक विश्वस्त संस्था निर्माण केली, तिचे नाव ठेवले 'अक्षय'. हे नाव त्यांनी काळजीपूर्वक निवडले. अक्षय म्हणजे कधीही नाश न पावणारे, चिरंतन टिकून राहील असे, ऱ्हास न होणारे. कंगालांप्रती वाटणारी सहानुभूती, दया, माया ही अशीच कायमस्वरूपी राहावी हा हेतू मनात ठेवून त्यांनी हे नाव ठेवले. त्यातून त्यांच्या दारिद्र्यपीडितांकरता वाटणाऱ्या भावना तीव्रपणे दिसून येतात. त्यांच्या कार्यामागे व त्याकरता केलेल्या त्यागामागे या भावनाप्रणालीचा मोठा हात आहे यात शंकाच नाही.

चारशे लोकांचा सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण व रात्रीचे भोजन नुसते तयार करणे नाही तर प्रत्येकाला तो जिथे आहे त्या ठिकाणी नेऊन (गरज वाटल्यास त्याला भरवून) देणे ही सोपी गोष्ट नव्हे. कोणी म्हणेल की त्यांनी केटरिंगचे व्यावसायिक शिक्षण घेतल्यामुळे त्यांना हे काम म्हणजे डाव्या हातचा मळ वाटला असणार.

त्यांनी औपचारिक शिक्षण घेतले आहे व त्याचा त्यांना या उपक्रमात उपयोग होत असेल हे काही अंशी खरे असले तरी गोष्टी तितक्या सरळ नाहीत. मोठाल्या हॉटेलात कर्मचाऱ्यांची मदत हाताशी असताना, अद्ययावत साधने व उपकरणे उपलब्ध असताना काम करणे पुष्कळ सुकर असते. पण माणसांचे तुटपुंजे पाठबळ, निधीच्या कमतरतेची टांगती तलवार, साधनसामग्रीची कमतरता, व्यावसायिकपणाचा सहकाऱ्यांतील अभाव या आणि इतर अनेक अडचणींचा रोज सामना करणे म्हणजे महाकर्मकठीणच. शिवाय त्यावर मात करून पुढे मार्गक्रमण करणे हे क्रमप्राप्तच असते.

अतिशय तोकड्या मनुष्यबळावर त्यांनी भाज्या, किराणा माल, इंधन वगैरेची खरेदी, साठवणूक, काटकसरीने वापर, प्रक्रिया, अन्नाचे वाटप, जागेची कमतरता अशा नानाविध व्यवस्थापकीय अडचणींवर विजय मिळवला. अनेकदा अगदी एकहाती. व्यवस्थापन शास्त्रातील अनेक धडे, कौशल्ये व अनुभव यांच्या त्रिसूत्री मिलाफातून त्यांचा जगन्नाथाचा रथ नित्यनेमाने मार्गक्रमण करीत असतो. होणाऱ्या त्रासाची, कष्टाची, अडचणीची वाच्यता ते चुकूनही कुठे करीत नाहीत. त्यांना त्याची आवश्यकता वाटत नाही. ते म्हणतात, 'या लोकांची अन्नपूर्णा देवीच्या कृपेने सेवा करण्यात मला मनस्वी आंतरिक समाधान मिळते. एखाद्या चिरंतन तेवणाऱ्या ज्योतीप्रमाणे त्यातून मिळणारी उर्जा व स्फूर्ती मला जोमाने पुढे जाण्यास उद्युक्त करते.'



'अन्नासाठी दाही दिशा, आम्हा फिरविशी जगदीशा'. श्री. नारायणांनाही तो जगदीश अगदी सकाळ, दुपार आणि संध्याकाळ दाही दिशा फिरवत आहे. पण केवढा फरक आहे जगदीशाच्या या फिरवण्यात! इतरेजनांना तो फिरायला लावतो ते स्वत:च्या पोटाची खळगी भरण्यासाठी, नारायणन यांना तो फिरवतो ते जनता जनार्दनातील पीडितांना अन्न हे पूर्णब्रह्म देण्यासाठी. कंगालांना दाही दिशा फिरायला लागू नये म्हणून. श्री. नारायणन यांचे यथार्थ वर्णन थोडक्यात करायचे तर 'जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले, तोची साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा.' असे करता येईल.

श्री. नारायणन यांचे काम मुख्यत्वेकरून देणग्यांच्या सहाय्याने होते. त्यांच्या उपक्रमाचा रोजचा खर्च येतो सुमारे पंधरा ते साडेपंधरा हजार रूपये. त्यांना मिळणाऱ्या देणग्यांतून सुमारे २२ दिवसांचा खर्च भागतो. राहिलेला खर्च ते त्यांना त्यांच्या आजोबांनी दिलेल्या घराच्या भाड्यातून भरतात. दोन हजार साली त्यांनी आपली सगळी बचत म्हणजे सुमारे सव्वा लाख रूपये या कार्याकरता अर्पण केली. ते अक्षय संस्थेकडून किंवा इतर कोठूनही एक पैसाही पगार घेत नाहीत. त्यांच्या वैयक्तिक गरजा फारच थोड्या असतात. अक्षय ट्रस्टच्या एका साधारणशा स्वयंपाकघरात ते इतर सहकाऱ्यांबरोबर राहतात. आईवडिलांनी त्यांची पूर्ण जबाबदारी घेतलेली आहे. आता त्यांचे लक्ष लागले आहे ते एका मोठ्या गोष्टीकडे – ते सेवा करतात त्या स्तरातील लोकांना निवारा मिळवून देण्याकडे. त्यांनी अक्षय होम्स या नावाने राहायला हॉलवजा जागा बांधायला सुरूवात केली आहे. पैशाच्या अभावी तूर्तास जरी हे काम जोरात होत नसले तरी त्यांची त्यामागची दीर्घदृष्टी, जिद्द व उत्साह वाखाणण्याजोगे आहेत.

दररोज सकाळी व्हॅनमध्ये अन्न भरल्यावर मग शोध सुरू होतो की आता वाटप कसे करायचे. पुलावर, आडोशाला, कोपऱ्यात, छोट्या गल्ल्यांत, लहानशा बोळात, आडवळणाला, चौरस्त्यावर, झोपडपट्ट्यांच्या बाहेर, देवळाच्या आसपास कंगाल वस्तीत ही निराधार, रोगपीडित, व्याधीग्रस्त, कित्येकदा मरणोन्मुख माणसे आढळून येतात. अशा सर्व जागा श्री. नारायणन व त्यांचे सहकारी (ज्यांनी स्वत:ला पूर्णपणे अक्षय ट्रस्टला वाहून घेतलेले आहे) दिवसा तिन्ही त्रिकाळ धुंडाळतात – तीन वेळचे अन्न पुरवण्यासाठी.

गेल्या सात आठ वर्षांत अक्षय ट्रस्टने एकूण १२ लाख नाश्ता, दोन वेळची जेवणे या लोकांना पुरवण्याची सेवा बजावलेली आहे. आजही दिवसाकाठी

४०० पेक्षा अधिक मंडळी या तीनही जेवणांचा लाभ घेऊन आपली भूक भागवतात. त्यातले कित्येक जण स्वत: खाण्यापिण्याच्या स्थितीतदेखील नसतात. अशा वेळेस श्री. नारायणन आपला वेळ खर्च करून त्यांना अन्न भरवण्याचे काम करतात.

कंगवा, कात्री, वस्तरा ही त्यांची आयुधे नारायणन नेहमी जवळ ठेवतात. आपण ज्याला सेवा पुरवतो त्या माणसाला स्वच्छ व निर्मल वाटून त्याने स्वत्वाचा थोडासा का होईना पण सकारात्मक अनुभव घ्यावा व त्यांच्या मनाला जरा उभारी मिळावी हा हेतू. त्यांच्यातील गरजूंना नाभिकाची सेवाही ते प्रदान करतात. त्याकरता त्यांनी केस कापण्याच्या, दाढी करण्याच्या सात आठ पद्धती मुद्दाम शिकून घेतलेल्या आहेत. गरज भासल्यास अगदी प्राथमिक औषधोपचार ते करतात. बरेच मनोरूग्ण व मन अस्थिर असणारे स्वत:ची काळजी घेण्याच्या अवस्थेत नसतात. कुटुंबियांनी त्यांना सोडून दिलेले असते. बऱ्याच जणांना आपली नावेही आठवत नसतात. कुटुंबातील माणसे कोण हे सुद्धा लक्षात नसते. ते अशा अवस्थेत असतात की भीक मागणेही त्यांच्या कुवतीबाहेर असते. काय मदत मागायची हेही त्यांना समजत नाही. प्रत्येकाची प्रतिक्रिया व ती व्यक्त करण्याची पद्धत वेगळी असते. बऱ्याचदा ते श्री. नारायणन यांचे आभारही मानत नाहीत. त्यांना मुळी ते सुचतच नाही. कित्येकदा तारतम्याची वानवा असते.

या साऱ्या बाबींकडे श्री. नारायणन दुर्लक्ष करतात आणि आपल्या कामावर त्याचा परिणाम होऊ देत नाहीत. त्यांचे म्हणणे असे की 'व्यक्ती तितक्या प्रकृती', उलट ते म्हणतात की हे करण्यामुळे त्यांना काम करायला उत्साह व स्फूर्ती मिळते. मिळणाऱ्या आंतरिक समाधानामुळे ते अधिक ताजेतवाने होतात. 'भुकेच्या धगधगत्या आगीमुळे भुकेल्यांच्या पोटी उसळू पाहणारा डोंब आम्ही शमवतो. त्यांच्या आत्म्यांच्या हाकेला आम्ही प्रतिसाद देऊन त्यांना तृप्त करतो. हे आमच्या लेखी सर्वात महत्त्वपूर्ण आहे.' असे ते म्हणतात.

सीएनएन ही अमेरिकेतील दूरचित्रवाणीची आंतरराष्ट्रीय वाहिनी दरवर्षी 'हिरो ऑफ दि इयर' या जागतिक स्पर्धेचे आयोजन करते. समाज जीवनात उल्लेखनीय कामगिरी करून आपल्या समाजसेवेचा खोलवर ठसा उमटवणाऱ्या सामान्य माणसाला तो प्रदान केला जातो. त्याकरता जगभरातील लोकांनी पसंती दाखवायची असते आणि हे मतदान सर्वांसाठी खुले असते. जगभरातील हजारो समाजसेवक यात भाग घेतात आणि त्यातील फक्त १० जणांची निवड शेवटच्या



फेरीकरता केली जाते. या दहा जणात स्थान मिळवणे हा जागतिक स्तरावरील फार मोठा बहुमान समजला जातो. २०१० सालच्या स्पर्धेत भाग घेणाऱ्यांची संख्या होती दहा हजारांहून अधिक. अखेरच्या फेरीत निवड झालेल्यात एक होते भारताचे श्री. नारायणन कृष्णन. त्यांना मिळालेली २५,००० डॉलर्सची रक्कम ते अक्षय ट्रस्टच्या कामाकरता वापरत आहेत.

असे आहे नारायणन या विभूतीचे अविरत चालणारे सेवाव्रत.

❋❋

# श्रीमती अनिता अहुजा -'कंझर्व'

*प्लास्टिकचा भस्मासूर सर्व मानवजातीच्या मानगुटीला बसलेला आहे. पर्यावरणवादी त्याच्या गंभीर परिणामांची जागरूकता वृद्धिंगत करण्यात आपापल्या परीने कोणतीही कसर सोडीत नाहीत. त्याचा फारसा सर्वदूर परिणाम झालेला दिसून येत नाही. प्लास्टिकचा समूळ नाश जरी करता येत नसला तरी त्याचा उपयुक्त ठरेल अशा प्रकारे पुनर्वापर करता येईल का? दिल्लीच्या श्रीमती अनिता अहुजा या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी देतात. कचऱ्यात फेकलेल्या प्लास्टिकच्या पिशव्यांवर प्रक्रिया करणारी स्वत:ची अशी पद्धत त्यांनी शोधून काढली. या प्रक्रियेद्वारे त्या प्लास्टिकच्या पिशव्या वितळवून त्याचे हँडमेड रिसायकल्ड प्लास्टिक तयार करतात. त्यापासून स्वत:च्या वर्कशॉपमध्ये त्या नाना प्रकारच्या आकर्षक वस्तू बनवतात. त्यांच्या या वस्तूंना परदेशात मोठी मागणी आहे.*

*हे प्रयत्न म्हणजे प्लास्टिकच्या विळख्यावर प्रत्यक्ष हल्ला करणारी जनसेवाच. श्रीमती अहुजा हे काम एक सामाजिक उपक्रम या दृष्टीने राबवतात. कचरा वेचणाऱ्या व उपक्रमातील इतर कामगारांच्या कल्याणाकडे त्या डोळ्यात तेल घालून मुद्दाम सतत लक्ष देतात. वानगीदाखल सांगायचं तर येथील कामगारांना बाहेरच्या मजुरांना मिळणाऱ्या वेतनाच्या तिप्पट पगार मिळतो. त्यांच्या मुलांना शिष्यवृत्त्या दिल्या जातात. त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते.*

---



साल १९९८. दिल्लीच्या राज्य सरकारने भागीदारी मोहीम सुरू केली, ज्याद्वारे रहिवाशांना नागरी उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले गेले. त्याला प्रतिसाद म्हणून श्रीमती अनिता अहुजा व त्यांचे पती यांनी 'कंझर्व' ही संस्था मित्रांच्या सहकार्याने सुरू केली. सुरूवातीला त्यांनी कचरा व्यवस्थापनावर कार्यशाळा व शिबिरे भरवणे चालू केले. अहूजांनी रहिवासी कल्याण संघटनांच्या समन्वयाने आसपासच्या वसाहतींतून कचरा एकत्र करणेही सुरू केले. या प्रयत्नात काही यश मिळाले नाही. पण कचऱ्यात फेकलेल्या प्लास्टिक पॉलिथिनच्या बॅगांचा वापर करून काहीतरी करता येईल, हा अंदाज अहुजा यांना आला. पुढची दोन वर्षे त्यांनी या बॅगांच्या प्लास्टिकचा पुनर्वापर करण्यावर खूप प्रयोग केले. त्यांच्या ध्यानी आले की जाड प्लास्टिकचे पेनहोल्डर, कागद ठेवायची फोल्डर चांगली बनतात. त्यांना जाणवले की त्यांच्या या उत्पादनाला मागणीही चांगली होती.

एकट्या दिल्ली शहरात ४००० टनांपेक्षा अधिक कचरा तयार होतो आणि त्यात १५ टक्के प्लास्टिक असते. प्लास्टिकमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो. सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिन्यांत अडथळा निर्माण होऊन त्या तुंबतात. आसपास घाणीचा प्रादुर्भाव वाढतो. नद्यांचे पाणी दूषित होते (खास करून शहरांच्या जवळ).

अहुजांच्या 'कंझर्व' ने एका दगडात दोन नव्हे तर पाच पक्षी मारले आहेत.

१. कचरा या अगडबंब प्रकाराला प्लास्टिकपासून मुक्त करायचे काम हाती घेतले.
२. प्लास्टिक बॅगांपासून पर्यावरणाला मुक्त करण्यास पाऊल उचलले.
३. वाया म्हणून टाकून दिलेल्या प्लास्टिकच्या कचऱ्याचा पुनर्वापर करून चांगल्या दर्जाच्या उपयोगी वस्तू तयार केल्या.
४. गरीब स्तरातील (कचरा उचलणाऱ्या) लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.
५. त्यांची पिळवणूक न करता त्यांचा आत्मसन्मान जपून राहणीमान सुधारावे म्हणून त्यांना बाहेरच्यांपेक्षा तिप्पट पगार व इतर सुविधा दिल्या.

प्लास्टिकचा पुनर्वापर किफायतशीर ठरत नाही हा अनुभव असतानाही त्या या आटापिटीत पडल्या व यशस्वी होत चालल्या आहेत, त्याला काही कारणे

आहेत. सगळ्यांनी वापरून घिसा पिटा झालेला मार्ग त्यांनी चोखाळला नाही. इतरांनी विकण्यासाठी तयार केलेल्या वस्तूंपासून त्या लांब राहिल्या. वापरलेल्या प्लास्टिक पिशव्यांवर प्रयोग करून त्यांनी स्वत: विकसित केलेल्या तंत्रज्ञानाने मोठमोठे एकसंध प्लास्टिकचे तागे त्या तयार करतात. त्याचे पेटंट मिळवण्याच्या त्या प्रयत्नात आहेत. एका वेगळ्या प्रक्रियेने त्या या बॅगा वितळवून एकत्रित करतात. त्यातून वेगवेगळ्या जाडीचे टिकाऊ प्लास्टिक बाहेर पडते. 'कंझर्व' कडे हे काम करणारी बारा यंत्रे आहेत. प्रत्येक तागा हा दुसऱ्यापेक्षा वेगळा असतो (जाडपणा, रंग वगैरे बाबतीत) व आवश्यकतेनुसार त्यात बदल केला जातो. प्रत्येकापासून निरनिराळ्या प्रकारची उत्पादने आणि वस्तू तयार केल्या जातात, उदा. दैनंदिनीची वेष्टणे, बॅग्ज, रेनकोट, छत्र्या, फायली व त्यांची वेष्टणे, पायताणे ठेवायची कपाटे, सामान ठेवायच्या पेट्या, टेबलमॅटस्, कोस्टर्स इ.

'कंझर्व' जी उत्पादन प्रक्रिया वापरते त्याला उर्जा कमी लागते इतकेच नव्हे तर रंग व इतर रसायनांचा वापर फार कमी करावा लागतो. त्यामुळे ती किफायतशीर तर आहेच पण प्रदूषणही होऊ देत नाही. लोकांनी निरूपयोगी म्हणून रस्त्यावर फेकून दिलेल्या, वाया गेलेल्या प्लास्टिकच्या बॅगांपासून श्रीमती अहुजांनी आधुनिक व फॅशनेबल अशा निरनिराळ्या वस्तू बनविल्या, ज्यांना परदेशातही उच्चभ्रू लोकांत, मोठमोठ्या मॉल्समध्ये खूप मागणी आहे.

तंत्रज्ञान व मानवी श्रम तसेच कौशल्य यांची पूरक अशी सांगड घालत, उद्योगधंदा व्यावसायिक पद्धतीने चालवण्यावर श्रीमती अहुजांचा भर आहे. आज 'कंझर्व' ने तयार केलेल्या हॅंडबॅग्ज, पर्सेस वगैरेंना लंडन, पॅरीस व इतर मोठ्या पाश्चिमात्य शहरांतून उच्चभ्रू वर्तुळात चांगली मागणी आहे. भारतातही त्यांना भरपूर मागणी आहे. पाच वर्षांपूर्वी फक्त हॅंडबॅग्जची त्यांची विक्री होत होती महिन्याला ४००० नग. उद्योगधंद्यातील व्यावसायिक चातुर्याची व सामाजिक बांधिलकीची जाण सतत ठेवून श्रीमती अहुजांनी या दोन्हीचे दुर्मिळ संतुलन साधण्याचा हेतू प्रयत्नपूर्वक जपला आहे.

'कंझर्व' करता प्लास्टिकच्या, कचरा म्हणून फेकलेल्या बॅगा गोळा करणे, त्यांचे वर्गीकरण करून त्या स्वच्छ करणे व त्यांचे वजन करणे या कामांकरता स्त्रियांना नोकरीवर ठेवलेले आहे. सुमारे ३०० जणी तेथे काम करतात. त्यांना महिन्याला सुमारे ३००० रुपये पगार दिला जातो. अशा कामाकरता त्यांना इतरत्र मिळणाऱ्या पैशांच्या तुलनेत हा पगार खूपच जास्त आहे. त्यामुळे त्यांना



अधिक सुरक्षितता मिळते, आत्मसन्मानाचे जगणे शक्य होते व स्वत:ची अशी एक ओळख निर्माण होते.

कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी श्रीमती अहुजा यांनी वेगळी केंद्रे उघडली आहेत. कचरा उचलणाऱ्या स्त्रियांचे स्वयंसेवी बचत गट स्थापन केले. त्यांच्यात निर्णयक्षमता वाढीस लागत आहे व त्या स्वतंत्रपणे विचार करू लागल्या आहेत. त्या स्त्रियांपैकीच त्या स्वत: एक आहेत अशी भावना निर्माण करण्यासाठी व त्यांच्यातील दरी मिटवण्यासाठी त्या प्रयत्नशील असतात.

कचरा उचलणाऱ्यांचे सामूहिक गट तयार करून, आपले तंत्रज्ञान त्यांना वापरायला देऊन तयार होणारे प्लास्टिकचे तागे 'कंझर्व' विकत घेते (बाय बॅक व्यवस्था). त्यांना मालाचा दर्जा उत्तम राखण्याबद्दल व युरोपीय बाजारपेठेतील बदलत्या फॅशन्सविषयी त्या प्रशिक्षण देतात.

शहरातील निरनिराळ्या भागांतून ३०० पेक्षा जास्त मजूर प्लास्टिक गोळा करतात. प्रत्येकजण दिवसाला सुमारे ४५ किलो प्लास्टिक पिशव्या जमवतो. या मजुरांकडून हा कचरा गोळा करून पुढील प्रक्रियेसाठी आणण्याच्या कामावर श्रीमती अहुजा यांनी ५० माणसे नेमलेली आहेत. त्यानंतर या पिशव्या फाडून त्यांना आकाराने सलग व सरळ केले जाते. मग साबणाच्या पावडरने स्वच्छ धुवून सुगंधी पाण्यात बुडवून ठेवले जाते व सूर्यप्रकाशात वाळवले जाते. त्यानंतर त्यांना ठरलेल्या पद्धतीने मांडून विशिष्ट प्रकारे तापवून वितळवले जाते व नंतर एकसंध करून थंड केले जाते. त्यातून मग बाहेर पडते ते हाताने केलेले व पुनर्वापर झालेले प्लास्टिक (हॅंडमेड रिसायकल्ड प्लास्टिक), त्याला एचआरपी म्हणतात. असा एक यार्ड लांबीचा तुकडा तयार करायला प्लास्टिकच्या ८० ते १०० पिशव्या लागतात. श्रीमती अहुजांच्या भविष्यकालीन योजना म्हणजे उत्पादनक्षमता वाढवणे, १० लाख मीटरचे प्लास्टिकचे तागे तयार करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करणे, नोकरांची संख्या ५०० वर पोचवणे, आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदाराबरोबर चाललेली बोलणी यशस्वी करून निधी मिळवणे, त्यांचा व्यवसाय करण्याचा नमुना भारतात इतरत्र पसरवणे, युरोपातील दुकानांच्या साखळ्यांच्या माध्यमातून किरकोळ विक्रीच्या संधी वाढवणे इत्यादी आहेत.

श्रीमती अहूजांच्या जीवनावर त्यांच्या वडिलांचा खूप प्रभाव पडला आहे. इंग्लंडमध्ये राहून त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात हिरिरीने भाग घेतला होता. जगातील अनेक आदर्शवत् व महान व्यक्तींच्या कार्याबद्दलचे विवेचन ते लेकीपुढे

मांडत असत. आजूबाजूच्या समाजात सुधारणा घडवून आणण्यास व आपल्या सुस्थितीचा कमनशिबी लोकांना फायदा मिळवून देण्यास त्या उत्सुक असायच्या. त्यातून स्फूर्ती घेऊन, महाविद्यालयात असताना त्या भारताच्या विद्यार्थी फेडरेशनमध्ये गेल्या.

कालांतराने त्यांनी आधुनिक भारतात हिंदू मुसलमानांचे संबंध या विषयावर पुस्तक लिहिले. आयआयटीतून अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेले त्यांचे पती त्यांना कायम प्रोत्साहन देत असतात व संस्थेच्या व्यावहारिक बाजूकडे लक्ष देतात.

प्लास्टिकच्या पुनर्वापराच्या अनेक परिणामांबद्दल तसेच 'कंझर्व' च्या उपक्रमांसंबंधी त्यांनी निरनिराळ्या देशांत जाऊन प्रबोधन केलेले आहे. त्यांना मिळालेला प्रतिसाद उत्तेजनात्मक असतो.

श्रीमती अहुजा म्हणतात, 'रोज वाया म्हणून टाकून दिलेला आणि निरूपयोगी समजला जाणारा कचरा आमची संस्था पिंजून काढते. आम्ही त्यातून प्लास्टिक वेचून त्यातून जणू सोने काढतो.'

आतापर्यंत 'कंझर्व' ने पावणेदोन लाखाहून जास्त वस्तू तयार करून विकलेल्या आहेत. सन २००६-०७ मध्ये मिळालेल्या तीन लाख डॉलर्सपैकी निम्मी रक्कम धंद्यात गुंतवली गेली. त्याचा विनियोग कचरा वेचणाऱ्या मुलांकरता शाळा चालवण्याकरता केला गेला. सुमारे २०० मुलांना त्याचा फायदा मिळाला.

एके काळी कचरा गोळा करणाऱ्या व उत्पादित होणाऱ्या वस्तूंच्या दर्जावर काटेकोर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वाचे काम करणाऱ्या बाई म्हणतात, 'मी येथे सात वर्षे आहे. इतक्या आनंदात सगळे काही चालले आहे की 'कंझर्व' सोडून जाण्याचा माझा कोणताही इरादा नाही.' 'कंझर्व' च्या कामामुळे राजधानीतील रस्ते स्वच्छ होण्यास तर मदत होतेच पण कचरा उचलणाऱ्यांना जास्त पगार व आत्मसन्मान मिळतो.

कचऱ्यातील प्लास्टिक बॅगांचा नियमित पुरवठा मिळणे, ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही हे श्रीमती अहुजांच्या लक्षात आले. कचऱ्याचा पुनर्वापर करण्याचे काम काही कंत्राटदारांच्या हातात केंद्रित झालेले आहे. प्रत्येक मोहल्ल्यातील मोठ्या कचराकुंड्यांवर त्यांचे नियंत्रण आहे. त्यांची परवानगी असलेलेच कचऱ्याचे ढीग उपसू शकतात. संरक्षण म्हणून हातमोजे वापरणे, नाक तोंड झाकणे या प्राथमिक बाबींपासून हे मजूर वंचित असतात आणि



कंत्राटदारांना याच्याशी काही देणे घेणे नसते. कोणत्याही बाहेरील व्यक्तीला या सर्वात शिरकाव करणे जवळपास अशक्यच असते. दिल्लीतील या टग्या व मस्तवाल कंत्राटदारांनी तसेच नोकरशाहीने श्रीमती अहुजांशी अघोषित भांडणच सुरू केले होते. श्रीमती अहुजांनी दिल्ली सरकारच्या परवानगीने आपल्याकरता कचरा उचलणाऱ्या मजुरांना ओळखपत्रे दिली. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांची संमती मिळवली, तेव्हा कुठे त्यांना शिरकाव मिळाला.

तसं पाहिलं तर व्यावहारिक दृष्ट्या पॉलिथिनचा व त्याच्या बॅगांचा वापर संपूर्णपणे बंद करणे ही जगाच्या आवाक्यातली गोष्ट आहे का? आज याचे प्रामाणिक उत्तर 'नाही' असेच आहे. तो बंद करायचा प्रयत्न जरूर व्हावा, अगदी युद्धपातळीवर व्हावा. पण जोवर हे शक्य होत नाही तोवर या राक्षसाचे काय करायचे?त्यावर प्रक्रिया करून पुनर्वापर करावा हा विचार जर गंभीरपणे अंमलात आणला तर काही अंशी तरी का होईना ते एक सकारात्मक पाऊल ठरेल.

आनंदवनात डॉक्टर विकास आमटे यांनी ही कल्पना प्रत्यक्षात उतरवून मोठ्या खुबीने हा मुद्दा सिद्ध करून दाखवला आहे. श्रीमती अहुजांच्या पुनर्वापराच्या यशस्वी प्रयत्नामुळे डॉक्टरांच्या क्रियाशीलतेला पुष्टीच मिळते. दिल्ली महानगरपालिकेचे कामही तेवढे हलके होते हा एक फायदा वेगळाच.

संस्थेने दिल्लीत शोरूम उघडलेली आहे, तेथे संस्था वेगवेगळ्या वस्तू कशा बनवते ते प्रत्यक्ष पहायला मिळते. यात कामातील पारदर्शकता लोकांपुढे मांडणे हा भाग तर आहेच, परंतु त्याचबरोबर ग्राहकांच्या मनात डोकावणाऱ्या गर्भित शंकांचे निरसन स्पष्टपणे करणे हेही तितकेच खरे. 'कंझर्व' ने इतरही नवीन वस्तूंचे उत्पादन करून ते त्यांची विक्रीही करीत आहेत. उदा. बूट, नकली दागदागिने इ. बॅगा व इतर वस्तू तयार करण्याच्या प्रक्रियेला एक कौशल्य व कलाकुसर अशी ओळख सरकारने मान्य करावी या प्रयत्नात श्रीमती अहुजा आहेत. प्लास्टिकची शिलाई करणारी एक डझनाहून अधिक यंत्रे संस्थेकडे आहेत. प्लास्टिक पिशव्यांच्या बरोबरीने 'कंझर्व'रबर, डेनिमचे कापड, गाड्यांचे सीटबेल्टस, साड्या इत्यादी वस्तूही वापरून वस्तू तयार करते. त्यांचा उपयोग आकर्षक डिझाइन्स व फॅशन्स निर्माण करण्याकरता समर्पकपणे केला जातो.

'कंझर्व' ने एक फिरता दवाखाना आपल्या कर्मचाऱ्यांकरता उपलब्ध करून दिलेला आहे. एका व्हॅनमध्ये औषधे व रूग्णाकरता पलंग इत्यादी अत्यावश्यक सोयी उपलब्ध आहेत. कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांची नियमित

वैद्यकीय तपासणीही हा दवाखाना करतो. या कचरा मजुरांना बाहेर मिळणाऱ्या पगारापेक्षा तिप्पट पगार 'कंझर्व' देते त्यामुळे ते विटांच्या पक्क्या घरात राहू शकतात, तसेच चांगले पोटभर जेवू शकतात. यावर संस्थेचे बारीक लक्ष असते. त्यांच्या मुलांकरता शिक्षणाची सोय संस्थेने विनामूल्य केलेली आहे. या मजुरांनी कायम कचरा उचलण्यातच खितपत पडू नये म्हणून संस्थेने त्यांच्या सगळ्या कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाची सोय केलेली आहे. त्यांनी आत्मसात केलेल्या नवीन कौशल्याप्रमाणे व संस्थेला गरज असेल त्याप्रमाणे कचरा मजुरांना त्या कामातून काढून इतर चांगल्या कामात टाकले जाते. उदाहरणार्थ, या वस्तू तयार करण्याच्या प्रक्रियेत, कार्यालयात, पार्किंगच्या कामात, विक्री विभागात वगैरे. त्याचा मोठा फायदा म्हणजे कचरा मजूर असा त्यांच्यावर बसलेला शिक्का कायमचा पुसला जातो.

दिल्ली शहरात कचऱ्याची विल्हेवाट लावणाऱ्या दीड लाख मजुरांना कायदेशीर 'स्वयंरोजगारी' म्हणून मान्यता मिळालेली नाही. ते करीत असलेल्या अत्यावश्यक परंतु हलके समजल्या जाणाऱ्या कामाला योग्य ती स्वीकृती व आदर मिळावा या हेतूने त्यांचे अधिकृत नोंदणी पुस्तक करण्याची मागणी 'कंझर्व' सातत्याने करीत आहे. कचरा कामगारांचे नोंदणी पुस्तक नसल्यामुळे त्यांना कायदेशीर अधिकृतता मिळत नाही, ती या नोंदणीपुस्तकाद्वारे मिळेल. नोंदणी पुस्तकाची मागणी पुढे नेण्याकरता 'कंझर्व' जिवापाड प्रयत्न करीत आहे, संबंधित मंत्रालयाकडे व उच्चपदस्थांकडे सतत रेटा लावून आहे.

'कंझर्व' हे नेमके कोणते रसायन आहे? उच्चभ्रू लोकांची हाय फाय प्रकारची गरज भागवणारी संस्था की एक स्वयंसेवी संस्था? अहुजा दांपत्याचे म्हणणे असे की ती एक स्वयंसेवी संस्थाच आहे, जी समाजकल्याणाकरता काम करते. याचा पुरावा म्हणजे त्यांना मिळणारा नफा ही संस्था आवर्जून समाजोपयोगी कामांकरता वापरते.

❃❃



# श्री. मिलिंद रानडे - 'कचरा वाहतूक संघर्ष समिती'

*शहरात कचरा वाहतूक करणाऱ्या मजुरांचे काम सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य यांच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहे ते अधोरेखित करण्याची आवश्यकता नाही. असे अनिवार्य काम करूनही त्यांच्या जीवनस्तराची पातळी किती हीन दर्जाची आहे याची पांढरपेशा मंडळींना पूर्ण कल्पना येणार नाही. समाजाचे एक उपेक्षित अंग म्हणून त्यांचे आयुष्य अधिक सुकर कसे करता येईल हा मुद्दा कळीचा आहे. पण समाजात एकूणच त्याबद्दल मोठी अनास्था आहे.*

*या पार्श्वभूमीवर श्री. मिलिंद रानडे यांची ङ्ककचरा वाहतूक संघर्ष समिती ङ्खङ्ख या लोकांचे जीवनमान सर्वार्थाने उंचावण्याचा अथक प्रयत्न करीत आहे. या कामगारांना सुसंघटित करून अन्याय्य प्रस्थापित पद्धतींशी त्यांचा झगडा सुरूच आहे. त्यांच्या प्रयत्नांना काही प्रमाणात यश आलेले दिसत असले तरी अजून मोठा पल्ला गाठायचा आहे. ते मार्गक्रमण मुळीच सोपे नाही, याची पुरेपूर जाणीव श्री. मिलिंद रानडे यांना आहे.*

---

श्री. मिलींद रानडे यांची कचरा वाहतूक संघर्ष समिती ही राजकीय पक्षांपासून मुक्त असलेली, वेगळ्या प्रकारची कामगार संघटना आहे – अस्पृश्य अशा कचरा वाहतूक करणाऱ्या कामगारांची.

तसे पाहिले तर मुख्य प्रवाहातील मजूर संघटनांच्या ती खिजगणतीतही नाही. कदाचित अस्पृश्य सभासदांचा मोठ्ठा कळप पाहून त्यांनी दुर्लक्ष केले असावे.

पण श्री. रानडे यांनी या वर्गातील कामगारांचे आरोग्य, सर्वसाधारण कल्याण व वाटाघाटींची क्षमता सुधारायचा प्रयत्न करीत, हलक्या दर्जाचे काम करणाऱ्या कामगारांच्या प्रस्थापित सद्यस्थितीला आव्हानच दिले आहे.

समाजाने व सरकारने त्यांना कायद्याप्रमाणे समान व उपयुक्त नागरीक समजावे ही रानडेंची मनापासूनची कळकळ आहे. त्यांच्यामुळे व या समितीमुळे अयोग्य कंत्राट पद्धतीखाली काम करणारी ही मंडळी आज मुंबईच्या मुख्य प्रवाहातील मानवी हक्क, मजूर वगैरे विषयातील तज्ज्ञ वकिलांशी, समुपदेशकांशी, प्रस्थापित मजूर गटांशी संवाद साधू शकतात. शिवाय समिती त्यांना त्यांच्या गंभीर समस्यांवर (उदा. दारूचे व्यसन, निरक्षरता, घरातील भांडणे व मारामारी इ.) विचारविनिमयाकरता संधी उपलब्ध करून देते.

ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या म्हणण्यानुसार, भारतात या कामगारांना हवे तसे वागवणे सहज शक्य आहे. उदाहरणच द्यायचे तर अगदी रोजगाराच्या नियमांपासून सुरूवात होते. मुंबईत त्यांच्या कामाचा मोबदला देते महानगरपालिका, पण ते सार्वजनिक कर्मचारी नसल्यामुळे काही सेवाशर्तींपासून वंचित राहतात. कंत्राटाच्या शर्ती व नियमांनुसार महापालिकेने ते भाड्याने घेतलेले किंवा कंत्राटदारांनी पुरवलेले मजूर असतात. नगण्य वेतनात अत्यंत निष्ठुर कामाच्या परिस्थितीत त्यांना निर्धारित वेळेपेक्षा अधिक तास काम करावे लागते. पाळीव प्राण्यांचे मृतदेह, मानवी विष्ठा, इस्पतळातील घाण व कचरा अशा कल्पनाही करू न शकणाऱ्या गोष्टी ते नियमितपणे हाताळत असतात.

श्री. मिलिंद रानडे यांच्या मनात कामगारांच्या हक्कांबद्दलचे विचार लहानपणापासूनच घोळत असत. राजकीय पार्श्वभूमी असलेले आजोबा आणि स्थानिक कामगारांना संघटित होण्यास मदत करणारी शिक्षिका आई ही त्यांची स्फूर्तीस्थाने होती. विद्यार्थीदशेत ते साम्यवादी नेते श्रीपात अमृत डांगे यांच्या नेतृत्त्वाने खूप प्रभावित झाले होते.

कामगार नेते दत्ता सामंत यांनी गिरणी कामगारांच्या संघटनेचे नेतृत्व केले तेव्हा ते मुंबईत अभियांत्रिकीचे विद्यार्थी होते. ते व त्यांचे मित्र मुंबईतील गरीबांना मदत करणाऱ्या एका सामाजिक संस्थेत सामील झाले. नंतर १९९१ साली मुंबईत हिंदू मुसलमान दंगल होईपर्यंत ते गिरणीत कामाला होते. त्यावेळी राजीनामा देऊन त्यांनी धारावी राष्ट्रीय एकता समितीची स्थापना केली. या संस्थेचे उद्दिष्ट होते धारावीसारख्या धगधगत्या ठिकाणी जातीय सलोख्याकरता काम करणे. या अनुषंगाने त्यांना नंतर अत्युत्तम कामाकरता राजीव गांधी पुरस्कार देण्यात आला होता.

श्री. रानडे यांनी कचरा वाहतूक कामगारांसाठी कामाला १९९५ साली सुरूवात केली तेव्हा या मजुरांना स्वरक्षण करण्याकरता आवश्यक वस्तूही उपलब्ध नव्हत्या (हातमोजे, बूट, डोक्याला हेल्मेट इ.) त्यांच्याशी बोलायला गेले तर ते तोंड उघडायचेच नाहीत. जरी या कचरा वाहतूक कामगारांना वेगवेगळ्या प्रकारचा अन्याय व हालअपेष्टांचा सामना करावा लागत असला तरी प्रस्थापित मजूर संघटनांनी त्यांच्याकडे दुर्लक्षच केले होते. परंतु श्री. रानडे यांनी सिद्ध करून दाखवले की अस्पृश्य कामगार संघटित होऊन स्वत:चे अस्तित्व जाणवून देऊ शकतात. त्यांनी चार प्रकारच्या मुद्यांवर लक्ष दिले.

१. या कामगारांना एकत्र आणून त्यांच्या संघटनेला बळकटी आणणे;
२. त्यांच्या एकत्रित शक्तीतून त्यांच्या कामाशी निगडित परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे;
३. मजुरांच्या हक्कांकरता झगडणाऱ्या इतर गटांशी सहकार्य वाढवणे;
४. कायद्याचा जोरदार वापर करून त्यांना त्यांचे घटनात्मक हक्क मिळवून देणे.

श्री. रानडे यांनी कचरा वाहतूक कामगारांच्या विश्वात प्रवेश केला तो १९९५ साली, मुंबईच्या शिवाजीनगर कचरा डेपोपासून. त्यांनी सुमारे नऊ महिने त्यांचे रोजचे जीवन, दिनक्रम व राहणी यांचा अभ्यास करण्यात घालवले. सुरूवातीला ते रानड्यांशी काही बोलतच नसत. त्यांच्या रोजच्या भेटीमुळे मग मंडळींची भीड हळुहळू चेपू लागली व थोडाफार प्रतिसाद मिळू लागला. विश्वास बसू लागला. श्री. रानडे त्यांच्याबरोबर त्यांच्या कचऱ्याचे ढीग असलेल्या ट्रकमध्ये बसून जाऊ शकत होते.

नंतरचे सहा महिने त्यांच्याशी बोलून त्यांच्या कामाच्या परिस्थितीची माहिती, नियम, शर्ती, अटी, मूलभूत हक्क वगैरेंची माहिती रानड्यांनी मिळवली. मग दिवसा ते इतर कचरा डेपोंना भेट देत व रात्री शिवाजीनगर डेपोच्या अखत्यारीतील म्युनिसिपल वॉर्डात अनौपचारिक सभा घेत.

श्री. रानडेंनी प्रत्यक्ष संघर्षाला सुरूवात केली ती हे कामगार एकजुटीने सोडवू शकतील अशा साध्या व रोजच्या अडचणींपैकी महत्त्वाच्या प्रश्नापासून, म्हणजेच पिण्याचे स्वच्छ पाणी. १९९६ साली शंभरहून अधिक कामगार कचरा

साठवायच्या ठिकाणी / डेपोमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय करावी म्हणून उपोषणाला बसले. इथे त्यांनी मुंबई महानगरपालिकेला नमवले. पण आंघोळीचीही सोय हवी या त्यांच्या मागणीबाबत महानगरपालिका मूग गिळून बसली.

पण एक मोठे यश चाखल्यानंतर कामगारांनी श्री. रानडे यांच्या नेतृत्त्वाखाली कामगार वाहतूक संघर्ष समिती (केव्हीएसएस) स्थापन केली. आता समितीचा व्याप खूपच वाढलेला आहे. ती महानगरपालिकेच्या सर्वच वॉर्डात कार्यरत आहे. तिचे दोन हजाराहून अधिक कामगार सभासद आहेत. प्रत्येक वॉर्डात समितीचे काम पाहणारा तिघा सभासदांचा एक गट असतो. समितीच्या कामाचा सभासदांशी समन्वय साधणे, सभा भरवणे, संघर्ष सोडवणे, समितीशी सतत संपर्कात राहणे वगैरे कामे हा गट करतो. त्यांच्यावर असतो मुख्य गट– ज्याच्या सात सभासदांपैकी पाच असतात स्वत: कचरा कामगार. त्यांना श्री. रानडे व त्यांचे सहकारी निवडतात. त्याकरता मुख्य निकष असतो प्रश्न सोडवण्याची क्षमता व संवाद साधण्याची हातोटी.

समितीने कामगारांच्या प्रशिक्षणाला खूप महत्त्व दिलेले आहे. वेगवेगळ्या वॉर्डातील सभासदांकरता मजूरविषयक कायदा, आपल्या देशातील औद्योगिक न्यायालये, हिशेब ठेवणे, प्रसारमाध्यमांना हाताळणे इत्यादी विषयांचा त्यात समावेश असतो. संबंधित विषयातील तज्ज्ञ मंडळी या उपक्रमाद्वारे प्रशिक्षणार्थींना संबोधित करतात. टाटा सामाजिक विज्ञान संस्था विद्यार्थ्यांना समितीत स्वयंसेवक म्हणून पाठवत असते. त्यातून कामगारांना काही नवीन शिकायला मिळते. विद्यार्थ्यांनाही उपयुक्त कामाचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. प्रशिक्षणामुळे कामगारांना अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस या संघटनेचा एक चमू तयार करण्यासाठी मदत झाली. सहकार्याद्वारे समुपदेशनाचे कामही प्रशिक्षणामुळे सुरू झाले. आता ते गरीबांकरता शहरभर राबवल्या जाणाऱ्या धान्य पुरवठा करणाऱ्या उपक्रमाद्वारेही आपला फायदा करून घेतात.

जसजशी संघटना प्रयत्नांद्वारे व अनुभवांतून शिकत गेली तसतसे तिचे कार्यक्षेत्र विस्तारत गेले. संघटनेने व प्रशिक्षण दिलेल्या कामगारांनी राज्यभरातल्या कचरा वाहून नेणाऱ्या कामगारांना संघटित करण्याचे काम सुरू केले. नव्या मुंबईत ५०० आणि नाशिकमध्ये ४०० कर्मचाऱ्यांपासून सुरूवात झाली. श्री. रानडेंच्या मनात भारतभर अशा संघटनांचे जाळे तयार करून



केव्हीएसएसच्या कामात अधिक सुसूत्रता आणण्याचा विचार आहे. कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश व गुजराथ राज्यांशी संघटना स्तरावर शैक्षणिक दृष्टीने आदानप्रदान होऊन ती वृद्धिंगत होत आहे. जसजसे कंत्राटी सफाई कामगार कायमस्वरूपी नोकरदार होतील तसतसे समितीचे अधिकाधिक सभासद म्युनिसिपल कॉर्पोरेशनमध्ये नियमित नोकरदार होत जातील व आपोआप त्यांच्या प्रस्थापित कामगार संघटनेचेही सभासद होतील.

१९९९ साली संघटनेने मुंबई महानगरपालिकेला १९७८ च्या कंत्राट नियमन व निर्मूलन कायद्याचा भंग केल्याचा ठपका ठेवून उच्च न्यायालयात खेचले. कोर्टाने ऐतिहासिक निर्णय देताना कंत्राटी कामगारांची भरती अवैध असल्याचा निर्णय देऊन ती बंद करून ७८२ कामगारांना कायम सेवेत समाविष्ट करून घ्यावे असा आदेश दिला. या निर्णयामुळे देशभरातील नगरपालिकांकरता एक पायंडा पाडला गेला.

अनेक कंत्राटदारांचे राजकीय क्षेत्रात चांगलेच लागेबांधे असतात. कायद्याने स्वीकृत केलेला कमीत कमी मजुरीचा दर मागितला म्हणून एका ठिकाणच्या म्युनिसिपालटीच्या कंत्राटदाराने कामगारांना सेवेतून कमी केले. कोर्टात तो अर्थातच केस हरला. कचरा वाहतूक करणाऱ्या कामगारांना एकत्र येऊन संघटित होऊ दिले जात नव्हते. परंतु आता परिस्थिती बदलत आहे. याचा परिपाक म्हणून समितीने अनेक प्रश्नांत मिळवलेल्या यशाची आणखी काही प्रमुख उदाहरणे पाहू या.

- दहा वर्षे संघर्ष केल्यानंतर मुंबई महानगरपालिकेने ११०० कंत्राटी कामगारांना कायम सेवेत स्वीकारले.
- ठाणे, नवी मुंबई, नाशिक, बेंगळुरू, हुबळी, धारवाड, मंड्या, म्हैसूर व चेन्नई येथील कामगारांनी युनियन स्थापन केली आहे.
- समितीचे मुंबई महानगरपालिकेत सहा हजार सभासद आहेत. समिती आता महाराष्ट्राच्या इतर भागात हातपाय पसरत आहे.
- एका कंत्राटदाराने कामगारांना कायद्याने स्वीकृत दरापेक्षा कमी मजुरी दिली. तसेच त्यांच्या खोट्या सह्या करून त्यांच्या नावावर कर्जे उचलली. समितीने या प्रकरणात लक्ष घातले असून कामगारांना न्यायासाठी झगडण्यासाठी उत्तेजन देत आहे.
- कचरा कंत्राटदार रोज रूपये ३६००० इतका नफा कमावतो.

कामगाराला कचरा ट्रक बरोबर तीन चकरा मारण्याचे ९० रुपये दिले जातात. आज समितीतील कामगार कमीत कमी ३९०० रूपये मासिक पगार मिळवत आहे.

- समितीने ३२८० कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी करावे याकरता केलेल्या मोठ्या संघर्षात यश मिळून कंत्राटदार बदलला तरी कामगार बदलता येणार नाहीत या तत्त्वाचा आग्रह धरून चतुर्थश्रेणी कामगारांइतकेच वेतन द्यावे असा आदेश अधिकृत रीत्या मिळवून तो महानगरपालिकेला पाळण्यास भाग पाडले.
- नवीन मुंबई येथेही हाच मुद्दा लावून धरून तेथील समित्यांनी यश मिळवले.
- किमान वेतन दर मिळावा यासाठी समितीने नागपूरला झटपट पावले उचलून आंदोलन उभे केले व महानगरपालिकेला नमवले.
- मुंबईत समितीने कामगारांना ४६ टक्के अधिक फायदा मिळवून दिला आहे. आता त्यांना गणवेश, सुरक्षा साधने, भविष्य निर्वाह निधी, वार्षिक भरपगारी रजा, ८.३३ टक्के बोनस मिळतो आहे.

एकूणच श्री. मिलिंद रानडे यांनी ही समिती ज्या उद्देशाने सुरू केली व जोपासली तो उद्देश आता हळुहळू का होईना सफल होताना दिसत आहे व त्यांच्या कामाची फळे आजवर उपेक्षित असलेल्या कचरा कर्मचाऱ्यांना मिळू लागलेली आहेत, हेही नसे थोडके !

❃❃



# श्री. बस्तू रेगे - संतुलन

*आपल्या देशात सामाजिक दृष्टीने उपेक्षित राहिलेला एक मोठा वर्ग म्हणजे 'असंघटित मजूर'. शोषण व्यवस्थेचे कायम बळी ठरलेल्या या स्तरातील मंडळींची अवस्था नेहमीच दयनीय राहिलेली आहे. पत्थराच्या खाणीत दगड फोडणारे कामगार याच वर्गात मोडतात. अनेक अडचणींचा सामना करत ते सतत काबाडकष्ट करीत असतात. अनेक प्रकारची पिळवणूक ही त्यांच्या पाचवीला पुजलेली. त्यांना न कायम आसरा असतो, न मुलांच्या शिक्षणाची सोय असते.कित्येकदा तर पाण्याचीही वानवा - स्वच्छ पिण्याचे पाणी तर दूरच. आरोग्यसेवांची स्थितीही तशीच दयनीय.*

*श्री. बस्तू रेगे यांनी १९९७ साली स्थापन केलेली 'संतुलन' (Social Animation Towards United Liberative Action) ही संस्था महाराष्ट्रातील २६७४ पत्थर खाणींतील मजुरांचे जीवनमान उंचावण्याकरता सतत संघर्ष करीत आहे. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरता १३ जिल्ह्यांत १०८ पाषाणशाळा कार्यरत आहेत. तेथील बालमजुरीला आळा घालण्यात आला आहे. राष्ट्रीय सणांना सुट्टी मिळू लागली आहे. अन्न, आरोग्य, ओळखपत्र, शिधापत्रिका, पाण्याचा पुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था, वीज पुरवठा, सरकारी विमा योजनांचा फायदा, फुकट स्वयंसेवी बचत गट, कायदेशीर मदत आणि सल्ला, शिष्यवृत्त्या, मजुरांची संघटना, बांधणी आणखी अशा अनेक विकासांशी निगडीत बाबींवर लक्ष देऊन श्री. रेगे आपला लढा जोमाने पुढे नेत आहेत.*

म्हणतात ना, 'उद्योगाचे घरी देवता लक्ष्मी वास करी । जय श्रमदेवी जय श्रमदेवी जय श्रमदेवी कृपा करी।' ही ओळ श्रम, कष्ट, प्रयत्न वगैरे बाबींचे महत्त्व अधोरेखित करून त्या मनावर बिंबवते. त्या अतिशय गंभीरपणे आचरणात आणून लक्ष्मीदेवीला प्रसन्न करू पाहणारेही कमी नसतात. पण सभोवती पाहताना असे जाणवते की त्यांची आहुती देणाऱ्या सर्वांवरच लक्ष्मी खूष होते हे तितके खरे असतेच असे नाही. कितीतरी वेळा प्रसन्न तर सोडाच पण तिने उलट रूष्ट झाल्यासारखी पाठ फिरवलेली असते आपल्या समाजातल्या काही घटकांबाबत तर हे जणू त्रिकालाबाधित सत्यच आहे. उदाहरणच द्यायचे तर आपल्या देशातील असंघटित मजुरांचा वर्ग ज्याची संख्या करोडोंमध्ये आहे. अतोनात काबाडकष्ट करूनही सर्वांगीण शोषण प्रक्रियेचे बळी ठरणे हे जणू या वर्गाच्या पाचवीलाच पुजलेले. श्रमदेवी व लक्ष्मी यांचा जणू छत्तीसचा आकडाच असतो. हा अनुभव नित्यनेमाने त्यांना येतो. जीवनचक्राच्या जात्यात धान्याच्या दाण्याप्रमाणे ते भरडले जातात. अगदी रोजच्या रोज. इथे लिहिले तर अनेकांना कदाचित आवडणार नाही, पटणार तर नाहीच नाही पण त्यांच्या या भरडले जाण्याने बाहेर पडणारे पीठ मात्र पुरेपूर उपभोगतात, समाजातील तुमच्या आमच्यासारखे इतरेजन. बहुतेकजणांना न या बाबतीत खेद असतो न खंत. त्याविरूद्ध दंड थोपटून उभे ठाकणारे लाखो करोडोंमध्ये हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच असतात. अशा अपवादात्मक कोंदणामध्ये चपखल बसतात ते पाषाणाच्या खाणीत राब राब राबणाऱ्या मजुरांचा जीवनस्तर उंचावण्याकरता उभे आयुष्य वेचणारे श्री. बस्तू रेगे.

श्री. रेग्यांनी १९९७ साली 'संतुलन '(Social Animation Towards United Liberative Action) या स्वयंसेवी संस्थेची स्थापना केली ती दगडाच्या खाणीत काम करणारे मजूर आणि त्यांचे कुटुंबीय यांना सर्वसाधारण माणसाप्रमाणे आयुष्य जगता यावे म्हणून प्रयत्न करण्याकरता. सुरूवात झाली ती त्यांच्या डोळ्यासमोर घडलेल्या एका भयंकर प्रसंगातून. त्या घटनेने त्यांच्या मनावर खोल परिणाम केला. त्यांच्या मनाची फार तगमग झाली. असहाय्यतेची बोचणी मनात घर करून सतत अस्वस्थ करू लागली. 'संतुलन' च्या निर्मितीची मुळे रूजलेली आहेत ती या बेचैनीत.

एकदा ते अहमदनगर रस्त्यावरून घरी परतत होते, तेव्हा त्यांनी एका सहा-आठ वर्षांच्या मुलाला वाहनाने (डम्पर) चिरडलेले पाहिले. त्या मुलाचा जागच्या जागीच मृत्यू झाला. त्यांना समजले की रस्त्याच्या विरूद्ध बाजूला उभ्या असलेल्या त्याच्या विधवा आईच्या डोळ्यांदेखत हे घडले. ते नखशिखांत हादरले. त्या वाहनाची ओळखदेख जाणून घ्यायला त्यांनी पाठलाग केला. ते होते दगडाच्या खाणीत मालाची ने-आण करणाऱ्या अशा अनेक वाहनांपैकी एक. तेव्हापासून त्या खाणीत काम करणारे मजूर व त्यांच्या हलाखीच्या जीवनाचे ते निरीक्षण करू लागले. शिक्षण व आरोग्यसेवा यांपासून वंचित असणे ही बाब त्यांना अतिशय खुपली. त्यांनी ठाम निर्णय घेतला की या लोकांचे जीवन सुकर व्हावे म्हणून मी शक्य ते सर्व करीन.

दगडांच्या खाणींमध्ये काम करणारा, स्वत:चा चेहरामोहरा नसलेला हा मजूरवर्ग स्थलांतरीत असतो. त्यांना एका खाणीतून दुसऱ्या खाणीत बदलून जावे लागते. त्यांना कायद्याप्रमाणे सक्तीचे असलेले किमान वेतनही मिळते की नाही याची खात्री नाही. त्यांना पिण्याचे पाणी पुरवायची सोय नसते. राहायला माणसाच्या उंचीच्या अर्ध्या उंचीच्या कच्च्या झोपड्या असतात. आरोग्यसेवांची सोय नसते. या खाणी बरेचदा लांब व दुर्गम भागात असतात, त्यामुळे मजुरांच्या शोषणाकडे कोणाचे सहसा लक्ष जात नाही. सर्वसाधारणपणे या मजुरांकडे ओळखपत्र नसते त्यामुळे ज्या धोरणांचा व योजनांचा त्यांना फायदा मिळायला ते लायक आहेत त्यापासून ते वंचित राहतात.

कोल्हापूरच्या दगडखाण मजुरांच्या संघटनेचे नेते त्यांना धन्यवाद देताना म्हणतात की मजुरांच्या जीवनस्तरात भाऊंच्या (त्यांना भाऊ म्हणतात) अथक प्रयत्नांमुळे खूप सुधारणा झाली आहे. सगळ्यात मोठी गोष्ट म्हणजे आमच्या मुलांना शिक्षणाची द्वारे खुली झाली आहेत. आज 'संतुलन' च्या पाषाण शाळांतून महाराष्ट्राच्या सहा जिल्ह्यांत अडीच हजारांहून जास्त मुले शिकत आहेत. पाषाण शाळांत मुलांना दाखल करावे म्हणून त्यांच्या पालकांचे मन वळवणे म्हणजे महाकर्मकठीण काम. शिक्षणाचा काही उपयोग नाही हे त्यांच्या मनात घट्ट बसलेले. त्यापेक्षा खाणीत काम करून चार पैसे मिळवून महागाईने मेटाकुटीस आलेल्या आईवडिलांना थोडा दिलासा द्यावा हा त्यांचा ठाम विचार. तो मोडून काढण्यात भाऊंनी पुष्कळ यश मिळवले.

सरकारच्या सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत नाविन्यपूर्ण पर्यायी शिक्षण कार्यक्रम (सातवीपर्यंत) म्हणून पाषाणशाळांना मान्यता मिळालेली आहे. पाषाणशाळांचे वैशिष्ट्य म्हणजे ज्यांच्यापर्यंत सर्वसाधारण शाळांचे शिक्षण

पोहोचू शकत नाही त्यांच्यापर्यंत ते नेणे. 'संतुलन' ची पुणे जिल्ह्यात एक निवासी शाळाही आहे. येथे आठवी ते दहावी या वर्गात शिकणाऱ्या मुलांच्या राहण्याखाण्याची सोय केली आहे. इतर ठिकाणच्या पाषाणशाळांतूनही सातवीच्या पुढे शिकू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांनाही तिथे प्रवेश देतात. इथे वसतीला असलेले विद्यार्थी इतके आनंदात असतात की मोठ्या सुट्टीतही त्यांना निवासस्थान सोडून गावी जाववत नाही. पाषाणशाळा तीन वयोगटांप्रमाणे तीन वेगवेगळ्या पातळ्यांवर व निरनिराळ्या वेळी भरवली जाते. त्यामुळे मोठ्या भावंडांना त्यांच्या धाकट्या भावंडांकडे लक्ष द्यावे लागत नाही.

या शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे मजुराची एका खाणीतून दुसऱ्या ठिकाणी बदली झाली तरी मुलांच्या शिक्षणात खंड पडत नाही. वर्षभरात कधीही ती दुसऱ्या पाषाणशाळेत कोणत्याही किचकट नियम वा कागदपत्राशिवाय प्रवेश घेऊ शकतात. सर्वच पाषाण शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक खूष आहेत की त्यांची मुले भाऊंसारख्यांच्या देखरेखीत तालीम घेत आहेत. देशभर हा पाषाणशाळांचा नमुना एका जागी स्थिर न राहणाऱ्या मुलांच्या शिक्षणाकरता वापरायला उपयुक्त आहे हे सरकारने अधिकृतपणे मान्य केले आहे. पण या कार्यपद्धतीला आणि कामकाजाच्या नमुन्याला मान्यता देण्यास सरकारी दिरंगाईने दहा वर्षे घेतली. त्यानंतरच सरकारच्या शाळांकरता असणाऱ्या योजनांचा लाभ पाषाणशाळांना मिळू लागला.

'संतुलन' संस्थेने पहिली पाषाणशाळा पुणे जिल्ह्यात मौजे वाघोली येथे १९९७ साली सुरू केली. आजमितीला महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यांत संस्थेच्या १०८ पाषाणशाळा कार्यरत आहेत. या शाळांचे यश अधोरेखित करायला एक बोलकी घटना पुरेशी आहे. पूर्णपणे निरक्षर असलेली कोल्हापूरच्या खाणीतील मजुराची १० वर्षांची एक मुलगी आपल्या हुशारीने पाषाणशाळेत दरवर्षी दोन इयत्ता पास करून पाच वर्षांत शालांत परीक्षा पास झाली. सातवी पास झाल्यावर पालक तिच्या लग्नाच्या खटपटीत आहेत याचा अंदाज येताच ती संस्थेच्या पुण्याच्या निवासी शाळेत पुढील शिक्षणाकरता दाखल झाली. महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या या मुलीला पुढे सामाजिक कामासंबंधी शिकायचे आहे व मग खाण कामगारांच्या मुलींकरता वसतीगृह काढायचे आहे.

गेल्या बारा वर्षांत भाऊंनी अनेक संकटांचा, अडचणींचा व समस्यांचा सामना केला. अगदी सुरूवातीला दगडखाण मजुरांच्या निकट जाऊन त्यांचा विश्वास मिळवण्यापासून ते सरकारशी संघर्ष करण्यापर्यंत. भाऊंच्या पत्नी पल्लवी या संतुलनच्या कार्यात हिरिरीने भाग घेतात. संस्थेच्या प्रगतीत त्यांचा मोठा वाटा आहे याची भाऊंना चांगलीच जाणीव आहे. याशिवाय संस्थेच्या यशाचे श्रेय ते तेथील १८ कर्मचाऱ्यांना, १५० अर्धवेळ नोकरांना व मोठ्या संख्येने कार्यरत असलेल्या स्वयंसेवकांना देतात.

ऑक्टोबर २०१० मध्ये संस्थेने दगडखाण मजुरांच्या मुलांचे शिक्षणासंबंधी प्रश्न उठवण्याकरता आपल्या पाषाणशाळांचे विचारसत्र आयोजित केले होते. तेथे अठरा वर्षांखालील मुलांना खाणीत कामाला वापरणाऱ्या खाण मालकांचा परवाना रद्द करावा हा ठराव बहुमताने मंजूर झाला. सरकारने खाण मजुरांच्या मुलांना शिक्षण सक्तीचे करून ते मोफत द्यावे, आवश्यकतेनुसार शाळा बांधायला जमीन द्यावी, या मुलांना शिष्यवृत्ती द्यावी, त्यांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असे एकूण दहा ठराव तिथे केले गेले.

ज्यांच्या अस्तित्वाची मुळी दखलच घेतली जात नाही व मूलभूत हक्कसुद्धा ज्यांना उपलब्ध नाहीत अशा दगडखाण मजुरांची संख्या अदमासे ३५ ते ५० लाख आहे. 'संतुलन'च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात २६७४ दगडाच्या खाणी असून मजुरांच्या मुलांची संख्या (सहा ते चौदा वयोगटातील) सुमारे ३२००० आहे. मार्च २०१० पासून पुणे जिल्ह्यातील दगडाच्या खाणीत काम करणाऱ्या असंघटित मजुरांना इतर लोकांप्रमाणेच सर्व राष्ट्रीय सणांना भरपगारी सुट्टी मिळू लागली आहे. महिलांना तर आंतरराष्ट्रीय स्त्री दिनानिमित्तही एक दिवस रजा मिळायला लागली आहे. याचे श्रेय ॲडव्होकेट बस्तू रेगे यांच्या दगडखाण असंघटित कामगार विकास परिषदेला जाते.

दगडखाण कामगारांच्या हक्कांसंबंधी करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये

१) पुरेसा पाणी पुरवठा
२) पिण्याचे पाणी
३) वैद्यकीय व आरोग्य सेवा
४) शिधा पत्रिका
५) नियमाप्रमाणे किमान वेतन
६) सर्व दगडखाण मजुरांना समान वेतन

इत्यादींचा समावेश संघटनेने केला आहे. पुणे जिल्ह्यांत या मजुरांच्या विकासासाठी खास वेगळे मंडळ स्थापण्याचा निर्णय घेण्यात आला. हे मंडळ

वैद्यकीय आणि अपघातात मदत मिळेल याकडेही लक्ष पुरवेल. या मजुरांना सरकारी योजनांचा लाभ घेता यावा म्हणून त्यांच्याकडे असलेल्या ओळखपत्राला मान्यता देऊन ते ग्राह्य धरले जावे असाही निर्णय पुणे जिल्ह्याकरता झालेला आहे. आरोग्य सेवा सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्रातर्फे दिली जाईल. या सोयी दिल्या जात आहेत की नाही हे पाहण्यासाठी संबंधित अधिकारी अचानक भेटी देतील. तसेच दर महिन्याला आढावाही घेतला जाईल. खाणविकासाकरता म्हणून असलेल्या निधीपैकी ५ टक्के पैसे या मजुरांच्या प्रगतीच्या कामी वापरावे असाही निर्णय घेतला गेला. कायमस्वरूपी घरांची मागणीही विचाराधीन असेल असे सांगण्यात आले.

खाणमजुरांच्या जागेवर जाऊन त्यांच्या भल्याकरता काम करणे तितके सोपे नव्हते. खाणमालक आपल्या उन्नतीकरता, चांगल्याकरता काहीच करत नाहीत व उलट आपली पिळवणूक करतात ही जाणीव तरी मजुरांना होती की नाही, ते एकटा परमेश्वरच जाणे. सुरूवात झाली ती 'कोण हा बाहेरचा माणूस? तो आमच्यात काय करतो आहे? त्याला आमच्यामध्ये काय रस आहे? कसली उत्सुकता आहे?' वगैरे वगैरे प्रश्नांनी. त्यांची ही मनोभूमिका चुकीची नव्हती. एकतर असे कोणी आत्तापर्यंत आले नव्हते. पांढरपेशा जगाशी त्यांचा काही संबंध नव्हता. मग हे अचानक कसे उगवले? मुळात निरक्षरतेचे साम्राज्य व पराकोटीचा अविश्वास यामुळे या मंडळींचा विश्वास जिंकण्यातच खूप वेळ गेला. विश्वास बसल्यानंतर त्यांना कामगारांनी स्वीकारले व मग श्री. रेगे त्यांना संघटित करू शकले.

मजुरांना सूज्ञ करण्याचा विचार श्री. रेगे करत आहेत म्हटल्यावर खाणमालकांचे पित्त न उसळेल तरच नवल. काही वेळा मजुरांना भडकावून तर काही वेळेला त्यांना हाताशी धरून त्यांनी रेग्यांच्या इराद्याला व कृतीला सुरूंग लावण्याचे जोरदार प्रयत्न केले. त्यांनी रेग्यांच्या जीपला भस्मसात केले. ते वर्ष होते २००५.

त्यानंतर २००८ साली त्यांच्या घराला व कार्यालयाला आगही लावली. भाऊ म्हणतात की अशा कृत्यांचा त्यांच्यावर काही परिणाम होत नाही. अशी कृत्ये कोण व का घडवून आणतात ते अर्थातच त्यांना पक्के माहीत आहे. त्यांच्या मते यातून एक दुजोरा मिळतो तो म्हणजे 'संतुलन' ची वाटचाल योग्य दिशेने चालू आहे.



श्री. रेगे मूळचे ग्रामीण भागातील. त्यांचे शालेय शिक्षण गावातच झाले. अगदी साध्या परिस्थितीतील शेतकऱ्याच्या घरात जन्मल्यामुळे त्यांना गरीबीची ओळख पहिल्यापासूनच होती. सामाजिक विकासाशी निगडीत क्षेत्रात काम करण्याच्या त्यांच्या निर्धाराचे मूळ या पार्श्वभूमीत होते. या बाबतीत असलेल्या विरोधावर त्यांनी मात केली. त्यांनी मास्टर ऑफ सोशल वर्क ही पदवी मिळवली. त्यामागेही विकास क्षेत्रात काम करायला उपयुक्त असे शिक्षण घ्यावे, हाच विचार होता. कालांतराने दगड कामगारांच्या समस्यांवर काम करताना कायद्याची जाणही आवश्यक वाटल्याने त्यांनी कायद्याची पदवीही मिळवली. सुरूवातीला ते एका नागरी संघटनेत एकात्मिक विकासाशी संबंधित प्रकल्पावर काम करत होते. त्यांनी व त्यांच्या पत्नी पल्लवी यांनी मिळून 'संतुलन' ही संस्था स्थापन केली. 'संतुलन' च्या माध्यमातून दगडखाण मजुरांचे जीवन सुधारायचे, त्यांना सबळ व सक्षम करायचे या एकमेव उद्दिष्टाने ते दोघे झटत आहेत.

हे उपक्रम असे आहेत :

१) पाषाणशाळेची नाविन्यपूर्ण संकल्पना
२) आरोग्याविषयीच्या समस्या
३) स्त्रियांचे बचतगट
४) स्त्रियांचे सबलीकरण
५) कायदेशीर बाबींबद्दल सहाय्यता
६) समुपदेशन वगैरेंवर लक्ष केंद्रित करणे इ.

दूरदृष्टीने विचार करता या लोकांना दुष्टचक्रातून मुक्त होण्याचा एकच मार्ग आणि तो म्हणजे शिक्षण व याला 'संतुलन' ने फार महत्त्व दिले.

श्री. रेगे म्हणतात, ज्या दगडांच्या धुराळ्यात ते सतत वावरत असतात त्याच्या एका कणाएवढी किंमतही या मजुरांना दिली जात नाही. ते मुळी खिजगणतीतच नसतात. जनगणनेच्या सर्वेक्षणातही ते दुर्लक्षित राहतात. ते तोडत असलेल्या दगडांपेक्षाही त्यांचा दर्जा कमी असतो. श्रीमती पल्लवी म्हणतात की मी लहानपणापासूनच सामाजिक कार्यात भाग घेत आहे. जन्मतःच माझ्यात ती आवड आहे. विश्वास बसणार नाही अशा अडचणींचा या मजुरांना सामना करावा लागतो. सर्वसाधारणपणे खाणमजुरांची मुले त्यांच्या पालकांच्या अवतीभवती वावरत खडी फोडण्याचे काम करत असतात. अगदी चार वर्षांची मुलेही हे काम करतात. ते काही अधिकृत मजूर नसतात. त्यांना पगार व बाकी सोयी

मिळण्याचा प्रश्नच येत नाही. ते आईवडिलांच्या सोबतीने दगड फोडत बसतात. सुधारणेचे पहिले पाऊल म्हणजे त्यांना यापासून दूर करून शिक्षणाकडे वळवणे. त्याकरता आधार व मदत देणे व सक्षम करणे. 'संतुलन' च्या कार्यामळे त्यांना नाकारल्या गेलेल्या काही मूलभूत सेवांच्या बाबतीत निश्चित बदल जाणवू लागलेला आहे. अगदी लहान स्वरूपात, थोड्या मुलांबरोबर सुरू केलेल्या या प्रयत्नांनी दीड दशकात संघर्ष करीत मोठे यश मिळवले. एका लाखाहून अधिक मजूर या यशाची फळे आता चाखत आहेत.

या काळात अनेक चांगल्या गोष्टी प्रथमच घडल्या. त्यात समावेश होणाऱ्या बाबी म्हणजे कुटुंबांना शिधापत्रिकांचे वाटप, सरकारी विमायोजनेचा लाभ, आरोग्य उपक्रम, वीज व पाणी पुरवठा, शैक्षणिक शिष्यवृत्ती, फुकट कायदेशीर मदत, स्वयंसेवी बचत गटांची स्थापना, मजुरांच्या युनियनची निर्मिती व वाढ, घरांकरता सहकारी संस्था, वगैरे. श्री. रेगे यांनी नुसतीच मजुरांची संघटना बांधली नाही तर मुलांना व तरूणांना एकत्र आणून मोर्चे काढले, त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली, त्यासाठी सरकारकडे घोषणापत्रे सादर केली. योग्य कारणांकरता कायदेशीर झगडा करायलाही 'संतुलन' मागेपुढे पहात नाही.

मोर्चे, कायदेशीर नोटीस, मुंबई उच्च न्यायालयात खटला इत्यादी मार्ग अनुसरून चार वर्षांनंतर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवला. दगडखाण मजुरांकरता वेगळे महामंडळ नेमणे तसेच त्यांच्या संरक्षणाचा कायदा मंजूर करून घेणे यावर श्री. रेगे सरकारशी सतत चर्चा करत आहेत. 'संतुलन'ला त्याकरता १७ सार्वजनिक निदर्शने, मुंबई उच्च न्यायालयात केस, विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला हजर राहावे लागले. त्यांनी आत्तापर्यंत ५०,००० मजुरांना त्यांच्या हक्काबद्दल व हक्कांच्या मागणीबद्दल जागृत केले आहे. स्त्री मजुरांना या समित्यांवर व संघटनेत काम करण्यास उत्तेजन दिले. बचत गटातील सहभागालाही प्रोत्साहन दिले. त्याद्वारे घरगुती भांडणे व मारामाऱ्या, स्त्रीपुरूष भेदभाव कमी होतो ही भावना आहे. कसल्याही प्रकारचे कापडी किंवा इतर संरक्षण नसल्यामुळे मजुरांना जखमा व श्वसनाचे विकार यांचा सामना करावा लागतो. मजुराचे सरासरी आयुष्यमान ४० ते ५० वर्षे आहे. 'स्ट्रगल अँड सरव्हायवल' या शीर्षकाचे लघुचित्रही 'संतुलन' ने काढले आहे.

'संतुलन'च्या आणखी काही जमेच्या बाजू म्हणजे १४८ मुलांनी पाऊण लाख रूपयांहून अधिक रक्कम शिष्यवृत्तीद्वारे मिळवली. दरवर्षी ५००० मुलांना पूरक असा सकस आहारही दिला जातो. दरवर्षी आरोग्य उपक्रम ५०० ते २०,००० माणसांपर्यंत पोचवला जातो. दहा हजार बायका बचत गटाच्या सभासद आहेत. साडेतेरा हजारांहून अधिक मजुरांचा विमा उतरवलेला आहे. पिण्याचे पाणी १०,००० मजुरांपर्यंत पोचले आहे. पुष्कळ कुटुंबांना वीज पुरवठा झालेला आहे.

श्री. रेगे म्हणतात की सरतेशेवटी आम्ही कोणालातरी उपयोगी ठरू शकतो, त्यांना आमची गरज आहे ही भावना मनाला समाधान देऊन जाते.

❀❀

# मधु सिंघल -'मित्र ज्योती'

*जगात अगणित लोक अपंग आहेत. त्यातील सर्वाधिक आपल्या देशात आहेत. त्यातील ऐंशी टक्के ग्रामीण भागात व चौसष्ट टक्के महिला आहेत. पण समाजाचा हा एक घटक म्हणून हा वर्ग अनेक बाबतीत दुर्लक्षित राहिला आहे. समस्येची व्याप्ती व गुंतागुंत लक्षात घेता स्वयंसेवी संस्था आणि सरकारचे प्रयत्न अपुरे पडतात. अशा वेळी पुढे सरसावल्या आहेत बेंगळुरूच्या कु. मधु सिंघल - स्वत: जन्मत: दृष्टीहीन असल्यामुळे अपंगत्वाच्या शिकार झालेल्या. त्यांचे लक्ष्य आहे अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे. त्याकरता त्यांनी स्थापन केलेली 'मित्र ज्योती' ही संस्था अविरत सेवाकार्य करीत आहे. त्याकरता शिक्षण, प्रशिक्षण, वाचन संस्कृतीचा प्रसार, समुपदेशन वगैरे गोष्टींवर, संचार प्रणाली व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संस्था कार्यरत असते. सीडी व कॅसेटच्या द्वारे पुस्तकांचे रूपांतर करून आशियात सर्वात मोठे समजले ग्रंथालय त्यांनी निर्माण केले आहे. ती सुविधा जगभर नाममात्र दरात पुरवली जाते. नाना अडचणी निस्तरत अपंगांच्या जीवनात प्रकाश पसरवण्याचे कार्य सातत्याने करीत आहेत कु. मधु सिंघल.*

आपल्या रोजच्या धकाधकीच्या जीवनात आपण आपले शरीर व त्याची कार्यक्षमता गृहीतच धरलेली असते. पण अपंग, दृष्टीहीन, मनोरूग्ण वगैरेंची गोष्ट वेगळी असते. रोजच्या धावपळीच्या रामरगाड्यात ही मंडळी आपल्या आजूबाजूला वावरत असतात. पण ती आपल्या खिजगणतीतही नसतात. सर्वसामान्य नागरिकांच्या मनात त्यांच्या समस्या, प्रश्न वगैरे बाबी येत नाहीत. मग त्या उकलण्याचा विचार तर दूरच. अनेक स्वयंसेवी संस्था यात लक्ष घालतात. त्यामागे असतात तुमच्याआमच्यासारखी अव्यंग माणसे. पण अपंग, दृष्टीहीन, मनोरूग्ण वगैरे असणाऱ्या व्यक्तींपैकी एखाद्याने अशी स्वयंसेवी संस्था स्थापन केली तर? अपंगत्व, मग ते कशाही प्रकारचे असेना का, त्यामुळे संबंधित व्यक्तीवर निरनिराळ्या प्रकारच्या मर्यादा पडतात. त्या मर्यादांच्या कक्षेत राहताना बरेचदा त्यांना रोजच्या जीवनातल्या साध्या साध्या गोष्टीही करणे जड जाते. अशा व्यक्तींपैकी एखाद्याने स्वयंसेवी संस्था काढून ती यशस्वीरीत्या चालवून दाखवणे म्हणजे अहो आश्चर्यम्! बरेचदा आपण म्हणतो की सत्य हे कल्पनेच्या पलिकडचे असते. ते सत्यात उतरवून दाखवलेली व्यक्ती आहे कु. मधु सिंघल. स्वत: दृष्टीहीन असलेल्या व 'मित्र ज्योती' या अपंगांकरता काम करीत असलेल्या स्वयंसेवी संस्थेच्या जनक व व्यवस्थापकीय विश्वस्त.

'जळावीण मासा तडफडे कैसे, जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे' हा अनुभव जातीने स्वत:हून पुरेपूर घेतलेली, अपंगांच्या हालअपेष्टांचे काटेरी दर्शन सतत घेत असलेली, त्यावर दृढनिश्चयाने झगडून मात करणारी ही यशस्विनी म्हणजे एक आगळेवेगळेच रसायन आहे. जणू काही अपंग समुदायाच्या मांदियाळीतील एक महामेरूमणीच.

एकूणच अपंग व्यक्तीकडे समाज काही फार सकारात्मक दृष्टीने पाहत नाही. त्यातून अशी व्यक्ती जर कंगाल व निराधार असेल तर मग विचारायलाच नको. एकूण अपंगांबद्दल समाजात अनास्थाच फार आढळते. नाही म्हणायला नातवाच्या / मुलाच्या वाढदिवशी, मातापितरांच्या स्मृतिदिनी वगैरे प्रसंगी अपंगांकरता काम करणाऱ्या संस्थांना देणगी देणारे पुष्कळ असतात. त्यात भावना असते 'गरीब बिचारे' ही आणि एक थोडासा दर्पही असतो 'दातृत्त्वा'चा. अशा सामाजिक वास्तवतेची जाणीव ठेवून तिला प्रयत्नपूर्वक छेद देण्याकरता कटिबद्ध आहे ती एक अंधांनी स्थापन केलेली व त्यांना स्वयंपूर्णतेकडे नेऊ पाहणारी एक स्वयंसेवी संस्था 'मित्र ज्योती'.

मित्रज्योतीचा असा दृढ विश्वास आहे की अपंग व्यक्तींकडे स्वतंत्रपणे वागण्याची आणि स्वावलंबी आयुष्य जगण्याची कुवत निर्विवादपणे असते. जीवनात एक उद्दिष्ट समोर ठेवून ते गाठण्याची त्यांची क्षमता सर्वसाधारण अव्यंग माणसांच्या तोडीची असते. योग्य संधी मिळाली तर ते समाजात उपयुक्त भूमिका वठवू शकतात, हा गाढ विश्वास 'मित्र ज्योती' चा मूलभूत पाया आहे, तसेच

प्रेरणास्रोतही. हे आधारित आहे कु. मधु सिंघल यांच्या भरभक्कम स्वानुभवावर. कोणत्याही बाबतीत आपण परावलंबी नाही याची त्या सतत खातरजमा करीत असतात. त्या स्वतंत्रपणे वेगळ्या राहतात. अगदी परदेश प्रवाससुद्धा एकट्याने स्वत:हून करतात. वेगवेगळ्या सामाजिक संस्थांत त्या महत्त्वाची पदे भूषवत आहेत. त्यासंबंधित कामेसुद्धा त्या आपली आपणच करतात.

'मित्र ज्योती' अपंग लोकांना परावलंबीपण सोडून स्वतंत्र होण्याकरता साहाय्य करते. त्यांना त्यांच्या हक्कांची आणि जबाबदारीची जाणीव करून देते. त्यांच्या शिक्षणाला तसेच कौशल्याला पूरक असे प्रशिक्षण देते. व्यवसायाभिमुख योग्य ते शिक्षण देऊन नोकरी मिळवून देण्याचा प्रयत्न करते. त्यांच्या लिखाणवाचनावर, शिक्षणावर खास लक्ष केंद्रित करते. अपंगांना इतर संस्थांशी व बाहेरच्या जगातील संबंधितांशी संपर्क साधण्याकरता इंटरनेटच्या जाळ्याद्वारे पोषक वातावरण तयार करते. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा म्हणून झटते. एका वाक्यात सांगायचे तर अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करण्याकरता काम करते.

दृष्टीहीनांनी वाचावीत अशी बरीचशी पुस्तके ब्रेल भाषेत उपलब्ध नव्हती. त्यामुळे ती ऐकून त्यांपासून फायदा घेणे याला दुसरा पर्याय नव्हता. शिवाय, ब्रेल भाषेतील पुस्तके बाळगायलाही त्रासदायक ठरत. त्यांच्या जाडीमुळे (ब्रेल पुस्तकांचा कागद जाड असल्यामुळे) जागा फार व्यापली जाते. त्यामुळे कॅसेट व सीडींचे संग्रहालय ही संकल्पना संस्थेला व्यवहार्य आणि सोयीस्कर वाटली.

बोलक्या पुस्तकांचे ग्रंथालय ही वेगळी नाविन्यपूर्ण संकल्पना 'मित्र ज्योती' ने १९९२ साली दृष्टीविरहीत अपंगांकरता त्यांच्या अभ्यासाच्या आणि इतर वाचनाच्या गरजा पूर्ण करण्याकरता सुरू केली. ब्रेल भाषेत रूपांतरित पुस्तकांची संख्या तसेच त्यांची विषयमर्यादा दृष्टीहीनांची वाचनाची गरज फारशी भागवू शकत नाही. म्हणून 'मित्र ज्योती' ला या उपक्रमाची गरज जाणवली. ग्रंथालय योजनेत अशी पुस्तके रूपांतरीत केली जातात कॅसेट व सीडी या माध्यमात.

वेगवेगळ्या भाषांतील निरनिराळ्या अभ्यासक्रमांकरता व इतर वाचनीय अशी पुस्तके याकरता निवडण्यात आलेली आहेत. नंतर ती उपलब्ध करून दिली जातात ग्रंथालयाद्वारे. आजवर अडीच हजार पुस्तकांच्या पंचवीस हजार कॅसेटस् व आठशे सीडीज 'मित्र ज्योती' ने ग्रंथालयाकरता तयार केल्या आहेत.



ग्रंथालय सर्व अपंगांना खुले असून सभासदशुल्क अत्यंत नाममात्र ठेवलेले आहे. ग्रंथालयात प्रती काढायची सोयही आहे. कर्नाटकातील तसेच देशभरातील सर्व वयोगटातील तसेच सर्व स्तरातील शेकडो अपंगांनी ग्रंथालयाचा उपयोग करून घेतला आहे. त्यात ३७ संस्थांचाही समावेश आहे. ग्रंथालयाचे काम केवळ कर्नाटक किंवा भारतापुरतेच मर्यादित नाही तर कॅसेटस् व सीडीजची मागणी जगभरातून येत असते. खास नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे 'मित्र ज्योती' सात किलो वजनापर्यंतच्या कॅसेटस् व सीडीज जगभरात कुठेही विनामूल्य पाठवते. पृथ्वीच्या कानाकोपऱ्यात हा उपक्रम पोहोचला आहे. कु. मधु सिंघल अत्यंत समाधानाने म्हणतात की जगाच्या या भागात अशा प्रकारचे एवढे मोठे दुसरे ग्रंथालय नाही. त्या सांगतात की या ग्रंथालयाचा हेतू पैसे कमावणे हा नसून दृष्टीहीनांना उत्तम पुस्तकवाचन सेवा पुरवता यावी हा आहे व त्यात संस्था चांगल्या प्रकाराने यशस्वी झाली आहे.

आजकालच्या जगात संगणकाविना जीवन ही कल्पनाच मानवजात करू शकणार नाही. अपंग याला अपवाद कसे असतील? संस्थेचे संगणक केंद्र २००५ सालापासून दृष्टीहीन अपंगांना काहीही फी न आकारता संगणकाचे शिक्षण देत आहे. प्राथमिक तसेच पुढील शिक्षण देणारे हे वर्ग वर्षभर सुरू असतात. उन्हाळ्यात कार्यशाळाही आयोजित केल्या जातात. संस्थेच्या पुढाकाराने संगणक क्षेत्रातील एका नामवंत कंपनीने विस्तृत स्वरूपाचे सहा महिन्यांचे प्रशिक्षण अपंगांना दिले. २००९-१० साली एकूण ५८ जणांनी या उपक्रमांचा लाभ घेतला. दुसऱ्या एका कंपनीच्या माध्यमातून सहा महिन्यांचे मेडिकल ट्रान्स्क्रिप्शनचे प्रशिक्षण अपंगांना दिले. त्यावेळी राहण्याचा, जेवण्याचा खर्च 'मित्र ज्योती' ने केला होता.

नेत्रहीन मंडळींच्या विनंतीवरून पुस्तकाचे ब्रेलमध्ये रूपांतर करून देणारे ब्रेल ट्रान्स्क्रिप्शन केंद्र सुरू झाले १९९९ मध्ये. हे केंद्र नेत्रहीनांना त्यांच्या विनंतीवरून कोणत्याही पुस्तकाचे ब्रेलमध्ये रूपांतर करून देते. संस्थेचा असा अनुभव आहे की बहुतांशी अशी पुस्तके ही अभ्यासक्रमाकरता नेमून दिलेली पाठ्यपुस्तके असतात. कोणीही दृष्टीदोष असलेली व्यक्ती या सोयीचा फायदा घेऊ शकते. त्यामुळे मुलांना अभ्यास करणे सुकर जाते. प्राथमिक पातळीवर स्पेलिंग लक्षात ठेवणे कठीण पडते तेव्हा शब्दसंग्रह सुधारायला या सुविधेचा मोठा उपयोग होतो असे आढळून आले आहे.

'स्वतंत्रपणे जगण्याचे कौशल्य' असे नाव असलेला हा प्रशिक्षणाचा कार्यक्रम मुद्दाम नमूद करण्यासारखा आहे. अठरा ते पस्तीस वयोगटातील नेत्रहीन स्त्रियांकरता खास तयार केलेल्या या उपक्रमात रोजच्या दैनंदिन बाबींवर भर देण्यात येतो. बाहेरच्या जगात हिंडणे व वावरणे, घरातील व्यवस्था व देखरेख, स्वयंपाक, आरोग्य वगैरे गोष्टी शिकवण्यावर लक्ष देण्यात येते. अंध स्त्रियांचे सक्षमीकरण वाढवण्यासाठी या कार्यक्रमाचा खूप उपयोग होतो असे जाणवलेले आहे. या प्रशिक्षणाकरता संस्था एक पैसाही आकारत नाही.

'संचय' नावाचे मासिकही संस्था कन्नडमध्ये काढते. त्यात वेगवेगळ्या विषयांवर बातम्या आणि इतरही लिखाणाचा समावेश असतो. आरोग्य, सामान्यज्ञान, माहिती तंत्रज्ञान, स्पर्धात्मक परीक्षा, विनोदी किस्से वगैरे नाना विषय त्यात वाचायला मिळतात. आता 'संचय' सीडीच्या माध्यमातूनही उपलब्ध आहे. संस्थेतर्फे सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचा भाग म्हणून मधून मधून निरनिराळ्या विषयांवरील तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. दातांची तपासणी वगैरे मोहिमा घेतल्या जातात. मधून मधून सहलीही काढल्या जातात.

संस्थेच्या २० व्या वाढदिवशी गरजूंना टेपरेकॉर्डर वाटून बिनीच्या काही स्वयंसेवकांचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या विश्वस्त मंडळात सात जण काम करतात. कु. मधु सिंघल या व्यवस्थापकीय विश्वस्त आहेत. संस्थेत १९ पूर्ण वेळ कर्मचारी नोकरीस आहेत. सुरूवातीपासून ७००० अपंगांनी संस्थेच्या सुविधा व सेवांचा लाभ घेतला आहे. त्यांच्या सेवा काहींनी प्रत्यक्षपणे तर इतरांनी अप्रत्यक्षपणे (वेगवेगळ्या प्रशिक्षण उपक्रमांतून) घेतलेल्या आहेत. संस्थेचे कार्य दक्षिण भारतातील सर्व राज्यांमध्ये पसरलेले आहे.

जन्मत: आंधळ्या असलेल्या कु.मधु सिंघल यांचा जन्म हरयाणातील रोहतक शहरात एका सुखवस्तू उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. हे वैग्युण्य असूनही त्यांच्या पालकांनी त्यांच्या देखभालीत कोणतीही कसर सोडायची नाही हे पक्के केले. ब्रेल भाषेतून शिकवणारे मास्तर सहावीपर्यंत त्यांना घरी येऊन शाळेतल्याप्रमाणेच शिकवत असत. नंतर त्या सर्वसाधारण शाळेत जाऊ लागल्या. मुळात हुशार असलेल्या कु. मधु यांनी कालांतराने साहित्य आणि राज्यशास्त्र या विषयांत पदवी घेतली व हिंदुस्थानी संगीतात पदव्युत्तर शिक्षण घेतले. पालकांनी त्यांना इतर भावंडांप्रमाणेच वाढवले. भावंडांनी चांगले सहकार्य दिले. या बाबींचा त्या खास उल्लेख करतात.



नंतर त्यांनी आपल्यासारख्याच दृष्टीहीनता आणि नेत्रदोष असलेल्या व्यक्तींशी संपर्क साधायला सुरूवात केली. असे दोष असलेली बरीच जण त्यांची मित्रमंडळी झाली. त्या आश्चर्यचकित झाल्या की त्यांच्यातील कितीतरी जण अशिक्षित किंवा अगदी कमी शिकलेले होते. त्यांच्या असेही लक्षात आले की नेत्रहीन मुलींचे पालक त्यांना गरजेपेक्षा जास्त जपतात व अनावश्यक इतकी काळजी घेतात. त्यांच्यातील सुप्त गुणांना त्यामुळे वाव न मिळता ते उलटपक्षी दडपले जातात. बऱ्याच पालकांना त्यांच्यात असे काही गुण असतील याचा मुळी अंदाजच नसतो. 'ते आंधळे, त्यांना काय येणार? ते काय करू शकणार?' असा पक्का समज असणारे नातेवाइकच जास्त. या साऱ्यांतून मधुंना मनोमन जाणीव झाली की या लोकांच्या तुलनेने आपण किती नशीबवान आहोत की आपल्याला सुसंस्कृत पालक मिळाले व त्यांनी आपल्याला सतत उत्तेजन देताना कसलीही आडकाठी निर्माण केली नाही. त्यामुळे या वर्गाकरता आपण काही केले पाहिजे असे त्यांना मनातून वाटू लागले. त्याला एक प्रकाराने दिशा मिळाली जेव्हा त्या बंगळुरूला खास प्रशिक्षण घेत असताना त्यांना शिकायला लागणाऱ्या साहित्याची वानवा जाणवली तेव्हा. ते न ब्रेलमध्ये उपलब्ध होते, न ऐकून शिकण्याकरता कॅसेटमध्ये. ते दिव्य कसेतरी पार पाडल्यानंतर त्यांना नोकरीही मिळेना. शिक्षणास साहित्य न मिळणे, त्यामुळे अभ्यासापासून वंचित राहणे या ताज्या अनुभवाने त्यांना मनस्वी यातना झाल्या. नोकरीचा सल मनात होताच. मला भोगायला लागलेल्या या यातना आणि अवहेलना माझ्या दृष्टीहीन बांधवांच्या वाट्याला येऊ नये हा विचार सातत्याने त्यांच्या डोक्यात घोळू लागला. त्याकरता विधायक अशी कृती करण्याची मनातील उर्मी उफाळून आली आणि त्यांनी 'मित्र ज्योती' ची स्थापना केली. अपंगांचे (बालके वगळून) शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार हे संस्थेचे कार्यक्षेत्र आहे.

संस्थेला जाणवणारी एक मोठी अडचण म्हणजे अपंग मंडळींना रोजगार मिळवून देणे. त्याकरता कु. मधु सिंघल यांनी १९९९ साली एक वेगळा कक्ष सुरू केला. या कक्षाच्या माध्यमातून सुमारे ६०० अपंगांनी रोजगार मिळवला आहे. पण एकूणच बरीचशी अपंग मंडळी अगदी थोडीफारच शिकलेली असतात. पण तेवढे आणि त्या प्रकारचे शिक्षण त्यांना रोजगार मिळवून देण्याकरता पुरेसे ठरत नाही. पालकांनी शाळेत उशिरा पाठवल्यामुळे अनेकजण वाढत्या वयात जरा काही प्रगती करतात.पण अनेकदा ती समाधानकारक

पातळीची नसते. तोवर नोकरीचे वयही निघून गेलेले असते. त्यांना प्रशिक्षण देणाऱ्या ज्या काही सोयी आहेत त्या कालबाह्य झालेल्या आढळतात. तंत्रज्ञानही फार वेगाने पुढे जात आहे व त्याबरोबर वेग राखणे अपंगांना जमत नाही. कंपन्या वगैरेंचे व्यवस्थापनही त्यांना कामाकरता आवश्यक असे प्रशिक्षण देण्यास उत्सुक नसते. कारण वेळ आणि पैसा दोन्हीचा अपव्यय, म्हणून त्यांना नोकऱ्या देण्याकरता नाखुशी. एकूणच नोकरी मिळवून देण्याच्या सव्यापसव्यात कष्टाच्या मानाने फळ फार कमी मिळते.बराच सखोल अभ्यास करावा लागतो. मोठमोठ्या कंपन्यांकडे या कामाकरता जाताना नेमके कोणाला भेटायचे याबद्दल संभ्रम असतो.

वर्षाला पन्नास ते साठ अपंगांना कामाला लावण्यात कु. मधु सिंघल यशस्वी होतात. मनोरूग्णांबाबत मात्र त्यांच्या पदरी अपयश पडत आहे व त्याकरता वेगळा विचार करायला हवा हे संस्थेला माहीत आहे. कु. मधु सिंघल यांच्या मते खरी ग्यानबाची मेख वेगळीच आहे. अपंग , दृष्टीहीन, विकलांग वगैरे लोक काही कामे करू शकतात आणि तीही सर्वसामान्य माणसांप्रमाणेच, यावर समाजाचा मुळी विश्वासच नाही. सकारात्मक उदाहरणे समाजात वावरत असतानाही त्यांचा परिणाम काही होताना दिसत नाही. हे कधी आणि कसे बदलेल याची खंत त्यांना आहे. अर्थातच ती समजण्यासारखीही आहे. कु. मधु यांना असे वाटते की संस्थेने कंपन्यांच्या नेमक्या गरजा लक्षात घेऊन अपंगांना प्रशिक्षण दिले पाहिजे. त्याकरता त्यांच्या गरजांचे विश्लेषण व्हायला पाहिजे.

कु. मधु सिंघल यांना अनेक प्रतिष्ठेचे मानसन्मान, पारितोषिके आणि बक्षिसे मिळालेली आहेत. अनेक संघटना व संस्थांच्या व्यवस्थापन मंडळांत त्या सभासद म्हणून काम करतात. आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा त्यांना फायदा करून देतात. आशियन अंधांच्या संघटनेच्या त्या अध्यक्ष व जागतिक अंध संघटनेच्या त्या सन्माननीय सदस्य आहेत. अपंगांसंबंधी काम करणाऱ्या संघटना व संस्था एकमेकांबरोबर जाण्यासारख्या घट्ट विणल्या गेलेल्या असाव्यात असे कु. मधु यांचे प्रामाणिक मत आहे. त्यामुळे एकमेकांतील सामंजस्य वाढेल, संबंध दृढ होतील. अनुभवांची देवाणघेवाण होईल. एकमेकांपासून काही शिकता येईल. अनावश्यक पुनरावृत्ती टाळता येईल. एकत्रितपणे काही बाबी अधिक समर्थपणे धोरणकर्त्यांच्या, नोकरशहांच्या पुढे मांडता येतील. त्यामुळे भलेच होईल असा त्यांचा ठाम विश्वास आहे.



कु. मधु यांचे वाचन अफाट आहे. 'मित्र ज्योती'करता त्यांची स्वप्ने फार मोठी आहेत आणि ती प्रत्यक्षात उतरवण्याकरता लागणारे धैर्य आणि इच्छाशक्ती त्यांच्या ठायी आहे. त्यांचे व्यंग हे त्या नकारात्मक दृष्टीने पाहतात का? मुळीच नाही. या व्यंगाचे त्यांनी शक्तीस्थानात परिवर्तन केले आहे. उलट 'मित्र ज्योती' च्या स्थापनेतून व माध्यमातून एक अपंग व्यक्ती किती उंच भरारी मारू शकते व शारीरिकदृष्ट्या समदु:खी बांधवांना सर्वसाधारणपणे जीवन जगता यावे म्हणून कसे तन मन धनाने स्वत:ला वाहून घेऊ शकते याचे अतुलनीय उदाहरण त्यांनी घालून दिले आहे.

कु. मधु सिंघल दृष्टीहीन असल्या तरी द्रष्ट्या आहेत. हजारो अपंगांच्या जीवनात त्यांनी प्रकाश आणून ते आनंदाच्या आणि अपेक्षांच्या उजेडाने व्यापून टाकण्याची किमया त्या करीत आहेत. त्यांनी स्वत:च्या व्यक्तिगत विकासाकडेही दुर्लक्ष केलेले नाही. अमेरिकेत त्यांनी 'लीडरशिप' वर आणि हाँगकाँगला खास 'अपंगांकरता माहिती तंत्रज्ञान' या विषयांवर प्रशिक्षण घेतलेले आहे. कामानिमित्त त्या आशियातल्या बऱ्याच देशांत जाऊन आलेल्या आहेत. पायी मोठा पल्ला गाठण्याच्या आवडीमुळे (ट्रेक) त्यांची मजल दार्जिलिंगच्या हिमालयन माऊंटेनिअरिंग इन्स्टिट्यूटपर्यंत पोचली. त्यांनी लिहिलेले 'बदलाव' हे हिंदी कथांचे पुस्तकही प्रसिद्ध झाले आहे. महिलांकरता असलेल्या राष्ट्रीय आयोगाला अंध स्त्रियांसंबंधी धोरणे तयार करण्याकरता त्यांनी मोलाची मदत केली आहे.

एका वाहतूक कंपनीचे कार्यालय, नंतर एक मोकळे गॅरेज यांपासून श्रीगणेशा करणाऱ्या 'मित्र ज्योती' चा आज स्वत:च्या मालकीचा कॅम्पस आहे. अडीच हजार पुस्तकांचे ध्वनीमुद्रण आतापर्यंत पूर्ण झालेले आहे. पंचवीस हजार कॅसेट व आठशे सीडी ग्रंथालयात उपलब्ध आहेत. बाराशे पन्नास वैयक्तिक सभासद असलेल्या या ग्रंथालयात तीस शैक्षणिक संस्थांनीही सभासदत्त्व घेतलेले आहे. याकरता अत्यंत माफक फी आकारण्यात येते.

अपंगांकडे दयेच्या नजरेने पाहिलेले कु. मधु सिंघल यांना अजिबात आवडत नाही. त्यांच्या मते आपण सर्वसामान्यांसारखेच आहोत ही भावना अपंगांच्या मनात रूजवणे हीच तर यशाची खरी गुरूकिल्ली आहे.

# डॉ. संजीवनी केळकर-'आरोग्यदूत'

*ग्रामीण भागाच्या विकासातील एक मोठी अडचण म्हणजे सांडपाणी, शौचालये वगैरेंबद्दलच्या समस्या. महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात डॉ. संजीवनी केळकर यांच्या 'माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान'ने या कामी पुढाकार घेऊन जागरूकता कार्यक्रम हाती घेतले. तसेच गावकऱ्यांच्या सभा, आरोग्यदूत इत्यादी माध्यमांतूनही संदेश पोहोचवला जातो. एका अशा सभेनंतर काही गावकऱ्यांनी शौचालये बांधण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत.*

*अभ्यासाद्वारे सिद्ध झाले आहे की स्त्रियांना श्वसनमार्गाशी संबंधित रोग होण्याचे मूळ कारण स्वयंपाक करताना निर्माण होणाऱ्या धुरात असते. प्रतिष्ठानने असा धूर निर्माण न करणाऱ्या धूरविरहित चुलींचा हिरिरीने प्रचार करून अशा चाळीस चुली स्वयंपाकघरात स्त्रियांना बसवून दिल्या आहेत. बचतगटांच्या माध्यमातून आरोग्यक्षेत्रातही शिरकाव करून एक निधी तयार केला आहे. या 'आरोग्यकोशा'त प्रत्येक बचत गट शंभर रूपये जमा करतो. त्या निधीतून तब्येतीविषयी मोठ्या अडचणी निवारण्याकरता सभासदांना बिनव्याजी कर्जाद्वारे मदत केली जाते. त्यामुळे त्यांना वैद्यकीय साहाय्यता वेळेत मिळू शकते. ही योजना सर्वांनाच फार पसंत पडली असून प्रतिष्ठान तिला चांगला पाठिंबा देत आहे. डॉक्टर केळकर व त्यांच्या माताबालक उत्कर्ष प्रतिष्ठानच्या कामाची दखल देशविदेशात घेतली न गेली तरच नवल. वेळोवेळी मोठमोठे पुरस्कार, बक्षिसे, सन्मान त्यांना सातत्याने मिळाले आहेत.*



'माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान' ही संकल्पना प्रतिकूल परिस्थितीपासून बचाव करण्याच्या उद्देशाने प्रस्थापित झाली. सांगोल्यातील स्त्रिया व मुलांची स्थिती पाहून सामाजिक कार्यकर्त्या डॉ. संजीवनी केळकर यांनी त्याची सुरूवात केली. सांगोला हे सोलापूर जिल्ह्यातील एक दुष्काळी गाव. डॉ. संजीवनी केळकर १९७९ पासून 'माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान' या संस्थेच्या माध्यमातून माताबालक आरोग्य संवर्धन व महिला उत्कर्षाचे काम करीत आहेत. त्यांचे परिश्रम व मार्गदर्शनामुळे संस्थेने महिलांवरील अत्याचाराचे निराकरण, पीडित महिलांचे पुनर्वसन, स्वयंसहायता, महिलांचे संघटन, आर्थिक विकास व कौटुंबिक समस्या अशा प्रकारचे भरीव कार्य केले आहे. त्याचप्रमाणे बचत गटाचे नियोजन, व्यवसाय प्रशिक्षण व पूर्वप्राथमिक व प्राथमिक शाळा व स्त्रिया व बालकांचे आरोग्य यातही त्यांचा मोठा वाटा आहे.

डॉ. संजीवनी केळकर कुटुंबियांसमवेत त्यांच्या सांगोला येथील रूग्णालयात उत्तम रूग्णसेवा करतात व त्यांनी फिरता दवाखाना 'आरोग्यदूत' ही सुरू केला आहे. डॉ. संजीवनी केळकर यांना बरेच पुरस्कार मिळालेले आहेत, उदा. वैद्य स्मृती पुरस्कार, डॉ. हेगडेवार सेवा पुरस्कार, राजर्षि शाहू पुरस्कार व आदिशक्ती पुरस्कार, तसेच 'माणूस' प्रतिष्ठानचा पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले गेले आहे.

प्रतिष्ठानने केलेल्या सर्वेक्षणामध्ये दिसून आले की सांगोल्याच्या आजूबाजूच्या खेड्यांमध्ये आरोग्याच्या सोयी आणि सुविधा खूपच कमी आहेत. त्यामुळे गावकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. त्यामुळे प्रतिष्ठानने 'आरोग्यदूत' फिरता दवाखाना सुरू केला. संपूर्णपणे सुसज्ज असलेल्या या फिरत्या दवाखान्यात आरोग्याच्या आवश्यक त्या सोयी उपलब्ध आहेत. आवश्यक व नेहमी लागणाऱ्या औषधांचा साठासुद्धा केलेला असतो. ही औषधे रूग्णांना व इतरांना परवडणाऱ्या दरात दिली जातात. आरोग्य सेवा उपलब्ध नसलेल्या लांबवरच्या बारा गावांत ही सोय पुरवली जाते. रूग्णांना डॉक्टर आठवड्यातून एकदा तपासतात. या फिरत्या दवाखान्यासोबत डॉक्टर व परिचारीका, एक समाजसेवक, मुलांकरता शिक्षक किंवा प्रशिक्षक, बचत गटाचे कार्यकर्ते यांचा चमूही सोबत असतो. त्यामुळे आरोग्य सेवांसोबत शिक्षण, अल्पबचत, अत्याचाराविरूद्ध लढा इत्यादी बाबींकडेही एकाच वेळी लक्ष देणे सुकर जाते. एप्रिल २००८ पासून सुरू झालेल्या या उपक्रमाने चांगलीच

लोकप्रियता मिळवलेली आहे, यावरून दुर्गम भागात चांगली आरोग्यसेवा मिळण्याकडे प्रतिष्ठानचे लक्ष असल्याचे जाणवते.

सुमारे दोनशेहून अधिक गर्भवती स्त्रियांनी व जवळपास तेवढ्याच तान्ह्या बाळांनी या सुविधेचा फायदा घेतला आहे. त्यात नियमित तपासणीशिवाय कुटुंबनियोजन सल्ला, रक्तचाचणी, मुलांचे लसीकरण व त्यांचा आहार, सोनोग्राफी करून घेण्यास मदत वगैरेंचा समावेश असतो. फिरत्या दवाखान्यामुळे आधुनिक उपचारांचा वापर ग्रामस्थांमध्ये वाढत आहे व त्याचबरोबर जुन्यापुराण्या दवापाण्याच्या वापराला आळा बसत आहे. एक प्रकारे अंधश्रद्धेच्या निर्मूलनाला हे पूरकच आहे. मातांना व तान्ह्या बाळांना अधिकाधिक चांगली वैद्यकीय सेवा व सोयी पुरवण्यासाठी प्रतिष्ठान खास प्रयत्न करते. प्रतिष्ठानच्या डॉक्टर व समाजसेवकांचा चमू गर्भवती स्त्रिया शोधून त्यांना प्रसूतीची पद्धतशीर योजना पटवून देतात. त्यात आहार व इतर घ्यायच्या काळज्यांवर भर दिला जातो. नियमित लसीकरण तपासणी तसेच उपचारांवर लक्ष दिले जाते. मुळातच त्या वापरत असलेल्या जुनाट आणि अशास्त्रीय अशा प्रसूतीच्या रूढी व पद्धती यांचा पगडा घालवणे हे कर्मकठीण, परंतु प्रतिष्ठानच्या चमूंच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे दूरवरच्या खेड्यांतही चांगले यश मिळत आहे. आता निरक्षर तरूणींनासुद्धा प्रतिष्ठानचे म्हणणे मान्य झालेले आहे व बहुतांशी गर्भवती स्त्रिया आपणहून वैद्यकीय सल्ला आणि उपचारांकरता पुढे येतात.

आतापर्यंत घेतलेल्या वैद्यकीय चाचण्यांतून प्रतिष्ठानला असे आढळून आले आहे की कमी सकस व अपुरे अन्न हे स्त्रियांच्या तब्येती खराब असण्यामागचे मुख्य कारण असते. मुलांमध्ये लसीकरणाचा अभाव हे महत्त्वाचे कारण असते. या गोष्टींकडे शारीरिक तपासणी शिबिरे व आरोग्यदूतच्या माध्यमातून मुद्दाम लक्ष दिले जाते. सकस अन्न, पिण्याचे स्वच्छ पाणी, आरोग्य वगैरेंबद्दल उपयुक्त सूचना डॉक्टर व तज्ज्ञ कर्मचारी वेळोवेळी करीत असतात. बचत गटाच्या सर्व सभासदांकरता प्रतिष्ठान हिमोग्लोबिन चाचणी करीत असते. या सर्वांमागचा हेतू असा की चांगली तब्येत ठेवण्याकरता सोय व साधनसामग्री पुरवणे. प्रतिष्ठानचा यामागचा विश्वास असा आहे की आर्थिक उत्पन्नाबरोबरच चांगली तब्येत ही भरभराटीची खरी 'गुरूकिल्ली' आहे. याचा परिणाम म्हणून महिला व वर्षाच्या आतील बालकांच्या मृत्यू दरांवर चांगला परिणाम झालेला आहे.



प्रतिष्ठानने सुरूवातीला बालवाडी आणि के.जी वर्गावर लक्ष केंद्रित करायचे ठरवले. पालकांच्या आग्रहामुळे नंतर प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरू केली गेली. ग्रामीण भागातील मुलांना उत्तम प्रतीचे शिक्षण देणे हे शाळेचे मुख्य ध्येय आहे. त्याकरता शाळा अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम सतत राबवत असते. जगात वावरताना कुठेही मुलांनी कमी पडू नये अशी सुशिक्षित, सुजाण आणि सुसंस्कृत पिढी तयार करण्यावर तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंना आकार देण्याचे आव्हान नजरेपुढे ठेवून हे उपक्रम आखले जातात. रोजच्या जगात वावरताना लागणारे प्रात्यक्षिक ज्ञान व माहिती मुलांना अनौपचारिकपणे सहज म्हणून सांगितली जाते. उदा. बँकांचे व सरकारी कार्यालयातील व्यवहार. ही छोट्या ठिकाणची मुले स्वत:ला शहरातील मुलांपेक्षा कमी समजतात. हा न्यूनगंड दूर करण्याकरता वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञांना बोलावून त्यांना मार्गदर्शन केले जाते. आपले सुप्त गुण ओळखून जीवनात आपले ध्येय कसे साध्य करावे हे अधोरेखित केले जाते.

शाळेत स्व-अध्ययनावर भर दिला जातो. प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण, भरपूर शैक्षणिक साहित्याचा व कृतीपत्रिकांचा वापर, विषयाला अनुसरून प्रकल्प यामुळे मुलांच्या सहकार्याने त्यांचा बौद्धिक विकास केला जातो. शाळेत अत्याधुनिक खेळाची सामग्री , संगणक, ग्रंथालय, विद्यार्थी भांडार वगैरे सुविधा आहेत. बालक मंदिराचे कार्यही उल्लेखनीय आहे. मनसोक्त खेळण्याबरोबरच मुले गाणी, नाटुकली, नाच, कवायती, वर्गसजावट, वाद्ये वाजवणे वगैरे गोष्टी करतात. एका वेळेस २०० मुले भाग घेऊ शकतील इतकी साधनसामग्री शाळेत आहे. चार भाषांतून गाणी, गोष्टी, श्लोकोच्चार यावर भर दिला जातो. वक्तृत्व व सभाधीटपणा याकडे लक्ष दिले जाते.

मतदान व निवडणूक प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावी म्हणून मुलांचा प्रतिनिधी खऱ्यासारखी निवडणूक मतपत्रिका शिक्के वापरून निवडला जातो. चौथीच्या मुलांची हस्तलिखिते, चित्रे त्यांच्या वर्गात लावली जातात. आठवड्यातून एकदा अवांतर वाचन करून त्यावर चर्चा होते. मुले गांडूळ खत तयार करून भाजीचे वाफे तयार करतात व मधल्या सुट्टीत आपण लावलेली गाजरे खातात. मुख्याध्यापिका म्हणतात याने मुलांना स्वनिर्मितीचा आनंद मिळतो. सर्व मुलांना भाग घेता आला नाही तरी ती निरीक्षण करतात व पुढे शिकतात. शाळेत सण साजरे होतात. त्या महिन्यात वाढदिवस असलेल्या सर्व

मुलांचे वाढदिवस एकत्रितपणे साजरे केले जातात. औक्षण, गोड-धोड केले जाते. मुलांची प्रगती पालकांना कळवली जाते. महिन्यातून एकदा मुलांची वैद्यकीय तपासणी होते. कित्येक माजी विद्यार्थी डॉक्टर, इंजिनियर, वकील, उच्चपदस्थ अधिकारी आहेत तर काही परदेशात नाव काढत आहेत. उच्चपदस्थ माजी विद्यार्थी हाच आमचा अमूल्य ठेवा आहे असे मुख्याध्यापिका म्हणतात. डॉ. केळकरांच्या जुन्या इमारतीत सुरू झालेली शाळा आज नवीन प्रशस्त इमारतीत भरते.

बचत गटाच्या माध्यमातून प्रतिष्ठानला मेंढपाळ व घोंगडी विणणाऱ्या कुटुंबाची माहिती मिळाली. त्यांचे संपूर्ण कुटुंब यापैकी एकाच व्यवसायात काम करत असे. त्यांचे उत्पन्न कमी व कर्ज जास्त होते. राहण्याची परिस्थिती अस्वच्छ आणि असुरक्षित होती. प्रतिष्ठानचे काम राष्ट्रीय कृषी आणि विकास बँकेला माहीत असल्यामुळे त्यांना या कुटुंबांकरता विकास योजना बनविण्यासाठी प्रतिष्ठानला प्रोत्साहन दिले. तीन वर्षांत त्यांचे उत्पन्न दुप्पट करावयाचे अशी योजना तयार करून त्याद्वारे सर्वेक्षण आणि जागरूकता यावर भर दिला. या लोकांकरता अभ्यास दौरा आणि प्रशिक्षणाची व्यवस्थाही केली गेली. वेगवेगळ्या तज्ज्ञांनी मेंढ्यांची संख्या आणि लोकरीचे उत्पादन वाढवण्यास खूप मदत केली. गेल्या दोन वर्षांत ६० कुटुंबियांनी याचा फायदा घेतला असून उत्पन्नात आधीच्या तुलनेत दीडपट वाढ झाली आहे. पूर्वीच्या सात यंत्रांच्या ठिकाणी आज त्यांचे कडे बावीस लोकर विणकाम यंत्रे आहेत. लोकर बोर्डाकडे त्यांना समान सुविधा केंद्र स्थापण्याकरता प्रतिष्ठानने प्रस्ताव पाठवला आहे. ग्रामसंपदा या बँकेने भरवलेल्या विक्री प्रदर्शनात त्यांच्या उत्पादनांना प्रथम पारितोषिक मिळाले.

प्रतिष्ठानच्या अनोख्या कर्तृत्त्वाची कीर्ती फार दूरवर पोहोचली आहे. दूरवरून देशातील आणि परदेशातील मंडळी सांगोल्याला मुद्दाम भेट देत असतात.

❀❀



# श्री. श्रीकृष्ण पाद्रे-'अडीके पत्रिके'

*माहिती , तंत्रज्ञान आणि प्रसार माध्यमांच्या वाढत्या प्रादुर्भावाचा परिणाम शेती व ग्रामीण विकास क्षेत्रावरही होत आहेच. शेकडो वेबसाईट्स, इंटरनेट, ईमेल, मोबाईल दूरध्वनी, टोल फ्री फोन इत्यादींद्वारे माहिती व तिच्या विश्लेषणाचा ओघ शेतीक्षेत्राकडे लक्षणीय प्रकारे वळला आहे. या सर्वांचा अत्याधुनिकतेवर असलेला भर हे विशेष अंग असून ते सांभाळतात संबंधित विषयातील तज्ज्ञ मंडळी.*

*या सर्व मांदियाळीत उठून दिसेल असे शेतीविषयक कन्नड मासिक आहे श्री. पाद्रे यांचे 'अडीके पत्रिके'. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे ते शेतकऱ्यांकरता, शेतकऱ्यांनी लेखणीबद्ध केलेले मासिक आहे. त्यात शेतकरी आपण स्वत: वापरलेल्या किंवा प्रयोग केलेल्य आगळ्या वेगळ्या (व बरेचदा नाविन्यपूर्ण) विविध शेती प्रक्रियांबद्दल लेख लिहितात. हेतू हा की काही गोष्टी एक शेतकरी दुसऱ्या शेतकऱ्याच्या प्रत्यक्ष ज्ञानातून व अनुभवातून अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊन आत्मसात करू शकतो.*

*स्वत: त्या कामात शेतात हात घालून, घाम गाळून मग मिळवलेल्या अनुभूतीवर आधारित लिखाण अडीके पत्रिकेत प्रसिद्ध करायला लायक ठरते, अन्यथा नाही. मुळात मासिकाची लोकप्रियता व विश्वासार्हता वाढत आहे ती शेतकऱ्यांच्या अनुभवांना वाट करून देऊन ते सत्कारणी लावले म्हणून.*

शेतकऱ्याच्या हातात नांगर असणे अगदी स्वाभाविक आहे व यथायोग्यही. त्याने शेतीवर लक्ष देऊन आपले पीकपाण्याचे काम नीट पहावे. पण त्याच्या जोडीला हातात लेखणी? त्याने लेखणीने काय लेखन करायचे? काय आहे हा गूढ उपद्व्याप? यामागचे सूत्रधार आहेत श्रीयुत श्रीकृष्ण पाद्रे. लोकशाहीचे वर्णन करणाऱ्या शब्दांत सांगायचे तर गेली २२ वर्षे श्री. पाद्रे शेतकऱ्यांच्या, शेतकऱ्यांनी, शेतकऱ्यांकरता चालवलेल्या एका नाविन्यपूर्ण उपक्रमाचे जनक आहेत. ते चालवत आहेत एक मासिक, ज्यात फक्त मातीत हात माखलेला बळीराजाच आपले शेतकामातले विविध प्रकारचे स्वानुभव, निरीक्षणे, समस्या, प्रश्न, उपाय, परिणाम, मार्गदर्शनपर चार शब्द, यशस्वी किस्से वगैरे शब्दांकित करतो. कशाकरता? तर आपल्यासारख्याच इतर शेतकरी बांधवांना 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या प्रक्रियेत समाविष्ट करता यावे म्हणून. शेतकऱ्यांनी असे लिखाण करणे हा वार्तांकन क्षेत्रातील एक मैलाचा दगड म्हणता येऊ शकतो. या उपक्रमाचे भारतभर कौतुक केले गेले आहे.

श्री. पाद्रे आहेत कर्नाटक आणि केरळ यांच्या सीमेवरच्या किनारपट्टीजवळच्या, सुपारीची मोठी लागवड असलेल्या पश्चिम घाटातल्या एका गावाचे रहिवासी. विज्ञानातील पदवीनंतर त्यांनी इतिहासात पदव्युत्तर शिक्षण घेतले. ते घरच्या शेतीकडे जरी वळले तरी त्यांची लिखाण व पत्रकारितेची आवड व प्रेम कायम होते. ते अधुन मधून मुक्त पत्रकार म्हणून इंग्रजी व कन्नडमध्ये लिखाण करीत होते. सुपारीच्या किंमती १९८५-८६ साली कोसळल्या. शेतकऱ्यांचे अमाप नुकसान झाल्यामुळे श्री. पाद्रे फार अस्वस्थ झाले. त्यांना प्रकर्षाने जाणवले की एकूणच शेतकरी वर्गात विश्वसनीय माहिती व अनुभवाची आपापसातील देवाणघेवाण यांची अतिशय निकड आहे. हे त्यांनी त्यांच्या भागातील सुपारी उत्पादकांच्या नजरेस आणले. शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांकरता लेख लिहावे व त्याद्वारे आपला सर्वांचाच फायदा करून घ्यावा या संकल्पनेबद्दल सुपारी उत्पादकांना शंका वाटत होती. शेवटी श्री. पाद्रे यांच्या आग्रहामुळे संघटना त्याला तयार झाली. सुरूवातीला मासिक नव्हे तर एक नियतकालिक या स्वरूपात ते प्रसिद्ध होऊ लागले.

आज 'अडीके पत्रिके' या कन्नड मासिकाने २२ वर्षांची वाटचाल पूर्ण केली आहे. मासिकाचा प्रत्येक अंक हा वेळच्या वेळीच प्रसिद्ध होतो. त्याला इतक्या वर्षांत एकही अपवाद नाही. चार पाने असलेल्या नियतकालिकाची किंमत होती एक रूपया. जाहिरातींचे उत्पन्न मिळवून जेमतेम हातमिळवणी होणाऱ्या या उपक्रमाला शेतकऱ्यांचा प्रतिसाद मात्र उत्तम होता. म्हणून १९८८ साली नियतकालिकाचे रूपांतर मासिकात करण्यात आले. आज मासिकात २८ पाने असतात. एका अंकाची किमत आहे १५ रूपये व महिन्याचा खप आहे ३३,०००. कोणत्याही प्रकारचा नफा कमवण्याचा मासिकाचा हेतू नाही. ते 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर एका विश्वस्त संस्थेतर्फे चालवले जाते. श्री. पाद्रे यांनी मासिकाला सुपारी पिकापुरते मर्यादित ठेवले नाही, तर सर्वसमावेशक केले. फक्त सुपारी उत्पादकांचे मुखपत्र बनविले नाही. आजमितीला सुपारीचे पीक मासिकातील १० टक्क्यांपेक्षा कमी जागा व्यापते.

मासिकाची कल्पना नाविन्यपूर्ण असली तरी ती व्यवहार्य असून अमलात आणली जाऊ शकते हा विश्वास शेतकऱ्यांमध्ये निर्माण करणे हे श्री. पाद्रे यांच्यापुढील पहिले आव्हान होते. आधीचा अनुभव लक्षात घेता त्यांनी शेतकऱ्यांच्या यशस्वी झालेल्या उपक्रमांचा वापर करण्याचे ठरवले. खुद्द शेतकऱ्यांनी स्वत: करून पाहिलेल्या गोष्टीवर इतर शेतकऱ्यांचा विश्वास बसणे सोपे जाते. गरज पडली तर ते अशा शेतकऱ्यांच्या जागेला भेट देऊन खातरजमा करून घेऊ शकतात. खर्च आवाक्याबाहेरचा नाही ही खात्री करून घेऊ शकतात, व आपल्याला हे जमू शकते हे इतर शेतकऱ्यांना पटते.

शेतकऱ्यांची उन्नती फक्त शेती उत्पन्नात वाढ किंवा एकाच घटकामुळे होणार नाही याची जाणीव श्री. पाद्रे यांना आहे. म्हणूनच त्याकरता आवश्यक अशा बाबी किंवा विषयही मासिकात समाविष्ट केलेले असतात. जमिनीत हात घालून राबणाऱ्या शेतकऱ्यांकरता हे मासिक एक आरसा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या खरोखरीच्या समस्या मांडणे सोपे जाते.

श्री.पाद्रे म्हणतात, 'सुरूवातीपासूनच शेतकऱ्याच्या ज्ञानावर व सूज्ञपणावर आमचा विश्वास आहे. आम्ही त्यांना सांगितले की सह-शेतकऱ्यांना सांगण्यासारखे तुमच्याकडे काही असेल तर तुम्ही ते विनासंकोच लिहा. लिहायची पद्धत, अननुभव वगैरेची काळजी करू नका. ते आम्ही पाहून घेऊ. यामागची भूमिका अशी होती की आम्हाला जास्तीत जास्त अनोळखी व नाविन्यपूर्ण बाबी शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून प्रसिद्ध करायच्या असतात.' ते पुढे असेही म्हणतात की 'शेतकऱ्यांच्या अनेक गोष्टी पारंपरिक असून त्या काळाच्या कसोटीवर खऱ्या उतरलेल्या आहेत. त्यातल्या काही तर नामशेष होत आहेत.

एकत्रित रीत्या पाहिले तर त्यांच्याकडे ज्ञान व अनुभव अलौकिक आहे. फक्त लिखित स्वरूपात आणायची आवश्यकता शेतकऱ्यांच्या गळी उतरून पचनी पडावी म्हणून त्यांनी गावागावातून शेकडो मैल प्रवास केला. अशा प्रकारच्या अनेक पद्धती व प्रयोग त्यांनी स्वत: जागेवर भेट देऊन पाहिले व निरीक्षण करून निष्कर्ष काढले आहेत.

श्री. पाद्रे यांनी आकडेमोड व तांत्रिक बाबींवर अनावश्यक भर दिला नाही. उलटपक्षी संबंधित शेतकऱ्यांचा आनंद, नैराश्य, केलेले प्रयत्न, शिकलेले धडे, दिशादर्शक प्रतिपादन वगैरे बाबींवर लक्ष केंद्रित केले. काळजीपूर्वक, त्यांनी प्रत्येक लेखात काही व्यवहार्य टीपा, विचारायोग्य मुद्दे, शेती, पाणी, जंगले वगैरेबद्दल लोक आचरणात आणत असलेल्या चुकीच्या गोष्टी यांबद्दल आवर्जून चर्चा केली. हे करीत असताना श्री. पाद्रे यांनी पाळलेली तत्त्वे म्हणजे स्वयंसेवी संस्थांनी याबाबत केलेल्या चांगल्या कामांची व योजनांची त्यांनी दखल घेतली. अनुदानावर अवलंबून असलेल्या सरकारी उपक्रमांकडे त्यांचे मासिक फिरकलेही नाही. अर्थात, एखाद्या तशा यशस्वी योजनेचा किवा बाबींचा उहापोह करताना ती इतर ठिकाणच्या परिस्थितीत अपेक्षित यश देईल याची ते खातरजमा करून घेतात.

अशा प्रकारे लिहिलेल्या लेखांमुळे शेतकऱ्यांचे औत्सुक्य प्रकर्षाने जागृत झाले. त्याचा एक परिणाम म्हणजे श्री.पाद्रे यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना शेतकऱ्यांची, सार्वजनिक संस्थांची, स्वयंसेवी संस्थांची, सरकारी खात्यांची भाषणाकरता बोलावणी येऊ लागली. दृक्‌श्राव्य माध्यमाचा उपयोग करून स्वत: श्री. पाद्रे यांनी कर्नाटक व केरळात एकूण ४०० पेक्षा जास्त सभांना संबोधित केले. या सभांचा व्यक्तिगत रीत्या त्यांना एक मोठा फायदा झाला. इतक्या मोठ्या प्रमाणावर शेतकरी व संबंधितांना भेटल्यामुळे त्यांना नवनवीन प्रकारांनी यशस्वी झालेल्या नानाविध उपक्रमांची अतिशय उपयुक्त माहिती मिळत गेली.

या विषयावर कोणाला काही वेगळे सांगायचे आहे का? कोरड्या पडलेल्या व म्हणून मातीने भराव घातलेल्या विहिरींना चुकून पाणी लागले आहे का? दुष्काळी परिस्थितीत कोणी शेतकऱ्यांनी घरच्यापुरते धान्य पिकवले आहे का व कसे? पावसाळ्यात पाणी वाहून न जाऊ देणारा शेतकरी कोणी नजरेत आहे का? अशा प्रकारचे प्रश्न व उत्तरांची कारणमीमांसा शोधणे ही प्रक्रिया सतत ४०० हून अधिक सभांमध्ये केल्यामुळे त्यांच्याकडे माहितीचा खजिनाच साठत गेला.



कोणत्या प्रकारच्या परिस्थितीत कोण कशा रीतीने व का यशस्वी ठरले याची मोठी जंत्रीच त्यांच्याकडे तयार झाली. त्यात अनेक गोष्टी अनोळखी आणि नाविन्यपूर्णही होत्या. याचा अडीके पत्रिकेला किती वेगवेगळ्या तऱ्हांनी व विस्तृत प्रमाणावर उपयोग झाला असेल याचा विचार मती कुंठित करतो. अशा यशस्वी कथा श्री. पाद्रे यांनी या सभांमधूनच मिळवलेल्या आहेत असे नाही. बरेचदा सहज गप्पांच्या ओघात वाचकांकडून मिळणाऱ्या प्रतिक्रिया वगैरेमध्येही त्यांची बीजे प्रकट किंवा दडलेल्या स्वरूपात आढळतात. एका दशकाहूनही अधिक काळ ते या स्रोतांचा वापर करीत आहेत. त्यातून आगळ्या वेगळ्या, नाविन्यपूर्ण व जराशा 'हटके' अशा वास्तवातील कथांना योग्य निकषांवर व संपादकीय सोपस्कारांनंतर अडीके पत्रिकेमध्ये प्रसिद्ध होण्याचा मान मिळतो.

त्यांच्या या चाळणीतून निघणे ही सोपी गोष्ट नाही. अनेकदा श्री. पाद्रे स्वत: जागेवर जाऊन प्रत्यक्ष पाहतात, चर्चा व निरीक्षणे करतात. मग त्यानंतर प्रसिद्धीयोग्यता ठरवतात. कित्येकदा वेळ व लांब अंतराचे प्रवास भाडे यामुळे त्यांना स्वत:हून पाहणे शक्य होत नाही. मग संबंधित शेतकऱ्याशी संपर्क साधून मिळालेल्या माहितीची खातरजमा केली जाते. स्वत:चा कल सकारात्मक असला तर अधिक विस्तृत चर्चा करतात. त्या आधारावर त्या शेतकऱ्यासाठी एक सखोल प्रश्नावली ते तयार करतात व त्या शेतकऱ्याला ती भरून द्यायला सांगतात. या दरम्यान इकडे त्यांची व सहकाऱ्यांची तयारी चालूच असते. नंतर मिळवलेल्या संपूर्ण माहितीच्या आधारावर लेख तयार होतो. संपादकीय कात्रीखालून तो गेल्यानंतर मग सर्व सोपस्कार पूर्ण होतात. सुमारे आठशे ते हजार शब्दांचा लेख या पठडीतून बाहेर पडतो.

जमिनीचा पोत राखणे आणि पाणी वाचवून त्याचा सुयोग्य वापर करणे अशा विषयांचे महत्त्व लक्षात घेऊन, सप्टेंबर १९९६ मध्ये 'अडीके पत्रिके' ने दरमहा एक नियमित सदर छापण्याचे ठरवले. त्यात वेळेच्या कसोटीवर खऱ्या उतरलेल्या बाबींचे, शेत व ग्रामीण पातळीवरचे अस्सल अनुभव सादर केले जात. प्रत्येक ठिकाणची परिस्थिती वेगळी असते. म्हणून जसेच्या तसे हे अनुभव उपयोगी पडू शकत नाहीत. मासिक फक्त त्यांची माहिती पुरवते. त्यामधून ज्यांनी त्यांनी आपापल्या परिस्थितीनुरूप तपासून पाहून योग्य ते स्वीकारावे. ८ वर्षांनंतर जेव्हा श्री.पाद्रे यांची खात्री पटली की लोकांत, प्रशासनात व प्रसारमाध्यमांत पुरेसे औत्सुक्य जागे झाले आहे तेव्हा ते सदर बंद करण्यात आले.

अडीके पत्रिकेकडे वाचकांच्या प्रतिक्रियांचा मोठा वर्षाव असतो. पाणी बचत व त्याचा वापर इत्यादींवर मार्गदर्शनपर लिखाणाबद्दल धन्यवाद देणारी पत्रेही बरीच असतात. त्यावरून कर्नाटकातील हजारो शेतकऱ्यांनी स्वत:चा फायदा करून घेतला आहे हे स्पष्ट होते.

जनसामान्यात ही संकल्पना सातत्याने रूजवून लोकप्रिय करणारे अडीके पत्रिके हे पहिले मासिक. आता कर्नाटकातील तीन अग्रगण्य वर्तमानपत्रांत दर आठवड्याला या विषयांवर एक सदर प्रकाशित केले जाते केरळातील एका जिल्ह्यात या विषयावरचा एक धडा पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्यात आला आहे. काही शाळांतही या विषयांवरील प्रात्यक्षिके राबवली जात आहेत - मुलांना त्यापासून शिकता यावे म्हणून. या सर्वांचे मोठे श्रेय जाते ते अडीके पत्रिकेच्या जनकाला - श्री पाद्रे यांना.

मासिक सुरू केल्यानंतर अडचणीही समोर येऊ लागल्या. शेतकऱ्यांकडे सांगण्यासारखे बरेच काही असायचे पण ते असे काही लिहायला मुळी तयार नसायचे, कारण उघडच आहे. लिखाण करणे हा काही त्यांचा प्रांत नाही. त्यांच्यापैकी पुष्कळसे अशिक्षित, जे लिहूवाचू शकायचे त्यांच्या लिखाणाची पातळीही फार वरची नव्हती, त्यामुळे नेहमीच्या साच्याचे तज्ज्ञांचे लेख प्रसिद्ध करण्याकरता येऊ लागले.

पण श्री. पाद्रे यांनी त्यांना प्रोत्साहन दिले नाही. बहुतेक शेतकऱ्यांची लेखनक्षमता साधारण असल्यामुळे पहिली पाच सात वर्षे श्री पाद्रे यांना ८० टक्के लेखांचे पुनर्लेखन करावे लागत होते. त्यावर उपाय म्हणून त्यांनी शेतकऱ्यांना शेतीविषयक वार्तांकनाची कौशल्ये शिकवायला सुरूवात केली. त्यांच्यातील निवडक २५-३० जणांकरता तीन दिवसांचा मेळावा आयोजित केला. या उपक्रमाच्या यशातून कल्पना पुढे आली की अशी चार ते सहा दिवसांची कार्यशाळा घ्यावी. या कार्यशाळेचा १७५ हून अधिक शेतकऱ्यांनी लाभ घेतला. मग अशा प्रकारच्या आणखी कार्यशाळा त्यांनी आयोजित केल्या. त्याचा परिणाम म्हणजे हळुहळू लिहिणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढू लागली.

बरेचसे शेतकरी निरक्षर असल्यामुळे वाचू शकत नाहीत-लिहिणे तर दूरच. त्यांच्याकरता श्री पाद्रे यांनी 'समृद्धी' नावाचा गट स्थापन केला. महिन्यातून एकदा त्याची सभा होते. प्रात्यक्षिके, संभाषण, आपापसातील देवाणघेवाण, पाहण्याजोग्या शेती प्रयोगांच्या भेटीचे नियोजन, वगैरेबाबत तेथे चर्चा होते.



अडीके पत्रिके या मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखांच्या दर्जाबद्दल बोलायला एकच गोष्ट पुरेशी आहे. ती म्हणजे अनेक लोकप्रिय नियतकालिके आणि मासिके'अडीके पत्रिके' तील लेख पुनर्मुद्रित करतात. थोडक्यात सांगायचे तर श्री. पाद्रे यांच्या या मोहिमेमुळे शेतकऱ्यांच्या परंपरागत ज्ञानाला, तंत्रांना, माहितीला व अनुभवाला एक नवा पैलू लाभला आहे. त्यांनी हे जाणले आहे की एकत्रितपणे प्रश्न सोडवण्याची त्यांची क्षमता आहे. फक्त आवश्यकता आहे ती एकमेकांपर्यंत पोचण्याच्या सुसूत्र व पद्धतशीर व्यवस्थेची.

एकूण खर्चाचा ताळमेळ जमवण्याकरता या मासिकाला जरी जाहिरातींच्या उत्पन्नाची गरज लागत असली तरी ते काही ठराविक निकषांवरच जाहिराती प्रसिद्धीसाठी स्वीकारतात. अडीके पत्रिकेमुळे शेकडो शेतकऱ्यांच्या शेती-कामाचा दर्जा सुधारला आहे. श्री पाद्रे यांनी या मासिकाचे वर्णन 'स्वयं सहायक मासिक' असे केले आहे. ते म्हणतात की हे शेतकऱ्यांच्या यशाचे गमक उकलून सांगणारे लोकांचे विश्व विद्यालय आहे. याहून यथार्थ शब्दांत या उपक्रमाचे वर्णन करता येईल का? श्री पाद्रे यांचे कार्यक्षेत्र फक्त अडीके पत्रिकेपुरतेच मर्यादित नाही. जमिनीचे संधारण तसेच पाणी बचत व त्याचे नियोजन या विषयांचा त्यांचा सखोल अभ्यास आहे. पश्चिम कर्नाटक आणि उत्तर केरळमधील त्यांच्या पाणी क्षेत्रातील कामगिरीमुळे तेथील शेतकऱ्यांना जणू संजीवनीच मिळाली आहे. त्यांच्या कार्यशाळा अतिशय लोकप्रिय ठरलेल्या असून त्यांना ठिकठिकाणाहून त्याकरता बोलावणी येतात. त्यांनी १९९६ पासून २५० पेक्षा जास्त कार्यशाळांद्वारे २०,००० हून जास्त शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. एका कार्यशाळेकरता त्यांना सरासरी ७५ कि.मी प्रवास करावा लागतो. शेतकऱ्यांना दुष्काळाचा सामना कसा करायचा तेही त्यांनी दाखवून दिले आहे. केरळमध्ये काजूच्या झाडावर फवारल्या जाणाऱ्या घातक औषधांविरूद्ध मोहीम उघडून त्यांनी स्थानिक शेतकऱ्यांचे हित साधले. पाच कन्नड व एका इंग्रजी पुस्तकाचे ते लेखक आहेत. त्यातल्या त्यात वेळ काढून ते एका कन्नड वर्तमानपत्राकरता आठवड्याचे सदर लिहितात.

एकूण पाहता, एका मासिकाद्वारे शेतकऱ्यांचे इतके प्रश्न त्यांच्याच अनुभवाद्वारे सोडवणे हा एक अभिनव मार्ग श्री. पाद्रे यांनी यशस्वीपणे चोखाळला आहे.

# श्रीमती जेरू बिलिमोरिया - 'चाइल्डलाईन'

*निराधार, निराश्रित, दरिद्री असे जिणे वाट्याला आलेली बालके रस्त्यावर, रेल्वे स्टेशनवर, बस थांब्यावर, इतस्तत: नेहमी आढळतात. या मुलांना कितीतरी प्रकारच्या कल्पनातीत समस्यांना तोंड द्यावे लागते - अगदी उपासमारीपासून ते समाजकंटकांच्या वेगवेगळ्या शोषणापर्यंत. त्यावेळी आपत्कालीन समयी त्यांच्या मदतीला धावून जाते ती चोवीस तास कार्यरत असणारी 'चाईल्डलाईन'. भारत सरकारला या गोष्टीची आवश्यकता पटवून देऊन ही वेगळी टोल फ्री फोनची लाइन मिळवायला श्रीमती जेरू बिलिमोरिया यांना सतत तीन वर्षे झगडावे लागले. आजमितीला देशात ८४ शहरांत ही सोय उपलब्ध आहे, ज्यामुळे फोन मिळाल्यापासून जास्तीत जास्त ६० मिनिटांत प्रशिक्षित स्वयंसेवकांचा संच घटनास्थळी पोचतो. या सोयीच्या उपयुक्ततेबद्दल सुरूवातीला अनेकांना शंका होत्या, पण आज दोन कोटींहून अधिक फोन 'चाइल्ड हेल्पलाइन' कडे आलेले आहेत. आपत्कालीन संकट निवळल्यानंतर त्या बालकांच्या पुनर्वसनाकडे लक्ष पुरवले जाते. श्रीमती जेरू बिलिमोरिया यांनी हा उपक्रम आंतरराष्ट्रीय स्तरावर नेलेला असून अनेक देशांत तो चालू आहे.*

---

'चाइल्डलाईन' म्हणजे कोणत्याही अडचणीत किंवा संकटात सापडलेल्या मुलांना रात्रंदिवस उपलब्ध असलेली मोफत आपत्कालीन दूरध्वनीची सेवा. त्याकरता देशभरातून कुठूनही १०९८ या टोल फ्री क्रमांकाला फोन करता येतो. अठरा वर्षांपर्यंतच्या मुलांच्या संकटाच्या हाकेला नुसताच प्रतिसाद दिला जात



नाही, तर दीर्घदृष्टीने त्यांची काळजी घेऊन पुनर्वसनाकरता प्रयत्न केले जातात. देशभरात ८४ शहरांमध्ये हा अवाढव्य उपक्रम राबवणे म्हणजे गुंतागुंतीचेच काम. त्याकरता विकेंद्रीकरण करून प्रत्येक शहराकरता स्वत:ची वेगळी अशी स्वतंत्र व्यवस्था तयार केली गेली आहे. समाजातील तरूण मुले, स्वयंसेवी संस्था, इतर संस्था व संबंधित व्यक्ती वगैरेंचे चमू शहरातील भागांनुसार/ रस्त्यांनुसार तयार केले जातात. या प्रत्येक भागात प्रशिक्षित तरूणांचा संच २४ तास उपलब्ध असतो.

या उपक्रमाची सुरूवात प्रा. कु. जेरू बिलिमोरिया यांनी १९९६ मध्ये केली. रेल्वेस्टेशनवर, रस्त्यावर राहणाऱ्या मुलांशी बोलायला त्या नेहमी वेळ काढत. या वार्तालापातून मुलांना त्यांच्याबद्दल एक प्रकारची जवळीक निर्माण झाली होती. कसलाही कठीण समय आला की दिवस असो किंवा रात्र, ते जेरू मादामच्या घरी फोन लावायचे. अशा फोनची एसओएस (SOS) स्वरूपाची तातडी व तीही रात्री उशीरा यामुळेच खरेतर चाइल्डलाइनची बीजे पेरली गेली. मग प्रत्येक वेळी जेरू मादाम घाईघाईत धावपळ करीत त्यांना इस्पितळे, पोलीत ठाणे, निवारा मिळेल अशा ठिकाणी मदतीकरता घेऊन जात. त्यांना जाणवले की अशा मुलांना संकटांचा/अडचणींचा सामना आकस्मिकपणे करावा लागतो. म्हणून आपत्कालीन मदत रात्रंदिवस देणाऱ्या सेवेची गरज आहे. रस्त्यावरची मुले कुठल्याही भागात फिरत असतात. त्याकरता ही सेवा विखुरलेली व विस्तृत अशी हवी. एक टेलिफोन करून पटकन त्यांना कधीही रात्रंदिवस मदत मिळेल अशी सेवासुविधा हा योग्य तोडगा होऊ शकतो असे त्यांच्या ध्यानात आले.

मुलांकडून १०९८ वर फोन आल्यावर त्याला कशा रीतीने प्रतिसाद दिला जातो? फोन काय आहे यावर ते अवलंबून असते. काही वेळा फोनवरच समुपदेशन, भावनिक आधार, सल्ला, मार्गदर्शन वगैरेची आवश्यकता असते. जर आपत्कालीन परिस्थिती असेल वा मुलांपर्यंत तातडीने पोचणे आवश्यक असेल तर चाइल्डलाइनचा चमू तिथे तासभराच्या आत पोचतो.

पण मुले खरोखरच हे फोन करतात का? हे त्यांना सुचते का?

आकडे दर्शवतात की देशभरातील ८४ शहरांतून आजतागायत एकूण दोन कोटींच्या आसपास फोन चाइल्डलाइनकडे आले आहेत. याची सुरूवात वर्षभरात केवळ सहा हजार फोनने झाली. त्यातील ६० टक्के फोन मुलांनी स्वत: केले होते.

सर्वसाधारणपणे मुले कशा प्रकारच्या तातडीच्या बाबींमुळे फोन करतात? आजारपण, हरवणे, लैंगिक अत्याचार, निवारा, अपघात, घरातून पळून आलेल्यांना झालेली उपरती, मार्गदर्शन, सल्लामसलत, बेवारशी मुलांचे अंत्यसंस्कार यांकरता जास्तीत जास्त फोन येतात.

मधुनमधून सेवांचे मूल्यमापन केले जाते. मुलांच्या गरजांचेही निरीक्षण केले जाते. स्वयंसेवकांत तरूणांचा भरणा जास्त आहे. त्यातील अनेकजण याच संस्थेचा कधी ना कधी फायदा घेतलेले असतात. त्याच्या कामातील जिव्हाळा व आपुलकी वेगळीच असते.

चाइल्डलाइनची मुख्य उद्दिष्टे : सुरक्षेकरता मदतीची आवश्यकता असलेल्या मुलांना तातडीने मदत करणे, या सोयीची माहिती प्रत्येक भारतीय मुलापर्यंत पोचवणे, या कामात गुंतलेल्या संस्थांचे घट्ट जाळे तयार करायला व्यासपीठ म्हणून काम करणे, या मुलांकरता पोषक वातावरण राहावे म्हणून संबंधित संघटनांबरोबर (उदा. पोलीस, आरोग्य, वैद्यकीय, कायदा, प्रसारमाध्यमे इ.) सलोख्याचे संबंध ठेवणे, मुलांच्या रक्षणाकरता देशभरात मुख्य संघटन म्हणून काम करणे, यासंबंधित जागतिक पातळीवरील संबंधित चळवळीत हिरिरीने सहभागी होणे.

चाइल्डलाइन इंडिया फौंडेशनचा व्याप फार मोठा आहे. दीडशे मार्गदर्शकांनी तयार केलेले १५०० सामाजिक कार्यकर्ते ७० फोन लाइन्स चालवतात व ५५ प्रकारच्या सेवा पुरवणाऱ्या ठिकाणांशी संपर्कात राहतात. दररोज सुमारे ६००० तक्रारी त्यांच्याकडे येतात. शिवाय इतर संलग्न संस्थांशी सतत संबंध येतो तो वेगळाच. रात्री बेरात्री फोन आला म्हणून स्वत: जाऊन मुलांची सोडवणूक करणे वेगळे आणि त्याकरता एक यंत्रणा निर्माण करून त्याद्वारे सुसंघटित असे सर्वंकष प्रयत्न करणे वेगळे. जेरूमादामना याचा पूर्ण अंदाज होता. 'दहा हजार मैलांचा प्रवाससुद्धा पहिल्या एका पावलाने सुरू होतो' या चिनी म्हणीप्रमाणे त्यांनीही अशी पावले टाकली. रस्त्यावरच्या निराधार मुलांच्या समस्या अधिक खोलवर समजून घेतल्या. त्यात त्यांच्या झिडकारल्या गेलेल्या उपेक्षित बाल्याचा, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक वा भावनिक प्रकारच्या बाबींचा तसेच गरजांचा समावेश होता. परिणामकारकपणे त्यांच्यापर्यंत कसे पोचायचे हाही मोठा प्रश्नच होता. त्यांना आपत्कालीन परिस्थितीतून बाहेर काढण्याकरता व नंतर त्यांचे आयुष्य सर्वसामान्यांसारखे रूळावर आणणे याकरता सुसूत्रपणे सातत्याने कार्यरत राहील अशा यंत्रणेच्या निर्मितीवर विचार करणे व ती कार्यान्वित करणे म्हणजे अति मोठे आव्हान होते. अविरतपणे तीन वर्षांच्या प्रयत्नांनंतर देशपातळीवर हे सर्व काम कसे करायचे याचा अंदाज व आवाका लक्षात आला व योजना मार्गी लागली. भारतवर्षातील सर्व ठिकाणांकरता एकच टोल फ्री फोन नंबर मिळवणे ही अत्यंत कर्मकठीण व वेळखाऊ बाब ठरली. केंद्र सरकारच्या वेगवेगळ्या मंत्रालयांची संमती व सरकारी लालफितीतला कारभार यामुळे या कामाने अक्षम्य वेळ खाल्ला.

या संकल्पनेचे मूळ होते जेरू बिलिमोरिया या प्राध्यापिकेने टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतर्फे प्रायोगिक तत्त्वावर केलेल्या प्रकल्पात. कालांतराने त्याचे रूपांतर झाले या राष्ट्रव्यापी उपक्रमात. आता त्याचा विस्तार व वापर एवढा मोठा झाला आहे की सरकारदरबारीही त्याची पत उंचावली आहे. सरकार त्यावर अवलंबूनही असते ही बाब चाइल्डलाइन कौतुकास्पद समजते.

सुरूवातीला या संकल्पनेला लोकांनी नाके मुरडली व थट्टा केली की डोक्यात किडा आलेले हे एक उगाचच पाश्चिमात्य खूळ आहे. आपल्या देशात हे पूर्ण निरर्थक आहे. जेरू मादाम व त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्वेक्षण करून त्याच्या निष्कर्षांनुसार सरकारच्या दूरसंचार विभागाकडे अशा फोनची मागणी केली. चार वर्षांनंतर एकोणीसशे शहाण्णव सालच्या जूनमध्ये तिने मूर्त स्वरूप धारण केले. जेरूमादामबरोबर काम केलेली तरूण मंडळी स्वयंसेवक म्हणून पुढे सरसावली.

भारत सरकारच्या संबंधित मंत्रालयाने हे काम आणखी ३० शहरांत वाढवण्याकरता फौंडेशनबरोबर भागीदारी केली. या कामाला देशव्यापी स्वरूप देण्याकरता चाइल्डलाइनने चाइल्डलाइन इंडिया फौंडेशनची स्थापना केली. सरकार, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, राज्य सरकारे, देणगीदार, खाजगी क्षेत्रातील कंपन्या हे त्यात भागीदार झाले. दैनंदिन प्रशासकीय कामाकरता वेगळे कार्यालय कार्यरत केले आहे. त्यांनी संशोधन प्रकल्पही हाती घेतला आहे. संस्था बातमीपत्र दर दोन महिन्यांनी प्रसिद्ध करते.

'अफलातौन' या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थेच्याही जनक आहेत जेरू मादाम म्हणजेच प्रा. कु. जेरू बिलिमोरिया. दोन हजार पाच साली सुरू झालेल्या या संस्थेचे मुख्य कार्यालय हॉलंडमध्ये ॲमस्टरडॅम येथे आहे. सहा ते चौदा वर्षांच्या मुलांना ती संस्था शिक्षण देते. त्यांचे हक्क, जबाबदाऱ्या, पैशांचे तसेच उत्पन्नाचे व्यवस्थापन यावर सामाजिक व वित्तीय दृष्टीकोनातून शिक्षण दिले जाते.

मुलांना आपल्या कर्तव्यांची नीटपणे जाणीव करून देणे हा यामागील प्रमुख उद्देश. त्यांना पैशाचे महत्त्व कळून बचतीच्या मार्गाला लावणे, त्यातील काही जणांमध्ये उद्योजकतेचे सुप्त गुण आढळल्यास त्यांना मदत करणे या बाबतीतही संस्था कार्यरत आहे. आजवर संस्थेने एकोणसत्तर देशांत आपले कार्यक्षेत्र पसरवलेले आहे. या शिक्षणामुळे मुलांचा स्वत:वरील विश्वास वाढतो व ते अधिक सक्षम बनू लागतात. पैशांच्या विनियोगात संबंधित योग्य माहिती मिळाल्यामुळे आपण आपला व्यवसाय करू शकतो हा विश्वास त्यांना वाटू लागतो. दारिद्र्याचे दुष्टचक्र मोडण्याची ईर्षा पैदा होऊ लागते. ४५६३ शाळांच्या माध्यमातून संस्था सुमारे सहा लाख मुलांपर्यंत आधीच पोचली आहे. या मुलांनी २७ लाखाहून अधिक डॉलर्सची बचतही केलेली आहे.

या मुलांबरोबर काम करताना जेरूमादामना प्रकर्षाने जाणवले की या मुलांनी स्वत:ला पारखून घ्यायला, जाणून घ्यायला शिकले पाहिजे. हक्कांची व जबाबदारीची जाणीव त्यांना हवी. स्वत:च्या उत्पन्नाचा विनियोग कसा करावा हे त्यांना कळावे. म्हणून त्यांनी अठरा वर्षांपूर्वी 'अफलातौन' ची संकल्पना भारतात राबवून पाहिली. खेळ, गाणी, डोक्याला चालना देणाऱ्या बाबी वगैरेद्वारे पोहोचवलेला संदेश व मथितार्थ त्यांना भावला व पटलाही. या यशामुळे प्रेरित होऊन जेरूमादामनी हा अनुभव आंतरराष्ट्रीय समुदायापुढे मांडला. तो फारच आवडल्यामुळे वेगवेगळ्या देशांत तो कशा पद्धतीने पुढे न्यायचा या चर्चेचे फलित म्हणजे 'अफलातौन' संस्थेची निर्मिती.

❀❀



# श्री. अंशू गुप्ता - गूँज

*आजकालच्या जमान्याचा मंत्र आहे 'विकत घ्या, वापरा, वस्तू नकोशी झाली (काहीही कारणांनी) तर फेकून द्या आणि नवी आणा'. शहरात बळावणाऱ्या या वाढत्या प्रवृत्तीला वेगळ्या प्रकाराने छेद देण्याचे काम करीत आहे.*

*श्री. अंशू गुप्ता यांची 'गूँज' ही स्वयंसेवी संस्था. शहरात साधनसामग्री, सेवा, सुखसोयी, वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध असतात. वैयक्तिक पातळीवर त्या अनेकदा म्हणाव्या तितक्या पूर्णपणे व सर्वार्थाने योग्य रीतीने वापरल्या जातातच असे नाही. बऱ्याचदा त्यांचा दुरूपयोग होतो. त्या फेकून दिल्या जातात. वायाही जातात. त्यांचा पूर्णत्वाने उपयोग होत नाही. मग अशा गोष्टी, वस्तू वगैरे शहरातून गोळा करून त्या जर ग्रामीण भागातील (खास करून गरीब) जनतेला मोफत उपलब्ध करून दिल्या तर त्यांचा पुरेपूर उपयोग होवू शकेल. तसेच ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या वापरापासून होणारा फायदाही मिळू शकेल, हा दृष्टीकोन केंद्रस्थानी ठेवून कार्य करीत आहेत श्री. अंशू गुप्ता व त्यांची देशव्यापी संस्था 'गूँज' आणि तिने लक्ष केंद्रित केले आहे कपडा या महत्त्वाच्या गरजेवर.*

*'रोटी, कपडा, मकान' या माणसाच्या तीन अगदी मूलभूत गरजा. त्यातील 'कपडा' ही गरज वापरून झालेल्या कपड्यांच्या पुनर्वापरामुळे बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सुटू शकते. त्यासाठी न मोठ्या गुंतवणुकीची गरज आहे न कसल्या धोरणात्मक बदलांची. तसेच पूर, दुष्काळ, भूकंप अशा राष्ट्रीय आपत्तीच्या वेळेस जागे होऊन कपडे गोळा करायला*

*धावाधाव होते. पण कपड्यांची गरज तर ग्रामीण गरीबांना सततच भासते. म्हणूनच श्री. अंशू गुप्तांनी हा एक सातत्यपूर्ण उपक्रम म्हणून हाती घेतला व आज तो देशभर दुर्गम भागांतही पोचला आहे.*

*श्री. गुप्ता यांना त्याचे दिसलेले दोन प्रत्यक्ष फायदे म्हणजे गरीबांना त्यांचे तुटपुंजे उत्पन्न कपड्यांऐवजी अन्न व इतर मूलभूत गरजांवर खर्च करता येते आणि सणासुदीला नव्या कपड्यांकरता वगैरे सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत नाही. १९९८ साली फक्त ६७ कपड्यांच्या वाटपाने सुरू झालेला हा आकडा आता महिना २०००० किलोहून जास्त कपडे इथपर्यंत पोचला आहे. देशातील बहुतेक सर्व राज्यांत हे काम ३०० स्वयंसेवकांद्वारे व १०० पेक्षा जास्त (ग्रामपातळीवर काम करणाऱ्या) संस्थांद्वारे केले जात आहे. कपड्यांबरोबरच इतर गोष्टींबाबतही 'गूँज' ने स्पृहणीय काम केले आहे.*

---

श्री. अंशू गुप्ता उभारू पाहात आहेत एक देशव्यापी चळवळ, ज्याद्वारे शहरी मध्यम व उच्च वर्गीयांकडील जास्तीच्या आणि उपयोगात नसलेल्या वस्तू ग्रामीण भागातील हजारो गरीबांना वाटल्या जातात.

त्यांनी एका प्रभावी वितरण व्यवस्थेचे संघटन केले आहे. त्या माध्यमातून शहरी भागातील सधन लोकांची त्यांना नको असलेल्या (पण पुन्हा वापरता येण्याजोग्या) वस्तूंपासून सुटका तर होतेच पण त्याचबरोबर खेड्यातील रोजचे जगणे (आर्थिक अडचणीमुळे) अशक्य झालेल्या अशा हजारो अत्यंत गरीब कुटुंबांच्या साध्या साध्या गरजांची नडसुद्धा भागवली जाते. त्यामुळे त्यांच्या जीवनात चांगला असा फरक तर पडतोच, तसेच शहरी लोकांकडे उगाचच पडून असलेल्या (म्हणून नाकाम वाटणाऱ्या) वापरात येऊ शकणाऱ्या वस्तूंचाही पुनर्वापर यथायोग्य प्रकाराने होतो. जाता जाता सहज आपल्या देशातील गरीब, कंगाल जनतेच्या थोडेफार का होईना, उपयोगी पडल्याचे समाधान शहरवासियांना मिळते.

'रोटी, कपडा और मकान' या बाबी गरीबांना किती जवळच्या वाटतात ते सांगायला नकोच. श्री. अंशू यांनी त्यांचा आपसातील संबंध बऱ्याच ठिकाणी जवळून निरखला आहे. इतरांनी दिलेले काही थोडे कपडे मिळाल्यामुळे त्यांच्याकडील तुटपुंजे पैसे इतरही तातडीच्या गरजांकरता वापरता येतात व त्यामुळे त्यांना फार मोठा दिलासा मिळतो. सणासुदीला (किंवा इतर वेळी गरज म्हणूनही लागले तर) कर्जाच्या चक्रात अडकण्यापासून मुक्तता मिळते. त्यामुळे या चळवळीची सुरूवात श्री. अंशू यांनी केली ती कपड्यांच्या वितरणापासून. सर्वसाधारणपणे कपडे देऊन टाकणे ही धर्मादाय बाब समजली जाते. श्री. अंशू त्याकडे 'पुरवठा' आणि 'मागणी' या दृष्टीने पाहतात.

शहरी मंडळींना जागेची कमतरता, बदलत्या फॅशन्स, वाढता चंगळवाद यांमुळे जराशा जुनकट गोष्टीही नकोशा होतात तर देशातल्या लाखो गरीबांना त्यांची नितांत आवश्यकता असते. सरतेशेवटी श्री. अंशू यांचे उद्दिष्ट आहे शहरातून अशा प्रकारच्या आवश्यक वस्तू (उदाहरणार्थ औषधे, पुस्तके इ.) मोठ्या प्रमाणात एकत्र करून त्या खेडेगावातल्या जनतेमध्ये वाटणे.

शहरी लोकांना नको असलेल्या पण पुनर्वापर होऊ शकतील अशा गोष्टींच्या योग्य ठिकाणी वापराची खात्री देऊ शकेल अशी जागरूकता निर्माण होणे हे महत्त्वाचे. ती तशी निर्माण होण्यापासून ते अशा वस्तू शहरी लोकांकडून गोळा करणारी साखळी निर्माण करणे व स्थानिक संस्थांच्या सहकार्याने भारताच्या कानाकोपऱ्यात या वस्तू गरीबांपर्यंत पोचवणे हा जगन्नाथाचा रथ ते हाकत आहेत. 'गूँज' ही संस्था उद्योग व्यावसायिक, शाळा, वाहतुकदार, रहिवाशांची संघटना, खेड्यापाड्यातील स्थानिक संघटना वगैरेंच्या सहभागाने वाटचाल करते. देशाच्या ग्रामीण भागात राहणारी लक्षावधी कुटुंबे आज दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत आहेत. जगण्याकरता अत्यावश्यक गोष्टींपासूनही ते आजमितीला वंचित आहेत. दुसऱ्या बाजूला शहरातील लोकांमध्ये खरेदी करायची क्षमता वाढल्यामुळे ग्राहकांची संख्या कधी नव्हे इतकी फुगत चालली आहे. 'आहे रे' कडून 'नाही रे' कडे अशा वस्तूंचा ओघ वळवण्याची नितांत आवश्यकता दिसून येते.

शहरी भागातून ग्रामीण भागाकडे अशा गोष्टी नियमितपणे जाव्यात असे मार्ग किंवा पद्धत आज अस्तित्वात नाहीत. वापरलेले कपडे गोळा करून त्याचे वितरण करण्याची सुनियोजित पद्धत, तिचा विस्तार इतर गोष्टींपर्यंत वाढवून सतत कार्यरत राहील अशी कायमस्वरूपी यंत्रणा निर्माण करणे, जास्तीत जास्त लोकापर्यंत पोचता येईल अशा संबंधित संस्था, कार्यालये, संघटना, व्यक्ती वगैरेंशी भागीदारी / सहकार्य करून ती बळकट करणे यावर श्री. अंशू गुप्ता यांच्या कामाचा भर आहे. या कल्पनेचे आगळेपण असे की कपड्यांच्या वितरण

व्यवस्थेचे विकेंद्रीकरण केलेले असून लोकांच्या नेमक्या गरजा लक्षात घेऊन त्यानुसार कपडे पाठवले जातात. 'गूँज' ने इतक्या वर्षांत गावातल्या लोकांमध्ये काम करणाऱ्या संस्थांशी संबंध वृद्धिंगत केले आहेत. जणू त्यांचे एक जाळेच विणले आहे. साठहून जास्त संस्था त्यात समाविष्ट झालेल्या आहेत. या संस्थांच्या निवडीआधी संस्थेची तपशीलवार छाननी 'गूँज' करून घेते व मगच पुढे पावले टाकते. या संस्था स्थानिक लोकांच्या गरजांचे बरोबर विश्लेषण करण्याच्या स्थितीत सक्षम असतात. त्यांची दुर्गम ग्रामीण भागांत पोहोचही चांगली असते. या संस्था त्यांच्या कार्यक्षेत्रातील लोकांच्या कपड्यांच्या गरजांची यादी पाठवतात. यादीत स्त्रीपुरूषांची संख्या, वेशभूषेच्या आवडीनिवडी व सवयी, कपड्यांच्या गरजा इत्यादी माहिती असते. त्यानुसार गोळा केलेल्या कपड्यांचे वर्गीकरण केले जाते व त्या त्या संबंधित संस्थेकडे तसे कपडे पाठवले जातात. या संस्थांच्या माध्यमातून 'गूँज' ची वितरण केंद्रे पश्चिम बंगाल, आसाम, उत्तरांचल, झारखंड, काश्मीरमध्ये कार्यरत आहेत. विकेंद्रीकरणाच्या द्वारे काम करणाऱ्या या व्यवस्थेवर श्री. अंशू गुप्ता यांची करडी नजर असते.

समाजातील सर्व स्तरातील लोकांना 'गूँज' ने स्वयंसेवक म्हणून काम करण्याकरता कायमस्वरूपी आवाहन केलेले आहे. वेगवेगळ्या कामांकरता स्वयंसेवक ठराविक अवधीकरताही काम करू शकतात. उदाहरणार्थ, आपल्या शहरातील मोहिमेचे समन्वयक होणे, वस्त्रे व इतर सामान गोळा करणाऱ्या केंद्रांचे व्यवस्थापन करणे, गूँजला उपयोगी होऊ शकतील अशा समाजातील नानाविध घटकांसाठी गूँजचा संबंध जोडून देणे इ. नवे वर्ष प्रत्येकाने एखादा तरी कपडा देणगी म्हणून देऊन साजरे करावे म्हणून एक जानेवारी हा दिवस संस्थेने 'कपडा दिवस' म्हणून पाळण्याचे ठरवले आहे.

श्री. अंशू गुप्ता यांना स्वत:ला आणि 'गूँज' या संस्थेला अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी व मानमरातबांनी वेळोवेळी सन्मानित केले गेलेले आहे. श्री. अंशू गुप्ता यांना २००४ साली सन्मानाची अशोक शिष्यवृत्ती देऊन त्यांचा गौरव करण्यात आला होता. 'गूँज' च्या कल्पनांची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जाऊन त्यांना मान्यतेची पावती मिळालेली आहेच.

वस्त्र सन्मान या 'गूँज' च्या राष्ट्रव्यापी कार्यक्रमातून गरीबांची प्राथमिक गरज म्हणून कपड्यांचे महत्त्व अधोरेखित होते. 'राहत' या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे आपत्कालीन संकटात कपड्यांची मदत पोचवणे.



त्सुनामी संकटाच्या वेळेस वाटप न झालेल्या / खराब झालेल्या २० लाख कपड्यांवर सुमारे ५० महिला दोन वर्षे काम करीत होत्या. त्यापासून त्यांनी उपयुक्त अशा वेगवेगळ्या वस्तू तयार केल्या, शाळांची दप्तरेसुद्धा. 'शाळा ते शाळा' या कार्यक्रमात शहरी व ग्रामीण शाळांमध्ये शाळेकरता उपयुक्त वस्तूंच्या देवाणघेवाणीद्वारे आपापसात सामंजस्य निर्माण केले जाते. याची पुढची पायरी म्हणजे 'प्रतिबिंब' कार्यक्रम ज्यात ही मुले समोरासमोर येवून हे संबंध अधिक बळकट करतात. 'देणारे' आणि 'घेणारे' या भावनांना तिथे अजिबात थारा नसतो. मुलांच्या मनातील मळभ नष्ट होण्यासाठी या कार्यक्रमाचा फार उपयोग होतो. वाया जाणारा कागद आणि कपड्यांतून अनेक वस्तू 'गूँज' संस्था तयार करते. ग्रामीण भागांकरता शाळेची दप्तरे, तंबू, चटया इत्यादी, तर शहरी गिऱ्हाइकांकरता नाना प्रकारच्या आधुनिक पिशव्या व बॅग्ज, योगासनांकरता चटया, पैशाची पाकिटे इ.

रहिवाशांच्या संघटना, शाळा, कार्यालये इत्यादी माध्यमांतून कपडे गोळा केले जातात. त्याकरता या ठिकाणी कँप भरवला जातो. त्याबद्दल जवळच्या रहिवाशांना माहितीपत्रकाद्वारे व दारोदार फिरूनही माहिती आधीच कळवली जाते. ही कल्पना लोकांपर्यंत पोचवून प्रतिसाद मिळवणे हे श्री. अंशू यांच्या मते फार महत्त्वाचे आहे. त्याकरता इंटरनेट, मोहिमा, पथनाट्य, माहितीपत्रके, वेगवेगळ्या सभा वगैरेंमधे हजेरी लावणे हे ही संस्था सातत्याने करीत असते. स्वयंसेवक या कामी मोठी भूमिका बजावतात.

दिल्लीत त्यांच्या घराचा कपडे गोळा करणारी केंद्रे म्हणून वापर केला जातो. तिथे अशी ३५ केंद्रे कार्यरत आहेत. सरासरी पाहता 'गूँज' ला दररोज १५ ते २० फोन येतात – वस्तू देणगी म्हणून देण्यासाठी. 'गूँज' कडून वाटप केल्या जाणाऱ्या कपड्यांचा दर्जा चांगलाच असेल याची खात्री श्री. अंशू देतात. याकरता कपड्यांचे वर्गीकरण व तपासणी केली जाते. हे काम 'गूँज' चे कर्मचारी करतात. धुलाई आणि दुरूस्ती कामाकरता हंगामी कामगारांची निवड केली जाते. नासधून, वाया घालवणे इत्यादी कमीत कमी ठेवण्यावर भर दिला जातो. त्यामुळे कापडाचा पूर्ण वापर केला जातो.

किंमती कमी ठेवण्याबरोबरच त्या त्या गावातून पुढे आलेल्या गरजांकडे जास्तीत जास्त लक्षही पुरवता येते. कपड्यांचे वाटप करणाऱ्या संघटनांकडून विस्तृत अहवाल 'गूँज' ला दिला जाणे ही बाब अनिवार्य आहे. त्यात कपडे

वाटलेल्या माणसांची पोचपावती व दृश्य स्वरूपाचा पुरावाही समाविष्ट करायचा असतो. लायक माणसांनाच योग्य पद्धतीने वाटप केले जाते याची काळजी घेण्याला संस्था फार महत्त्व देते. याची छाननी बाहेरील स्रोतांकडूनही केली जाते.

आपत्तींना तोंड देण्याची तयारी ठेवणे याकडेही 'गूँज' लक्ष ठेवते. त्यांच्याशी संलग्न असलेल्या संस्थांचे जाळे अशा रीतीने पसरवायचा त्यांचा विचार आहे की आपत्तीग्रस्त भागातील स्थानिक संघटनांशी संपर्क साधून 'गूँज' तिथे मदत लवकरात लवकर पोचवू शकेल. गुजरातेतील दंगलीच्या वेळी ही कल्पना यशस्वी ठरून ट्रक भरभरून मदत थोड्याच दिवसात पाठवता आली.

श्री. अंशू यांच्या असे लक्षात आले की मुले शाळेत जाण्यास नाखूष असतात कारण त्यांच्याकडे गणवेश, वह्या, लिहायला कागद वगैरे आवश्यक गोष्टी नसतात. त्यामुळे त्यांनी शहरी भागातील शाळांच्या मुलांना वापरात नसलेले गणवेश, दप्तरे, सत्राच्या शेवटी वह्या व इतर न लागणाऱ्या वस्तू देण्यास प्रोत्साहित केले. दीड दोन हजार विद्यार्थ्यांची शहरी शाळा चार पाच ग्रामीण शाळांच्या अशा गरजा पुरवू शकते. बिहारमध्ये हा उपक्रम राबवला गेला आहे.

कर्मचाऱ्यांच्या लहान चमूव्यतिरिक्त वेगवेगळ्या क्षेत्रातील तीनशे स्वयंसेवक 'गूँज'शी निगडीत आहेत. मारूती, सिटी बँक, अमेरिकन एक्स्प्रेससारख्या मोठ्या संस्थांनी कपडे गोळा करण्याचे कँप आपल्या कार्यालयात घेऊ दिले व इतर क्षेत्रीय कार्यालयांनाही या कामी समाविष्ट केले. पारदर्शक प्रक्रिया व तळागाळात काय चालले आहे ते पटकन नजरेस आणून देणारी सक्षम पद्धत यामुळे 'गूँज'ची विश्वसनीयता प्रस्थापित होण्यास मदत होते. देणगीदारांच्या नजरेत याचे किती महत्त्व असते ते सांगायला नकोच. 'गूँज' च्या प्रयत्नांचा परिणाम स्वयंसेवक, देणगीदार, हितचिंतक वगैरे मंडळींनी तपासण्यास श्री. अंशू गुप्ता प्रोत्साहन देतात.

पहिली पाच वर्षे संस्थेला पैशांच्या मदतीची गरज भासली नाही. श्री.अंशू यांच्या आगळ्यावेगळ्या नाविन्यपूर्ण कार्यपद्धतीमुळे खर्च कमी लागायचा हे त्यामागील कारण – मग ते वाहतूकदारांशी कमी दराकरता बोलणे असो किंवा पॅकिंगसाठी ज्यूटची पोती धान्य व्यापाऱ्यांकडून विकत घेणे असो. काही वेळा वाहतुकीचा खर्च संलग्न स्थानिक संस्थांबरोबर वाटून घेतला जायचा. केवळ ९७ पैशात एक कपडा देशातल्या कोठल्याही कोपऱ्यात 'गूँज' पोचवू शकते. देणगीदारांकडून हे ९७ पैसे मागायचा विचार आता श्री. अंशू करीत आहेत.



उत्पन्न वाढवण्याकरता त्यांनी अनेक मार्ग शोधून ठेवले आहेत. जुनी वर्तमानपत्रे देण्याकरता ते लोकांना आवाहन करतात व ती रद्दीत किंवा थैल्या करून विकतात. मुळात अगदी काहीही वाया म्हणून जाऊ द्यायचे नाही हा 'गूँज' चा मुळी मूलसिद्धांत. म्हणून चिंध्या, फाटके कपडे, वाया जाणारा कचरा यांपासून ते थैल्या व बॅग्ज बनवून शहरांत विकतात. वाया जाणाऱ्या कागदांचा कोरा भाग वेगळा काढून त्याच्या वह्या करतात. त्यामुळे पैशांबरोबरच ग्राहकांमध्ये संस्थेचा संदेशही पोचतो. तयार कपडे निर्यातदारांकडे जाऊन त्यांचा नाकारलेला मालही 'गूँज' ने घ्यावा यासाठी श्री. अंशू प्रयत्नशील आहेत. ज्यूटच्या बॅगा तसेच चिंध्यांपासून कॅरीबॅग तयार केल्या जातात. हाताने तयार केलेल्या कागदाची भेटकार्डेही केली जातात. संस्था मेणबत्त्या, पणत्याही करून विकते व त्यातून उत्पन्नाला हातभार मिळतो.

संस्थेच्या कामात समाजाच्या जास्तीत जास्त घटकांना समाविष्ट करण्याचा श्री.अंशू यांचा प्रयत्न असतो.

उदाहरणार्थ,

- जम्मू काश्मीरच्या एका दुर्गम भागात लोकरीचे कपडे आणि घोंगड्या पोहोचवण्याकरता सैन्यदलाच्या एका तुकडीबरोबर 'गूँज' काम करीत आहे.
- 'गूँज' चा 'शाळा ते शाळा' कार्यक्रम एका मान्यवर व्यक्तीच्या माध्यमातून दक्षिण भारतात राबविला जात आहे.
- आणखी तीस शहरांमध्ये 'गूँज' चा विस्तार करून हिमाचल प्रदेश, छत्तीसगढ व महाराष्ट्रात शिरकाव करायचा त्यांचा विचार आहे.

दरवर्षी थंडीच्या दिवसात उत्तर भारतात कित्येक गरीब लोक हकनाक जिवाला मुकतात. ही बाब तशी दरसालचीच, पण दुर्लक्षित राहिल्यामुळे कायमस्वरूपी बनून राहिलेली. कारण एकच – पुरेशा व योग्य कपड्यांची तीव्र वानवा. खास करून रात्री घोंगड्यांची कमतरता त्यांना फारच त्रासदायक ठरते. दिल्ली शहरात स्वयंसेवकांची संख्या मोठी असल्याने रात्रीच्या थंडीत ते बाहेर पडून रस्त्यावर झोपलेल्यांना घोंगड्या वाटण्याचे काम नियमितपणे करतात.

'गूँज' चा असा ठाम विश्वास आहे की जुने कपडे पुनर्वापराकरता देणगी म्हणून दिल्याने गरीबांच्या अपुऱ्या कपड्यांचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक न करता व धोरणे न बदलता सुटू शकेल.

दर वर्षी एक जानेवारी हा दिवस 'कपडा दिवस' म्हणून पाळताना एकोणीस राज्यांमध्ये कार्यरत असलेले 'गूँज' चे स्वयंसेवक गेली चार वर्षे नवीन वर्षाची सुरूवात इतरांसारखी पार्ट्या, शँपेन, धूमधडाका, टीव्ही कार्यक्रम यांनी करीत नाहीत. पहाटेपर्यंत ते धुंडाळत असतात रस्ते, गल्लीबोळ आणि शोधत असतात थंडीने गारठणाऱ्या रात्रीत कुडकुडत असलेल्या, रस्त्यावरच्या दीनवाण्या जिवांना, त्यांना गरम कपडे वाटण्यासाठी व प्रेमाची ऊब देण्यासाठी. या कल्पनेने देणगीदारांच्या अंतर्मनाला जणू हात घातला आणि उत्तम प्रतिसाद मिळून तिचे चांगले स्वागत झाले.

समाजसेवेची प्रबळ इच्छा असणारे साध्या साध्या गोष्टीतही ही संधी शोधतात, हेच यातून दिसून येते. वाया जाणाऱ्या जुन्या कपड्यांचा गरीबांसाठी सार्थ उपयोग करण्याचे अभिनव काम 'गूँज' ही संस्था अविरतपणे करीत आहे.

❃❃



# श्रीमती यज्ञेश्वरन-ट्री फॉर फ्री
## (TREE FOR FREE )

*वृक्षतोडीचे दुष्परिणाम समाजातील वेगवेगळ्या स्तरांवर विस्तृत स्वरूपात जाणवू लागलेले आहेत. तरी वास्तवता अशी आहे की सर्वसाधारणपणे वृक्षतोडीच्या समस्येचे अक्राळ विक्राळ स्वरूप कमी झालेले नाही. असाही एक मतप्रवाह आहे की काही वेळेला वृक्षतोड ही अपरिहार्य बाब बनू शकते. उदाहरणार्थ, रस्याच्या रूंदीकरणाकरता. यावर एक उपाय म्हणजे जेवढे वृक्ष तोडले जातील त्यापेक्षा जास्त वृक्ष लावणे, त्यामुळे काही अंशी तरी का होईना हा प्रश्न सौम्य होण्यास मदत होईल. बेंगळुरूच्या श्रीमती यज्ञेश्वरन यांचा वृक्षतोडीला विरोध आहेच.पण तो त्यांनी अधिक सकारात्मक पद्धतीने हाताळला आहे. त्या मग्न आहेत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात. त्यांच्या 'ट्री फॉर फ्री' या स्वयंसेवी संस्थेतर्फे वृक्ष लावण्याचा सामाजिक उपक्रम त्यांनी हाती घेतला आहे. या संस्थेच्या माध्यमातून त्या हजारो झाडे लावत जोमाने पुढे जात आहेत.*

---

समाजाला वृक्षारोपणाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर जाणवते आहे, हे तर स्पष्टपणे दिसून येत आहे. स्वच्छ हवा, मुबलक प्राणवायू, मान्सूनची अनुकूलता, वैश्विक उष्णतेला लगाम, पर्यावरणाचे संतुलन अशा नानाविध प्रकारांनी वृक्ष जगाच्या शाश्वतस्वरूपी विकासाला मोठाच हातभार लावतात यात शंका नाही. तरीही मोठ्या प्रमाणावर होणारी जंगलतोड ही आजकालच्या काळात एक अक्राळविक्राळ स्वरूप धारण केलेली भली थोरली समस्या झालेली आहे.

जंगलतोडीला आळा घालणे आणि वृक्षारोपणाकडे खास लक्ष पुरवणे ही एक तातडीने लक्ष देण्याची बाब होऊन बसली आहे.त्या अनुषंगाने उचलली जात असलेली पावले खरोखरच पुरेशी आणि परिणामकारक आहेत काय याचे उत्तर आजमितीला तरी समाधानकारक नाही. तज्ज्ञांचे मत काय असेल ते असो, पण सर्वसामान्य माणसाची याबाबतची समज वाढली आहे, हे नक्की. मूळ मुद्दा असा आहे की खरोखरच हा वाढता समज प्रत्यक्ष कृतीत उतरतो आहे का? सामान्यत: संस्थेच्या वर्धापनदिनी, एखाद्या अधिकारी मान्यवर व्यक्तीची संस्थेला भेट, शाळा कॉलेजचा रौप्यमहोत्सवी सोहळा, आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा होणारा वृक्षमित्र दिन किंवा 'झाडे वाचवा, झाडे जगवा' सारखा पाळण्यात येणारा दिवस वगैरे वेळेला जनसामान्यांना थोडीफार जाग येते व झाडांची काहीशी आठवण होते. बहुतेकांना रोजच्या दिनचर्येत, झाडांवगैरेबद्दल काही विचार करायला मुळी वेळच नसतो. बऱ्याचजणांना वाट वाकडी करून इकडे पाहण्याइतकी फारशी गरज वाटत नाही. अनेक जणांची मानसिकताही त्याकरता पोषक आणि तयार नसते.

या पार्श्वभूमीवर 'ट्री फॉर फ्री' या श्रीमती जेनेट यग्नेश्वरन् यांच्या बंगळुरूच्या विश्वस्त संस्थेचे काम आगळेवेगळेच म्हणावे लागेल. पतीचे २००५ साली निधन झाल्यानंतर केवळ शोकाकूल अवस्थेत दिवस काढण्यापेक्षा त्यांनी पतीच्या स्मृतीप्रीत्यर्थ विश्वस्त संस्था स्थापन करण्याचा विचार केला.

त्यावेळी बंगळुरू शहरात वृक्षतोड मोठ्या प्रमाणावर सुरू होती. खास करून भुयारी रेल्वे प्रकल्प हाती घेतल्यापासून निर्दयी अशा प्रकारची वृक्षतोड जणू सामान्य बंगळुरूवासियांच्या अंगवळणीच पडली होती. रस्त्यावर तोडून पडलेले वृक्षांचे अवशेष त्यांना व्यथित करत असत. नागरिक आरडाओरडा करीत होते. पण त्यात मोठी कळकळ आणि फिकिरीचा अंश नव्हता. जसा काही तो एक गप्पांचा विषय होता. थोडेफार बोलून सोडून द्यायचा.

श्रीमती यग्नेश्वरन् यांनी विचार केला की झालेल्या वृक्षतोडीबद्दल नुसतेच बोलण्यात किंवा अश्रू ढाळण्यात काय उपयोग? त्याने हाती काहीच येणार नाही. कदाचित त्यामध्ये सामान्य नागरिक याबाबत नुसतेच बोलतात. दृश्य स्वरूपाची कृती मुळी करीतच नाहीत. किंबहुना ती त्यांच्या इच्छाशक्ती आणि कुवतीबाहेर आहे असे त्यांना वाटले. म्हणून त्यांनी हा सकारात्मक दृष्टीकोन ठेवून ठोस पावले उचलण्याचे ठरवले.



त्यांनी या भूमिकेतून 'ट्री फॉर फ्री' या संस्थेची स्थापना करून वृक्षारोपणाचे काम हाती घेतले.

सुरूवातीला त्या आणि त्यांची काही थोडी मित्रमंडळी आसपासच्या, शेजारच्या भागात घराघरातून फिरायच्या. 'तुमच्या घरासमोर जर झाड लावले, तर काही हरकत आहे का, त्याची देखभाल कराल का, त्याला पाणी घालाल का' असे विचारून घरातील मंडळींची संमती मिळवायचा प्रयत्न त्या करायच्या. बऱ्याच जणांनी होकार दिला तरी अनेकांनी वाहने लावायला जागा हवी म्हणून नकार दिला. पाणी वगैरे नेमाने घालायचे झेंगट, शिवाय पडणारा पालापाचोळा झाडायला लागेल तो वेगळाच. या कटकटींना उगाचच विकतचे श्राद्ध म्हणून कशासाठी थारा द्यायचा?

सुरूवातीचे दिवस फार कठीण गेले. लोकांच्या नानाविध मुक्ताफळांना सामोरे जायला तर लागायचेच, पण त्याकडे दुर्लक्ष करून मनाला समजावणे अपरिहार्य होते. (त्यात वेळही वाया जायचा). 'या बाईंना काही काम वगैरे नाही वाटते', 'रिकामपणाचे चाळे आहेत झालं', 'या बाई अशा कोण मोठ्या लागून गेल्या आहेत', 'या बाईंना मुळात या झाडा-बिडांच्या भानगडीशी काय करायचे आहे', 'या प्रश्नात लक्ष घालायला आहेत की सरकारी खाती आणि त्यांची यंत्रणा', 'उगीचच काहीतरी', 'काही स्वयंसेवी संस्था आधीपासूनच या कामात आहेत, या बाई असं काय मोठं नेमकं करून दाखवणार आहेत', 'स्वत:चाही वेळ वाया घालवत आहेत आणि तुमचाही वाया घालवा असे यांचे म्हणणे दिसते आहे'. पण या बाई निघाल्या जिद्दीच्या. त्यांनी घेतला वसा चालूच ठेवला. शांतपणे, निग्रहीपणे, लक्ष्यावरची नजर अढळ ठेवून, सकारात्मक व नकारात्मक जनप्रतिक्रियांना एकाच पारड्यात तोलून त्याची परिणती म्हणजे त्यांची ख्याती बंगळूरू शहरात 'वृक्षमैत्रीण' म्हणून पसरत आहे. या उपाधीद्वारा नागरिकांनी ओळखणे हे संस्थेला, तिच्या कार्यकर्त्यांना व त्यांना स्वत:ला सार्थ अभिमानाची व समाधानाची बाब आहे. 'फलप्राप्त्यर्थम्' मांडलेल्या त्यांच्या यज्ञकुंडाची जाण आणि उपयुक्तता सर्वसामान्यांपर्यंत निश्चितपणे पोहोचत असल्याची ही उपाधी म्हणजे जणू एक प्रकारची पावतीच आहे.

पहिल्या वर्षी त्यांनी स्वत: खपून वृक्षारोपण केले. त्यांच्याकडे आवश्यक ती अवजारे होती. झाडांचीही त्यांना तशी माहिती होती. आता मात्र या मंडळींना दारोदार जावे लागत नाही. प्रसारमाध्यमांमुळे व इतरही ठिकाणांहून लोकांना

माहिती मिळाल्यामुळे झाडे लावण्यास जागा असलेली इच्छुक मंडळी आपणहून संस्थेकडे येऊ लागली आहेत. आता घरांच्या आवारांत, रस्त्यांवर, शाळांमध्ये झाडे लावू पाहणाऱ्यांची संख्या वाढते आहे. पण त्याबाबतची ज्यांना मुळात काही माहिती नसते, अशा लोकांना मग संस्था झाडे लावून देते व नंतरची देखभाल कशी करावयाची याचे मार्गदर्शन करून त्याचे उत्तरदायित्व त्यांच्यावर सोपवते.

श्रीमती यज्ञेश्वरन् म्हणतात की बंगळुरू शहरात रोज खूप झाडे कापली जातात. यापुढील काळातही काही ना काही कारणांनी वृक्षतोड ही होतच राहणार. त्यामुळे देखभाल होण्याची खात्री ज्या ठिकाणी आहे त्या त्या सर्व जागांवर, अगदी पूर्ण बंगळुरूभर झाडे लावण्याचा संस्थेचा उद्देश आहे. त्याद्वारे शहर पुन्हा हिरवे होऊ लागेल. वृक्षतोडीवर वृक्षलागवड हा एकास एक या प्रमाणात तोडीस तोड असा उपाय नक्कीच नाही याची त्यांना अर्थात जाणीव आहे. तरीही ही विचारधारा कृतीत उतरवल्यामुळे होणारे नुकसान काही अंशी तरी भरून येऊ शकेल असा त्यांचा दृढ विश्वास आहे.

श्रीमती यज्ञेश्वरन् यांनी संस्थेचे कार्य फक्त सामान्य नागरिकांपुरतेच मर्यादित ठेवलेले नाही. व्यापार, उद्यम जगतासमोरही त्यांनी या कामी सहकार्याचा हात पुढे केला आहे. अशा कंपन्यांना नेमके काय करायचे, झाडे कशी व कुठे लावायची याची माहिती नसते. या क्षेत्रातील मंडळी अशा कामाकरता पैसाही खर्च करायला तयार असतात. संस्था त्यांना झाडांची देखभाल होऊ शकेल अशा जागा दाखवते. अशा जागा वृक्षारोपणाकरता तयार करून ठेवते. तसेच रोपेही आवश्यक इतक्या संख्येने लावण्यायोग्य करून ठेवते. कंपन्यांचे प्रतिनिधी त्या जागेवर स्वत: रोपे लावू शकतात किंवा मग संस्थेचे स्वयंसेवकही हे काम करण्यात पुढे सरसावतात.

बंगळुरूच्या अनेक मान्यताप्राप्त कंपन्यांनी / कार्यालयांनी संस्थेच्या या उपक्रमाची नोंद घेऊन त्यात सहभाग दिलेला आहे. उदाहरणार्थ, सॉफ्टवेअर क्षेत्रातील एक कंपनी आपल्या कर्मचाऱ्याच्या वाढदिवशी संस्थेकडून एक झाड लावून घेते. पुरूषांचे तयार शर्ट बनवणारी नावाजलेली कंपनी शर्टच्या किंमतीचा ठराविक भाग संस्थेच्या माध्यमातून वृक्षारोपणावर खर्च करते. कंपन्यांना हे उपक्रम त्यांच्या 'सामाजिक जबाबदारी' या बाजूकडे लक्ष पुरवण्याच्या दृष्टीनेही उपयुक्त ठरतात.



संस्थेचा दृष्टीकोन या संकल्पनेद्वारे पैसा मिळवणे हा अजिबातच नसल्यामुळे कंपन्यांना / कार्यालयांना एक वेगळा दर व व्यक्तींना वेगळा दर असा सापत्नभाव संस्था करीत नाही. एक रोप शंभर रूपये या दराने द्यायचे हे संस्थेचे धोरण आहे, मग तो राव असो वा रंक, कंपनी/कार्यालय असो वा सामान्य नागरिक. असा दुजाभाव न केल्यामुळे संस्थेची विश्वासार्हता तर वाढलेली आहेच शिवाय मूळ उद्देशाबद्दल संस्थेच्या बांधिलकीबद्दलचा आदर दुणावत आहे.

भविष्यातील कामाबद्दल श्रीमती यज्ञेश्वरन् म्हणतात की बंगळुरू शहरात खूप मोकळी जागा आहे. तिथे झाडे लावता येण्यासारखी आहेत. बऱ्याच शाळा, कॉलेजे, इस्पितळे वृक्षारोपणासाठी संस्थेकडे येत असतात. त्यांच्याकडे वाढत्या प्रमाणावर लक्ष पुरवणे संस्थेला अत्यावश्यक वाटते. आत्तापर्यंतचे कार्यक्षेत्र बंगळुरू शहरात ३० कि.मी. पर्यंतच मर्यादित आहे. बंगळुरूच्या आजूबाजूच्या जिल्ह्यांतूनही संस्थेने तिथे काम करावे अशी निमंत्रणे येत आहेत. जवळच्या एका जिल्ह्यात ७५ कि.मी. वरील खेड्यातील शाळेत असे काम त्यांनी सुरूही केले आहे. कार्यक्षेत्र भौगोलिक दृष्ट्या वाढवणे व यात कंपन्यांची मदत मिळवणे यात संस्था अधिक रस घेणार आहे.

वाढदिवस, एकसष्ठी, लग्नाची २५ वर्षे वगैरेंसारख्या व्यक्तीच्या जीवनप्रवासातले मोठे टप्पे हे वृक्षारोपण करून साजरे करू या, भेटवस्तू म्हणून झाडांची रोपे देऊन ती लावू या, अशी संकल्पना त्यांनी लोकांमध्ये रूजवायला सुरूवात केली. त्यात मित्रमंडळी आणि पुढे आलेल्या स्वयंसेवकांचे सहकार्य मिळवले. आज लोक दिवसेंदिवस विस्तृत प्रमाणावर हा विचार प्रत्यक्ष आचरणात आणत आहेत. त्याद्वारे 'ट्री फॉर फ्री' या संस्थेच्या कार्याला स्वीकारून एक प्रकारे लोकमान्यताच मिळवून देत आहेत. संस्थेकडे लग्नसमारंभाच्या सोहळ्यात रोपांचे प्रदर्शन मांडाल काय अशी आमंत्रणेही मिळू लागली आहेत.

श्रीमती यज्ञेश्वरन् यांना झाडे लावणे तर मनापासून आवडतेच पण तितकेच त्यांना या समाजोपयोगी कामामुळे लोक एकत्र येतात, समान उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून काम करतात, त्यांचे आपापसातील विचारांचे आदानप्रदान वाढते, एकाच चमूचे व समूहाचे सदस्य असल्याप्रमाणे सामंजस्याने समाजोपयोगी कार्य करतात, त्यामुळे सामाजिक एकजिनसीपणा वाढतो, समाजातील उच्चनीच भावना कमी होण्यास मदत होते या गोष्टींचा फार आनंद होतो. शाश्वत

विकासाच्या प्रक्रियेत नागरिकांच्या सक्रिय सहभागाला फार मोठे महत्त्व आहे. जाणीवपूर्वक या गोष्टीला त्यांनी मोठ्या प्रमाणावर उत्तेजन दिले याचा वृथा अभिमान त्यांना नाही, पण सार्थ जाणीव मात्र आहे. आणि खरं पाहिलं तर तशी ती बिनीच्या समाजसेवकाला असायलाच हवी, नाही का!

संस्थेचा मार्ग अडचणींपासून मुक्त नाही. त्याची सुरूवातच मुळी झाली याबाबतच्या जनमानसाच्या मानसिक स्वरूपाच्या नकारात्मक दृष्टीकोनातून. सुरूवातीच्या काळातील अत्यल्प प्रतिसाद ही धोक्याची निशाणी होती. रस्तादुरूस्ती, त्याचे सिमेंटीकरण यांत संस्थेने लावलेल्या रोपांचा बळी जातो. श्रीमती यग्नेश्वरन् यांच्या मते या प्रश्नांबद्दल फक्त संबंधित अधिकाऱ्यांनी मनावर घेतले तरच काही होऊ शकेल. रोपांची मागणीही फार मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे आणि ती पुरवणे जड होऊ लागले आहे. रोपांची, मजुरांची ने-आण करणेही दिवसेंदिवस कठीण होते आहे. जीपसारखे एखादे चारचाकी वाहन घेण्याकरता कोणी पुरस्कर्ता मिळतो का या शोधात त्या आहेत. रोपांचा साठा ठेवण्यासाठी त्या वापरत असलेली एका मैत्रिणीची जमीन खूप कमी पडू लागली आहे. वाढत्या मागणीमुळे समस्या अधिक गंभीर होते आहे.

बंगळुरू महानगरपालिकेत, जी नेहमी उत्स्फूर्त सहकार्य देत असे, राजकीय समीकरणे बदललेली आहेत. सत्तापालटामुळे रोपांचे रक्षण करणारे सुरक्षारक्षक पुरेशा संख्येत उपलब्ध नाहीत व त्यांचा आकडा वाढवणे कठीण होत आहे. वनखात्याच्या व महानगरपालिकेच्या वरिष्ठांची गाठभेट घडवून हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न त्या करणार आहेत.

या विषयावरच्या काही म्हणी व थोरामोठ्यांची मते यांची येथे आठवण होते :

- तीर्थक्षेत्री जाऊ शकत नाही, तर मग एक झाड लावा. दोन्हींपासून मिळणारे पुण्य समसमान आहे. - भारतातील एक म्हण.
- मला जरी कळले की उद्याच जगाच्या ठिकऱ्या होणार आहेत, तरी मी सफरचंदाचे झाड लावीनच. - सर मार्टिन ल्यूथर किंग
- तळपत्या उन्हाचा त्रास होतो आहे. झाडाची छाया कुठे दिसत नाही. सूर्याला दोष देऊ नका. स्वत:ला द्या.
- तीन कडुलिंबाची झाडे लावेल तो नरकात कधीही जाणार नाही. - भारतातील एक म्हण.



बंगळुरू शहरात श्रीमती यग्नेश्वरन् यांची ओळख तसेच ख्याती 'वृक्ष मैत्रीण' म्हणून पसरत आहे. केनयाच्या ६८ वर्षीय श्रीमती वंगारी मथाई यांना त्यांच्या हिरवा पट्टा मोहिमेमुळे २००४ सालचे नोबेल पारितोषिक मिळाले होते. या मोहिमेच्या माध्यमातून त्यांनी तीस वर्षांहून अधिक काळात अक्षरश: शेकडो झाडे लावली. श्रीमती यग्नेश्वरन् या नोबेल विजेतीच्या पावलावर पाऊल टाकून पुढे जात आहेत, असे बंगळुरूमध्ये अभिमानाने बोलले जाते.

त्या म्हणतात की दर वर्षी हवामान अधिकाधिक खराब होत चालल्यामुळे बंगळुरूच्या नागरिकांत झाडांच्या गरजेबाबतची जाणीव वृद्धिंगत होत आहे. २००८ सालातच संस्थेने ९००० रोपे लावली. काही वेळेला तर एका दिवसात १००० रोपांना जमिनीचा आसरा मिळवून दिला.

श्रीमती यग्नेश्वरन् आत्मविश्वासाने म्हणतात, 'वृक्षारोपणाची मोहीम म्हणजे ससाकासवाच्या शर्यतीप्रमाणे आहे. ससा फार पुढे गेलेला असला तरी एक न एक दिवस कधी ना कधी त्याला मागे टाकून आम्ही ही शर्यत जिंकूच.'

त्या दर पावसाळ्यात वनखात्याकडून अमाप रोपे विकत घेतात, कारण खाते रोपे फक्त पावसाळ्यातच विकते. बरेच लोक, संस्था, कंपन्या त्यांच्याकडे फक्त रोपांची मागणी करतात व त्या ती आनंदाने देतात. अर्थात त्या जागेत व सभोवतालच्या परिस्थितीत दिलेली रोपे तग धरू शकतील अशी स्वत:ची खात्री पटवून घेतल्यानंतरच. तसेच तेथे कोणते झाड फोफावू शकेल ते लोकांना सांगून त्या प्रकारच्या झाडाचे रोप देतात.

संस्थेचे बहुतेक स्वयंसेवक तरूण आहेत. त्यातील बरेचसे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आहेत. ते संस्थेला संगणकासंबंधित कामातही मदत करतात. पर्यावरणवादी, तंत्रज्ञ, विद्यार्थीही यात उत्साहाने सामील झाले आहेत. संस्थेच्या प्रगतीत ते मोलाचा हातभार लावतात.श्रीमती यग्नेश्वरन् यांचेकडे १०० स्वयंसेवक आज उत्स्फूर्तपणे काम करीत आहेत. अगदी रोपांची काळजी घेण्यापासून देखरेखीपर्यंतची सर्व कामे ते संपूर्ण शहरभर हिंडून करीत असतात. त्यांच्या मेहनतीमुळे व सहयोगामुळे संस्था आपली उद्दिष्टे साधण्याकरता अधिक बळकट व कार्यक्षम होते आहे. श्रीमती यग्नेश्वरन् म्हणतात की त्यांच्या सहभागामुळे हे काम एक लोकोपयोगी चळवळ म्हणून चालवले जात आहे आणि त्यामुळेच ती चळवळ अधिक कार्यक्षम तसेच लोकप्रिय होत आहे. जास्तीत जास्त झाडे लावण्याच्या नादात संस्था उगीचच वाहवत जात नाही. त्याच्या सर्व शास्त्रीय

बाबींचा विचार केला जातो. श्रीमती यग्नेश्वरन् झाडांच्या बाबतीत स्वप्रशिक्षित तज्ज्ञ आहेत. त्या हे काम अत्यंत कार्यक्षमतेने पार पाडतात. लावलेल्या झाडांबाबत रोप उपलब्ध करून ते लावून देण्यापुरतेच मर्यादित काम संस्था करीत नाही. त्या झाडांच्या वाढीवर तसेच प्रगतीवर संस्था नजर ठेवून असते. जर काही कारणाने रोपटे किंवा झाड जगू शकले नाही, तर तेथे दुसरे नवीन झाड लावून देते.

वृक्षतोड पूर्णपणे थांबवणे व्यवहार्य बाब नाही. खरा व्यावसायिक दृष्टीकोन म्हणजे आपण जितकी झाडे तोडू, त्यापेक्षा अधिक नवीन झाडे संस्थेने लावणे. हेच काम त्यांची संस्था आत्मीयतेने, जिद्दीने आणि सर्वांच्या सहकार्याने उत्तम रीत्या पार पाडत आहे.

❋❋



# डॉ. मधुकर देशपांडे-'विज्ञानवाहिनी'

*सध्याचे युग हे विज्ञानयुग आहे. विज्ञान हे सर्वांच्या विकासाचे एक प्रमुख साधन झाले आहे. त्यामुळे विज्ञानाचे शिक्षण, त्याची आवड आणि त्यासाठी लागणाऱ्या साधनांची उपलब्धता समाजाच्या कानाकोपऱ्यात पोचणे जरूरीचे आहे. विशेषत: विद्यार्थ्यांना - म्हणजे भावी पिढीला - तर हे अत्यावश्यक आहे. परंतु आपल्या देशात हे प्रत्यक्ष होताना दिसत नाही. याला अनेक कारणेही आहेत. पण त्यावर सर्वंकष उपाय शोधणे अत्यंत गरजेचे आहे.*

*आज काही समाजसेवी संस्था यासाठी अथक प्रयत्न करताना दिसतात. त्यातील एक प्रमुख संस्था आहे 'विज्ञानवाहिनी'. श्री.व सौ. देशपांडेंनी सुरू केलेल्या या संस्थेने तर असे प्रयत्न करण्याचा वसाच घेतलेला दिसतो. त्यांनी यासाठी हाती घेतलेले विविधांगी उपक्रम आणि त्यांचे परिणाम यांची एक तोंडओळख या लेखाद्वारे होईल आणि इतरांनाही ती प्रोत्साहित करू शकेल.*

विज्ञानवाहिनी या नाविन्यपूर्ण प्रयत्नाचा हेतू आहे, विज्ञान विषयाच्या शहरी आणि ग्रामीण भागात असणाऱ्या मोठ्या तफावतीवर लक्ष केंद्रित करून ती कमी करणे. त्याकरता ही संस्था वेगवेगळ्या कल्पना सातत्याने १५ वर्षांहून अधिक काळ राबवीत आहे.

त्यातील अग्रगण्य म्हणता येईल असा उपक्रम म्हणजे 'फिरती विज्ञान प्रयोगशाळा'. ही प्रयोगशाळा म्हणजे अत्यंत कल्पकतेने अंतर्गत रचना केलेली मिनीबस आहे. गावोगाव शाळांत जाऊन विज्ञानाच्या वेगवेगळ्या प्रयोगांची

प्रात्यक्षिके या मिनिबसद्वारे पोहोचवली जातात. त्यातील काही प्रयोग स्वत:च्या हातांनी करायची संधी मुलांना दिली जाते. ही बस प्रयोगशाळेतील उपकरणे, दृक्श्राव्य साधने, संगणक, यू.पी.एस. वर चालणारी इंजिन बॅटरी, जनित्र, घडीची छोटी टेबले, झोपण्याकरता घडीचे पलंग, पाण्याची टाकी, छोटे स्वच्छतागृह वगैरे गोष्टींनी युक्त केलेली आहे.

विज्ञानवाहिनीचा कणा म्हणजे संस्थेच्या स्वयंसेवकांचा चमू, ज्यात निवृत्त शास्त्रज्ञ, अभियंते व शिक्षकांचा समावेश आहे. त्यांना संभाषण आणि कृती गट म्हणतात. (Dialogue & Action Group i.e. DAG). समाजातील १५ ते २० प्रतिष्ठित व्यक्ती या गटाचे सभासद असतात. आपला वेळ, व्यावसायिकता व प्रयत्न ते संस्थेच्या कामी खर्च करतात. गटाची सभा महिन्यातून एकदा होते, त्यात मागील महिन्यातील कामाचा आढावा आणि नजीकच्या काळात काही बदल (आवश्यक असल्यास) यावर चर्चेद्वारे निर्णय होतो. वर्षातून एकदा दोन दिवसांची वार्षिक सभा होते, ज्यात संपूर्ण वर्षाचा विस्तृत आढावा, येत्या वर्षात भेट द्यायच्या शाळांची यादी, समाविष्ट करायचे प्रयोग वगैरे बाबींवर चर्चा होऊन पुढील रूपरेखा आखली जाते. या फिरत्या प्रयोगशाळेबरोबर संस्थेचे विज्ञानशिक्षक व कृतीगटातील पाच मंडळी ठरवलेल्या शाळेत जातात. प्रयोगशाळा नसलेल्या, छोट्या, सरकारी अनुदान नसलेल्या ग्रामीण शाळांना प्राधान्य दिले जाते. प्रयोग ज्यांवर आधारित आहेत अशी मूलतत्त्वे व संकल्पना मुलांना समजावून सांगितल्या जातात. पूरक अशा दृक्श्राव्य माध्यमातून उपयुक्त जोड दिली जाते. नंतर संगणक शिक्षण, पर्यावरण, आरोग्य, पौगंडावस्थेतील समस्या वगैरे दैनंदिन जीवनाशी संबंधित बाबींची माहिती दिली जाते.

ग्रामीण भागातील शाळेत विज्ञान विषय शिकवणाऱ्या शिक्षकांचे ज्ञान, क्षमता, हातोटी वृद्धिंगत करण्याची आजमितीला गरज आहे. म्हणून विज्ञानवाहिनी या शिक्षकांकरता प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करते. विज्ञान हा विषय कशा पद्धतीने अधिक परिणामकारकतेने शिकवावा यावर भर देऊन मार्गदर्शन केले जाते. कृतीगटातील तज्ज्ञ स्वयंसेवक विज्ञान व गणित विषयातील सखोल माहितीपूर्ण भाष्य करतात. विज्ञानवाहिनीने २००९-१० साली अशा प्रकारच्या दोन कार्यशाळा आयोजित केल्या होत्या. खेड्यातील शाळांमधील अपवादात्मक हुशार मुलांकरता संस्था वर्षातून एक शिबिर भरवते. तेथे विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी त्यांना मार्गदर्शन करतात. त्यात भारताचे



अवकाश प्रकल्प, मानसिक आरोग्य, नॅनो तंत्रज्ञान, जैविक तंत्रज्ञान, जैविक वैविध्य वगैरे विषयांवर हे तज्ज्ञ मुलांना संबोधित करतात. गोष्टी डोळ्यांपुढे घडताना दिसाव्यात व त्यांचे निरीक्षण करता यावे म्हणून मोठ्या विज्ञान संस्थेला हे विद्यार्थी प्रत्यक्ष भेट देतात. ते देणाऱ्या कारखान्यांच्या भेटीमागेही हेच कारण आहे. विशेष म्हणजे या उपक्रमात मुलींचा सहभाग मोठ्या प्रमाणावर असतो. गावात एकूणच विज्ञानाविषयी सकारात्मक दृष्टीकोन वाढत असल्याचे हे द्योतक नव्हे का? संस्था छोट्या शाळांना उपयुक्त अशा पुस्तकांचा संच एकत्रित करून ते फिरत्या वाचनालयाच्या स्वरूपात भेट देते. अशा शाळांकडे वाचनालये नसतात व पुस्तके उपलब्ध नसण्यामुळे मुलांच्या बौद्धिक वाढीवर विपरीत परिणाम होतात. विज्ञानवाहिनीच्या या उपक्रमामुळे ही कमतरता काही अंशी तरी भरून निघते.

विज्ञानवाहिनीच्या सामाजिक उत्तरदायित्त्वाचे आणखी एक उदाहरण म्हणजे विज्ञाननिष्ठेच्या या प्रवासात शारीरिक दृष्ट्या विकलांगांनाही समाविष्ट करून घेणे. अंध तरूणांच्या विकासासाठी काम करणाऱ्या एका संघटनेकरता संस्थेने खास कार्यशाळा आयोजित केली होती. त्यात पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्रातील प्रयोगांचा समावेश केला होता. ग्रामीण भागात होणाऱ्या विज्ञानविषयक प्रदर्शनात, मेळाव्यात सहभागी होण्याकरता संस्थेला आमंत्रित केले जाते. तेथे ग्रामीण भागातील जनतेची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर असते व संस्था त्यात हिरिरीने भाग घेते.

जानेवारी १९९५ मध्ये स्थापन झालेली विज्ञानवाहिनी ही स्वयंसेवी संस्था आहे. डॉक्टर मधुकर देशपांडे आणि श्रीमती पुष्पा देशपांडे हे दांपत्य तिचे संस्थापक असून त्यांनी सुरूवातीला दिलेल्या मोठ्या देणगीतून ही संस्था निर्माण झाली. नंतर सर्व खर्च देणगीदारांकडून मिळणाऱ्या मदतीतून भागवला जातो. दीड दशकाहून अधिक काळात संस्थेची प्रयोगशाळा महाराष्ट्रातील २३ जिल्ह्यांतील ग्रामीण शाळांमध्ये २,५०० वेळा जाऊन आलेली आहे. संस्थेशी निगडीत वेगवेगळ्या उपक्रमांचा फायदा दोन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी घेतला आहे. दोन हजार नऊ-दहा या सालापुरते पाहता फिरत्या प्रयोगशाळेने १३४ ग्रामीण संस्थांना भेटी दिल्या आहेत. त्यातील २९ शाळांना दोनदा भेट दिली होती. संस्थेच्या प्रयोगशाळेची भेट सर्वसाधारणपणे एक दिवसाची असते. प्रयोगशाळेचा दौरा काही वेळा ४-५ दिवसांचाही असतो.

त्यात लांबवरच्या ग्रामीण शाळांपर्यंत पोहोचणे हा उद्देश असतो. या वर्षात असे अकरा दौरे या संस्थेने केले आणि एकूण १५,७०० किलोमीटर अंतर कापले. त्याचा फायदा मिळाला १६,३६० ग्रामीण विद्यार्थ्यांना.

विज्ञानवाहिनीने अहमदनगर जिल्ह्यात सिरोडी गावात पाणलोट विकास क्षेत्राबद्दल एक प्रकल्प गेली काही वर्षे राबविला आहे. त्याद्वारे जमीन सिंचनाखाली आल्यामुळे उत्पन्न बरेच वाढले आहे. गावातील प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी मोठ्या उत्साहाने सायन्स ॲक्टिविटी सेंटर सुरू केले आहे. चौथ्या वर्गातील मुलांनी केलेल्या प्रायोगिक तत्त्वावरील कामाला जिल्हा व राज्यपातळीवर बक्षिसेही मिळालेली आहेत.

निबंध स्पर्धा, प्रदर्शने, पक्षीनिरीक्षण, गणिती कोडी, तारेनिरीक्षण आदींचा समावेश असलेला व सायन्स सेंटर नांदूर यांनी आयोजित केलेला विज्ञान दिवस यात संस्थेच्या तज्ज्ञ लोकांनी भाग घेतला होता. तसेच गेली आठ ते दहा वर्षे उत्तर कर्नाटकातील खेड्यात फिरत्या प्रयोगशाळेचा प्रकल्प राबवणाऱ्या विज्ञानप्रसारिणी या संघटनेला सहकार्याचा हात पुढे करून त्यानुसार संस्थेने वेळोवेळी तांत्रिक मदत केली आहे.

मराठीत विज्ञानविषयक पुस्तके अधिक प्रमाणावर उपलब्ध व्हावीत या हेतूने संस्थेने हाती घेतलेल्या उपक्रमातून 'अंतरंग अणूचे' व 'उमलत्या कळ्या' ही पुस्तके संस्थेच्या दोन विश्वस्तांनी लिहून प्रकाशित केली आहेत. ग्रामीण भागातील मुलांना संस्था ही पुस्तके खूप सवलतीच्या किंमतीत विकते. पुणे विद्यापीठात व्यवस्थापन अध्ययन विभागाने विज्ञानवाहिनीने भेट दिलेल्या शाळांचा अभ्यास करून संस्थेच्या कामाचे मूल्यमापन केले होते. त्यानुसार या शाळांना शिक्षण विज्ञानवाहिनीच्या प्रकल्पांनी चांगलेच प्रोत्साहित केले होते.

फिरत्या प्रयोगशाळेचा कार्यक्रम म्हणजे सर्वसाधारणपणे पुण्यापासून २० ते १०० किलोमीटर अंतर असलेल्या ग्रामीण मागासलेल्या भागातील शाळेला पूर्वनियोजित कार्यक्रम ठरवून भेट देणे व मुलांसोबत विज्ञान प्रयोग पूर्ण करून मुक्कामाला परत पुण्याला येणे. शाळेत पोहोचताच कामाचा आराखडा तयार केला जातो. मुलांना पटापट टेबले, खुर्च्या, उपकरणे लावणे वगैरे कामे वाटून दिली जातात. काही मिनिटातच मुले ही कामे पूर्ण करतात आणि स्वयंसेवक म्हणून कृती गटाचे बरोबर गेलेले सदस्य संभाषणाच्या माध्यमातून मुलांना संबोधित करणे सुरू करतात. चार ते सहा तासात मुलांचे धडे शिकणे व



पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र व वनस्पतीशास्त्रातील प्रयोग करणे व पाहणे पूर्ण होते. या वेळात मुलांना एक चलचित्रही दाखवले जाते.

विज्ञानविचार या शीर्षकाची छोटी पुस्तिका विज्ञानाच्या शिक्षकांकरता आणि मुलांकरता १९९७ मध्ये संस्थेने प्रसिद्ध केली. विज्ञानाशी संबंधित निरनिराळ्या प्रकारचे लेख त्यात समाविष्ट केलेले आहेत. वाचकांनी या पुस्तिकेचे चांगले स्वागत केले आहे. संस्था ही पुस्तिका कमीतकमी किंमतीत विकते. शिवाय विद्यार्थ्यांना सवलतही दिली जाते.

संस्थेचा आणखी एक उपक्रम म्हणजे वेगवेगळ्या विज्ञानविषयक पुस्तकांचा संच करून तो ग्रामीण भागातील शाळांना एका महिन्याकरता उपलब्ध करून देणे. महिनाभरानंतर तो पुस्तकांचा संच दुसऱ्या शाळेला पुढच्या महिन्याकरता वापरायला दिला जातो.

परदेशातील विद्यार्थ्यांना संस्थेत येऊन काही महिन्यांकरता स्वयंसेवक म्हणून काम करायची योजनाही उल्लेखनीय आहे. फिरत्या प्रयोगशाळेबरोबर जाणे, विद्यार्थ्यांना प्रयोग करून दाखवणे, त्यांच्याकडून प्रयोग करवून घेणे अशा प्रकारची कामे ते करतात. स्वयंसेवकांनाही हा एक आगळा वेगळा अनुभव ठरतो. त्यांना भारतीय ग्रामीण भाग, तिथले राहणीमान, जीवनपद्धती यांबद्दल बरेच काही समजते. भारतातील विज्ञानाचे शिक्षण व एकूणच शालेय शिक्षणाच्या पद्धतीबाबत काहीशी जाण येते. त्यांचे अनुभवविश्व विस्तारते व वैयक्तिक फायदा होतो. या संस्थेपासून प्रोत्साहन घेऊन इतर अनेकजण असे प्रकल्प सुरू करतील अशी अपेक्षा एका स्वयंसेविकेने व्यक्त केली आहे.

शालेय अभ्यासक्रमातील एका अत्यंत महत्त्वाच्या त्रुटीवर नेमके बोट ठेवून व ग्रामीण भागातील या समस्येचे स्वरूप बरोबर जोखून त्या अनुषंगाने संस्थेचे कार्य गेली पंधरा सोळा वर्षे अव्याहत सुरू आहे. विद्यार्थ्यांना त्याचा फायदा किती अमूल्य आहे ते शिक्षक आणि मुख्याध्यापकांच्या प्रतिसादातून तसेच प्रतिक्रियांमधून व्यक्त होते.

विज्ञानाचे शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत नाविन्यपूर्ण मार्गाने पोचवण्याचे हे विविध प्रकल्प सर्वांचा दूरगामी फायदा व परिणाम करून देणारे आहेत यात शंकाच नाही. यासाठी 'विज्ञानवाहिनी'ला मनापासून सलाम !

# श्री. बाबर अली

*शिक्षण घेण्याला वयाचे बंधन नसते हे आपण जाणतो. पण शिक्षण देणाऱ्यालाही ते नसते, हे सिद्ध करणारा विरळाच. असा अपवाद आहे पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यातील एक तरूण - बाबर अली. त्याने छोट्या बालकांकरता एक शाळा सुरू केली तीच मुळी तो स्वत: नऊ वर्षांचा असताना व स्वत: दुसऱ्या शाळेत शिकत असताना. मित्रमंडळींत बालसुलभ खेळांमध्ये रमण्यापेक्षा त्यांनी बालमजूर, कामवाल्या छोट्या मुली या स्तरावरील, शाळेत न जाणाऱ्या मुलामुलींना शिकवणे सुरू केले. संध्याकाळी चार ते सात ही शाळेची वेळ असते.*

*बाबर अलीच्या पटांगणसदृश मोकळ्या जागेत नववीपर्यंतचे वर्ग घेतले जातात. ही शाळा सरकारमान्य आहे. शाळेला फी नाही. उलटपक्षी शिक्षणाला लागणारे साहित्य तो मुलांना स्वखर्चाने पुरवतो. त्यांच्या दुपारच्या खाण्याचीही सोय विनामूल्य करतो. या सर्वांकरता देणग्या गोळा करतो. बाबर अलीवर बी.बी.सी.ने प्रसारित केलेल्या कार्यक्रमावर जगभरातून हजारो स्तुतिसुमने उधळली गेली. त्यातील सर्वात बोलकी प्रतिक्रिया म्हणजे 'या मुलाला शांततेचे नोबेल पारितोषिक मिळायला हवे होते, ओबामा काय एक वर्ष थांबू शकत नव्हते?'*

---

आज जगभरातील लाखो दरिद्री कुटुंबांतील बालकांना, अगदी प्राथमिक शिक्षणापासूनसुद्धा वंचित राहावे लागत आहे. पालकांना शिक्षणाचा खर्च परवडत नाही हे अर्थातच त्यामागील मुख्य कारण. आंतरराष्ट्रीय पातळीवरील विकासाशी संबंधित असलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या व तत्सम संस्थांपासून ते गाव



पातळीवर काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांपर्यंत या समस्येच्या विविधांगी पैलूंकडे गंभीरपणे पाहिले जात आहे. वेगवेगळ्या योजना, प्रकल्प, कृती, आराखडे, मूल्यमापन वगैरेंच्या माध्यमातून ही समस्या गंभीरपणे हाताळण्याची प्रक्रिया सातत्याने सुरूच आहे. त्याचे काहीसे परिणाम दिसूनही येत आहेत. अगदीच नाही असे नाही. पण या समस्येची व्याप्तीच मुळी इतकी अवाढव्य आहे की समाधानकारक मार्ग मिळणे कर्मकठीणच. त्यातही विकसनशील देशात तिची तीव्रता तर अधिकच आहे आणि आपला देशही याला अपवाद नाही.

बाबर अली हा मुलगा पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यात राहतो. सोळा सतरा वर्षांचा, पौगंडावस्थेतील बाबर अली हा स्वत: एक विद्यार्थी आहे. उंच, शिडशिडीत बाबर अली हा एक अभ्यासू व आदर्श म्हणावा असा तरूण. त्याचे शिक्षक अनुभवी व कर्तव्यनिष्ठ आहेत. तो वर्गात नीट लक्ष देतो. शिक्षक शिकवतात ते नेटकेपणाने लिहून घेतो. त्याची शाळा सरकारी आहे. त्यामुळे त्याला शिक्षणाकरता फी द्यावी लागत नाही. पण गणवेश, पुस्तके, वह्या, जाणे येणे वगैरेंचा खर्च येतो, तोच मुळी वर्षाला दोन हजार रूपयांच्या आसपास जातो. मुर्शिदाबादच्या आजूबाजूच्या भागातील सर्वसामान्य कुटुंबांच्या उत्पन्नाची पातळी लक्षात घेता, एका मुलाच्या शिक्षणाकरता म्हणून ही रक्कम मोठी आहे व आवाक्याबाहेरची पण. रोजचे जाणेयेणेही सोपे नाही. त्यामुळे बरीचशी मुले या शाळेचा फायदा घेऊ शकत नाहीत.

सकाळी सहा वाजता शाळेत जायला निघालेला विद्यार्थी बाबर अली १० किलोमीटर अंतर रिक्षाने व २ किलोमीटर पायी प्रवास करून शाळेत पोचतो. परत येताना तोच द्राविडी प्राणायाम, त्यात फार वेळ जातो. या भागात ही शाळा सर्वोत्तम समजली जाते. त्याचे आईवडील अशिक्षित असले तरी बाबर अलीला उत्तमच शिक्षण द्यायचे हा त्यांचा बाणा होता. शाळा सुटताक्षणी तो घरी परत यायला निघतो. तेथेच रेंगाळणे, शाळासोबत्यांशी टंगळमंगळ करणे या गोष्टी तो कटाक्षाने टाळतो. अजिबात वेळ न घालवता घाईने घरी परत येतो कारण त्याला डोळ्यांसमोर दिसत असते ती तो चालवत असलेली त्याची स्वत:ची शाळा. तिथे वेळेवर हजर राहून ती शाळा कार्यान्वित करणे ही त्याची त्या घटकेची प्राधान्यात्मक बाब असते.

अत्यंत गरीब स्तरावरील मुलांनादेखील शिक्षणाची आच किती गहन असते याची त्याला आजूबाजूच्या परिस्थितीमुळे पूर्ण जाणीव होती. बाबर

अलीने या स्तरातील मुलांच्या शिक्षणाची समस्या बरोबर हेरली आणि स्वत: हिरीरीने पुढाकार घेऊन त्यावर नाविन्यपूर्णरीत्या उपाय शोधून तो प्रयत्नपूर्वक अंमलात आणला. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतील मुलांसाठी त्याने शाळा सुरू केली. अजाणतेपणाने का होईना, परंतु शिक्षणक्षेत्रातील एखाद्या मोठ्या स्वयंसेवी संस्थेच्या तोडीस तोड असे काम तो एकहाती करीत आहे. त्यात त्याला शिक्षक म्हणून मदत करत आहेत त्याच्यासारखेच काही थोडे विद्यार्थी.

त्याच्याकडे ना आहेत तज्ज्ञ व्यवस्थापक व अनुभवी विश्वस्त मंडळी, ना संस्थेचे पाठबळ किंवा पूर्वपुण्याई. त्याला ना आधार आहे प्रशासकीय कामाकरता वेगळ्या व्यवस्थेचा व यंत्रणेचा. इतर कसला आधार त्याला नाही तरीही एखाद्या मोठ्या शैक्षणिक संस्थेला लाजवेल अशा तोलामोलाचे काम तो एकहाती (जगाच्या दृष्टीने अननुभवी असलेला तो लहान मुलगा) करीत आहे. त्याला स्वत:ला या एवढ्या मोठ्या गोष्टीची मुळी अजिबातच जाणीव नाही. तो आपला मग्न आहे त्याच्या शाळेत ज्ञानदानाचे कार्य हिरीरीने करण्यात.

या मुलांकरता बाबर अलीने शाळा सुरू केली ती वयाच्या ९ व्या वर्षी. फारच लहान वयाचा असताना कशी काय सुरूवात झाली या शाळेची? त्याच्या वयाच्या बऱ्याच मुलांना शिकवायची हौस असते. कदाचित शिक्षकांना सर्वच बाबतीत आदर्श मानून त्यांच्याप्रमाणे त्यांना अनुसरून खूपशा गोष्टी करायचे ते एक वेगळे वेडे वय असते. त्यात 'शिकवणे' आलेच. याला आपण 'शाळा शाळा' खेळणे असे म्हणतो.

ही 'शाळा शाळा' आजूबाजूच्या आपले ऐकणाऱ्या दोन चार छोट्या मुलांचे शिक्षक बनून खेळली जाते, तर काही जण या मुलांच्या ठिकाणी समोरच्या वस्तूंना मुले समजून शिक्षकाची भूमिका पार पाडतात. बाबर अली व त्याची काही मित्रमंडळी अशा प्रकारची 'शाळा शाळा' खेळत. तो शिक्षक व ते विद्यार्थी असा तो खेळ चालायचा. बाबर अलीला शिकवायला आवडते व 'शाळा शाळा' खेळ मुलांत चांगलाच रंगत असे. समोरचे विद्यार्थीही या खेळात तल्लीन होऊन जायचे.

बरेच दिवस हे चालू राहिले. तो ना वयाने मोठा होता ना कोणी शहाणा समजूतदार, जेणेकरून त्याला साक्षरता मोहीम अभियान वगैरे गोष्टींची जाण असेल. त्याच्या बालमनात विचार आला की या मुलांना खऱ्या शाळेत जाणे हलाखीच्या परिस्थितीमुळे अशक्य आहे, पण ती त्याच्याभोवती संध्याकाळी



'शाळा शाळा' खेळायला जमतातच, त्यात तल्लीन होतात, त्यांना शिकवलेलेही आवडते, ती आपणहून येथे येतात, न कंटाळता बसतात, मग नियमितपणे आपण त्यांना नीट पद्धतशीर का शिकवू नये? अगदी आपल्याला जे येते, जेवढे येते त्यातूनच.

ती मुले बिचारी शिक्षणापासून वंचित होती. त्यातील बहुतेकांना उदरनिर्वाहाकरता मजुरी किंवा तत्सम कामे करण्याशिवाय तरणोपाय नव्हता. मुले शेतमजूर वगैरे म्हणून काम करायची. मुली मोलमजुरी, घरकाम करायच्या. त्यांच्या उत्पन्नाची त्यांच्या कुटुंबांना गरज होती. त्यामुळे दिवसा ही मुले मोकळी नसायची. बाबर अलीही त्याच्या स्वत:च्या शाळेत जाण्या-येण्यात, अभ्यासात मग्न असायचा. म्हणून संध्याकाळी चार ते सात या वेळात बाबर अलीची रीतसर शाळा सुरू झाली. यांना जर शिकवले गेले नाही तर ही मुलं आयुष्यभराकरता निरक्षरच राहतील, त्यांचे भवितव्य नेहमीकरताच अंध:कारमय होऊन जाईल या त्याच्या मनात घोळणाऱ्या विचारांनी मूळ धरले व शाळेची पाळेमुळे खोलवर रूजू लागली.

बरोबर चार वाजता त्यांच्या शाळेची घंटा वाजते व लगबगीने घाईगर्दीने पटापट मुले हजर होतात. सुरूवातीला बाबर अली २-४ मिनिटे त्यांना संबोधतो - रोख असतो शिस्त, तिचे महत्त्व, जगातील घडामोडी वगैरे. नंतर राष्ट्रगीत म्हटले जाते. अशा वातावरणात नंतर शाळेचे वर्ग सुरू होतात. आठशेपैकी साडेसातशे मुले उघड्यावर बाबर अलीच्या घराच्या पुढच्या मोठ्या विस्तीर्ण जागेत जमिनीवर बसतात. तर वरच्या वर्गातील सुमारे पन्नास मुले तिथल्याच एका मोडक्या शेडमध्ये धडे शिकतात. पाऊस वगैरे आला तर आजूबाजूच्या झाडांचा आधार घेऊन तिथे वर्ग भरतात. फारच पाऊस असला आणि पाण्याची डबकी वगैरे साचली असली तर त्या दिवशी सुट्टी दिली जाते. पण शक्यतो अशी वेळ येऊ नये म्हणून काही खबरदारी घेण्याचे प्रयत्न केले जातात. त्यात बऱ्यापैकी यशसुद्धा मिळत आहे.

बाबर अलीचे आवडीचे विषय म्हणजे इतिहास, राज्यशास्त्र आणि इंग्लिश. यातील इतिहास व इंग्लिश हे दोन विषय तो स्वत: शाळेत शिकवतो. शिक्षणक्रमात असणारे गणित, भूगोल, बंगाली, हिंदी वगैरेसारखे इतर विषय बाकीचे शिक्षक (त्याची मित्रमंडळी) शिकवतात. संगणक शास्त्र हा विषय शिकवण्याची सोय शाळेत लवकरच होणार आहे.

सात वर्षांपूर्वी लावलेल्या या रोपट्याचा आता एक मोठा डेरेदार वृक्ष झाला आहे. अक्षर ओळखीपासून सुरू झालेल्या या उपक्रमात आता पहिली ते आठवीपर्यंतचे वर्ग घेतले जातात. पाच ते चौदा वर्षांची मुले शाळेत शिकतात. अगदीच अपवाद म्हणजे एखाद दुसरी पाचसहा वर्षांची मुलगी व तिची पंचविशीतील आई. आजमितीला ८०० पेक्षा जास्त विद्यार्थी हजेरीपटावर आहेत. दहा शिक्षक स्वयंस्फूर्तीने विद्यादानाचे काम विनामोबदला करतात. त्यातील काही बाबर अलीप्रमाणे स्वत: विद्यार्थी आहेत. काही जण बाबर अलीपेक्षा वयाने मोठे आहेत. त्याच्या या अनधिकृत शाळेला स्थानिक पातळीवरच्या प्रशासनाने व अधिकाऱ्यांनी मान्यता दिलेली आहे.

बी.बी.सी. ने त्यांच्या Hunger to Learn या श्रृंखलेत बाबर अलीच्या शाळेवर एक कार्यक्रम प्रसारित केला होता. जगातील सर्वात लहान मुख्याध्यापक असे त्याचे वर्णन करून त्याला गौरवले होते. मुलांचे भवितव्य घडवणारा एक अलौकिक शैक्षणिक प्रकल्प अशा शब्दांत कौतुक केले होते. इंग्लंडमधील त्याच्या तीन समवयस्क विद्यार्थ्यांनी त्याच्याशी बातचितीमधून सुसंवाद साधला होता. सानंद आश्चर्य तर त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होताना दिसलेच पण ते मूलत: हे पाहून अचंबित झाले होते की आपल्या वयाचाच एक मुलगा असा उपक्रम राबवत आहे. त्यांच्या प्रश्नांचा मुख्य रोख होता तो म्हणजे हे सगळं त्याला कसं सुचलं? त्याचे बाल्य, अल्लडपणा वगैरे गोष्टी त्याला अडथळा वाटल्या नाहीत का? शिवाय त्याने ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवताना नेमके काय केले ? प्राधान्यक्रम कसा ठेवला? वगैरे विस्तृतपणे ऐकले. त्याला पुढे कोण व्हावेसे वाटते अशा विचारणा आल्यावर त्याने सांगितले की मला शिकवायला आवडते, अगदी मनापासून पण ते माझ्या आयुष्याचे ध्येय वगैरे नाही. तो पुढे म्हणाला, 'मला भारतीय प्रशासकीय सेवेत (IAS) दाखल होऊन देशातील लोकांचे जास्तीत जास्त भले करावयाचे आहे. समाजाकरता काही भरीव व ठोस कार्य करण्याची माझी इच्छा आहे आणि म्हणूनच मोठा झाल्यावर फक्त शिक्षणक्षेत्रावरच लक्ष केंद्रित करण्यापलिकडे जाऊन विस्तृत रीत्या काम करण्याचा माझा मानस आहे.'

बालशिक्षण, शिक्षणाचे भवितव्य, शिक्षणाची भविष्यातील दिशा वगैरेंसारख्या विद्वत्ताजडित चर्चांत भाग घेणाऱ्या पंडितांमध्ये बाबर अली मोडत नाही. देशाची अशा व तत्सम बाबींची धोरणात्मक विश्लेषणे, मूल्यांकने, संकल्पनात्मक अभ्यास वगैरेंकरता नेमल्या जाणाऱ्या तज्ज्ञांच्या समितीवर किंवा अभ्यास गटांवर त्याची नियुक्ती होऊ शकत नाही. मुलांना प्रत्यक्ष शिकवण्याच्या ढोबळ कामात तो गुंतला आहे. त्याची विचारांची मजल चांगले शिकवून अधिकाधिक मुलांना कसा फायदा होईल इथपर्यंत व इथपर्यंतच जाऊ शकते. त्याचा चिकित्सक विचार वगैरे त्याने अजून केलेला नाही. खरं पाहिलं तर त्याच्या वयात ही अपेक्षा करणेही बरोबर नाही. त्यासाठी लागणारी परिपक्वता, पांडित्य व मोठा अनुभवही त्याच्या गाठीशी नाही. पुरस्कार, बक्षिसे, सन्मान वगैरेंतून प्रतीत होणारी समाजमान्यताही त्याला फारशी मिळालेली नाही. पण एक मात्र निश्चित. त्याच्या अनमोल प्रयत्नातून या क्षेत्रात काम करणाऱ्या दिग्गजांना खूप काही शिकण्यासारखे, पूर्वीचे निष्कर्ष तपासून घेण्यासारखे, समजून घेण्यासारखे बरेच काही दडलेले आहे, हे निर्विवाद. या अनोख्या प्रयत्नांत शिक्षणाविषयी, खास करून प्राथमिक शिक्षणावरील विविधांगी पैलू अंतर्भूत आहेत. अशा प्रकट आणि अप्रकट पैलूंचे साकल्याने व काही अंशी नियमितपणे केलेले आकलन या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींना अमूल्य स्वरूपाचे ठरेल यात शंकाच नाही.

बाबर अली जरी शाळेचा मुख्याध्यापक असला तरी तो स्वत:ला आधी एक शिक्षक समजतो. एक शिक्षक म्हणून त्याला मिळणारा अनुभव मोलाचा आहे यात शंकाच नाही. पण शाळा चालवत असताना त्याला मिळत आहेत व्यवस्थापन शास्त्राचे व प्रशासकीय क्षेत्राचे अनमोल प्रात्यक्षिक धडे. त्याला स्वत:ला याची वेगळी अशी जाणीवही नाही. ते त्याच्या गावीही नाही. पण ८०० विद्यार्थ्यांना एकत्रितरीत्या एका उद्देशाभोवती समान धाग्याने गुंफून ठेवणे याला लागते मोठे संघटनात्मक कौशल्य. वेळेचे नियोजन, वेळापत्रक, प्रत्येक वर्गाच्या अभ्यासक्रमाचे नियोजन व आखणी, तिची अंमलबजावणी, विद्यार्थ्यांना नीट पचनी पडत आहे की नाही ते पाहणे, त्यानुसार विचार करून योग्य ते बदल करणे, विद्यार्थ्यांशी सतत सुसंवाद, त्यांना तसेच शिक्षकांना कायम उल्हसित, उत्स्फूर्त ठेवून त्यांना उत्तेजन देणे, शिक्षकांना एकसंध असा चमू म्हणून बांधणे, पावसाळ्याकरता आपत्कालीन सोयीची व्यवस्था करून शाळा चालूच राहील हे पाहणे, मुलांकडे पाठ्यपुस्तके व्यवस्थित आहेत की नाही हे पाहणे (आईवडील गरीब व निरक्षर असल्यामुळे), गावकऱ्यांना शाळेच्या कामकाजात काही गैर दिसू नये ही काळजी घेऊन त्यांना नाराज न होऊ देणे वगैरे आणि

तत्सम नाना प्रकारच्या अवधानात डोळ्यांत तेल घालून लक्ष देणे. या सर्वांतून तो एका चांगल्या व्यवस्थापकीय व प्रशासकीय अधिकाऱ्याचे गुण व कौशल्य आपोआप व स्वत:च्या प्रत्यक्ष अनुभवातून आत्मसात करीत आहे, ही केवढी मोठी गोष्ट आहे. याचा त्याला भावी आयुष्यात किती उपयोग होईल हे वेगळे सांगायला नकोच. खास करून सनदी अधिकारी होण्याच्या अपेक्षा साकार झाल्यानंतर.

दारिद्र्यपीडित मुलांनी त्यांच्या कुटुंबातील आर्थिक समस्यांमुळे शिक्षण घेणे थांबवू नये म्हणून बाबर अली आपल्या परीने त्यांची विशेष काळजी घेतो. तो लोकांकडून देणग्या गोळा करतो व त्या रकमेतून अशा गरीब मुलांच्या गरजा भागवतो. त्याच्या घरची मंडळी या रकमेतून या गरीब मुलांच्या नाश्तापाण्याची सोय करतात, जेणेकरून उपाशीपणा व पैशाची अडचण शिक्षण सुरू ठेवण्याच्या आड येऊ नये. शाळेचा मुख्याध्यापक या नात्याने तो हे करत असतोच पण त्याहीपेक्षा समाजाकरता करत असलेल्या चांगल्या कामाच्या तळमळीपोटी जास्त करतो.

सर्वसामान्यपणे या वयातील मुलांना शिक्षणाचा तिटकारा असतो. त्यांना अभ्यास आवडत नाही. अगदी जुलमाचा रामराम म्हणून ते अभ्यास, वर्गपाठ, गृहपाठ, परीक्षा वगैरेंकडे पाहात असतात, अगदी तरणोपाय नाही म्हणून. या शाळेतील मुलांच्या बाबतीत तर आणखी दोन अडथळे महत्त्वाचे आहेत. एक शिक्षणाच्या दीर्घकालीन परिणामांबद्दल आईवडील पूर्णपणे अनभिज्ञ असतात. दोन, न शिकताच त्यांची मुले कमाई करून घराला हातभार लावत असतात. त्यामुळे त्यांना शाळेत जाण्याची तशी गरज भासत नाही. त्यामुळे संध्याकाळी खेळायचे सोडून ८०० एवढ्या मोठ्या संख्येने बाबर अलीच्या शाळेत ही मुले येतात हे एक अचंबित करणारे नवलच आहे.

चार वाजता शाळेची घंटा वाजायचीच खोटी, की बांध फुटलेल्या पाण्याच्या वेगाने मुले शाळेत घुसून स्थानापन्न होतात. शाळेबद्दलची ओढ व अभ्यासाची लागलेली गोडी या बाबी तर निर्विवाद. पण आठशे मुलांना असे वाटणे म्हणजेच किती मोठी गोष्ट. कशी साध्य केली असेल ती बाबर अलीने एवढ्या लहान वयात? याचे कारण बाबर अली त्यांना ज्या पद्धतीने वागवतो, शिकवतो, यात आहे. तो त्यांच्याशी मिळून मिसळून वागतो. आपुलकीने संवाद साधतो. त्यांच्या मनात मित्रत्त्वाची व त्याच बरोबरीने आदराची भावना निर्माण



करतो. वातावरणात अभ्यासामुळे व शिकण्याच्या प्रक्रियेमुळे येणारे दडपण अजिबात नसते. उलट वातावरण खेळीमेळीचे असते. एक प्रकारचा मोकळेपणा त्यात असतो. मुलांना जरी बाबर अलीचा एक प्रकारचा दबदबा जाणवत असला तरी तो सकारात्मक रीत्याच वापरला जातो. तो त्यांना आपल्यातलाच एक मोठा, प्रेमळ मित्र वाटतो. काहींना तो मार्गदर्शक वाटतो. या मुलांना असे वातावरण आवडते म्हणून ते आपणहून शाळेत येतात व दडपणाशिवाय मनावर ताण न येता आनंदाने शिकतात. मुलांच्या मानसशास्त्राची त्याला एक मुख्याध्यापक म्हणून चांगलीच जाण आहे याचा आणखी काय पुरावा हवा?

सरकारी यंत्रणेला नाना गोष्टींबद्दल दोष देणे हा तर जनतेने स्वयंघोषित असा स्वत:साठी मिळवलेला अधिकार. त्याचा वापर अनिर्बंधपणे करण्यात जनसामान्यांना एक प्रकारचे समाधान लाभते. पण ते हे विसरतात की सरकारी यंत्रणेच्या मदतीशिवायही त्यांना बरेच काही करण्यासारखे असते.

याचे मूर्तिमंत उदाहरण आहे बाबर अली. याबाबत तो एक ब्रही काढत नाही. सरकारी मदतीची अपेक्षा अजिबात ठेवत नाही. अत्यंत तुटपुंज्या सामग्रीसह तो शाळा चालवतो – अगदी 'घेतला वसा...' या उक्ती प्रमाणे. सरकारी यंत्रणेला दोष देऊन व आपण काय करू शकतो याचा विचारही मनात न आणणाऱ्यांच्या डोळ्यांत बाबर अलीने झणझणीत अंजन घातले आहे यात शंकाच नाही.

बी.बी.सी. मधील प्रसारणावर जगभरातून उत्तमोत्तम प्रतिक्रिया आल्या. बाबर अलीच्या अद्वितीय कामाचे पैलू जगभरातील विविध स्तरांवरच्या लोकांनी कशा दृष्टीने पाहिले, ते फार बोलके आहे :

''या भोगनिष्ठ जगात प्रवाहाच्या उलट्या दिशेने जाऊन उपलब्ध साधनांचा सर्वोत्तम वापर करून आपल्याबरोबरच इतर मुलांचे जीवनमान उंचावण्याचा स्तुत्य उपक्रम.''

'' 'आ' वासून साश्रू नयनांनी बाबर अलीची गोष्ट पाहिली.''

''या द्रष्ट्या माणसाच्या मागे संपूर्ण जगाने उभे राहिले पाहिजे. स्थानिक अधिकाऱ्यांनी त्याच्या पाठीशी सक्रियपणे उभे ठाकले पाहिजे. बाबर अलीला सलाम.''

''अविश्वसनीय! आपल्या पृथ्वीतलावरची गोष्ट आहे का ही?''

''अद्वितीय! जगभरातून हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या लोकांनी जरी

स्फूर्ती घेऊन असे प्रयत्न केले तरी बाबर अलींचे काम सार्थकी लागेल.''

''डोळ्यांवरची झापड उडाली.''

अशा प्रकारच्या अनेक प्रतिक्रिया व्यक्त केल्या गेल्या. मुळात खडबडून जागे झालेल्या मंडळींच्या मनातील उत्स्फूर्तपणे येणारे विचार बरेच काही सांगून जातात.

पाश्चात्य आणि विकसित देशांतील लोकांनी, 'आमच्या मुलांनी हे पाहून स्वत:मध्ये स्वकर्तव्याविषयी आमूलाग्र बदल घडवून आणला पाहिजे', अशा आशयाच्या प्रतिक्रिया दिल्या. पाश्चात्य मंडळींच्या कौतुकाचा वर्षाव करणाऱ्या प्रतिक्रिया काही वेळा अतिरंजित वाटल्या तरी त्या बोलक्या आहेत. अगदी 'जगात संत महंत अस्तित्वात असतील तर त्यातील एक आहे बाबर अली' इथपासून ते 'त्याला खरं तर नोबेल पारितोषिकच द्यायला हवे होते, ओबामा पुढच्या वर्षापर्यंत थांबू शकत नव्हते का?' इथपर्यंत.

ही सारी आहे एक खरोखरीची नवलकथा. एका ध्येयनिष्ठ बालकाची.



# डॉ. चंद्रशेखर संकुरत्री

*'दैव जाणिले कुणी' ही उक्ती डॉ. चंद्रशेखर संकुरत्री यांना अगदी चपखलपणे लागू पडते. विमानाच्या अपघातात त्यांची पत्नी व दोन मुले निधन पावली. त्यांच्यावर आकाशच कोसळले. जीवनात राम राहिला नाही. पण त्यांनी जीवनाचा सारीपाट पुन्हा मांडला तो सेवाव्रताद्वारे आंध्रप्रदेशातील आपल्या भागात समाजसेवेचा महायज्ञ सुरू करूनच. त्यांनी लक्ष केंद्रित केले ते शिक्षणावर आणि ते ज्या इंद्रियाद्वारे मिळवले जाते त्या चक्षूंवर. गरीबांच्या विकासात शिक्षणाचे महत्त्व फार व ते मिळवण्यात डोळ्यांची महत्ता मोठी. त्यांनी उत्तम शाळा काढण्याचे व डोळ्याचे इस्पितळ काढण्याचे ठरवले. शाळेत नुसता अभ्यासच नाही तर शिस्त, चांगल्या सवयी, बुद्धीला व उन्नतीला उठाव देणारे उपक्रम यांद्वारे विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडवण्यावर भर दिला जातो. त्यांनी मोफत शिक्षण देतादेताच बरोबरीने एक आदर्श शाळा प्रस्थापित केली. अत्याधुनिक असे डोळ्याचे इस्पितळ त्यांनी उभारले. लाखो शस्त्रक्रिया तेथे केल्या गेल्या. पदव्युत्तर पातळीवरील वैद्यकीय संस्थेत उपलब्ध असणाऱ्या साऱ्या सुविधांनी त्यांनी इस्पितळ सुसज्ज केले. बहुतेक सर्व रूग्णांना मोफत उपचार देणाऱ्या या विभूतीपुढे 'आंध्रप्रदेश सुपुत्र' हा बहुमान नतमस्तक झाला.*

'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा। दोष ना कुणाचा' ही ओळ चपखल पणे लागू पडेल असे प्रसंग सामान्यांच्या जीवनात अधून मधून घडत असतात. पण त्यांची तीव्रता किती असते त्यावर बरेचसे अवलंबून असते. ती फारशी

गंभीर स्वरूपाची नसेल तर ती फारशी लक्षात राहात नाही. सर्व काही सुरळीत चालू राहते. काही काळाने आपण असे प्रसंग विसरूनही जातो. पण अगदी अपवादात्मक लोकांच्या बाबतीत का होईना ते अत्यंत क्लेशकारक ठरतात. आयुष्यातील या काळ्याकुट्ट घटना होत्याचे नव्हते करून टाकतात. संपूर्ण जीवनाचा संदर्भच उलट सुलट होतो. मनुष्य नुसता सैरभैर होऊन जातो.

अशीच एक दुर्भागी व्यक्ती म्हणजे डॉक्टर चंद्रशेखर संकुरत्री. आंध्र प्रदेशातील पूर्व किनारपट्टीवरील एका गावात त्यांचा जन्म झाला. बालपणीचे शिक्षण व नंतरचे कॉलेजशिक्षण आंध्रातच पूर्ण झाले. नंतर कॅनडात जाऊन त्यांनी डॉक्टरेटची पदवी मिळवली. तिथे त्यांना सरकारमध्ये संशोधक म्हणून चांगली नोकरी मिळाली. कालांतराने त्यांच्या गावाजवळ राहणाऱ्या व गरीब ग्रामवासियांबद्दल खास कणव असणाऱ्या सुविद्य आणि सुसंस्कृत मुलीशी त्यांचे लग्न झाले. यथावकाश दोन गोंडस अपत्ये झाली. या सुखवस्तू चौकोनी कुटुंबाचे आयुष्य एकमेकांच्या संगतीत व्यतीत होत होते.

त्यावेळी आकस्मिकपणे उगवला तो काळदिन. तो दिवस होता २३ जून १९८५. त्यांची पत्नी व दोन्ही मुले एअर इंडियाच्या विमानाने टोरांटोहून लंडनला निघाली होती. विमान आयर्लंडजवळ बॉंबस्फोटाने दुर्घटनाग्रस्त झाले. त्यात हे तिघे मरण पावले. डॉक्टरांवर तर आकाशच कोसळले. ते वगळता सर्व कुटुंब जग सोडून गेले होते. त्यांच्या जीवनाचा सारीपट भिरकावून दिल्यासारखा उधळला गेला. वैफल्यग्रस्त झाले होते अवघे आयुष्य. काय करावे काही सुचेना अशी तगमग त्यांना पावलोपावली छळू लागली. त्यांनी नोकरी चालू ठेवली पण त्यांना काही त्यात राम वाटेना. मनात सतत यायचे, कशाकरता हे सगळे, कोणीतरी सुचवले की त्यांनी विमान स्फोटाबाबत चाललेल्या कायदेशीर लढाईत रस घ्यावा आणि हिरिरीने त्यात पडावे. त्यामुळे त्यांना दिवंगत पत्नी व मुलांसाठी काहीतरी यथायोग्य केल्याचे समाधान मिळेल. त्यांना स्वत:लाही मानसिक शांती मिळेल. त्यांनी विचार केला की असे केल्याने काय होणार? विनाकारण डोक्याला ताप होणार. कालांतराने निकाल लागल्यानंतर नेमके काय हाती लागणार व त्याचा उपयोग काय? त्यांनी त्यात न पडण्याचे ठरवले. तीन वर्षांनंतर त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला व भारतात कायमचे परतले ते पत्नीची गरीबांबद्दलची आस्था व कणव लक्षात ठेवूनच. त्यांची अविरत सेवा करायचे ध्येय मनात ठेवूनच.



गरीबांना नाना प्रकारच्या समस्या असतात. त्या सोडवण्याकरता वापरण्याच्या पद्धतीही वेगवेगळ्या असतात. गरीबांची सेवा करायची म्हणजे नेमके काय करायचे? हा प्रश्न त्यांनी स्वत:ला विचारला आणि त्याची अवाढव्य व्याप्ती मनाला अचंबित करून गेली. त्यांच्या असे लक्षात आले की ग्रामीण भागातील बरेचसे लोक डोळ्यांच्या विकारांनी ग्रासलेले असतात. त्यातील मोठे प्रमाण मोतीबिंदू झालेल्यांचे दिसते, ज्यांना बरे करणे कठीण नाही. अनेकजण ग्लूकोमियाने त्रासलेले असतात व या रोगाला प्रतिबंध घालणे शक्य आहे. विचारांती त्यांनी असे ठरवले की आपण मुख्यत्त्वेकरून चांगले शिक्षण व डोळे यांबद्दलच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करायचे.

त्यांनी आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीच्या भागात शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण तसेच वैद्यकीय / आरोग्य व आपत्कालीन मदत पुरवण्याकरता १९८९ साली संकुरत्री फौंडेशनची स्थापना केली. सामाजिक समता, प्रामाणिकपणा, ध्येयनिष्ठा, दर्जेदारपणा, पारदर्शकता, शिस्त, सचोटी, संघभावना, आपुलकी या गोष्टी त्यांनी फौंडेशनची मूलतत्त्वे म्हणून अंमलात आणायचे पक्के केले.

आपल्याजवळचे पैसे घालून त्यांनी पत्नीच्या नावाने फौंडेशन स्थापन केले. पत्नीचा जन्म झाला त्या ठिकाणापासून जवळच कुरूथू नावाच्या लहान गावात त्यांनी डोळ्यांचे इस्पितळ सुरू केले व एक शाळाही बांधली. आज गरीबांचे आयुष्यमान सुधारून त्यांना सक्षम करण्याच्या कार्यात फौंडेशनला छानच यश मिळाल्याचे गावकरी मान्य करतात. त्यांच्या चार वर्षांच्या मुलीच्या नावाने सुरू केलेल्या शारदा या शाळेत पहिली ते दहावीच्या शिक्षणाची सोय आहे. आतापर्यंत शाळेतून १२०० पेक्षा जास्त विद्यार्थी पास होऊन बाहेर पडले आहेत. शाळा अर्धवट सोडून जाणाऱ्यांची देशभरातील टक्केवारी ५० टक्के इतकी आहे तर त्यांच्या शाळेतून एकही मूल आजतागायत शाळा सोडून गेले नाही.

या शाळेला फी नाही. पुस्तके, वह्या, गणवेश, एकवेळचे जेवण, नाश्ता वगैरे खर्च डॉक्टरच करतात. त्यामुळे गरीब मुलांना फौंडेशनतर्फे शिक्षण फुकट असते. समाजाच्या अगदी खालच्या स्तरातील त्यांच्या पालकांना हा किती मोठा आर्थिक आधार आहे हे वेगळे सांगायची गरज नाही. एवढेच नाही, तर मुलांची नियमित वैद्यकीय तपासणी फुकट केली जाते. ज्या मुलांना पुढील उपचारांची गरज असते, त्यांना फौंडेशनतर्फे मोफत औषधोपचारांची व्यवस्था केली जाते. अभ्यासाबरोबरच शाळा त्यांच्या तब्येतीकडेही उत्तम लक्ष पुरवते हे स्पृहणीय

कार्य आहे यात शंकाच नाही. शाळेचा विश्वास आहे की मुळात आवडच नसेल तर सगळंच मुसळ केरात जाऊ शकतं. म्हणून मुलांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी याकरता शाळा खास करून प्रयत्नशील असते. शिकण्याची इच्छा व शिस्त यांवर शाळा मुद्दाम भर देते. दररोज शाळेची सुरूवात प्रार्थनेने होते, ज्यात देश, शिक्षक, समाज व जगन्नियंत्रक यांचे प्रती एकनिष्ठ भाव व्यक्त केला जातो. दररोज नियमितपणे शारदादेवीच्या पुतळ्याभोवती मुले प्रदक्षिणा घालतात व मगच शाळा सुरू होते. आमराईत मोठ्या आम्रवृक्षांखाली ही शाळा भरते.

फौंडेशन जेथे काम करते त्या पूर्व किनारपट्टीवर पूर्व गोदावरी जिल्ह्यात बंगालच्या खाडीतून नेहमी जोरदार वादळे येत असतात. तिथे पुराचाही तडाखा जोरात बसत असतो. या नैसर्गिक आपत्तींचे भयंकर परिणाम लोकांना भोगावे लागतात. पण या आपत्तींना गरीबांच्या झोपड्या तोंड देऊ शकत नाहीत. म्हणून अशा रहिवाशांना ही संकटे अधिक तीव्रतेने जाणवतात. त्यांना फारच थोड्या वेळात झोपड्या सोडून तात्पुरत्या निवासात आश्रयाला जावे लागते. तेथे खाण्याची व कपड्यांची सोय केलेली असते, पण बरेचदा ती अपुरी व विस्कळीत असते. त्यामुळे लोकांचे अतोनात हाल होतात. शिवाय अशा वेळेस पिण्याच्या पाण्याच्या दूषितपणामुळे होणारे अनेक रोग फैलावतात.

अनेक वादळे व पुरांचा अभ्यास, तसेच आपत्तीग्रस्तांशी विचारविनिमय करून फौंडेशनने १९९८ साली 'स्पंदन' हा कार्यक्रम हाती घेतला. याद्वारे विस्थापितांना अन्न, पिण्याचे पाणी, आरोग्य तपासणी, औषधे, कपडे इ. जीवनावश्यक गोष्टी तातडीने पुरवल्या जातात. ही मदत ते पुन्हा आपल्या घरी परतेपर्यंत केली जाते.

शिजवलेल्या अन्नाची पाकिटे, जुने तसेच नवे कपडे, सुक्या खाद्यपदार्थांची पाकिटे वगैरेचा पुरवठा १९९९ सालापासून प्रत्येक नैसर्गिक आपत्तीच्या वेळेस फौंडेशनने कर्तव्यभावनेने केला आहे.

मानवतावादी काम, गरीबांचा उद्धार, आरोग्य क्षेत्रातील सेवा, शिक्षण क्षेत्रातील काम, आपत्तीग्रस्तांना साहाय्य अशा वेगवेगळ्या गोष्टींकरता त्यांना अनेक पुरस्कार, बक्षिसे, मानसन्मान मिळालेले आहेत. ते भारतातूनच नव्हे तर अमेरिका व कॅनडातूनही अनेक प्रथितयश संस्थांनी त्यांच्या गौरवार्थ दिलेले आहेत. रोटरी, लायन्स, जागतिक स्वयंसेवक सभा, मदर तेरेसा पुरस्कार, कॅनडाचा गौरव, तेलगु पुरस्कार यांचा त्यात समावेश आहे.



जानेवारी १९९३ मध्ये खास करून दृष्टी व डोळ्यांसंबंधित विकारांकरता श्रीकिरण इन्स्टिट्यूट ऑफ ऑप्थल्मालॉजी या संस्थेची स्थापना करण्यात आली. ही संस्था फार मोठ्या प्रमाणावर काम करीत आहे. आजमितीला संस्थेकडे १२६ खाटांचे स्वत:चे डोळ्यांचे भव्य इस्पितळ असून त्यात बाह्य रूग्णांकरता वेगळा अद्ययावत विभाग आहे. याशिवाय संस्थेचे शहरात एक केंद्र असून ग्रामीण भागात चार केंद्रे आहेत. संस्थेकडे येणाऱ्या सुमारे ९० टक्के रूग्णांना अगदी शस्त्रक्रियेसहित सर्व उपचार मोफत दिले जातात.

सर्वसाधारणपणे ग्रामस्थ मंडळी आरोग्याच्या समस्या सोडवण्याकरता आपण होऊन पुढे येत नाहीत. लांबच्या व दुर्गम भागात हा प्रश्न अधिक गंभीर आहे. पण त्याची फलश्रुती म्हणजे तब्येतीच्या समस्यांकडे दुर्लक्ष होते. कितीतरी वेळा रोग्याची अवस्था गंभीर होते. यावर तोडगा म्हणजे रूग्ण उपचारांकडे येण्याऐवजी उपचारांच्या सुविधाच त्यांच्या दारी थेट त्यांच्यापर्यंत पोचवणे. हा हेतू समोर ठेवून, संस्थेने गरज असलेल्या व अडचणीच्या, दुर्गम भागातील लोकांच्या सहभागातून डोळ्यांची शिबिरे घेण्यास सुरूवात केली. तेथे उपचार करून पुढील औषधोपचारांची दिशा ठरवली जाते.

जर आजार गंभीर असला तर संस्थेच्या मोठ्या इस्पितळात त्याची रवानगी करतात. अशा वेळेस सर्व सुविधा म्हणजे घरापासून ने-आण, शस्त्रक्रिया, औषधोपचार, जेवण, राहणे, नंतरचे उपचार इत्यादी संस्थेतर्फे फुकट दिले जाते. संस्थेकडील उपकरणे, सुविधा व या क्षेत्रातील प्रचंड अनुभव या भांडवलावर तीन वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण देण्यायोग्य क्षमता इस्पितळाने स्वकर्तृत्त्वावर मिळवलेली आहे. जेव्हा संस्थेचा चमू दुर्गम भागातल्या गावाला भेट देतो तेव्हा कमीत कमी दोनशे लोक तरी गोळा होतात. त्यातले निम्मे मोतीबिंदूचे शिकार झालेले असतात. यावर उपाय आहे हे बऱ्याच जणांना माहीतच नसते. शिवाय इस्पितळात जाण्यायेण्याचा प्रश्न असतोच. भारतात दरवर्षी ७० लाख लोकांना मोतीबिंदू होतो. त्यातील २० लाख लोकच त्यावर आवश्यक ती शस्त्रक्रिया करतात. पाश्चिमात्य राष्ट्रातील हॉस्पिटलमध्ये एका डॉक्टरद्वारे दररोज १५ शस्त्रक्रिया केल्या जातात तर संस्थेचे डॉक्टर त्याच्या कित्येक पटीने जास्त शस्त्रक्रिया दररोज करतात. .

जगातील अंध व्यक्तींपैकी सुमारे २५ टक्के भारताचे रहिवासी आहेत. मुलांची शाळा संपल्यानंतर त्यांना घरी सोडणारी बस गावागावातून हिंडून

डोळ्याच्या इस्पितळात येऊ इच्छिणाऱ्या अंधांना/ रूग्णांना गोळा करून घेऊन येते व तपासणीनंतर पुन्हा परत सोडते.इस्पितळातील कामगार वर्ग स्थानिक असून त्यांना राहायला खोली, जेवण व माफक पगार दिला जातो.

स्वत:चे ज्ञान अद्ययावत ठेवण्याकरता वैद्यकीय परीक्षा उत्तीर्ण होऊन काही काळ लोटलेल्या डॉक्टर मंडळींकरता खास प्रशिक्षणाची सोय आहे. डी एन बी या डोळ्यांच्या पदव्युत्तर शिक्षणाकरता संस्थेला मान्यता मिळाली असून हे शिक्षण दिले जात आहे. या विषयात मदतनीस/ सहाय्यक म्हणून काम करण्यास उपयुक्त असे प्रशिक्षण वर्गही ग्रामीण युवकांकरता घेतले जातात नुकत्याच पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्या डोळ्यांच्या डॉक्टरांना अधिक ज्ञान मिळावे व त्यांचे कौशल्य वाढावे यासाठी शिष्यवृत्त्याही संस्थेने ठेवलेल्या आहेत.

आजतागायत कोणताही रूग्ण पैशांच्या अभावी उपचारावाचून परत पाठवला गेलेला नाही. ही एकच बाब संस्थेला सर्वोत्तम स्वयंसेवी संस्था का म्हणतात ते सिद्ध करायला बोलकी आहे.

सुरूवातीला इस्पितळात अवघ्या २६ खाटा व ९ कर्मचारी होते. आज संस्था पाच एकरात निसर्गरम्य वातावरणात पाच इमारतीत पन्नास हजार चौरस फुटांत स्थिरावलेली दिसत आहे. अद्ययावत उपकरणे विकत घेण्याकडे संस्था खास लक्ष देते. डोळ्यांच्या विकारांच्या या संस्थेच्या कर्तृत्त्वाचा आवाका दृष्ट लागावी एवढा अवाढव्य झालेला आहे. दहा बाह्यरूग्ण विभाग, चार शस्त्रक्रिया दालने, चोवीस तास आपत्कालीन सेवा, डोळ्यांशी निगडित प्रत्येक आरोग्य समस्ये करता खास वेगळा रूग्णविभाग, डोळ्यांची बँक, एक चष्म्याचे दुकान, एक औषधांचे दुकान, १३६ खाटांचे इस्पितळ, स्त्रिया व पुरूषांकरता वेगळी वसतीगृहे, एक सभागृह, एक उपहारगृह यांमुळे संस्था स्वत: एक स्वावलंबी व्यवस्थाच झालेली आहे.

या इस्पितळाइतकी सुसज्ज वैद्यकीय सुविधा आसपासच्या इलाख्यातील दोन कोटी लोकांना दुसरी कोठेही मिळत नाही.

आज आठ डोळ्यांचे तज्ञ व एक शिकाऊ डॉक्टर संस्थेला सेवा पुरवतात. प्रशासकीय व इतर कामांकरता ७९ पूर्णवेळ कर्मचारी नेमलेले आहेत. त्यात सहा संगणक तज्ञही आहेत. शिवाय ३६ शिकाऊ उमेदवार निरनिराळ्या विभागात कार्यरत आहेत. संस्थेला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी करण्याकरता ज्या रूग्णांना फी देणे परवडू शकते त्यांच्याचकडून शुल्क आकारले जाते. ते शुल्क मुद्दाम



इतके वाजवी ठेवलेले आहे की बहुतेक सर्व उत्पन्न गटातील लोकांना ते परवडणारे असते. रूग्ण फी देणारा असो किंवा मोफत उपचार घेणारा असो, इस्पितळाकडून मिळणाऱ्या सेवासुविधा दोहोंनाही अगदी सारख्याच असतात.

सामाजिक कामात स्थानिक ग्रामस्थांचे सहकार्य व त्यांचा विश्वास या दोन बाबींना अनन्यसाधारण महत्त्व असते. इतक्या वर्षांत या दोन्ही गोष्टी संस्थेने स्वकर्तृत्त्वाने आपल्या खात्यात जमा केल्या आहेत. उपलब्ध साधनसामग्रीचा जास्तीत जास्त व सुयोग्य वापर तसेच सर्व तज्ञ व कर्मचारी यांची कार्यतन्मयता ग्रामस्थ स्वत: पाहात आहेत. यामुळे टाळता येण्याजोगा आंधळेपणा संस्था नियंत्रित करीत आहे याचा अनुभव ते घेत आहेत. तसेच उपचारांनी बऱ्या होऊ शकणाऱ्या आंधळेपणावरदेखील प्रभावी उपचार त्यांच्या समोरच होत आहेत हे ते प्रत्यक्ष पाहात आहेत. आंध्र प्रदेश सरकारने सर्वोत्तम स्वयंसेवी संस्था असा केलेला गौरव स्थानिक मंडळींच्या कौतुकाचा विषय आहे.

आजमितीला दर दिवशी ३५० बाह्य रूग्णांना व दाखल केलेल्या ८० रूग्णांना सेवा देण्याची इस्पितळाची क्षमता आहे. सुमारे पंधरा वर्षांत संस्थेने सतरा लाख ऐंशी हजारांपेक्षा जास्त बाह्य रूग्णांना उपचार दिलेले आहेत. या काळात केलेल्या शस्त्रक्रियांची संख्या आहे एक लाख सदुसष्ट हजार, इतकी अवाढव्य. गावोगावी भरवलेल्या डोळ्यांच्या उपचार शिबिरांची संख्या पावणे दोन हजारांपेक्षा जास्त भरते. खास मुलांकरता घेतलेल्या शिबिरांची संख्या हजारापेक्षा मोठी आहे.

संस्थेकडून तीनशेपन्नास डॉक्टर्स व इतर संबंधितांनी वैद्यकीय प्रशिक्षण घेतले आहे. शंभर सहाय्यक लोकांनीही प्रशिक्षणाचा फायदा घेतला आहे.

त्यांनी स्थापन केलेल्या शाळेने या भागातील मुलांच्या आयुष्याकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात तसेच मानसिकतेतच सकारात्मक बदल घडवून आणलेला आहे. शिक्षणाशिवाय त्यांच्या पाचवीला पुजलेले जीवन म्हणजे मुलांनी शेतमजूर होणे व मुलींनी मोलकरीण होणे. भविष्यात असे घडणे ही जणू काळ्या दगडावरची रेघ. ही कल्पना असताना फक्त शाळेच्या आधारावर ही मुले डॉक्टर, शिक्षक, वकील, प्राध्यापक होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगत आहेत हे पाहून डॉक्टर चंद्रशेखरांचा ऊर भरून येत असल्यास नवल नाही.

शाळेत शिस्तीला फार महत्त्व दिलेले आहे. जेवायच्या वेळेस सर्व विद्यार्थी एकत्र येवून शांतपणे न बोलता ठरलेल्या रांगेत उभे राहतात. मग जगद्नियंत्रकांनी

त्यांना पूर्णब्रह्म असलेले अन्न दिल्याबद्दल प्रार्थनेद्वारे कृतज्ञता व्यक्त केली जाते. मग जेवण सुरू होते. त्यावेळेसही प्रत्येक जण न बोलता शांतता पाळून अन्न सेवन करीत असतो. डॉक्टर चंद्रशेखर म्हणतात, ''जोपर्यंत शिस्त पाळली जात नाही तोवर मुलांतील सर्वोत्तम गुणांचा व पूर्ण क्षमतेचा वापर होत नाही. प्रथम शिस्त, मग येते शिक्षण.'' शाळेने आखलेल्या योजनांप्रमाणे सर्व झालेच पाहिजे व त्या बाबतीत कसलीही तडजोड नाही व सूट नाही.

शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अठराशेपेक्षा जास्त आहे. त्यापैकी १८६ मुलांना शिष्यवृत्ती देण्यात आलेली होती. कॅनडातील विश्वस्त संस्थेकडनू मिळणाऱ्या निधीपैकी ९५ टक्के प्रत्यक्ष वैद्यकीय कारणांकरता खर्च करण्यात येतात. राहिलेले पाच टक्के व्यावसायिकांची फी व इतर प्रशासकीय कामांकरता वापरले जातात.

ते स्वत: शाळेत विज्ञान शिकवतात. उत्तम शिकवत असल्यामुळे विद्यार्थी खूष असतात. ते जिज्ञासेपोटी अनेक प्रश्न त्यांना विचारतात. त्यांना हे फार आवडते. ते म्हणतात, माझी स्वत:ची मुले माझ्या मनात कायमच असतात, पण या मुलांमध्ये मी त्यांना पाहतो, भेटतो.

नुकतेच, जून २०१३ मध्ये, डॉ. चंद्रशेखर संकुरत्री यांना इंडो-कॅनडा चेंबर ऑफ कॉमर्स, टोरंटो, कॅनडा यांचेकडून 'ह्यूमॅनिटेरियन ऑफ द इयर-२०१३' पुरस्काराने गौरवण्यात आले.

नियतीकडून एवढी मोठी कटुता वाट्याला आल्यानंतरही ते हलाहल पचवून त्याची परतफेड सद्सद्विवेकबुद्धी वापरून समाजात प्रेम, दया व सद्भावनेपोटी भले करू पाहणाऱ्या डॉक्टर चंद्रशेखरांसारखी व्यक्तिमत्त्वे हाताच्या बोटावर मोजण्याइतकीसुद्धा मिळणे कठीण. त्या कटू भावनेवर मात करून मनाचा गाभारा पुन्हा सद्भावनेने भरून 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' या उक्तीप्रमाणे आचरण करणारे, एक आदर्श समाजापुढे मांडणारे त्यांच्यासारखे लाखोंमध्ये एखादेच.

असे आहेत डॉ. संकुरत्री व त्यांचे कार्य !

❀❀



# श्रीमती चेतना सिन्हा -'माणदेशी फौंडेशन'

*ग्रामीण भागातल्या दारिद्र्यग्रस्त गरीब स्त्रियांचे जीवन नुसतेच कष्टमय नसते तर ते दुय्यम दर्जाचेही असते. काबाडकष्ट, कुटुंबाकरता खस्ता खाणे, घरात व बाहेरही होणारी अवहेलना, कस्पटासमान मिळणारी दुय्यम वागणूक, घरातील पुरूषाचे अनाकलनीय वर्चस्व, प्रकृतीची हेळसांड इत्यादी बाबी तर त्यांच्या पाचवीलाच पुजलेल्या. या आणि अशा प्रकारच्या अनेक पारंपरिक स्वरूपाच्या सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक समस्यांशी हिरिरीने आणि अनेक नाविन्यपूर्ण मार्गांनी झगडत आहेत श्रीमती चेतना सिन्हा आणि त्यांनी स्थापन केलेला माणदेशी महिला गट.*

*माणदेशी महिला गटाचे उद्दिष्ट म्हणजे हालअपेष्टा आणि दारिद्र्यात जगत असलेल्या स्त्रियांचे राहणीमान वित्तीय व संबंधित बिगर वित्तीय सेवासुविधांच्या माध्यमातून उंचावणे हे आहे. माणदेशी महिला गटात तीन संघटनांचा समावेश आहे. एक, माणदेशी महिला सहकारी बँक, दोन, माणदेशी फौंडेशन आणि तीन, माणदेशी महिला बचत गट फौंडेशन.*

*महिलांच्या उन्नतीच्या मार्गात आर्थिक बाबींना मोठे महत्त्वाचे स्थान आहे हे ओळखून माणदेशी महिला सहकारी बँकेची स्थापना केली गेली. ग्रामीण महिलांकरता काम करणाऱ्या या बँकेकरता परवानगी मिळाली ती अविश्रांत संघर्षानंतर. कामकाजावर रिझर्व बँकेची खास बारीक नजर असलेल्या या बँकेने भल्या भल्या बँकांनाही जमणार नाही अशी नेत्रदीपक कामगिरी करून दाखवली आहे. व्यवसायाचा आवाका*

*तर खूप वाढला आहेच पण गरीब वर्गातील खेडुतांना मोठ्या प्रमाणात कर्जे देऊनही वसुलीचे प्रमाण हेवा वाटावा इतके उच्च आहे. या वर्गातील ग्राहकांना बँकेचा उपयोग व व्यवहार कसा करावा याचे खास प्रशिक्षण त्यांनी दिले. आजमितीला हजारो गरीब बायकांनी बँकेच्या मदतीने छोटे छोटे व्यवसाय करून आपली आर्थिक स्थिती सुधारली आहे.*

*फक्त कर्जाच्या उपलब्धतेमुळे स्त्रियांचे जीवनमान सुधारणार नाही हे ओळखून त्यांनी माणदेशी फौंडेशनची स्थापना करून त्यांच्या बिगर वित्तीय स्वरूपाच्या सेवांकडेही लक्ष पुरवले. व्यवसाय सुरू करणाऱ्या / वाढवणाऱ्या गरीब स्त्रियांना धंदाव्यवसायाचे औपचारिक अभ्यासक्रमाद्वारे शिक्षण देणारी देशातील पहिली रूरल बिझिनेस स्कूल त्यांनी सुरू केली. दुर्गम खेड्यातील स्त्रियांना या उपक्रमाचा फायदा मिळावा म्हणून हे शिक्षण देणारी सक्षम अशी बस मुद्दाम या गावात जाते. छोट्या छोट्या शेतकऱ्यांनाही सर्वांगीण माहिती व ज्ञान मिळावे म्हणून वेगवेगळी प्रशिक्षणे आयोजित केली. मुलींच्या शिक्षणाकरता शिष्यवृत्ती व कमी व्याजदराने कर्जाची व्यवस्था केली. बायकांना त्यांचे कायदेशीर हक्क मिळावेत व काही योग्य कायदे त्यांच्या बाजूने करण्यासाठी माणदेशी फौंडेशन सतर्क असते. आसपासच्या ग्रामस्थांना उपयोगी ठरेल अशी माहिती प्रसारण करण्याकरता त्यांनी आकाशवाणी केंद्राचीही स्थापना केली आहे.*

---

माणदेशी महिला सहकारी बँक ही स्त्रियांनी स्त्रियांकरता चालवलेली सहकारी बँक आहे. बँकेची स्थापना १९९७ साली सातारा जिल्ह्यातील म्हसवड या ग्रामीण भागातील गावात झाली. या बँकेची स्थापना भाजी व फळ विक्रेते, छोटे दूध विक्रेते, अगदी लहान शेतकरी, जुजबी कलाकुसरीच्या वस्तू विकणारे फुटकळ विक्रेते, कुटिरोद्योग, रोजंदारीवर काम करणारे मजूर व तत्सम वर्गातील गरीब फेरीवाले वगैरे मंडळींकरता झाली. त्यांना ग्राहक म्हणून स्वीकारताना बायकांचा अशिक्षितपणा व जातपात यांसारख्या बाबींना अजिबात थारा नसतो. रोजंदारीवर काम करणारे मजूर व तत्सम वर्गातील गरीबही बँकेला वर्ज्य नाहीत. अनेकदा सहकारी पतसंस्था, सहकारी बँकांमध्ये जातपात, राजकीय कल, गटबाजी इत्यादींचा पगडा दिसून येतो. सुरूवातीपासूनच बँक अशा बाबींपासून जाणीवपूर्वक दूर राहिलेली आहे.



इथल्या अशिक्षित ग्रामीण महिलांना बँकिंग उपक्रमाचा परवाना मिळण्यासाठी रिझर्व बँकेशी मोठा संघर्ष करावा लागला. आजमितीला बँक आसपासच्या जिल्ह्यांमध्ये शाखांच्या माध्यमातून कार्यरत आहे. बँकेच्या स्थापनेपासून २०१० सालापर्यंत बँकेच्या ग्राहकांची संख्या १२ पटींनी वाढून ती एक लाख सत्तावीस हजार झाली. दरम्यान गोळा केलेल्या ठेवी वाढल्या व कर्जवाटपाचा आकडाही तितकाच वाढला. कर्जाच्या परतफेडीचा दर आश्चर्याने तोंडात बोटे घालावीत असाच उच्च आहे. बँकेचे कामकाज कसे उत्तम रीतीने चालले आहे यावर प्रकाश टाकणारा हा एक महत्त्वाचा निकष आहे. खास म्हणजे समाजाच्या अत्यंत खालच्या स्तरावरील लोकांना कर्जवाटप करूनही दृष्ट लागावी इतकी उत्तम कर्जवसुली असणे ही अतिशय स्पृहणीय गोष्ट आहे. देशातील मोठमोठ्या दिग्गज राष्ट्रीयीकृत बँकांनीही हेवा करावा अशीच ही बाब आहे. पहिली दोन तीन वर्षे सोडता २००१ पासून बँक सातत्याने नफा कमवीत आहे. त्यामुळे दारिद्र्यपीडित ग्राहकाबरोबर व्यवहार करणे म्हणजे कायम आतबट्ट्याचा व्यवहार असा स्वत:च स्वत:चा समज करून घेणाऱ्या राष्ट्रीयीकृत बँकांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले गेले आहे.

या भागातील अनेक प्रकारच्या अडचणींमुळे (मुख्यत: आर्थिक व सामाजिक) ही बँक सुरू झाली. आजूबाजूच्या भागात पाऊस ५ इंच इतका कमी पडतो. त्यामुळे शेतीची परिस्थिती तोळामासाच. अनेकजण कामाच्या शोधात शहरांत स्थलांतर करतात. शालांत परीक्षा पूर्ण व्हायच्या आधीच ५० टक्के विद्यार्थी शाळा सोडून नोकरीच्या शोधार्थ फिरतात – खास करून सेवाक्षेत्रामध्ये.

बँकेचे बहुतेक ग्राहक निरक्षर/ अशिक्षित आहेत. त्यांना न बँक काय करते ते कळते न बँकेशी कसे व्यवहार करावेत ते कळते. त्यामुळे बँकेचा अर्थ काय, तिचे काम काय, आपण तिच्याकडून काय अपेक्षा ठेवाव्यात, ती आपल्याला काय व कशी मदत करू शकते इत्यादीबद्दलची योग्य माहिती, जुजबी का होईना, त्यांना असणे गरजेचे आहे हे ओळखून बँकेने ग्राहकांकरता वित्तीय प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले. विस्तृत प्रमाणावर घेतलेल्या या उपक्रमाचा फायदा ११००० स्त्रियांनी घेतला. त्याचा अपेक्षित परिणाम बँकेला निश्चितच जाणवला. बँकेने केलेल्या एका अभ्यासानुसार प्रशिक्षित ग्राहक, त्यांची समज व व्यवहाराची पद्धत अप्रशिक्षित ग्राहकांपेक्षा पुष्कळच वेगळी होती. त्यांच्या व्यवहाराची रक्कमही जास्त होती, तसेच केलेल्या व्यवहारांची संख्याही. आणि

अर्थातच बँकेमुळे मिळालेला फायदाही. या यशामुळे प्रोत्साहित झालेल्या बँकेने आणखी एक विस्तृत कार्यक्रम आखला आहे, ज्यात विमा, भविष्यनिर्वाह निधी, बचतीचे तसेच कर्जाचे व्यवस्थापन, कर्जाच्या वाटाघाटी इत्यादींचा समावेश आहे.

आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय पातळीवर चेतनाताईंना व माणदेशी समूहाला अनेक सन्मान, पारितोषिके, बक्षिसांनी गौरवले गेले आहे. अर्थात असे सन्मान वाट्याला आले नसते तरच नवल. सामाजिक कामात राबवलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची आणि कल्पनांची त्यात खास नोंद घेतलेली असते. हजारो स्त्रियांच्या जीवनात प्रकाश पसरवणाऱ्या या यज्ञकुंडाची अमेरिकेतील हार्वर्ड, येल यांसारख्या नामवंत विश्वविद्यालयांनी मुद्दाम दखल घेणे तर स्पृहणीयच. मायक्रोफायनान्स क्षेत्रातील उत्कृष्ट व्यवस्थापकीय प्रक्रियेचे कौतुक करणारी आंतरराष्ट्रीय पातळीवरची पारितोषिके म्हणजे मोठाच मानाचा तुरा. सर्वसाधारणपणे इतर सहकारी क्षेत्रातील बँकांच्या पार्श्वभूमीवर खास उठून दिसणारा.

बँकेने भाजी व दूध यांची किरकोळ विक्री करणाऱ्या, दोन मुले असलेल्या विधवेला म्हैस विकत घ्यायला छोटेसे कर्ज देऊन सावकारापासून मुक्ती मिळवून दिली. आता ती दिवसाकाठी थोडी बचत करते. किराणा दुकानाची पोलिओग्रस्त मालकीण पालकांची देखभाल करून भावाचे शिक्षणही करते. शेतमजूर म्हणून काम करणारी एक स्त्री आज यशस्वी भाजी विक्रेती आहे. दारूड्या नवऱ्यापासून व शिवीगाळ करणाऱ्या सासऱ्यापासून मुक्तता मिळवून शिवणकामाद्वारे आठ हजार रूपये महिना मिळवून मुलीचा सर्व खर्च पेलणारी एक पीडित स्त्री...ही प्रातिनिधिक उदाहरणे आहेत दारिद्र्यपीडित वर्गातील हजारो स्त्रियांची, ज्यांना माणदेशी महिला सहकारी बँकेने आर्थिक खाईतून बाहेर खेचून विकासाच्या प्रगतीपथावर आणले आहे. चेतनाताई म्हणतात,'आमच्या प्रत्येक यशस्वी स्त्रीमुळे इतर जणींना प्रोत्साहन मिळते. त्यांना नाविन्यपूर्ण कामाकरता उत्तेजन मिळते.'

चेतनाताई जन्मल्या मुंबईत एका मध्यमवर्गीय व्यापारी कुटुंबात. कुटुंबातील जुन्या रीतीभाती व विचारांचा पगडा यांविरूद्ध जाऊन त्यांनी अर्थशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण मिळवले. प्रगतीशील शेतकरी व चळवळीतील मोठे कार्यकर्ते श्री. विजय सिन्हा यांच्याबरोबर विवाह झाल्यानंतर त्या ग्रामीण भागात राहायला आल्या. तिथेच त्यांची दारिद्र्यग्रस्त महिलांना तोंड द्याव्या लागणाऱ्या अडचणींशी प्रत्यक्ष ओळख झाली. त्यांना आढळले की कुटुंबाच्या



उत्पन्नाचा बराचसा भाग त्या कमाई करून आणत असल्या तरी त्यांच्याकडे व्यावसायिक दृष्टीने कोणी पाहात नसे. त्यांच्याकडे न मालमत्ता होती न जमीनजुमला. त्यांच्याकडे न सामाजिक प्राबल्य होते न राजकीय. कुटुंबातील पैसा न त्यांच्यापर्यंत पोचत असे न त्यांना होते खर्चाच्या निर्णयात काही मत. पूर्वी जरी पशुधन हाताळण्याची कला त्यांना अवगत होती तरी त्याकडे दुर्लक्ष करून त्यांच्यातील बहुतेक जणी रोजंदारीवर मजूर म्हणून काम करीत होत्या. त्या अशिक्षित असल्यामुळे त्यांच्या हातात राहणारी थोडीफार शिल्लक रक्कम त्या सावकाराकडे बचत म्हणून ठेवत असत. याचा तो पुरेपूर गैरफायदा घेत असे हे वेगळे सांगणे नकोच.

चेतनाताईंनी सुरूवात केली २५ धनगर महिलांच्या समूहापासून. त्यांनी प्रत्येक आठवड्याला बचत सुरू केली आणि एकत्र जाऊन बाजारातून एक मेंढी विकत आणली. अशा प्रकारचे स्वयंसहायता गट त्यांनी स्थापन केले व बाजाराधिष्ठित विक्री व्यवस्थेशी संबंध प्रस्थापित करण्यास या गटांना उत्तेजन देऊन सहाय्य केले.

ग्रामीण भागातील या गरीब बायकांच्या हातात जर घरातील पैशांचे व मालमत्तेचे नियंत्रण असेल तर मुलांची निकोप वाढ, त्यांचे शिक्षण, कुटुंबाचा आहार, कुटुंबाचे आरोग्य वगैरे आवश्यक बाबींवर जास्त खर्च होतो. विकास कामात लक्ष घातलेल्या कार्यकर्त्यांचे हे निरीक्षण जगन्मान्य आहे. अनेकदा ग्रामीण पुरूषांच्या हातातील पैसा व मालमत्ता स्वत:च्या चैनीकरता (दारू, जुगार वगैरे) खर्च होताना दिसून येते. त्यामुळे कुटुंबाच्या आवश्यक गरजांकरता पैसे कमी पडतात. पुरूषी अहंमन्यता व मनमानी ग्रामीण स्त्रीला व तिच्या मुलांना फार महाग पडते. याला छेद देण्याची किती आवश्यकता आहे हे सांगायला नकोच.

बँकेने या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकायचे ठरवले. कर्ज मिळवण्याकरता किंवा इतरही काही कारणांनी फक्त स्वत:च्या मर्जीनुसारच घर किंवा मालमत्तेची विल्हेवाट लावण्याच्या तसेच बायकोला हवे तेव्हा घराबाहेर हाकलण्याच्या उन्मत्त पुरूषी हडेलहप्पीला आळा घालण्यासाठी चेतनाताईंनी पुढाकार घेतला. सरकार दरबारी तर त्या गेल्याच पण बरोबरीने आपल्या बँकेच्या नियमावलीत पूरक असा बदल केला. याबद्दलची माहिती देण्यासाठी बँकेने काही विशेष केंद्रे स्थापन केलेली आहेत. चेतनाताई म्हणतात, 'आम्ही दोन बाबतीत निश्चित सकारात्मक बदल घडवून आणला आहे. एक मुलींचे व स्त्रीवर्गाचे शिक्षण आणि

दोन, त्यांच्या मूलभूत हक्कांबद्दलची त्यांची जाणीव. एकदा का बायका आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र झाल्या की त्या सक्षम होऊन निर्णय घेण्याची शक्ती त्यांच्यात येते.' मुलींच्या शिक्षणात आर्थिक अडचणींमुळे खंड पडू नये म्हणून बँकेने कमी व्याजदराने कर्जाची सोय उपलब्ध करून दिलेली आहे. अनेकजणींना त्याचा फायदा झालेला आहे. ज्या मुलींची परिस्थिती जास्तच दोलायमान असते त्यांच्याकरता बँकेने खास शिष्यवृत्तीचीही व्यवस्था केलेली आहे. आजूबाजूच्या गावातील पालक सातवीनंतर मुलीचे शिक्षण बंद करू लागतात असे बँकेला आढळले. त्यामागील कारण होते शाळेत जाणे येणे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था खराब, सायकल परवडत नाही, पायी चालून जाणे शक्य नाही.

स्थानिक गरजेच्या विविध बाजू लक्षात घेऊन त्यांना प्रतिसाद देणाऱ्या, अपारंपरिक स्वरूपाच्या वेगळ्या कर्जयोजना आखणे व त्या अंमलात आणणे ही तर बँकेची खासियत. अगदी मोठमोठ्या बँकांनी त्यापासून धडा शिकावा इतकी 'हटके'. शाळकरी मुलींची नड लक्षात घेऊन सायकली विकत घेण्यासाठी शून्य व्याजदराने कर्जपुरवठा करणे बँकेने सुरू केले. परिणाम म्हणजे आसपासच्या गावातील अडीच हजार विद्यार्थिनींना शिक्षण पुढे सुरू ठेवता आले. ज्या मुलींना कर्ज घेणे जड आहे त्यांना (याकरता खास तयार केलेल्या फंडातून) देणगीच्या स्वरूपात सायकल वाटप होते. स्त्रीजातीच्या प्रगतीकरता शिक्षणाद्वारे उन्नतीचे योगदान देणे या दृष्टीने ही बाब केवढी मोठी. गरीबांच्या साध्या साध्या गोष्टींची व अडचणींची नोंद घेवून बँक कशी मदत करते याचे हे उदाहरण बोलके आहे.

रस्त्यावर बसून फुटकळ विक्री करणाऱ्यांना रणरणते ऊन, सोसाट्याचा वारा, पावसाच्या सरी वगैरेंचा सामना करावा लागतो. अशा वेळी धंदा करणे अशक्य होऊन बसते. शिवाय अशा हवामानाचा तब्येतीवरही विपरीत परिणाम होतो. अशा विक्रेत्यांना बँकेने छत्र्यांकरता व्याजमुक्त कर्ज उपलब्ध करून दिले.

स्त्रियांचे भवितव्य सुरक्षित करण्याकरता बँकेने विमा योजना, भविष्य निर्वाह योजना असे उपक्रम कार्यान्वित केले आहेत. स्त्रियांच्या सबलीकरणाच्या दृष्टीने या गोष्टी किती महत्त्वपूर्ण आहेत ते सांगणे नकोच.

नुसत्या बँकिंग सेवासुविधा व कर्ज उपलब्ध करून देऊन उद्दिष्ट साध्य होईल या भ्रमात चेतनाताई कधीच नव्हत्या. या सुविधा व कर्जे सुयोग्यपणे वापरून त्यांचा यथायोग्य फायदा मिळण्याकरता इतर अनेक पूरक गोष्टींचा आधार आवश्यक असतो. तसेच त्यांचा या बायकांच्या दैनंदिन व्यवसायाशी व



जीवनांशी समन्वय नीटपणे साधणेही तितकेच गरजेचे. हे ओळखून त्यांनी १९९४ मध्ये माणदेशी फौंडेशनची स्थापना केली. स्वयंसेवी संस्थेच्या धर्तीवर काम करणाऱ्या या फौंडेशनचे काम म्हणजे माणदेशी बँकेच्या सेवांशी सांगड घालत ग्राहकांना उपयोगी ठरतील अशा बिगर वित्तीय स्वरूपाच्या सेवा पुरवणे.

माणदेशी फौंडेशनने निरक्षर वा शाळा सोडलेल्या पण व्यवसाय सुरू करणाऱ्या / वाढवणाऱ्या स्त्रियांकरता पैसे व व्यवसायसंबंधित व्यवस्थापकीय पैलूंचे औपचारिक शिक्षण देण्यासाठी ग्रामीण व्यवसाय शाळा (रूरल बिझिनेस स्कूल) सुरू केली. हा देशातील या प्रकारचा पहिलाच आगळा उपक्रम आहे.

फौंडेशनचा आणखी एक अनोखा उपक्रम म्हणजे सार्वजनिक आकाशवाणी केंद्राची स्थापना. हे केंद्र जरी फौंडेशनच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असले तरी त्याची मालकी म्हसवड व बाजूच्या परिसरातील समाजाची आहे. या भागातील स्थानिक, नागरी, सामाजिक व सांस्कृतिक जीवन अधिक समृद्ध करणारे कार्यक्रम सादर करण्यावर केंद्र भर देते. सर्वसाधारणपणे केंद्राच्या कार्यक्रमांची वर्गवारी म्हणजे तीन क्षेत्रे – शिक्षण, माहिती व मनोरंजन. एक वानगी म्हणून नजर टाकायची तर आकाशवाणीवर आढळून येणारे काही विषय म्हणजे शेतकऱ्यांकरता कार्यक्षम सहकारी संस्था कशी बांधायची, घरच्या घरीच प्रथमोपचाराची साधने कशी जमवायची, मुलांकरता जीवनसत्त्वे कशातून मिळवायची व ती किती द्यायची, हिरव्या पातळ भाज्या व इतर सकस अन्नाची गरज, स्त्रियांचा मालमत्तेतील वाटा तसेच वारसा हक्क, तरूणांच्या दृष्टीकोनाचे व विचारांचे आकलन, मायक्रोफायनान्स, खेळांबद्दल माहिती वगैरे. केंद्रातील जास्तीत जास्त कर्मचारी स्थानिक असतात तसेच स्वयंसेवकांच्या चमूलाही उत्तेजन दिले जाते. बहुतेक कार्यक्रमांचे स्वरूप साचेबद्ध व औपचारिक न ठेवता आखीव पण अनौपचारिक वार्तालापाचे/ संवादाचे असते.

२०१० साली माणदेशी फौंडेशनने 'चँपियन ऑफ स्पोर्टस्' हा उपक्रम सुमारे दहा ते सोळा वयोगटातील मुलांकरता सुरू केला. आजचे महागडे खेळ व त्याकरता लागणाऱ्या सुविधा ग्रामीण भागातील गरीब मुलांच्या आवाक्याबाहेरच्या असतात. या कार्यक्रमाअंतर्गत मुलांना क्रिकेट, फुटबॉल, बॅडमिंटन, व्हॉलीबॉल, धावणे, उंच उडी वगैरे खेळांकरता लागणारी मैदाने व इतर संबंधित सुविधा दिल्या जातात. ते शिकवणाऱ्या शिक्षकांची सोय, खेळांना लागणारे साहित्य, गावातून तसेच जवळच्या भागातून मुलांना जाण्यायेण्याकरता

वाहतुकीची बस, खेळाचे बूट, खेळाचा गणवेश, त्यांची नियमित प्राथमिक वैद्यकीय तपासणी, सकस खाणे पिणे (फळे, गूळ वगैरे) इत्यादींची सर्व सोय फौंडेशनतर्फे मोफत केली जाते. यामुळे मुलांना खेळीमेळीच्या वातावरणात मित्रमंडळींबरोबर आपापल्या आवडीच्या खेळात रस घेऊन प्रगती तर करता येतेच पण मनाला मोठा आनंदही मिळतो. त्यांची शारीरिक क्षमताही वाढीस लागते. संघभावनेचे महत्त्व कळून ती वाढीस लागते. शिस्त व नियमांबद्दल आदर निर्माण होतो. स्पर्धात्मक अशी निकोप चुरस वाढीस लागते. उद्दिष्ट गाठण्याकरता संघर्ष करणे, पराभव स्वीकारणे व तो पचवणे वगैरे गोष्टींची आपोआप सवय होऊ लागते. एक चांगला माणूस बनण्याकरता या बाबी महत्त्वपूर्ण असतात हे अधोरेखित करण्याची गरज नाही. खेळाच्या माध्यमातून हे साधण्याचा अगदी जाणीवपूर्वक व कसोशीने प्रयत्न करणे हे फौंडेशनच्या प्रगल्भ विचारसरणीचे द्योतक नव्हे काय?

फौंडेशन केवळ माणदेशी बँकेलाच आधारभूत ठरतील अशा गोष्टींपुरते आपले काम मर्यादित ठेवत नाही तर विविध स्तरावरील गरीबांच्या प्रगतीला मोलाचा हातभार लावण्याचे कामही व्यापक दृष्टी ठेवून करते. माणदेशी गटाच्या एकूणच सर्व संस्था ग्रामीण भागातील गरीबांच्या वेगवेगळ्या आवश्यकतांकडे लक्ष पुरवण्यात खास रस घेतात. त्यांचे ३० टक्के ग्राहक शेतकरी आहेत. त्यांना सरकारच्या सहकार्याने एकत्र आणून तंत्रज्ञान व बाजारव्यवस्थेच्या संपर्कात आणले आहे. महिलांच्या वस्तूंची विक्रीकरता प्रदर्शने भरवतात. शेतीविषयक विषयांची चर्चा करण्याकरता वार्षिक सभा संघटित करण्यात येतात. शेतातील उपज वाढवण्याकरता काही प्रकल्पही राबवण्यात येतात. जमीन, मातीची चाचणी व कंपोस्ट खते तयार करणे या सेवाही फौंडेशन देते. त्याकरता प्रशिक्षणही देते.

जनावरे हीच फक्त अनेक बायकांची मालमत्ता असते. त्यांची देखभाल करण्याकरता प्रशिक्षणाची सत्रेही भरवली जातात. बारा दुग्ध सहकारी सोसायट्या तेथे कार्यरत आहेत. स्वयंसहायता बचत गटांचे संघटन (फेडरेशन) त्यांना प्रशिक्षण देते. आजमितीला ही बारा दुग्धालये दिवसाला ५००० लिटर दूध विकतात. रेशीम तयार करण्याचे प्रशिक्षणही माणदेशी उद्योगिनीतर्फे सुरू करण्यात आले आहे. संबंधित सरकारी खात्याकडून रेशीम उत्पादनाकरता असलेल्या योजनांबद्दल माहिती मिळवून पुढचे नियोजन सुरू आहे. स्वयंसेवी गटाच्या बायकांकरता आरोग्यशिक्षण कार्यक्रम संघटित केला जातो तसेच तरूण मंडळींकरता एड्ससंबंधी माहिती शिबिर भरवले जाते. फौंडेशनचा शेतकऱ्यांकरता खास स्थापन केलेला कक्ष शेतीचे नियोजन व व्यवस्थापन यांसाठी फार उपयोगी ठरतो. मिळणाऱ्या माहितीबरोबरच शेतकऱ्यांच्या भेटीगाठींचे ते एक उपयुक्त व आवडीचे ठिकाण समजले जाते. दोन हजार सहा साली हा कक्ष सुरू झाला व आणखी एक कक्ष उघडायची तयारी सुरू आहे.

पारितोषिके, मान सन्मान, पुरस्कार यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवल्या गेलेल्या माणदेशी फौंडेशनने तंत्रज्ञानाच्या वापराबाबतही मोठी आघाडी घेतली आहे. माहिती तंत्रज्ञानाचा वापर करताना काळाची पावले ओळखून बँक आगेकूच करीत आहे व सहकारी क्षेत्रातील इतर अनेक बँकांपेक्षा खूपच पुढे आहे. ग्रामीण विकासाची नस बरोबर ओळखण्यापासून तंत्रज्ञानाची कास धरून भविष्याची वाटचाल करू पाहणाऱ्या या बँकेचा आता विचार आहे शहरी भागातील छोटे विक्रेते व स्थलांतरग्रासित मजूरवर्गाचा वेध घेण्याचा.

❀❀

# श्रीमती श्वेता गोपालचारी-‘टॉय बँक’

*बालकांना अगदी स्वर्गीय आनंद देणारी गोष्ट म्हणजे स्वत:चे आवडते असे एखादे खेळणे. किती हर्षभरित असतात ती त्या खेळण्याशी तन्मयतेने रमताना. पण हे अतुलनीय सुख यायचे कुठून निराधार, निराश्रित, दारिद्र्यग्रस्त अशा बापड्या बालकांच्या वाट्याला? कसा लुटायचा त्यांनी हा बालपणाचा अमूल्य ठेवा? यावर मार्ग काढायचा स्तुत्य प्रयत्न करीत आहेत श्रीमती श्वेता गोपालचारी व जिबी थॉमस  त्यांच्या ‘टॉय बँक’ च्या माध्यमातून. तुमच्या आमच्या सारख्यांच्या घरातून जुनी, न वापरातली, अडगळीत पडलेली वगैरे प्रकारची खेळणी त्यांची टॉय बँक गोळा करते. ती व्यवस्थित करून, आकर्षकपणे वेष्टनात गुंडाळून मग त्यांचे अगदी कंगाल वर्गातील बालकांमध्ये वाटप करते. मुळात ही कल्पनाच इतकी नाविन्यपूर्ण व सर्जनशील आहे की  लोकांना ती फारच आवडली. भराभर स्वयंसेवक पुढे आले. अनेक स्वयंसेवी संस्था या बालकांच्या शिक्षण, निवास, खाणे-पिणे, शिष्यवृत्त्या वगैरे गोष्टींकडे लक्ष पुरवतात. ‘टॉय बँक’ आगळी वेगळी ठरते ते या बालकांच्या अगदी अनोख्या गरजेकडे मोर्चा वळवल्यामुळे.*

बरेचदा आपल्या घरी जुनी, वापरात नसलेली खेळणी एखाद्या खोक्यात वगैरे गुंडाळून अडगळीच्या सामानात ठेवलेली असतात. ती घरात जतन करण्यामागे काही रास्त कारण असतेच असे नाही. बरेचदा ‘पडू देत नं, ती काय खायला मागतात का?’ किंवा ‘आलं कोणी लहान मूल  बाहेरून पाहुणा म्हणून तर त्याला खेळायला काय द्यायचं? मग तेव्हा ही काढता येतात, बरी पडतात त्यावेळी’ अशा आपल्या मनातील समजुतींमुळे आपण अनेकदा अशी जुनी खेळणी घरात बाळगून असतो व ती खेळणी तशीच पडून राहतात.

तसेच आठवते का, लहानपणी जेव्हा आपण खेळण्यांशी मजेत खेळायचो, तेव्हा त्यातील काही तर खास आवडीची असायची आणि अर्थातच आपली त्यांच्यावर खास मर्जी असायची. काही वेळा तर ती प्राणांहूनही प्रिय असायची. इतकी, की तारूण्यात पदार्पण केल्यानंतरही ती टाकून द्यायला मन होत नसायचे. अशी खेळणीही मग अडगळीत वास्तव्याला जातात. आपले बाल्य त्यांनी कसे रंगीत व मौजेचे केलेले असते ! आजही छोटे मूल खेळण्यांचा आनंद  घेत असताना पाहणे हे आल्हाददायकच असते. एखाद्या छोट्याला खेळणे बक्षीस दिल्यावर त्याच्या चेहऱ्यावरून ओसंडून जाणारा आनंद व उत्साह अवर्णनीय असतो.

कल्पना करा, की आपले बाल्य अशा प्रकारे समृद्ध करणारी खेळणी आपल्याला मिळाली नसती तर? नाही ना कल्पना करवत! नेमकी अशीच काहीशी अस्वस्थता, बोचरा सल अनुभवत आहेत देशातील लाखो कंगाल आणि निराधार बालके. खेळण्यांना वंचित राहिलेल्या या कमनशिबी जिवांच्या दु:खाव फुंकर घालण्याचे काम करत आहे ‘टॉय बँक’. लोकांकडील जुनी खेळणी गोळा करून ती मोफत वाटणारी ‘टॉय बँक’.

ज्या गरीब, कंगाल (ज्यांच्याकडे खेळणी नाहीत, ज्यांनी असे खेळणे अनुभवलेले नाही) अशा मुलांसाठी आपल्याकडील जुनी खेळणीही किती अनमोल असू शतात याचा विचार आपल्या मनात क्षणभर तरी येतो का? नेमक्या अशाच नको असलेल्या खेळण्यांच्या आधारावर उभी ठाकली आहे, ‘टॉय बँक’, लोकांकडून ठेवींऐवजी जुनी खेळणी गोळा करणारी. ही गोळा झालेली खेळणी मग पोचवली जातात गरजवंत, गरीब अशा दारिद्र्यपीडित मुलांकडे. हे सामाजिक कार्य करते एक स्वयंसेवी संस्था, जिचे नाव आहे ‘टॉय बँक’

टॉय बँक लोकांना आवाहन करते की आपल्या घरातील नको झालेली खेळणी अडगळीतून काढा, त्यांना वेष्टनात गुंडाळा आणि टॉय बँकेला द्या. मग पहा तुमच्या अंतर्मनाला कसे एक वेगळेच समाधान मिळते ते. जीवनात अनेक गोष्टींना वंचित राहिलेल्या दारिद्र्यपीडित मुलांना एक खेळणे भेट देऊन त्यांच्या बालमनाला एक वेगळी अशी उभारी मिळवून देण्याचे  सत्कार्य टॉय बँक गेली

सात-आठ वर्षे सातत्याने करीत आहे. टॉय बँक मान्य करते की भोवताली अठरा विश्वे दारिद्र्य आहे पण म्हणून काय दारिद्र्यातील मुलांनी खेळण्याविना बालपण घालवायचे? एका साध्या खेळण्यापासून मिळणाऱ्या अतुलनीय आनंदाला मुकायचे? या आनंदापासून वंचित असलेली मुले हजारोंच्या संख्येत आहेत व त्यातील काही आपल्या अवतीभवती वावरत असतात हे योग्य आहे का? आपल्या समाजाला भूषणावह आहे का?

ही पार्श्वभूमी आहे टॉय बँकेची. बँकेची मुख्य उद्दिष्ट आहेत :

१. वापरलेली खेळणी गोळा करून त्यांचे खालच्या स्तरातील मुलांत वाटप करणे.
२. खेळण्याच्या लायब्ररीद्वारे मुलांना साधन सामग्री उपलब्ध करणे.
३. खेळणे हा समाजातील सर्व बालकांचा मूलभूत हक्क आहे याची वाढती जाणीव समाजाला करून द्यायचा प्रयत्न करणे.

१५ ऑगस्ट २००४ रोजी ऐंशी हजारांच्या बीजभांडवलाने स्थापन झालेल्या टॉय बँकेची कल्पना आहे 'श्वेता गोपालचारी' या तरूण व उत्साही इलेक्ट्रॉनिक इंजिनियरची. नोकरीतून त्यांना अंतर्यामी मानसिक समाधान मिळू शकले नाही व हे काही खरे नाही असे त्यांना जाणवू लागले. त्यांच्या आणखी दोन मैत्रिणींनाही अशीच घुसमट जाणवत होती. यातून काय बरे मार्ग काढावा असे विचारमंथन चालू असताना त्यांना टॉय बँकेची कल्पना सुचली. श्वेताच्या मनाने घेतले की त्या दारिद्र्यपीडित मुलांच्या चेहऱ्यावर हसू आणतील व त्यांना खुशी उपभोगताना पाहतील. भारतातील आणि जगातील प्रत्येक गरीब मुलाच्या हातात एक स्वत:चे खेळणे असेल असे स्वप्न मनात ठेवून श्वेता यांनी टॉय बँकेची स्थापना केली, त्यावेळी त्यांचे वय होते अवघे २२ वर्षांचे. सुरूवातीला चार पाच वर्षे नोकरी आणि टॉय बँक दोन्ही त्यांनी सांभाळले. नंतर २००९ साली नोकरीचा राजीनामा देऊन संपूर्णपणे टॉय बँकेच्या कामाला वाहून घेतले. प्राध्यापक असलेल्या सुसंस्कृत आईचा संपूर्ण पाठिंबा त्यांना मिळाला.

श्वेता म्हणतात की या बँकेकडे जितकी खेळणी आपण ठेव म्हणून देता त्यापेक्षा कितीतरी पटींनी जास्त आनंद व समाधान परत मिळवता. श्वेता व त्यांच्या मैत्रिणींनी टॉयबँकेची सुरूवात केली ती मुंबईतील रस्त्यावरच्या मुलांपासून. मुळात 'आऊट ऑफ धिस वर्ल्ड' अशा या उपक्रमाने बालगोपालांच्या निरागस चेहऱ्यावर खुशीचा हास्यफुलोरा पेरण्याची कल्पनाच



लोकांना इतकी मनापासून आवडली की त्यांनी उत्स्फूर्तपणे भरभरून पाठिंबा दिला त्यांनी गोळा केलेल्या वापरलेल्या खेळण्यांचा पूरच टॉय बँकेवर धडका मारू लागला. पहिल्या महिन्यातच त्यांच्याकडे हजाराहून जास्त खेळणी जमा झाली. टॉय बँकेचे स्वयंसेवक प्रेमाने ही खेळणी भेटवस्तूकरता वापरायच्या वेष्टनात गुंडाळू लागले व दारिद्र्याने पिचलेल्या मुलांच्या हातात ती खेळणी विसावू लागली.

देशातील अनेक नामांकित संघटनांनी टॉय बँकेला सक्रिय साहाय्य दिलेले आहे. त्यात समावेश आहे टेक महिंद्रा, टी.सी. एस., पटनी, सीमेन्स, मोटरोला, आयबीएम, हेवलेट पॅकार्ड, ॲपटेक, एस.बी.आय. लाईफ, शॉपर्स स्टॉप सारख्या व्यापारी व उद्यम जगतातील दिग्गजांचा; आणि शैक्षणिक क्षेत्रातील दोन व्यवस्थापन विषयांच्या संस्था व एक सामाजिक विज्ञान संस्था यांचाही मुद्दाम उल्लेख करण्यासारखे म्हणजे एक्सेंचुअर या कंपनीच्या 'मुस्कान' या कर्मचारी संघटनेने पुढे केलेला मदतीचा हात.

अगदी सुरूवातीपासून आपण दानधर्माच्या भावनेपोटी हे काम करीत आहोत अशी भूमिका टॉय बँकेने कधीही घेतली नाही. मौजेत व आनंदात छान उपभोग घेत बाल्य जगणे हा मुलांचा अधिकार आहे, खेळण्यामुळे त्यांच्यात निर्माण होणाऱ्या जादुई आणि काल्पनिक जगतात रमणे हाही त्यांचा हक्क आहे. आपण फक्त या मुलांना त्यांचा हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहोत अशी नम्र भावना बँकेने प्रथमपासून ठेवली आहे. १३ नोव्हेंबर २००४ रोजी १४ स्वयंसेवकांच्या मदतीने खेळणी वाटपाचा श्रीगणेशा मुंबईत तीन ठिकाणी झाला. त्यावेळी ५०० मुलांना प्रत्येकी एक खेळणे भेट म्हणून दिले गेले. हे काम झाडूवाल्यांच्या समुदायात तसेच रस्त्यावरील मुलांकरता काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून करण्यात आले. गेल्या सात-आठ वर्षांत एकूण १०,००० हून जास्त बालकांना टॉय बँकेने खेळणी पुरवली आहेत. आज एकट्या मुंबईत टॉय बँकेची अठरा वितरण केंद्रे आहेत. आता तिचे कार्यक्षेत्र बंगळुरू, पुणे, दिल्ली, भूतान आणि लंडनपर्यंत पोचले आहे. टॉय बँकेचा आठ जणांचा मूळचा गट आज स्वयंसेवकांच्या मोठ्या साखळीच्या माध्यमातून काम करीत आहे. हे संस्थेच्या वाढत्या कारभाराचे द्योतक आहे.

अशा वंचित मुलांची मने त्यांना दिलेल्या खेळण्यांशी इतकी एकरूप, तन्मय, समरस होऊन जातात की तो एक वर्णनातीत अनुभव असतो. एक सहा

वर्षांची बालिका स्वत:ला मिळालेल्या भातुकलीच्या खेळातील ताटलीतून बहिणीला जेवायला द्यावे म्हणून आईकडे आग्रह धरते. दोन मुले एकमेकांना मिळालेल्या मोटारींची अटीतटीची शर्यत लावतात व तन मन धन अर्पिल्यासारखे आपली मोटार पुढे नेण्याचा प्रयत्न करतात. एक मुलगी स्वत:ला मिळालेल्या फळांचा संच अगदी तोऱ्यात सगळ्यांना दाखवित हिंडत असते. अनेक मुले रात्री आपले खेळणे सोबत घेऊन त्याला हातात पकडून झोपतात. अशा परम आनंदाच्या क्षणात मुलांना तल्लीन झालेले पाहताना त्यांच्या आईवडिलांचे डोळे पाणावतात व त्यांच्याबरोबरच टॉय बँकेच्या स्वयंसेवकांनाही भरून येते.

एक अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे खेळणी वाटून झाली की आपले काम संपले असे टॉय बँक मानत नाही. मुलांच्या मानसिकतेवर त्याचा काय परिणाम होत आहे यावर बारीक लक्ष ठेवणारा मागोवा श्वेता घेतात, हे पाऊल वेगवेगळ्या दृष्टीने किती उपयुक्त आहे हे निराळे सांगायला नकोच. अशा आढाव्यात त्यांना मदत करतो त्यांचा स्वयंसेवकांचा चमू. स्वयंसेवकांचे महत्त्व ओळखून त्यांना प्रोत्साहित करण्याकरता प्रत्येक महिन्याला बँकेकडून त्या महिन्याचा सर्वोत्तम स्वयंसेवक निवडला जातो.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांच्या मृत्यूपूर्वीच्या रात्री रॉबर्ट फ्रॉस्ट या सुप्रसिद्ध कवीच्या चार ओळी आपल्या टेबलावर लिहून ठेवल्या होत्या, त्यातील शेवटची ओळ होती, '... अँड माईल्स टू गो बिफोर आय स्लीप'. टॉय बँकेने त्यात थोडासा बदल करून म्हटले आहे की, 'मेनी स्माईल्स टू गिव्ह बिफोर वी स्लीप'.

खेळण्यामुळे मुलांच्या मानसिकतेवर मोठा परिणाम होतो,तिला घडवण्याचे व योग्य आकार देण्याचे काम करतात ही खेळणी. म्हणून मुलांमध्ये वाटपाकरता खेळणी स्वीकारताना ती नैतिक दृष्ट्या योग्य अशी आहेत हे टॉय बँक पाहते.

आक्रमकतेला वाव देणारी बंदूक, तलवार वगैरे खेळणी बँकेने आपल्या यादीतून बाद केलेली आहेत. मोडक्या, तुटक्या तसेच फुटक्या खेळण्यांना बँक देणगी म्हणून स्वीकारत नाही. त्यांचे वाटप तर दूरच. बार्बीसारख्या बाहुल्यांनाही बँक हात लावत नाही. कारण खेळण्यातदेखील मुलामुलींमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव करणे बँकेला मान्य नाही. स्वयंसेवक खेळणी गोळा करून बँकेच्या दादर येथील गोदामात आणतात. तिथे ती नीटपणे धुतली जातात. आवश्यक ती डागडुजी केली जाते. वयोगटाप्रमाणे त्यांचे वर्गीकरण केले जाते.



मग त्यांना भेट-वेष्टनात नीट गुंडाळून नंतर ती मुलांना वाटप करायला तयार होतात.

टॉय बँक आता एक स्वत:चा वेगळा अभ्यासक्रम तयार करण्याच्या मार्गावर आहे. कला, नाच, नकला, शिवण वगैरे गोष्टींबरोबरच धंदा/व्यवसाय करण्याचे नियोजन, खुब्या, खाचखळगे वगैरेवर भर देऊन यशस्वी व्यवसाय करण्याचे शिक्षण त्याद्वारे दारिद्र्यपीडित मुलांना त्यांना समजेल अशा प्रकारे देण्याचा बँकेचा विचार आहे. बँकेला मान्य आहे की तिच्या मुख्य उद्दिष्टांच्या कक्षेबाहेरचे हे काम आहे. पण या मुलांचे भविष्य आनंदी घडवण्याकरता ते फार महत्त्वाचे आहे. या बालकांच्या आनंदाशी व खुशीशी बँकेचा प्रत्यक्ष संबंध असल्यामुळे या बालकांना भविष्यातही आनंद मिळावा म्हणून हे पाऊल उचलायचे बँकेने पूर्ण विचारांती ठरवलेले आहे.

कमालीच्या दारिद्र्यामुळे ही मुले भेट मिळालेली खेळणी रस्त्यावरच्या वाहतूक थांब्यावर किंवा इतर सोयीस्कर ठिकाणी विकणार नाहीत याची खात्री काय? तसे झाले तर सारेच मुसळ केरात जाईल. टॉय बँकेचा मूळ हेतूच पूर्णपणे ओमफ्स होईल. असे प्रकार घडू नयेत म्हणून खेळांचे आयोजन केले जाते व त्यात भाग घेतला म्हणून खेळणे बक्षिस दिले जाते. त्याद्वारे ते खेळणे मुलाच्या व्यक्तिगत यशाचे द्योतक बनते. त्याचा त्याग करणे त्याला पसंत पडूच शकत नाही.

अत्यंत गरीब स्थितीतील मुलांच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेबद्दल टॉय बँक म्हणते 'या विकास कार्यात काम करणारे आपण सर्वजण म्हणजे मोठ्या जिग सॉ कोड्याचे वेगवेगळे तुकडे आहोत. त्यापैकी काही रोटी, कपडे, शिक्षण वगैरे मूलभूत गरजांकडे लक्ष पुरवतात तर आमच्यासारखे काही जण खेळण्यांच्या माध्यमातून त्यांच्या आयुष्यात आनंदाचे शिडकावे करतात. ज्या दिवशी हे सगळे तुकडे सुसूत्रपणे एकत्र येऊन चित्र पाहिजे तसे स्वच्छ व स्पष्ट होईल तेव्हा बहुतेक टॉय बँकेची गरजच उरणार नाही.'

ग्रामीण भागातील गरीब, अनाथ मुलांपर्यंत पोहोचणे हे टॉय बँकेचे भविष्यातील एक फार मोठे आव्हान आहे. ग्रामीण भागात अशा उपक्रमांची गरज आहे हे निर्विवाद. त्याचा आवाका नुसताच आकाराने अवाढव्य नाही तर तितकाच तो क्लिष्ट व गुंतागुंतीचा आहे. अगदी सुरूवातीपासून योजनाबद्ध कार्यक्रम तयार करणे त्याकरता अपरिहार्य आहे. त्याची अंमलबजावणी करतानाही काही विशेष बाबींकडे खास लक्ष पुरवावे लागेल. ग्रामीण भागातील अशा मुलांकरता काम करणाऱ्या संस्था किती? त्यांची असे काम करण्याची

तयारी तसेच कुवत आहे का? या कामाकरता लागणारे योग्य मनुष्यबळ त्यांच्याकडे उपलब्ध आहे का? तिथे काम करण्याकरता आवश्यक अशी स्वयंसेवकांची फळी उभी करावी लागणार का व तसे करणे शक्य आहे का? त्यांची मानसिक जडणघडण या कामाला पूरक ठरेल अशी असेल का?, इत्यादी.

तिथल्या मुलांचे खेळ व खेळणीही वेगळ्या प्रकारची असतील, त्यांना शहरी मुलांची  खेळणी कितपत आवडतील? त्यांच्या मनात शिरून व आपलेसे करून खेळणी वाटप करणे याकरता काही विशेष व वेगळे प्रयत्न करावे लागतील का? ते कोणते व कसे करायचे? या मुलांच्या दारिद्र्यपीडित, अशिक्षित आईवडिलांचा विश्वास कसा संपादन करायचा? त्याकरता तेथील समाजजीवनाची ओळख करून घ्यावी लागेल. गावातील प्रगतीशील व आदरणीय व्यक्तिमत्त्वे हेरून त्यांचे सहकार्य मिळवावे लागेल. गावातील लोक कोणत्या प्रकारची खेळणी देणगी म्हणून देऊ शकतील, त्यांची संख्या किती? ही आणि अशा प्रकारची वेगवेगळी आव्हाने व प्रश्न पुढे उभे ठाकतील. कदाचित बँकेला परिचित असलेल्या शहरांच्या जवळ असलेल्या ग्रामीण भागापासून याची सुरूवात करणे सोयीस्कर ठरू शकेल. त्या अनुभवावरून मग पुढील पाऊल टाकणे सुकर होऊ शकेल. बँकेचा हुबळी शहराजवळच्या खेड्यातील केलेल्या कामाचा अनुभवही या बाबतीत मार्गदर्शक ठरू शकेल. बँकेला या प्रश्नांची जाणीव तर आहेच आणि याला कसे सामोरे जावे याचे विचारमंथन चालू आहे.

टॉय बँकेच्या खेळणी वाटपाच्या समारंभात उगीच फापटपसारा व घोळ नसतो. मुलांना आवडेल व ती यात मनापासून पूर्णतया समरस होतील याकडे खास लक्ष दिले जाते आणि याला अजिबात अपवाद नसतो. सर्वप्रथम मुलांशी सुसंवाद साधण्याकरता त्यांना बोलके व मोकळे करण्याचे काम सुरू केले जाते. त्यांचे मन जिंकण्याचा प्रयत्न केला जातो आणि मगच सुसंवाद सुरू करण्याचे पुढचे पाऊल सुकर होते. ही प्रक्रियाही प्रत्येक समारंभात वेगवेगळ्या प्रकारांनी पार पाडली जाते. संस्थेतील एकूण परिस्थिती, मुलांची संख्या, त्यांच्या राहण्या-खाण्याच्या व वागण्याच्या पद्धती, सवयी, वयोगट, सर्वसाधारण आवडीनिवडी, संस्थाचालकांचे मत वगैरे गोष्टी या प्रक्रियेची दिशा व व्याप्ती ठरवतात. औपचारिक ओळखीनंतर गाडी गप्पाटप्पांकडे वळते व हळुहळू आवडनिवड, दिनचर्या, टीव्हीचे कार्यक्रम, क्रिकेट, सिनेमा वगैरे वळणे घेत घेत



मार्गस्थ होते. गोष्टी, कथा सांगणे, काही खेळ खेळणे, गाणी म्हणणे तसेच ऐकणे, नाच करणे, विनोदी किस्से सांगणे, अंताक्षरी खेळणे, नकला करणे, सिनेमातील संभाषण अभिनयासह करून दाखवणे, नटनट्यांची नक्कल करणे, क्रिकेट वगैरे खेळातील गमती जमती कथन करणे वगैरे मनोरंजनाचे प्रकार प्रसंगानुरूप अवलंबिले जातात. एकदा तर चौपाटीवरच्या घोडागाडीची सफरही बालमंडळी करून आली होती. बिस्किटे, खाणे पिणेही होते. संयोजक आपल्या भाषणात बोधप्रद असे विचार मुलांना समजतील अशा विषयावर ठामपणे मांडतात. कार्यक्रम अगदीच हलकाफुलका व नुसताच मजेचा होऊ नये एवढी काळजी जाणीवपूर्वक घेतली जाते. नंतर खेळणी वाटपाचा कार्यक्रम होतो.

खेळणी वाटपाच्या कार्यक्रमात हॉस्पिटलमधील गरीब मुलांचाही समावेश बँकेने केला आहे.सायन, कूपर, टाटा मेमोरियल, ठाणे म्युनिसिपल हॉस्पिटल अशा ठिकाणी काम करून बँकेने तिथल्या गरीब बालरूग्णांचा नूर पार बदलून टाकला होता. ३० स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने त्यांच्या कार्यक्षेत्रातही बँकेने गरीब बालकांना खेळणी दिली. दिल्ली, मुंबईसारख्या शहरात बांधकाम आणि खडी कामगारांच्या मुलांकरता चालवल्या जाणाऱ्या फिरत्या पाळणाघरांद्वारेही बँकेने खेळणी वाटप केले. काही शाळांचाही या कामात उपयोग केला जातो. अनाथ मुलांकरता चालवलेल्या दानशूर विश्वस्त संस्थेकरवीसुद्धा हे काम केले जाते. रस्त्यावरच्या मुलांनाही या उपक्रमात सहभागी करून घेतले जाते. मुंबईच्या टाटा मेमोरियल इस्पितळात बँकेने एक खेळणालयच काढले आहे जिथे दर तीन महिन्यांनी खेळणी संपूर्णपणे बदलली जातात.

टॉय बँकेचा मूलभूत उद्देश आहे असे विश्व निर्माण करणे जिथे मुलांचे बालपण आनंदी व निरोगी असेल. टॉय बँक या स्वयंसेवी संस्थेची इच्छा स्वत:च्या पायावर स्वतंत्र संस्था म्हणून उभी राहून जगातील हजारो मुलांचे आयुष्य आनंदमय करणे ही आहे. बँक जातपात, धर्म, वंश वगैरेमुळे होणाऱ्या दुजाभावापासून पूर्णपणे मुक्त आहे. बँकेचा गाढ विश्वास आहे की सामाजिक किंवा आर्थिक परिस्थिती कशीही असो स्वत:चे बाल्य जास्तीत जास्त आनंदात व मजेत जगण्याचा हक्क  हा सर्व मुलांचा मूलभूत हक्क आहे. या मुलांना सक्षम व सुसंस्कृत नागरीक बनविण्यात चांगले शिक्षण तर गरजेचे आहेच पण त्याच बरोबरीने शिक्षणापलिकडे काही गोष्टी तितक्याच आवश्यक असतात, त्यात खेळ व खेळणी यांचे महत्त्व वेगळे अधोरेखित करायला नको.

रस्त्यावरील मुले कुपोषण, भूक, आरोग्याचे प्रश्न, अस्वच्छता, उपेक्षा, चोरीचे आरोप, शारीरिक आणि लैंगिक शोषण, छळ, पोलिसांचा ससेमिरा अशा अनेक समस्यांनी ग्रस्त असतात. त्यामुळे नेमके वाढीच्या, उमेदीच्या वर्षांत त्यांना मानसिक नैराश्याला सामोरे जावे लागते. यामधून त्यांना बाहेर काढून थोडे बळ व चांगला विरंगुळा मिळवून देण्याचे काम टॉय बँकेची खेळणी उत्तमपणे बजावतात.

समाजातील वेगवेगळ्या स्तरांकडून टॉयबँकेला छान प्रतिसाद मिळत आहे, असे बँकेने स्वत:च नमूद केलेले आहे. मोठ्या संख्येने खेळणी गोळा करण्यात, स्वच्छ करण्यात, वेष्टनात गुंडाळण्यात, वाटप करण्यात लोकांचा उत्स्फूर्त सहभाग असतो. आपल्या भागात हिंडून खेळणी गोळा करणाऱ्या स्वयंसेवकांची संख्या तर शेकड्यांत भरते. काही जणांनी गोळा केलेली खेळणी ठेवायला जागा दिली. काहींनी खेळण्यांची वाहतूक करण्यास गाड्यांची व्यवस्था केली. वर्तमानपत्रे (स्थानिक व राष्ट्रीय पातळीवरील) व नियतकालिकांनीही चांगले सहकार्य दिले आहे. इलेक्ट्रॉनिक साधनेही यात मागे नाहीत. संस्थेस तसेच श्वेता यांनाही अनेक उल्लेखनीय बक्षिसे व मानपत्रे मिळाली आहेत. दूरदर्शनवर वेगवेगळ्या ठिकाणी त्यांच्या मुलाखतीही प्रसिद्ध झालेल्या आहेत. दूरचित्रवाणीच्या युवकांसाठी असलेल्या एका वाहिनीच्या स्पर्धेत तरूणांनी केलेल्या मतदानाप्रमाणे ८००० स्पर्धकांपैकी ३० तरूण आयकॉन म्हणून निवडले गेले. या ३० मधील एक असण्याचा सन्मान श्रीमती श्वेता यांनी पटकावला.

वरवर पाहता खेळणे वेष्टनात गुंडाळणे व त्याचे वाटप करणे ही प्रक्रिया फारशी कठीण नाही असे भासते. पण हीच खेळणी मुलांच्या सखोल भावनिक कल्पकतेच्या व विकासाच्या भावना रूजविण्यात फार मोठी भूमिका बजावतात. लहानपणी स्वत:चे खेळणे न मिळालेली मुले मोठेपणी आक्रमक, तुसडी व रागीट निघू शकतात असे श्वेता यांना मनापासून वाटते. टॉय बँकेच्या निदर्शनास आले आहे की खेळणी दिलेली मुले हळुहळू एकमेकांशी अधिक बोलू लागतात, जास्त मिसळू लागतात, आपले मत अधिक चांगले व्यक्त करू शकतात, स्वत:तील स्वत्व जास्त चांगल्या रीतीने ओळखू शकतात व सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आपले स्वत:चे असे काही आहे हे ती आपणहून सांगू शकतात. 'हे माझे आहे' ही उत्स्फूर्त भावना त्यांना जाणवू लागते व मग सुरूवात होते त्याकडे काळजीपूर्वक पाहण्याची. जसे लहानपणचे एखाद-दुसरे खेळणे आपल्याला आजही आठवत असते व त्याने दिलेल्या आनंदात आजही आपण रममाण होऊ शकतो, तोच अनुभव या बालकांना मोठेपणी घेता येईल.

उच्च स्तरातील मुलांनी देणगी देणे व त्यातून मिळणारा आनंद याबद्दल माहिती देवून त्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीला हात घालून चालना देण्याकरता या बँकेने पुढाकार घेतला आहे. बँकेचे स्वयंसेवक वेगवेगळ्या शाळांना भेट देऊन हे काम करतात. तसेच बँकेच्या कार्याची माहिती देतात. ते एक प्रकारे समाजातील 'आहे रे' आणि 'नाही रे' ही तफावत दूर करण्यात आपल्या परीने हातभार लावून सकारात्मक अशा प्रगतीशील विचारसरणीला रूजवत पुढे नेत आहेत.

खेळणी देणे हे औषध देण्यासारखे आहे. प्रत्येकाच्या प्रकृतीस्वभावाप्रमाणे त्याच्या परिणामात फरक होऊ शकतो. एखाद्या मुलाला खेळणे देण्याआधी त्या मुलाची प्रकृती, स्वभाव, मानसिकता व तिचे बळ वगैरे गोष्टी पहाव्याच लागतात, त्याचे कारण असे की मुलाने काय व कशा प्रकारे प्रतिक्रिया व्यक्त करायची ते त्याच्या खेळण्यातून तो शिकत असतो. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर ही खेळणी एक प्रकारे त्यांचे मार्गदर्शक असतात. बाहेरच्या वातावरणाबद्दलची त्याची समज व आकलन ती वाढवत असतात. वातावरणातून त्यांच्या समोर येणाऱ्या अनेक बाबींची उपयुक्तता व आपापसातील संबंधांचे धागे समजण्यास खेळण्यांची मोठी मदत होते.

मुलांची सकारात्मक तसेच नकारात्मक मानसिकता बनवण्याची क्षमता खेळण्यांमध्ये निश्चितच आहे. मुलांच्या हातात बंदूक ठेवली तर त्याला एखाद्याला ढिशुम ढिशुम करून मारण्यात आनंद होईल. पण त्याऐवजी मोटरगाडी, मोटरसायकलसारखी खेळणी निरोगी किंवा निर्मळ चढाओढीला वाव देतात. त्यामुळे सकारात्मक स्पर्धात्मकतेला प्रोत्साहन मिळते व पुढील आयुष्यात येणाऱ्या संकटांना तोंड देण्याची मानसिकता तयार होण्यास मदत होते.

टॉय बँकेची निरीक्षणे लक्षात घेण्याजोगी आहेत. या मुलांत निश्चित चांगल्या प्रकारचा फरक पडतो. बरीच मुले आपले खेळणे दुसऱ्याला द्यायला तयार होतात व तो वाटेकरी त्यांना चालतो. आजूबाजूच्या वातावरणाशी समरस होणे, अधिक संवेदनशील होणे, मोठ्यांचा मान आणि आदर करणे, हे शिकण्याइतकेच सगळ्यात मुख्य म्हणजे मुले एकूणच जशी आनंदी, निरामय,

खुशीत असणारी असावीत तशी ती खेळण्यांद्वारे बनतात. टॉय बँकेची संकल्पना त्यामुळे लोकांना लोभस वाटते.

टॉय बँकेने खेळणी दान करू इच्छिणारे व ते स्वीकारू शकणाऱ्या स्वयंसेवी संस्था यात एसएमएसद्वारा संबंध प्रस्थापित करण्याची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे गरज आहे अशा योग्य संस्थांकडे तर खेळणी पोहोचतातच पण वेळेचा अपव्ययही टाळला जातो.

'मुले ही तर देवाघरची फुले' याचा अनुभव तर सर्वसामान्य माणसे घेतच असतात, पण बहुतांशी तो मर्यादित असतो कुटुंब, नातेवाईक, फार तर मित्रपरिवारापुरता. पण सर्व मुले ही सारखीच; त्यांची निरागसता, बालसुलभ वागणे, कोवळी मने, निर्व्याज हसणे, उत्स्फूर्तता, उत्साह, वागण्यातील सरळपणा, भाबडेपणा इत्यादी बालसुलभ वैशिष्ट्ये अनाथ कंगाल मुलांमध्येही भरपूर असतात. पण समाजाकडून त्याची कितीशी दखल घेतली जाते? सर्वसाधारणपणे आमची मजल जाते ती भीक म्हणून एखादे नाणे फेकणे, लाल दिव्यावर वाहन थांबलेले असताना दयेपोटी, गरज नसतानाही त्यांच्याकडून काही बाही विकत घेणे, अनाथ मुलांच्या संस्थांना देणगी देणे, नियमितपणे किंवा कारणाकारणांनी त्यांच्यातील एखाद दुसऱ्याच्या शिक्षणाचा खर्च करणे, वगैरे. पण त्यांच्यातील बालसुलभतेची जाण वगैरे -- 'छे: छे:' !

त्याकरता लागणारी संवेदनशीलता ना जनसामान्यांकडे आहे ना समाजधुरिणांकडे ना राज्यकर्त्यांकडे ना धोरणकर्त्यांकडे. म्हणून या वंचित छोट्यांच्या बालसुलभतेची नुसतीच जाण नाही तर मान ठेवून त्यास एका अनोख्या मार्गाद्वारे कृतीशीलतेची भक्कम जोड देणाऱ्या टॉय बँकेच्या व तिच्या श्वेता दिदींच्या अतुलनीय यज्ञकुंडाला मनापासून कुर्निसात !

❀❀



# श्रीमती मुळादेवी

*जगातील ३७ टक्के लोक शौचालयाच्या सोयीपासून वंचित आहेत. आपल्या देशातही परिस्थिती काही वेगळी नाही. संपूर्ण आरोग्य अभियानाअंतर्गत आपल्या देशाने २०१२ सालच्या अखेरपर्यंत सर्व लोकांना शौचालयाची सुविधा पुरवण्याचा निर्धार केला आहे. आपण त्या उद्दिष्टापासून बरेच दूर आहोत. ग्रामीण भागाचा विचार केला तर ही टक्केवारी ७४ टक्के इतकी भरते. जगभरात ७ लाख मुले डायरिया व तत्सम प्रकारच्या टाळता येण्याजोग्या रोगांनी दगावतात.*

*भारताची स्थिती फारशी निराळी नाही. जगातील बालकांची मिळून १९.४ कोटी दिवसांइतकी शाळा बुडते. मुलींचे प्रमाण त्यात जास्त आहे. डायरिया व तशा प्रकारची रोगराई हे त्यामागचे एक मोठे कारण समजले जाते. या परिस्थितीत सुधारणा करण्यास सरसावली आहे ती बुंदेलखंडमधली एक ग्रामीण अशिक्षित महिला - श्रीमती मुळादेवी.*

*त्यांना न ही आकडेवारी माहीत आहे, न त्याच्याशी काही देणे घेणे आहे. त्यांनी अहोरात्र ध्यास घेतलेला आहे तो आपल्या गावातल्या घरांमध्ये जास्तीत जास्त शौचालये लवकरात लवकर कशी बांधून होतील याचा. गावात त्या आपल्या या कामात अतिशय व्यग्र आहेत. हे जणू त्यांच्या आयुष्याचे ध्येयच बनून गेलेले आहे. त्यांची ही गाथा.*

भीमनगर नावाचे एक छोटेसे गाव आहे, सुमारे अडीच हजार लोकवस्तीचे. आजूबाजूच्या इतर गावांप्रमाणेच ते आहे. उत्तर प्रदेशच्या बुंदेलखंड या मागासलेल्या भागातील जलौन या जिल्ह्यात ते वसलेले आहे. त्या भागाच्या

मागासलेपणाची छाप भीमनगरवर दिसून येते. एका बाबतीत मात्र हे गाव इतरांपेक्षा निश्चितपणे वेगळे ठरू पाहात आहे. ते म्हणजे घरोघरी शौचालय बांधून त्या करता होणारा मोकळ्या व उघड्यावरील जागांचा वापर थांबवणे.

यामागे कोणी राजकीय पुढारी किंवा सामाजिक दिग्गज व्यक्ती नाही. त्यात गुंतलेल्या आहेत गावातल्याच एक सीध्यासाध्या सामान्य महिला. श्रीमती मुळादेवी हे त्यांचे नाव. गावातल्या इतर स्त्रियांप्रमाणे त्या अशिक्षित आहेत. पुरूषांसमोर साडीच्या पदराआड चेहरा झाकून घेण्याइतक्या जुनाट विचारांच्या, ग्रामीण जीवन अंगवळणी पडलेल्या. सर्व रूढी व रीतीभाती कसोशीने पाळणाऱ्या एक पासष्ट वर्षांच्या महिला. पण त्यांनी तोंड उघडल्यावर जाणवतो तो एखाद्या तरूणाला लाजवेल असा नुसता ओसंडून जाणारा उत्साह.

घराबाहेर प्रातर्विधीसाठी जाणे ही भीमनगरची अनंतकाळपासून चालत आलेली पद्धत. मोकळ्या जागा, आडोशाच्या जागा, झाडाझुडुपांचा आसरा, पडक्या बांधकामांचा सहारा, एकांत भागाचा वापर या कामासाठी बिनदिक्कतपणे करण्यात येत असे. त्यात काही वावगे आहे हे कोणा गावकऱ्याच्या मुळी ध्यानातच कधी आले नाही. हे सर्वार्थाने कसे हानीकारक आहे, सामाजिक दृष्टीने आणि वैयक्तिक रीतीनेसुद्धा, हे त्यांच्या मानसिक घडणीच्या चौकटीत बसत नसे. एकतर पूर्वपरंपरेप्रमाणे चालत आलेली ही पद्धत चुकीची आहे हे मानायलाच ती मने तयार नव्हती. 'जे चालले आहे ते काय वाईट आहे? काही नुकसान झाले आहे का? मग?'अशी एकूण धारणा होती. यामुळे रोगराई पसरते, आरोग्य खालावते, पाण्याचे स्रोत दूषित होतात, स्त्रियांना त्रास होतो, वगैरे बाबी त्यांच्या गावीही नव्हत्या. शिवाय अगदी घरात शौचालय असणे या विचाराने त्यांना कसेसेच होत होते.

मुळादेवींना स्वत:ला ही विचारसरणी मुळीच पटत नव्हती. त्याविरूद्ध त्यांनी झगडा सुरू केला तो सुमारे पंधरा वर्षांपूर्वी परमार्थ समाज सेवा संस्थान या शेजारच्या भागात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेपासून प्रेरणा घेऊन. लोकांची ही मानसिकता योग्य नाही व जर खाजगी शौचालये बांधण्यासारखे विधायक काम करायचे तर सर्वप्रथम मनाची ही जडणघडण मोडून ती बदलायला हवी हे त्यांनी ओळखले. एकूण परिस्थिती पाहिल्यावर तर त्यांचे हे मत अधिकच ठाम झाले. शौचालये नसल्यामुळे होणारे सर्व तोटे अधोरेखित करून त्यांनी गावकऱ्यांपुढे हर तऱ्हेने मांडले. पाच वर्षांखालील मुलांच्या मृत्यूंपैकी २० टक्के



मृत्यू एकट्या अतिसाराने (डायरियाने) होतात व भीमनगरात अशा रीतीने दगावणाऱ्या बालकांचे प्रमाण खूप मोठे आहे हे त्यांनी लोकांपुढे आणले. गावकऱ्यांनी त्यांचे म्हणणे ऐकले तर हे बरेच कमी होऊ शाकते हे प्रतिपादन त्यांनी पुन्हा पुन्हा केले. भीमनगराच्या आकडेवारीच्या मदतीने त्यांनी ते सिद्ध करून गावकऱ्यांपुढे ठेवले.

गावकऱ्यांना त्या व्यक्तिगत रीत्या तसेच सामूहिक रीत्याही भेटत असत. विषय फारच नाजूक असल्यामुळे लोक त्यांच्याशी मनमोकळेपणाने चर्चा करीत नसत. त्यांच्या मनातले काही सांगत नसत. बरेच वेळा मुद्याचे बोलणे ते टाळत व इतर फापटपसारा जाणून बुजून लावत असत.'आलीया भोगासी असावे सादर' म्हणून श्रीमती मुळादेवी ते सगळे ऐकून घ्यायच्या, अगदी मूग गिळून बसल्यासारख्या. अशा वेळेस वेळ वाया जातो आहे हे जरी त्यांना जाणवत असले तरी त्या मनावर घेत नसत. कारण त्यांना माहीत होते की या आणि अशाच इतर लोकांकडून सहकार्य मिळवूनच त्यांना त्यांच्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करायची आहे. एकूणच लोकांना नाराज करून चालण्यासारखे नव्हते हे त्या समजून चुकल्या होत्या. आधीच लोकांची भावना अशी होती की शौचालय ही एक अनावश्यक अशी चैनीची बाब आहे. त्यांचा हा दृष्टीकोन बदलून ती एक 'अती आवश्यक गोष्ट कशी आहे' हे पटवणे म्हणजे महाकर्मकठीण काम हा अनुभव त्यांनी घेतला.

अक्षरश: गावातले घर आणि घर त्यांनी पालथे घातले. तेथे जाऊन व्यक्तिगत मते व अडचणी समजून घेतल्या व त्यावर विचार करीत गेल्या. लोकांना त्यांच्या रोजच्या जीवनात घडणारी, दिसणारी व जाणवणारी उदाहरणे अशा चर्चा करताना फार उपयोगाची ठरतात हे त्यांना आढळून आले. त्यामुळे त्यांनी भीमनगरमधीलच योग्य असे व परिणामकारक ठरतील अशा प्रकारचे प्रसंग उदाहरणे म्हणून निवडली व मुद्दे पटवून देताना त्यांचा न चुकता हिरिरीने वापर केला. उदाहरणार्थ, मुले उघड्या जागेत खेळत असताना त्यांची पादत्राणे अनवधानाने घाणीत जाणे, ती थोडीफार जुजबीपणे साफ करून त्यांचे पुन्हा खेळ सुरू करणे, या प्रकारात हाताचे तळवे दूषित होणे, खेळ आटोपल्यावर पादत्राणे नीट स्वच्छ न करता घरात शिरणे, तेव्हा तहान अनावर झाल्याने त्यांचे घरी धावत येऊन पाणी पिणे (हात न धुता), पाणी घेण्याकरता भांडे वापरताना त्यात बोटे बुचकळणे वगैरे. मुलांनी या सर्व गोष्टी पटवून घेणे व त्या कसोशीने पाळणे

याबद्दल त्या साशंक होत्या म्हणून त्यांनी गावातल्या आयांना समजावून सांगितले की पाणी पिताना पेला पाण्यामध्ये बुडवण्यापेक्षा लांब दांडी असलेले भांडे त्यात बुडवून ते पेल्यात ओतून पिणे केव्हाही अधिक आरोग्यदायक आहे.

अशा अनेक उदाहरणांवर भर देऊन त्यांनी त्यामुळे होणाऱ्या हानीवर जोर देण्यास सुरूवात केली. या प्रश्नामुळे आजारपण कसे उद्‌भवू शकते व काही वेळा ते गंभीर स्वरूपही धारण करू शकते. औषधपाण्यावर खर्च होतो तो अलाहिदा. त्यामुळे त्यांच्या मागासलेल्या गावातल्या गरीब लोकांना लागणारी पैशांची झळ ही दुर्लक्ष करण्याजोगी बाब नाही याचा त्या मुद्दाम उल्लेख करायच्या. अशक्तपणा येऊन तब्येतीवर विपरीत परिणाम होतो तो वेगळाच आणि त्याचे दीर्घकालीन परिणाम हे डोकेदुखी ठरू शकतात. उद्‌भवणाऱ्या गैरहजेरीमुळे त्यांच्या उत्पादक अशा मानव दिवसांचे नुकसान होते. उत्पादन प्रक्रियेत त्यांचा सहभाग कमी होतो. रोजगारीत खंड पडतो व आमदनीचे नुकसान होते. पर्यायाने कमी उत्पन्न, औषधोपचारांचा वाढता खर्च व तब्येतीचे नुकसान या दुष्टचक्राचा सामना गावाच्या नागरिकांना एक व्यक्तिगत शौचालय नसल्यामुळे करावा लागतो. हा परिणाम दृश्य स्वरूपाचा नसल्यामुळे गावकऱ्यांना जाणवून येत नाही याकडे त्या न विसरता बोट दाखवत असत. त्याद्वारे या सर्वांची गावकऱ्यांना मोजावी लागणारी एकत्रित किंमत मोठी असू शकते हे गावातल्या मंडळींना पटवण्याचा प्रयत्न करीत.

गावात पसरणारी रोगराई, दुर्गंधी, अस्वच्छता, घाण, डबकी, साचलेले पाणी यांचे दुष्परिणाम शौचालय नसल्यामुळे अधिक गंभीर स्वरूप धारण करतात. पर्यावरण व त्याच्या होणाऱ्या अपरिमित हानीवर भर तर दिलाच व पुढच्या पिढ्यांकरता ते कसे घातक आहे हे निदर्शनास आणून दिले. ते कमी करण्याच्या कामी त्या सुचवू पाहात असलेला उपाय महत्त्वाचा ठरू शकतो यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

लोकांच्या विचारधारेतील असे परिवर्तन म्हणजे एक तारेवरची कसरतच होती. ते करीत असताना काही कमी जास्त झाले किंवा चुकीची पावले उचलली गेली तर त्याकडे बोट दाखवून गावकरी स्वत:च्या जुनाट विचारसरणीला चिकटून राहतील व तिला पुष्टीच मिळाल्यासारखे ते समजतील. तसे झाले तर सगळेच ओमफस होईल आणि सारे मुसळ केरात जाईल. त्यांच्या मनातील या भीतीमुळे एकीकडे या कामाला जाचक व जबरदस्तीचे स्वरूप तर येऊ द्यायचे नाही पण



त्याचबरोबर कामाचे तारू भरकटू न देता समर्थपणे हाकायचे, हे संतुलन राखायचे म्हणजे कर्म कठीणच. पदोपदी त्यांना हे जाणवत असे. या टांगत्या तलवारीमुळे पुढे जाताना त्यांना काळजीपूर्वक सांगोपांग विचार करणे हे अनिवार्य होऊन बसले.

गावकऱ्यांशी संवाद साधण्यासाठी त्यांनी आणखी एका मार्गाचा उपयोग केला. एका स्वयंसेवी संस्थेद्वारे सभा घेऊन प्रबोधन व प्रशिक्षण शिबिरे भरवली. त्यांना आढळून आले की विषय नाजूक असल्यामुळे बहुतांश स्त्रिया अती संकोचामुळे मूग गिळून गप्प बसत. त्यामुळे त्यांचा शिबिरातील सहभाग फारच नगण्य असायचा. परंतु स्त्रीजातीने असे दुर्लक्षित राहणे मुळादेवींना मान्यच नव्हते. त्या गावातील वयस्क मंडळींपैकी आहेत. त्यांना गावात मान आहे. त्याचा सुयोग्य वापर करून त्यांनी स्त्रियांना पटवून दिले की या प्रश्नावर समाधानकारक उत्तर मिळण्याकरता चर्चा आवश्यक कशी आहे. त्यांचा उत्स्फूर्त व नि:संकोच प्रतिसाद मिळावा म्हणून त्यांच्याकरता मुद्दाम वेगळ्या सभा भरवल्या. त्यांनी स्त्रीवर्गाला सोसाव्या लागणाऱ्या असुविधेवर नेमके बोट ठेवले. त्यामुळे त्यांच्या तब्येतीवर होणारे घातक दुष्परिणाम ठासून पुढे मांडले गेले. गावाकरता लांच्छनास्पद असलेल्या या असुविधेचे निर्मूलन करण्याचे त्यांनी आवाहन केले.

आईचा मुलावर एक वेगळाच पगडा असतो. म्हणून अशा बाबतीत मुलांना चांगल्या आरोग्यदायी सवयी लावणे यात त्या मोठी भूमिका बजावू शकतात. त्यांचे स्वास्थ्य चांगले राहील हे पाहू शकतात. निरोगी राहून अभ्यासावर चांगले लक्ष केंद्रित करतील हे त्या पाहू शकतील. याकरता स्त्रियांच्या प्रकृतीला हानीकारक ठरणाऱ्या या गोष्टीकडे प्राधान्याने लक्ष देणे अत्यावश्यकच, हे त्या लक्षात आणून देत.

शौचालय बांधणीच्या उपक्रमाला गावात मोठी चालना मिळवून देण्यासाठी त्यांनी सरकारच्या संबंधित योजनांचा अभ्यास केला. त्याचा उपयोग गावकऱ्यांचे काही गैरसमज दूर करण्याकरता तर झालाच पण गावकऱ्यांना योग्य व अधिकृत माहिती देण्याकरताही बराच उपयोग झाला. संपूर्ण स्वास्थ्य योजनेद्वारे सरकार या कामाकरता अनुदान देते व त्याद्वारे माफक किंमतीत शौचालय तयार होऊ शकते यावर भर देत लोकांना हे पटवण्याकरता त्यांनी जोर लावला. शौचालय बांधण्याची महाग किंमत परवडत नाही या गावकऱ्यांच्या

मताबद्दल त्या म्हणतात की बांधताना योग्य तंत्रज्ञान वापरले तर ती किंमत माफक पडते हा त्यांचा पक्का विश्वास आहे. त्या म्हणतात 'संपूर्ण घरादाराला याचा फायदा होतो. एक प्रकारची कायमस्वरूपी कौटुंबिक मालमत्ता तयार होते– खास करून स्त्री वर्गाकरता. मुलीच्या लग्नात कर्ज वगैरे काढून अवास्तव प्रमाणात खर्च करण्यापेक्षा हे बरे. ही अनावश्यक श्रीमंती आहे अशी लोकांची धारणा पक्की होती. आता त्यात मोठ्या मुश्किलीने सुधार येत चालला आहे.'

त्यांच्या इतक्या वर्षांच्या प्रयत्नांना आता यश मिळताना दिसत आहे. आजमितीला सुमारे २०० कुटुंबांनी त्यांचा सल्ला स्वीकारून घरात शौचालये बांधून घेतली आहेत. गावातील एकूण कुटुंबांच्या ५० टक्के इतका हा आकडा भरतो. त्यामध्ये राव आणि रंक दोघेही समाविष्ट आहेत. उलट या गोष्टीचे फायदे एकदा पटल्यावर गरीब लोकांच्या आड त्यांची आर्थिक परिस्थिती येत नाही असा अनुभव आहे.

एकदा का एखाद्या कुटुंबाने शौचालय बांधण्याचा निर्णय घेतला की त्याकडे त्या जातीने लक्ष पुरवतात. ते बांधण्याचा वेग मंदावून त्या कामात शिथिलता येऊ नये म्हणून बरेचदा त्या बांधकामावर स्वत: हजर राहून नजर ठेवतात. बांधकाम पूर्ण होईपर्यंत त्या पिच्छा सोडत नाहीत व स्वत:ची खात्री करून घेतात. भीमनगरचे रहिवासी त्यांना कौतुकाने चिडवतात की गावातील प्रत्येक शौचालयात त्यांचा फोटो लावलेला असला पाहिजे, हे ऐकून त्या सुखावतात. त्यांनी मांडलेला हा यज्ञ पाहायला बाहेरून गावात यणाऱ्या पाहुण्यांना स्वत: अरूंद गल्ल्याबोळांतून नेत नेत त्या आपल्या कामाचे फलित दाखवतात, तेव्हा त्यांच्याबरोबरीने इतरांनाही जाणवणारी प्रसननता वातावरण भरून टाकणारी असते.

❀❀



# मोबाईल क्रेश

*श्रीमती मीरा महादेवन् यांनी बांधकामावरच्या मजुरांच्या बालकांसाठी सुरू केलेल्या मोबाइल क्रेशचे या क्षेत्राशी निगडीत असलेल्या इतर संस्थांशी जवळचे संबंध आहेत. असुरक्षित मुलांकरता कार्यरत असलेल्या समन्वय समितीची ही संस्था सदस्य आहे. बालमजुरी, मुलांचे शिक्षण व आरोग्य यांच्या बाबतीत कार्य करणाऱ्या शहरातील इतर स्वयंसेवी संस्थांशी सलोख्याचे संबंध आहेत. शहरातील अनेक ठिकाणी बालक विकासाबद्दल प्रशिक्षण देण्याकरता संस्थेला नियमितपणे बोलावले जाते. महाराष्ट्र सरकारच्या एकात्मिक बालक विकास योजनेची संस्थेच्या 'मुलांमधील कुपोषणाविरूद्धच्या झगड्या' त महत्त्वाची भूमिका आहे संस्थेच्या पुढाकारामुळे या योजनेत भटक्या कुटुंबांचा प्रथमच समावेश करण्यात आला आहे.*

*आंतरराष्ट्रीय पातळीवरील एका संघटनेने या संस्थेच्या दोन केंद्रांना पूर्ण आशियातील शाळांमधील पर्यावरणसंबंधी स्पर्धेत भाग घ्यायला प्रोत्साहित केले आणि तिथे क्रेशची मुले जिंकून आली. बांधकामावरील मुलांना शिकवणाऱ्या स्त्रियांमध्ये नेतृत्त्वगुण वाढावेत म्हणून इंग्लंडमधील एक संस्था क्रेशला निधी पुरवत असते.*

रस्त्यावरून जाताना आपण बरेचदा एखाद्या बांधकाम चालू असलेल्या इमारतीवरून पुढे जातो. तिथले दृश्य काही फारचे चांगले नसते. दगड, विटा, माती, वाळूचे ढिगारे, सिमेंटच्या पोत्यांचा धुरळा, राडारोडा, वरून पडणारे पाण्याचे थेंब, सिमेंटच्या मिक्सरचा धडधडाट यामुळे नकोशा वाटणाऱ्या त्या

अस्वच्छ वातावरणापासून कधी एकदा लांब जातो असे होऊन जाते. मन गलबलून जाईल अशी आणखी एक गोष्ट तेथे दिसते, ती म्हणजे कपड्याच्या झोळीत पहुडलेले एखाद दुसरे अशक्त तान्हुले, शेंबड्या धाकट्या भावंडांना कडेवर घेऊन सांभाळणारी, कळकट कपड्यांतील कच्ची बच्ची, एखाद्या ढिगाऱ्याच्या पुढे मागे बागडणारी, केसांच्या घाण झिंज्या अस्ताव्यस्त झालेली छोटी बालके. हे रोज पाहून बोथट झालेले आपले डोळे त्या चिमुकल्यांकडे निर्विकार थिजलेल्या नजरेने पाहून पुढे सरकतात. काहीजण तर नाकेही मुरडतात. तर काहीजणांच्या डोक्यात फार तर 'अरेरे, काय अवस्था या मुलांची', 'कसं काय होणार यांचं' असे लगेच तिथल्या तिथे विरून जाणारे विचार तरळतात.

कायम विस्मृतीत असलेल्या या बालकांबद्दल मुंबई मोबाईल क्रेशच्या सध्याच्या संचालक व मीराताईंची नात देविका महादेवन म्हणतात की बांधकाम क्षेत्रात होत असलेल्या भरभराटीचा अगदी नगण्य वाटाही तिथल्या मजुरांपर्यंत पोचत नाही. जनतेकरता घरे बांधणाऱ्यांना सुरक्षित आसरा नसतो. ते राहतात बांधकामाच्या ठिकाणी तात्पुरत्या झोपडीत किंवा अर्धवट बांधलेल्या इमारतीत. अस्वच्छ व गलिच्छ ठिकाणी. तिथे अगदी मूलभूत बाबींचीही वानवा असते. सर्वसाधारणपणे त्यांच्या बालकांवर याचा विपरीत परिणाम होतच राहतो व त्यांची दयनीय स्थिती 'जैसे थे' च राहते. आईवडील मजुरीवर जातात व ती इकडे तिकडे जवळपास वावरत वेळ घालवतात. न बालक मंदिर, न शाळा, त्यामुळे शिक्षणाचा आनंदच, वैद्यकीय व आरोग्य सेवांचीही वानवाच. त्यामुळे बालके बरेचदा रोगग्रस्त तसेच कुपोषित राहतात.

आपल्या देशातील बांधकाम उद्योगात सुमारे तीन कोटी कामगार मजूर म्हणून काम करतात. त्यांची स्थिती अगदी दयनीय आहे. त्यांना अत्यंत वाईट परिस्थितीत मजुरी करावी लागते. काही जाचक बाबींचा त्यांच्या जीवनावर विपरीत परिणाम होतो. उदाहरणे द्यायची तर पुरूष व स्त्री मजुरांच्या वेतनातील तफावत, त्यांच्या बालकांच्या आरोग्य व शिक्षणाच्या व्यवस्थेचा पूर्ण अभाव, स्त्री मजूर प्रसूती सुट्टीपासून वंचित इ. बांधकाम उद्योगाला भविष्यात मोठा वाव आहे असे प्रतिपादन केले जाते. परंतु मजुरांचे त्यामुळे किती भले होणार हा यक्षप्रश्नच आहे. गेल्या ४० वर्षांत संस्थेचा दोनशेहून अधिक बांधकाम मालकांशी संबंध आला. प्रत्येक वेळी आरंभिक चर्चा त्यांच्याकडे काम करणारे मजूर व त्यांची बालके यांच्या समस्या यांवर केंद्रित असे. बाल्यावस्थेत



बालकांच्या जीवनाकडे चांगले लक्ष देणे ही एक मोठी जिकिरीची गोष्ट आहे. त्याकरता संवेदनशीलता, ज्ञान आणि बरोबरीने कौशल्याची गरज असते हे तज्ज्ञांनी स्वीकारलेले आहेच. समाजात असे काम चांगल्या प्रकारे करू शकणाऱ्यांची फार मोठी वानवा आढळून येते. अशा प्रकारची कामे योग्य रीतीने करू शकणारी मंडळी तयार करणे (प्रशिक्षण व इतर माध्यमातून) हे संस्थेपुढील एक सातत्यपूर्ण आव्हान बनून राहिलेले आहे.

स्थलांतरीत मजुरांतील सर्वाधिक मंडळी बांधकाम व्यवसायात काम करतात. देशात त्यांचा आकडा ३ कोटी इतका असून त्यातील दहा लाख एकट्या मुंबई शहरात राहतात. त्यातील बहुतांशी तरूण जोडपी ग्रामीण भागातून शहरात स्थलांतरीत झालेली असतात व त्यांना लहान मुलेही असतात. भारतात दीड कोटी मुले बांधकामाच्या ठिकाणीच राहतात, त्यातील एक लाख तर एकट्या मुंबई शहरात राहात आहेत.

१९६९ साली दिल्ली निवासी श्रीमती मीरा महादेवन् एका बांधकामाजवळून जात होत्या. कोणाचे लक्ष नसलेले एक लहान बालक तीव्र गर्मीत तिथे पडलेले पाहून त्यांचे हृदय द्रवले. दुसऱ्याच दिवशी त्यांनी तिथे तंबू उभारला. काही मदतीची जमवाजमव केली आणि पहिली फिरती बालवाडी (मोबाईल क्रेश) सुरू केली.

सुरक्षितता, शिक्षण, आरोग्यसेवा आणि स्वरक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क आहे या ठाम विश्वासावर त्यांनी या कामाचा श्रीगणेशा केला. मुलांच्या वाढीत बाल्यावस्था ही अत्यंत महत्त्वपूर्ण पायरी असते हे त्रिवार सत्य त्यांनी स्वत:च्या कृतीतून अधोरेखित केले.

तेव्हापासून बालकांच्या भावनिक, शारीरिक, वैचारिक व सामाजिक वाढीकडे लक्ष देणारा विस्तृत असा दिवसभराचा आखीव कार्यक्रम राबवण्यास संस्थेने सुरूवात केली. सुरक्षित, सुखी व प्रोत्साहित करणारे बाल्य हा पुढील आयुष्याचा पाया असतो असा विश्वास असलेल्या या संस्थेचा भर सहा वर्षांपेक्षा छोट्या बालकांवर आहे. लहानपणच्या गोड व आनंदी आठवणी मुलांच्या मनात कायमच्या कोरल्या जातात हे वास्तव नजरेसमोर ठेवून संस्था आपल्या कार्याची आखणी करीत असते. संस्था हे काम करीत असताना पालक, बांधकाम व्यावसायिक, मजूर वर्ग व त्यांच्या संघटना, सरकारी खाती व संबंधित स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याचा खूप आदर करते.

तीन दशकांनंतर केवळ प्रशासकीय सोयीकरता संस्थेचे तीन भागात विभाजन केले गेले. मुंबई मोबाईल क्रेश हा त्यापैकी एक. दोन हजार साली ५००० बालकांचा आकडा पार करून २००९-१० साली ही संख्या सहा हजारांहून जास्त झाली. दर वर्षी साधारण दहा टक्के इतकी वाढ अपेक्षित आहे.

क्रेशच्या केंद्रात बालकांना ठेवल्यामुळे कामगारवर्ग काळजीमुक्त होतो. मुलांच्या देखभालीची त्यांना चिंता राहात नाही. असे बांधकाम मजूर कामावर अधिक लक्ष देऊ शकतात आणि पर्यायाने त्यांची क्षमता तसेच उत्पादकता वाढते. ही संशोधनाद्वारे सिद्ध झालेली बाब ही संस्था बांधकामाशी निगडीत इतर संघटनांना व व्यक्तींना पटवून देते. त्यामुळे, क्रेशचे केंद्र बांधकामाच्या जागेवर उघडणे त्यांच्या कसे उपयुक्ततेचे आहे व त्यांनी त्याकरता सर्वतोपरी सहाय्य कसे करावे हे संस्था अधोरेखित करून त्यांच्या मनावर बिंबवत असते. संस्थेने काही प्रमाणात संशोधन कार्यही हाती घेणे सुरू केले आहे. संस्थेला स्वत:ला अंतर्गत बाबतीत व बाहेरील जगाशी व्यवहार करतानाही त्याचा फायदा होतो.

सध्या संस्थेच्या केंद्रात असलेल्या बालकांवर पाच वर्षांनंतर कशा प्रकारचा परिणाम दिसून येतो हा अशा पहिल्या प्रकल्पाचा विषय आहे. संस्थेने सुरू केलेला आणखी एक उपक्रम म्हणजे वेगवेगळ्या बांधकामांवरील स्त्री मजुरांची महिन्यातून एकदा सभा घेऊन त्यांच्या महत्त्वपूर्ण वाटणाऱ्या बाबींवर चर्चा घडवून आणणे. तो राबवला जात आहे तळागाळातील नेतृत्वावर काम करणाऱ्या एका स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने. बांधकामावरील गर्भवती स्त्रियांचाही यात समावेश केला जातो. बालकांच्या वजन व वाढीकडे आठवड्यातून एकदा येणारे डॉक्टर नजर ठेवून असतात. शिवाय दात, डोळे इत्यादींकरता खास शिबिरे अधून मधून आयोजित केली जातात.

संस्थेचे केंद्र बांधकामाच्या जागेवरच दोन वर्गांसहित उघडले जाते. तेथील वातावरण खेळीमेळीचे, उत्साही, गाण्यांनी भरलेले असेल याची खास काळजी घेतली जाते. दोन्ही वर्ग प्रशिक्षित शिक्षकांकडून घेतले जातात. लहान भावाला कडेवर बाळगत मोठ्या भावंडाने त्याला सांभाळणे अथवा बालमजुरी करणे या मजूर कुटुंबात नेहमी आढळून येणाऱ्या अनिष्ट अपरिहार्यतेला केंद्रांमुळे संपूर्ण आळा बसलेला दिसून आला. दोन्ही भावंडे तिथे शिक्षण मिळवण्याच्या दिशेने खुशीखुशीत वाटचाल करू लागतात व बांधकामात गुंतलेल्या मजूर आया त्यामुळे मुलांबद्दल निर्धास्त असतात हा फायदा आहेच. शिवाय केंद्रे मजुरांना



मुलांचे हक्क, त्यांचे आरोग्य, केंद्राच्या कामाचे महत्त्व अशा उपयुक्त विषयांवर मार्गदर्शन करून आधार देतात, तसेच मदतही करतात.

क्रेशचे केंद्र दोन प्रकारचे वर्ग चालवते. एक, तीन वर्षांच्या खालील बालकांकरता आणि दुसरा, तीन ते पाच वर्षांच्या बालकांकरता. पहिल्या प्रकारच्या वर्गात खेळ, बालगीते, बडबडगीते, खेळणी इत्यादींवर भर दिलेला असतो. मुलांच्या सर्वांगीण विकासाची पाळेमुळे त्याद्वारे रूजवली जातात. दुसऱ्या वर्गात, लिहिण्याची तयारी, अंक मोजणी वगैरेच्या मूळ तयारीकडे लक्ष दिले जाते. मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळावा म्हणून दोन्ही वर्गांत पुरेसा मोकळा वेळ ठेवलेला असतो. त्याचबरोबर ती नेमून दिलेल्या गोष्टींकडेही ध्यान देतात हे पाहिले जाते. शाळेतील पहिलीच्या वर्गात प्रवेश मिळवण्याच्या दृष्टीने त्यांची खास तयारी करवून घेतली जाते. अशा मुलांना अधिकृत शाळेत प्रवेश मिळाल्यानंतरही त्यांच्या गृहपाठात व इतर अभ्यासात क्रेशचे केंद्र त्यांना मदत करते. तसेच पुढील शिक्षणासाठी व व्यावसायिक अभ्यासक्रमाकरता शिष्यवृत्तीही देते.

क्रेशच्या केंद्राचा दिनक्रम सुसूत्रपणे आखलेला असतो व तो पूर्णपणे पाळला जातो. बालके सकाळी नऊ वाजता केंद्रावर येतात व दिवस सुरू होतो.त्यांना केंद्राच्या सुपूर्द करून त्यांच्या आया बांधकामावर मजुरीकरता निघून जातात. आल्याबरोबर ते दूध व नाश्ता घेतात. गरजेप्रमाणे त्यांना जास्तीचा खुराक, औषधे वगैरे दिली जातात. मग तीन वर्षांखालील मुलांना गोष्टी सांगण्याचा तास असतो, ज्याची ते उत्सुकतेने वाट पहात असतात. त्यावेळी ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुले ठोकळे, चिकण माती, दोरे, पेन्सिली, रंग पेन्सिली वगैरेचा वापर करून आपापल्या कल्पनाशक्तीप्रमाणे व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या प्रतिकृती, चित्रे, आकार, वस्तू प्रमाणबद्ध रीतीने तयार करतात. काही वेळा उद्बोधक स्वरूपाच्या व मनाला चालना देणाऱ्या इतर बाबी यात समाविष्ट केल्या जातात. उदा. देशभक्तीपर गीते, मोठ्या विभूतींच्या जीवनातील संदेशात्मक गोष्टी, अक्षर व अंक यांचे आकार हाताळणे, इत्यादी. दुपारचे जेवण म्हणून गरम खिचडी दिली जाते. छोटी बालके नंतर दुपारची झोप घेतात व त्या वेळेत त्यांचे शिक्षक नोंदी करणे, सभांच्या आयोजनाबद्दलची व्यवस्था करणे अशी कामे करतात. झोपेतून ताजीतवानी झालेली मुले मग आठवड्याकरता आयोजल्याप्रमाणे चित्रे काढणे, कागद दुमडून वस्तू व पक्षी

तयार करणे, ते चिकटवणे इत्यादी कामात खूप रस घेऊन मनापासून रमतात. दुपारच्या वेळेत ३ ते ६ वर्षांची मुले व्यग्र असतात ती अक्षर ओळख, अंकलिपी शिकणे, अक्षर व अंक गिरवणे, बालकविता पाठ करून म्हणणे, समूहगीते म्हणणे, वाक्ये तयार करणे अशा प्रकारच्या अभ्यासात. या वेळेत मुलांकडून प्राथमिक शाळेत प्रवेशाकरता लागणारी तयारी केंद्र करवून घेते. संध्याकाळी पाच वाजता केंद्र बंद होते. त्यावेळी बालकांना दाण्याच्या चिक्कीसारखा अल्पोपहार मिळतो.

रोजच्या दिनक्रमाबरोबर प्राणी संग्रहालय व संग्रहालयाला भेट, पिकनिक, मुलांकरता असलेली प्रदर्शने, मनोरंजनात्मक शिबिरे, बालनाट्य इत्यादी नियमित उपक्रमांद्वारे बालकांना आनंदित व उत्साही ठेवण्याचा प्रयत्न संस्थेतर्फे सतत केला जातो. संस्थेचा एक आगळा वेगळा उपक्रम म्हणजे एखादा छोटासा विषय (मुलांच्या कुवतीत बसेल असा) घेऊन त्यावर खास वेगळा वेळ काढून शिक्षक त्यांना संबोधित करतात आणि मग त्यांना त्यावर प्रश्न वगैरे विचारून, त्यांच्याशी संभाषण करून त्यांना बोलते करतात. शक्यतो बालके समजून घेऊ शकतील अशाच बाबींची याकरता निवड होते. या उपक्रमात कोणताही विषय वावगा धरला जात नाही – अगदी सणवारापासून ते सागरी जीवनापर्यंत काहीही वर्ज्य नाही. अर्थातच बहुतेकदा त्यांच्या रोजच्या जीवनाशी दूरान्वयाने का होईना संबंधित असाच तो असतो. या उपक्रमाचे अनेक फायदे संस्थेच्या निदर्शनास आले आहेत. बालकांच्या सामान्य ज्ञानात भर पडणे, सभाधीटपणाचे बीज रोवले जाणे, मनमोकळेपणाने बोलण्यास उद्युक्त होणे, मनाला एकाग्र करण्याची सवय लागणे इत्यादी.

हळुहळू जशी केंद्रांची संख्या वाढू लागली आणि मजूर बायकांचा संस्थेवरचा विश्वास वाढू लागला तसतसे संस्थेने आपले पंख विस्तारले. संस्था या क्षेत्रातील काही मोठ्या बाबींमध्येही लक्ष घालून त्या धोरणकर्ते, सरकार, बांधकाम मालकांची संघटना वगैरेंच्या पुढे मांडून त्याबाबत अधिक आग्रही बनू लागली. बांधकाम मालकांकडे अधिक पैशांच्या आधाराची तसेच जबाबदारीत जास्त भाग उचलण्याची मागणी करू लागली. याबद्दल ठाम होऊ लागली. प्रगतीशील कायदे आणि कार्यक्रमांकरता आपला मुद्दा पुढे रेटण्याकरता धोरणकर्त्यांबरोबर संबंध प्रस्थापित करून ते वाढवू लागली. मजूर पालकांना घरी मुलांची काळजी घेण्याचे व अधिक चांगल्या सेवासोयीच्या मागणीचे महत्त्व पटवून दिले. संस्था नवनवीन बांधकामांच्या जागांच्या सतत शोधात असते, जेणेकरून अधिक केंद्रे उघडून ती जास्तीत जास्त मजुरांपर्यंत पोचू शकेल.

मूळ उद्दिष्टापलिकडे जाऊन संस्थेने सामाजिक भान जोपासले आहे. एका बांधकामाच्या जागेवर मोठी आग लागली. प्राणहानी झाली नाही पण नुकसान जबरदस्त झाले. संस्थेने ई-मेल द्वारे हितचिंतकांना आवाहन केले आणि गरजेपेक्षा जास्त पैसे, कपडे, भांडीकुंडी चोवीस तासांत जमा झाली. त्यांच्या पुढाकाराने संस्थेने पुढील काही आठवड्यांत डाळ, तांदूळ, चटया, कपडे, चादरी, स्वयंपाकाची भांडी अशा जीवनावश्यक वस्तूंचे दीडशे मजुरांना वाटप केले गेले. नुकत्याच झालेल्या आंतर स्वयंसेवी संस्थांच्या नाटुकल्यांच्या स्पर्धेत संस्थेच्या एका केंद्राला दुसरे बक्षिस मिळाले. एका केंद्रातील, 'खारफुटीचे महत्त्व' या सहा मुलांच्या बोलक्या बाहुल्यांच्या खेळाने हाँगकाँगमध्ये भरलेल्या आशियाई शाळांच्या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय पातळीवरचे बक्षिस पटकावले.

संस्थेने गर्भवती स्त्री मजुरांचे एक सर्वेक्षण केले. त्यानुसार नजीकच्या भविष्यकाळात संस्थेने अशा स्त्रियांच्या समस्यांवर लक्ष देण्याचे ठरवले आहे. मुलांमध्ये वाचनाला महत्त्व मिळावे म्हणून संस्था खास उपक्रम करीत असते. उदा. त्याकरता शांत वातावरणात स्वयं वाचन मुलांना १५ मिनिटांकरता सक्तीचे ठेवले आहे. मुंबईतील एका स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने केंद्रातील शिक्षकांना इंग्रजी शिकवण्यास उपयुक्त असे काही खास साहित्य तयार करण्याकरता संस्था पुढे सरसावली आहे.

संस्थेच्या अशा बहुविध आणि दूरदर्शी प्रयत्नांनी क्रेशची प्रगती यापुढेही चालू राहील याची खात्रीच आहे.

# दारिद्र्यपीडितांना परमेश्वराठायी पाहणारे सेवाव्रती श्री. राजा

*अक्षरशः रस्त्यावर पडलेल्या, कंगाल, अंगावर धडसे कपडे नसलेल्या, बरेचदा शारीरिक पीडांनी किंवा रोगांनी ग्रासलेल्या अशा वैफल्यग्रस्तांचे दर्शन पुष्कळदा होते. नैराश्याने पूर्णपणे घेरलेल्या या जिवांकडे दुर्लक्ष करून आपण पुढे जातो. पण त्यांची सेवा करण्याचे व्रत मनोभावे पाळत आहेत बेंगळुरूचे श्री. राजा व त्यांची 'होम ऑफ होप' ही स्वयंसेवी संस्था. आपल्या काही स्वयंसेवकांसह रस्त्यांवर हिंडून ते अशा निराश्रितांना शोधून काढतात. त्यांचे मन वळवून त्यांना आपल्या संस्थेत दाखल करून घेतात. तिथेच राहणे, खाणे, औषधोपचार वगैरेची विनामूल्य सेवा करतात. बरे झाल्यावर काम करण्याची शक्ती व कुवत असणाऱ्यांना संस्थेत किंवा इतरही ठिकाणी रोजगार मिळवून दिला जातो. अनेकजण संस्थेत दाखल होतानाच मरणोन्मुख अवस्थेत असतात. त्यांची शेवटची इच्छा वगैरे पूर्ण करून त्यांना सन्मानाने व शांतीने जगाचा निरोप घेणे शक्य केले जाते. त्यांचा इतर सामान्य माणसांप्रमाणेच व्यवस्थित अंत्यसंस्कार केला जातो. श्री. राजा यांचे जीवन म्हणजे 'जे का रंजले गांजले...' याचे स्मरण करून देणारे.*

---

श्री. राजा यांचे वडील दूरध्वनी खात्यात साधे लाईनमन होते. काही प्रमाणात अशिक्षितपणामुळे व विचारशक्तीच्या अभावामुळे पालक श्री. राजा यांच्या संगोपनाकडे लक्ष देऊ शकले नाहीत. मातापित्यांचे प्रेम व आपुलकी त्यांच्या वाट्याला अशी आलीच नाही. यापासून वंचित असलेल्या मुलांवर बरेचदा विपरीत परिणाम होतात. अनेकदा ती हाताबाहेरही जातात. श्री. राजा यांच्या बाबतीत नेमके असेच घडले. तो मुलगा वाया गेला, चोऱ्या करू लागला, मारामारीत पुढे राहू लागला, दारू पिण्याचीही सवय त्याला लागली, जुगाराच्या व्यसनातही तो गुंतला. त्यानंतरची पायरी म्हणजे जवळच्या नातेवाइकांना सोडून घरातून पळून जाणे. तीही पायरी त्याने ओलांडली. तो इकडे तिकडे उगाचच फिरत बसे आणि वेळ घालवत असे. त्याचे उठणे, बसणे, झोपणे तिथेच असायचे. अनेकदा कचऱ्याच्या डब्यांशेजारी. या डब्यांजवळ कितीतरी वेळा रोगिष्ट, पिसाळलेली वेडगळ कुत्री घुटमळत असायची. या मुलाला सोबत म्हणून त्यांच्या साथसंगतीचा लाभ होत असे. आयुष्य हे भरकटलेल्या तारूप्रमाणे झाले होते. त्याला मुळी काही दिशाच उरली नव्हती. तो रस्त्यावर एक दरिद्री, निराधार, कंगाल व्यक्ती बनून दिवस घालवत होता.

सुरूवातीला जरी त्याला त्याबद्दल काही वाटले नाही तरी दोन एक वर्षांत तो या जीवनक्रमाला कंटाळला. आपण आयुष्य फुकट घालवत आहोत असे मनात कुठेतरी जाणवू लागले. हे असे भकास जीवन आपण किती दिवस जगणार? आणि मग त्याचा त्याग करायचे त्याने मनाशी ठरवले. किमानस्वरूपी आपल्या अगदी मूलभूत गरजा भागवण्यापुरते तरी आपण कमावले पाहिजे ही भावना दिवसेंदिवस प्रबळ होऊ लागली. त्यापोटीच त्यांनी रिक्षा चालवायला घेतली व नंतर ते टॅक्सीचालक झाले. काही दिवस अंगरक्षक म्हणूनही त्यांनी काम केले.

त्या दोन वर्षांनी त्यांना खूप काही शिकवले. जीवनाच्या पैलूंचे एक वेगळेच दर्शन त्यांना होत गेले. मी कोण, माझ्या जगण्याचा उद्देश काय, जीवन म्हणजे काय, त्याचा हेतू काय, चांगले जगणे म्हणजे नेमके काय, ते कसे जगायचे, त्याकरता मी स्वत: काय केले पाहिजे...तेव्हा त्यांचे प्रयत्न सुरू झाले ते स्वत:पुरती या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे. अगदी सर्वसामान्यांसारखे पोटापाण्याच्या व्यवसायाला लागल्यानंतरही ही मानसिक आंदोलने थांबलेली नव्हती. उलटपक्षी त्यांची गती वाढली होती. श्री. राजा त्यांच्या मित्राबरोबरही बरीच खलबतं करीत असत. जनसामान्यांची सेवा करणे यात आयुष्याचा खरा अर्थ दडलेला आहे हे त्यांच्या मनाने पूर्णपणे स्वीकारण्याच्या कामी या मित्राने मोलाचे कार्य केले. त्यातूनच वर उल्लेखलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी स्वत:पुरती समाधानकारकरीत्या मिळवली. आयुष्याचे ध्येय ठरवले – ते म्हणजे संपूर्ण जीवन सेवाकार्याला अर्पण करणे.

दोन वर्षे त्यांनी रस्त्यावर काढली होती. उपेक्षित, दरिद्री व निराधार अशा अवस्थेत. त्या हालअपेष्टांच्या चटक्यांनी ते खूप पोळलेले होते. असे हलाखीचे जिणे त्यांनी पूर्णतया अनुभवलेले होते. रस्त्यावरच पडलेले (आणि म्हणून पर्यायाने तिथे आसरा घेतलले) रोगग्रस्त, समाजाने झिडकारलेले, अन्नान्न दशा झालेले अनेक पीडित त्यांना या दिवसांत आढळले. त्यामुळे रस्त्यावरच्या दारिद्र्यपीडित, निराधार, व्याधीपीडित, असहाय्य, उपेक्षित वर्गाची दु:खे आणि अंगावर शहारे आणणारी त्यांची वस्तुस्थिती त्यांनी जवळून पाहिली होती. त्यावर उपाय काय, कोणता मार्ग, काय करता येईल असे विचारचक्र प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे त्यांच्या मनात फिरू लागले.

दोन वर्षांच्या स्वानुभवाने य चक्राला गती देण्याचे कार्य मोठ्या ताकदीने केले. या चर्वितचर्वणातून त्यांनी एक दिवस आपल्या आयुष्याचा सर्वात महत्त्वाचा निर्णय घेतला, तो म्हणजे समाजातील या उपेक्षित व नगण्य समजल्या जाणाऱ्या वर्गाच्या नि:स्वार्थ सेवेचा, त्यांच्या सेवाकार्याला संपूर्ण जीवन वाहून घेण्याचा. निर्णय अत्यंत कठीण होता, पण त्यांच्या धर्मातील काही शाश्वतस्वरूपी मूल्यांमुळे, धर्मपत्नीच्या धीरोदात्त आधारामुळे व दोन वर्षांच्या अमूल्य आणि असाधारण अनुभवामुळे ते या निर्णयाप्रत ठामपणे पोहोचू शकले.

आता या वर्गाची सेवा करणे म्हणजे नेमके काय? त्यांनी या प्रश्नाचे उत्तर स्वत:पुरते शोधून काढले. ते म्हणजे या कंगाल मंडळींचे आयुष्य शक्य तितके विविध अंगांनी सुसह्य करणे, सुकर करणे, उपेक्षाविरहित करणे, दारिद्र्याच्या चटक्यांपासून त्यांना होताहोईतो दूर करणे, जीवनाबद्दलचा त्यांचा नकारात्मक दृष्टीकोन सौम्य करणे व आयुष्याबद्दलची कडवट मनोभूमिका कमी करणे. त्यातून समाधान मिळवण्याचे प्रयत्न करण्याकरता त्यांना उद्युक्त करणे वगैरे.

दिशा तर ठरली. पण पैशांच्या पाठबळापासून ते सेवाकार्य करण्यास लागणाऱ्या जागेपर्यंत अनंत अडचणी समोर होत्या. पाठीमागे होती ती दुर्दम्य इच्छाशक्ती व पत्नी व मुलांचा मनापासून पाठिंबा. एवढ्या गुंतवणुकीवर निराधार व मरणोन्मुख पीडितांना दिलासा देण्याचा हा यज्ञ सुरू झाला.

ते साल होते १९९७. त्यांनी ‘न्यू आर्क मिशन ऑफ इंडिया’ या संस्थेची स्थापना केली. १९९८ साली संस्थेच्या इतर विश्वस्तांची नेमणूक करण्यात आली. सुरूवात झाली ती श्री. राजा यांच्या एकच खोली असलेल्या घराच्या ५ फूट बाय ६ फूट पडवीतून. नंतर १९९८ साली एका धार्मिक संस्थेकडून बंगलोरच्या उपनगराजवळ अर्धा एकर जागा देणगी स्वरूपात मिळाली. त्या शांत, प्रसन्न जमिनीवर ३३०० चौरस फुटांचे बांधकाम करून त्याला ‘होम ऑफ होप’ हे नाव देण्यात आले व संस्थेचे कामकाज तिथे हलवण्यात आले.

संस्थेची प्रमुख उद्दिष्टे म्हणजे रस्त्यावरील कंगाल, दारिद्र्यपीडित, निराधार तसेच मरणोन्मुख लोकांच्या आयुष्यात जगण्याची आशा, उमेद निर्माण करणे. त्यांना निवारा, औषधे यांच्याबरोबरीने प्रेम व जिव्हाळा देणे, स्वत:च्या पायावर उभे राहण्याकरता व्यावसायिक शिक्षणाची व्यवस्था करणे. काही अंशी का होईना, त्यातील मुलांची शिक्षणाची व्यवस्था करणे, संस्थेतील मूलभूत सोयींमध्ये सुधारणा करून या मंडळींच्या जीवनमानात बदल घडवून आणणे, त्याकरता वेगवेगळ्या प्रकारच्या संस्थांशी, कार्यालयांशी समन्वय राखणे, सुसंवाद वाढवणे वगैरे.

रस्त्यावरून मुक्ती मिळालेले व संस्थेत दाखल झालेले हे लोक बहुतेक एड्स, कर्करोग, निकामी मूत्रपिंडे वगैरेंसारख्या गंभीर आजारांनी पीडित असतात. इतर बरेच वयस्क आणि कमालीचे अशक्त असतात. काहीजण मनोरूग्ण असतात तर काही शारीरिकरीत्या विकलांग. यातील बहुतेक आयुष्याच्या अगदी अखेरच्या पायरीवर असतात.

श्री. राजा, त्यांचे कुटुंबीय आणि एकसंधपणे काम करणारा त्यांचा चमू संस्थेतील दरिद्री निराधारांना अक्षरश: देवाप्रमाणे समजतात. अत्यंत सहानुभूतीपूर्वक आणि आपुलकीने त्यांची सर्वतोपरी काळजी घेतात. त्यांचे आयुष्य सर्वतोपरी सुकर व सुसह्य कसे होईल, त्यांचे वास्तव्य आनंददायक व जास्तीत जास्त संस्मरणीय कसे करता येईल, याकरता हर प्रकारे दक्ष तसेच कार्यतत्पर असतात. रांधा, वाढा, उष्टी काढा वगैरे स्वयंपाकाची जबाबदारी एक दांपत्य पार पाडते. जणू प्रतीपरमेश्वराच्याच जेवणखाण्याकडे लक्ष देत असल्याच्या मानसिकतेने व सात्विकतेने ते या कामात रस घेतात. संस्थेतील दु:खाने गांजलेल्या माणसांच्या मनाला यामुळे किती मोठा दिलासा व समाधान वाटत असेल त्याचे काय वर्णन करणार!

सुरूवातीच्या दिवसात श्री. राजा आपली ऑटो रिक्षा घेऊन बाहेर पडायचे आणि रस्त्यावरच्या दारिद्र्यपीडित, निराधार, व्याधीपीडित, मरणोन्मुख अशा प्रकारच्या माणसांना शोधायचे. त्यांना रिक्षात घालून आपल्या घरासमोरच्या चिंचोळ्या पडवीत आणायचे. इतरांच्या मदतीशिवाय (किंवा माफक मदतीने)

त्यांना न्हाऊमाखू घालायचे. त्यांना दुसरे कपडे घालायला द्यायचे. पोटभर खाणे, पिणे, जेवण देऊन संस्थेत दाखल करून घ्यायचे. अगदी लहान जागेमुळे उद्‌भवणाऱ्या अडचणींपासून अनेक प्रश्न त्यांच्यापुढे उभे ठाकत असत. पण ना त्यांनी हे काम बंद केले ना संस्थेत नवीन पीडितांना दाखल करण्याची प्रक्रिया थांबवली.

'दि होम ऑफ होप' ही संस्था बंगळुरूच्या एका उपनगरात अर्धा एकर जमिनीवर वसलेली आहे. ऐंशी लोकांना पुरेल एवढ्या बांधकामात दोनशेहून अधिक निराधार लोक मुक्कामाला असतात. जेमतेम ८० पलंग आणि स्वयंपाकाला आवश्यक इतकीच भांडीकुंडी एवढ्यावर संस्थेचे रहाटगाडगे श्री. राजा चालवत आहेत. ते स्वत: व त्यांचे कुटुंबीयही तेथेच राहतात.

आजमितीला श्री. राजा व स्वयंसेवक एक ऑटोरिक्षा व एक रूग्णवाहिका घेऊन शोधकामगिरीवर निघतात. आजूबाजूचे स्थानिकही निराधार, रोगग्रस्त, कंगाल असे लोक रस्त्याच्या बाजूला व सार्वजनिक ठिकाणी आढळल्यास आपणहून संस्थेला लगेच कळवतात. त्याद्वारे संस्थेवरचा त्यांचा विश्वास, आदर व आपुलकी दिसून येते. बंगळुरूचे पोलीस खाते व त्यांची फिरती पथकेही संस्थेला मदत करतात. असे गरजू लोक निदर्शनास आल्यास पोलीस त्यांना रस्त्यातून उचलून संस्थेत दाखल करतात. सरकारी यंत्रणेची याबाबतची कर्तव्यभावना आणि संस्थेपोटी असलेली सहानुभूती दखलपात्र आहे याबद्दल शंकाच नाही.

दर महिन्याला सुमारे १०-१५ कंगाल निराधारांची रस्त्यावर खितपण पडण्यापासून संस्था सुटका करते, ती अशा सहकार्यामुळे आणि मदतीमुळेच. संस्थेत दर महिन्याला सुमारे पाच सहा लोक कालवश होतात. त्यांचा योग्य इतमामाने व मानाने अंत्यसंस्कार केला जातो.

'होम ऑफ होप' मध्ये आतापर्यंत राहिलेला सर्वात वृद्ध मनुष्य १०१ वर्षांचा होता तर सगळ्यात लहान एक वर्षांचा. इथे दाखल झालेल्या बहुतेकांना सलगपणे औषधपाण्याची व देखभालीची गरज असते. त्यातले काहीजण आजारांना बळी पडतात आणि बाकीचे नियमित देखभालीमुळे आणि औषधपाण्याने संपूर्ण बरे होतात. त्यातील काहीजण काम करू शकतील अशा परिस्थितीत असतात. अशांना संस्थेच्या आवारात / परिसरात इतरत्रही साधेसे काम मिळवून दिले जाते.



सध्या संस्थेत १५ कर्मचारी आहेत व तिथेच वस्तीला आहेत. प्रत्येक कर्मचाऱ्याला काम वाटून दिले आहे. आजारी व मरणोन्मुख रोग्यांना औषध देणे, जेवण तयार करणे, माळी काम, आवाराची / परिसराची देखभाल, इमारतीची साफसफाई व स्वच्छता, व्यावसायिक प्रशिक्षण वगैरे कामे ही मंडळी करतात. ही मंडळी संस्थेतच दाखल होऊन बरी झालेली असल्यामुळे त्यांच्या कामात एक वेगळाच हुरूप व कृतज्ञतेचा भाव जाणवतो. त्यातील आपुलकीचा भाव वाखाणण्याजोगा असतो.

ज्यावेळी श्री. राजा रस्त्यावरच्या पीडित, गांजलेल्या, मरणोन्मुख वगैरे व्यक्तींना पहिल्यांदाच भेटतात, त्यावेळी पुढे काय होईल याचा त्यांना अंदाज नसतो. बरेचदा रस्त्यावरचे बघे, येणारेजाणारे त्यांच्याकडे वेगळ्याच दृष्टीने पाहतात. एवढ्या आपुलकीने कंगालांशी बोलणाऱ्या या माणसाचे अंत:स्थ हेतू वेगळेच असणार, मूत्रपिंड, डोळा वगैरेंसारख्या अवयवांचा हा व्यापारी किंवा दलाल असावा आणि त्याची वक्र दृष्टी या कंगालांच्या अवयवांवर असावी अशीही शंका बघ्यांना असते. एक वेगळाच अविश्वास आजूबाजूच्या लोकांच्या नजरेत असतो, जो श्री. राजा यांना उदासीन करून जातो. पण याकडे दुर्लक्ष करण्याची सवय त्यांनी अंगी बाणवलेली आहे.

रस्त्यावरच्या कंगाल, निराश्रितांशी संभाषण सुरू करणे ही एक मोठी जटिल बाब आहे. त्यांच्याकडून कशी काय प्रतिक्रिया येईल याचा अंदाज करणे कठीण असते. पूर्णपणे हलाखीत, अवहेलनापूर्ण, पराकोटीचे अपमानित जिणे जगणारी ही मंडळी बरेचदा आक्रमकपणे अंगावर धावून येतात. मारहाणीचा प्रयत्न करतात. आक्रस्ताळेपणा करतात. ज्यांच्यामध्ये अशक्तपणामुळे एवढी शक्ती नाही, ते लोक प्रतिकार करीत नाहीत. सुरूवातीच्या अशा प्रतिक्रियेतून बाहेर पडले की मग श्री. राजा त्यांच्याशी सुसंवाद साधायचा प्रयत्न करतात, कारण तोवर अविश्वासाने त्यांचे मन ग्रासलेले असते. हे कोण, त्यांना काय हवे आहे, ते आमच्या मागे का लागत आहेत, त्यांना काय देणेघेणे, ते सांगत आहेत त्यावर कितपत विश्वास ठेवायचा, वगैरे. यामागचे मुख्य कारण म्हणजे आतापर्यंत त्यांच्या वाट्याला आलेली असते ती फक्त तीव्र अवहेलना, सामाजिक बहिष्कार, उपेक्षित जिणे, अगदी दगडांचा मार सहन करेपर्यंत. त्यातील अनेकांचा स्वकीयांनी त्याग केलेला असतो. त्यामुळे आपल्याला एक माणूस मानून कोणी सहानुभूतीचे चार गोड शब्द बोलत आहे, याचेच त्यांना मोठे अप्रूप

वाटते. ना त्यांच्याकडे अशा प्रकारे कोणी आलेले असते, ना त्यांची कोणी विचारपूस केलेली असते. अशा परिस्थितीत, सहनशीलता आणि शांतपणा या दोन अस्त्रांचा श्री. राजा व त्यांचे स्वयंसेवक खुबीने वापर करतात. मन वळविण्यास व गोष्ट पटविण्यास लागणाऱ्या कौशल्याचाही आधार त्यांना घ्यावा लागतो. संस्थेत दाखल झालेल्या अशा मंडळींपैकी काही जणांचा तेथील वातावरणात श्वास घुसमटतो व त्यांची असहाय्य पावले पुन्हा रस्त्याकडे वळतात. अर्थात हा आकडा फारच कमी आहे.

'व्यक्ती तितक्या प्रकृती' या उक्तीनुसार, संस्थेत दाखल होणारे दारिद्र्यपीडित हळुहळू तिथल्या वातावरणाशी समरस होऊ लागतात. त्यांना रस्त्यावरील आयुष्यापेक्षा येथील जगणे निश्चितच आवडू लागते. ते तेथील जीवनपद्धतीत रूळू लागतात. संस्थेत राहणाऱ्यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात तसेच साजऱ्या होणाऱ्या इतर कार्यक्रमात ते भाग घेतात. त्यांची संस्थेबद्दलची आपुलकी, जिव्हाळा वृद्धिंगत होतो. याकरता मुख्यत्वेकरून जबाबदार आहे संस्थेचा दृष्टीकोन व तेथील वातावरण. सगळ्या रहिवाशांना प्रेमाने, त्यांची मानसिकता लक्षात घेऊन चांगली वागणूक दिली जाते. संस्थेत त्यांना मिळणारी वागणूक सौहार्दपूर्ण असते. प्रेमाचा, आपुलकीचा एक आविष्कार त्यांना अनुभवाला येतो. संस्थेला ते नकोसे झालेले आहेत आणि एक अपरिहार्यता म्हणून तिथे त्यांची देखभाल होत आहे असे संस्थेत कोणालाही वाटत नाही. निर्मळ, निकोप व सुकर जीवन या मंडळींना जगता यावे म्हणून संस्था खास खबरदारी घेते. अशा वातावरणात मग हळुहळू ते लोक खुलू लागतात व मग सुरू होतो शोध त्यांना कामकाज मिळवून देऊन मानाने जगण्यास मदत करण्याचा.

'होम फॉर होप' हे निराश्रित, कंगाल लोकांनाच आसरा देते असे नाही, तर मरणोन्मुख दारिद्र्यपीडितांकरता ते एक मायेचे, ममतेचे शांत असे स्थान आहे, जेथे ते सुखाने व शांततेने देहत्याग करतात. महत्त्वाची गोष्ट म्हणजे मरणोन्मुख व्यक्तींच्या शेवटच्या इच्छा पूर्ण करण्याकडे संस्था खास लक्ष पुरवते. काहीजण गोडधोड खायला मागतात तर काहींना चांगले जेवण हवे असते. काहीजण नवीन कपडे घालायला मागतात. शेवटच्या घटकांमध्ये त्यांची शेवटची इच्छा पूर्ण करण्यात श्री. राजा यांना वेगळीच कृतकृत्यता वाटते. कितीतरी जण श्री. राजांच्या कवेत येऊन मग मृत्यूला कवटाळतात. संस्था त्यांना



एक प्रकारची खात्री देते की जेव्हा ते देह ठेवतील तेव्हा ते निराधार, निराश्रित म्हणून नाही. ते निश्चिंत होतात की जग सोडताना ते एकाकी व उपेक्षित नसतील, तर त्यांच्या जाण्यामुळे दु:खी झालेल्या संस्थेतील इतरांच्या साक्षीने व उपस्थितीत एखाद्या सर्वसामान्य माणसाप्रमाणे ते जीवनाची इतिश्री करू शकतील. सन्मानाने जगाचा निरोप घेण्याची बहुमोल संधी त्यांना मिळते. निदान मृत्यूशय्येवर काही अंशी का होईना त्यांना मन:शांती व समाधान मिळावे म्हणून संस्था अविरत प्रयत्नशील असते. संस्था फक्त तेथील मरणोन्मुखांपर्यंतच आपले उत्तरदायित्व मर्यादित ठेवत नाही, तर रस्त्यावर कोणीही मृत व्यक्ती आढळल्यास तिला संस्थेत आणून तिच्यावर यथायोग्य अंत्यसंस्कार करण्यात येतात व मगच मृतात्म्याला भावपूर्ण निरोप दिला जातो. त्या जगाच्या नियंत्रकाच्या अनाकलनीय रहाटगाडग्याची दखल घेऊन त्याच्याप्रती आदर दर्शवण्याचा हा संस्थेचा मार्ग आगळा आणि स्तुत्यच नव्हे काय!

श्री. राजा यांना अनेक प्रशासकीय आणि व्यवस्थापकीय समस्यांना सामोरे जावे लागते. त्याबाबत त्यांना सध्या तरी कोणाची साहाय्यता किंवा मदत मिळत नाही. दुसरी फळी तयार करून कालांतराने त्यांच्यावर अनेक बाबी सोपवाव्या हा विचार आजमितीला ते गंभीरपणे करीत आहेत. त्या अनुषंगाने त्यांनी पावलेही उचलायला सुरूवात केली आहे. तेथे राहणाऱ्या मंडळीतील आपापसातील कुरबुरी, रूसवेफुगवेदेखील त्यांच्याकडे येतात. आता दोनशे डोकी एकत्र आली की भांड्याला भांडे लागणे हे काही विशेष नाही. मग ते तक्रारी वगैरे घेऊन श्री.राजांकडे येतात. सर्व मंडळी त्यांचा शब्द शिरोधार्य मानतात. मग सलमसलत, समजूत काढणे वगैरे होते. श्री.राजांनी सुचवलेला उपाय मंडळी राजीखुशीने स्वीकारतात.

संस्था सेवाकार्य करण्याच्या कामी किती उत्सुक व तत्पर आहे, याचे उदाहरण म्हणजे संस्थेने स्वत:चा, २४ तास खुला असलेला मदत फोन (हेल्पलाइन) निर्माण केला आहे. कधीही आणि कोणीही त्याचा वापर करू शकतो. रस्त्यावरच्या दारिद्र्यपीडितांना आपल्या समस्या, त्याबद्दलच्या इतर बाबी संस्थेच्या निदर्शनास आणून देण्याकरता, तसेच संस्थेत दाखल होण्याकरतासुद्धा हा मदत फोन म्हणजे एक वरदानच आहे.

देणगीदार, हितचिंतक आणि बाह्य जगतातील सामान्यांना संस्थेच्या कामकाजाची, सध्याच्या उपक्रमांची, नवीन योजनांची वगैरे माहिती सातत्याने

देत राहण्याने संस्थेबद्दल एक सकारात्मक भूमिका व दृष्टीकोन तयार होण्यात फार मोलाची मदत मिळते. म्हणून संस्था नियमितपणे दर तीन महिन्यांनी माहितीपत्र (न्यूजलेटर) काढून ते वितरीत करते. या माहितीपत्रामुळे एक आढावाही सतत घेतला जाऊन आपल्याला एक प्रकारची स्फूर्ती व उत्साह येतो असे श्री. राजा यांना मनापासून वाटते.

श्री. राजांच्या नि:स्वार्थी स्वभावाची, तळमळीच्या सेवेची आणि समर्पित वृत्तीची दखल दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणात घेतली जात आहे. 'नॅशनल अनसंग हीरो ऑफ इंडिया' हा पुरस्कार त्यांना दोन वेळा मिळाला आहे. कर्नाटकच्या राज्यपालांकडून दोन वेळा खास पुरस्कारही त्यांना देण्यात आला आहे. इतर अनेक मानसन्मानांनी व पुरस्कारांनी त्यांना सतत गौरवले जात आहे.

हा सगळा एवढा मोठा कारभार चालवला जातो आहे तो मिळणाऱ्या देणग्यांमधून. कितीतरी वेळा आर्थिक अडचण झोप उडवेल इतकी गंभीर स्वरूपाची असते. परंतु श्री. राजा त्यातून मार्ग शोधतात. त्यामुळे त्यांची या कामावरची निष्ठा अधिकच बळावते. ते अधिकच जोमाने व निर्धाराने पुढे जातात. ती भगीरथासारखी जिद्द व श्रद्धा पाहून सामान्यजन फक्त एवढेच म्हणू शकतात 'जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले; तोचि साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा.'

❋❋



# बेटर इंडिया (Better India)

*भारताएवढ्या मोठ्या देशात अनंत प्रकारच्या चांगल्या वाईट घटना रोज घडत असतात. देशात घडणाऱ्या घटना आपल्यापर्यंत पोचतात त्या वेगवेगळ्या प्रसारमाध्यमांद्वारे. दहशतवाद, लाचलुचपत, वशिलेबाजी, भ्रष्टाचार, आर्थिक घोटाळे, खून, दरोडे, स्त्रियांवरील अत्याचार, खंडणी, ओलीस ठेवणे, राजकीय सुंदोपसुंदी, अशा प्रकारच्या मनाला उद्विग्न करणाऱ्या घटनाच प्रकर्षाने आपल्यापुढे येतात. त्यामुळे काही वेळेला वाटते की देशात काही चांगल्या, सकारात्मक, मनाला दिलासा आणि उभारी आणणाऱ्या गोष्टी घडतच नाहीत की काय? पण वस्तुस्थिती तशी नाही. देशातील कही गिने चुने का होईना पण सुजाण, सुसंस्कृत आणि संवेदनशील सामान्यजन आपापल्या परीने व वेगवेगळ्या दृष्टीकोनांतून याकरिता सतत प्रयत्न करीतच असतात. असे प्रयत्न त्यामानाने आपल्यापुढे येत नाहीत एवढेच.*

*नेमकी हीच उणीव भरून काढली आहे श्री. धीमंत व श्रीमती अनुराधा पारेख यांच्या 'दि बेटर इंडिया' या वेबसाइटने. त्याद्वारे प्रकाशझोतात अजिबात नसलेल्या पण सकारात्मक प्रकारच्या वैविध्यपूर्ण अशा २०० पेक्षा जास्त बाबी व त्यामागील माणसे त्यांनी केवळ सामाजिक बांधिलकी या दृष्टीकोनातून नागरिकांपुढे विनामूल्य मांडलेल्या आहेत. फक्त दोन वर्षांत त्यांच्या या अनोख्या सामाजिक उपक्रमाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर उदो उदो झाला असून आज लाखो नागरिकांमध्ये तो लोकप्रिय आहे.*

माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांनी एकदा दूरचित्रवाणीवरील मुलाखतीत एका लहानशा वाटणाऱ्या गोष्टीचा उल्लेख केला होता. त्यांचे म्हणणे होते की, रोजच्या वर्तमानपत्रात सुरूवातीच्या काही पानांवर जर सकारात्मक अशा स्वरूपाच्या बातम्या वाचायला मिळाल्या तर किती चांगले होईल. रोजच्या सकाळचा नूरच आनंदी होऊन जाईल. दिवसभर एक वेगळाच टवटवीतपणा अनुभवता येईल व रोजच्या दिनचर्येवर चांगला परिणाम होईल.

सकाळी वर्तमानपत्र उघडले की राजकारणातील छक्के पंजे, दंगली, जातीयवाद, विरोधकांचे डावपेच, बंद, बेमुदत संप, हत्याकांड, टोळी युद्ध, अतिरेक्यांचा हैदोस, भ्रष्टाचाराची प्रकरणे, लाचलुचपत, लाल फितीचा प्रादुर्भाव, सार्वजनिक सुखसोयींसंबंधी अकार्यक्षमता तसेच त्यांची दुरवस्था व कमतरता, पाणी तंटे, वाढते प्रदूषण, मोठाले अपघात, शिक्षणप्रणालीतील अनागोंदी अशा प्रकारच्या नानाविध बातम्या समोर उलगडल्या जातात. दूरचित्रवाणीच्या वाहिन्यांमधूनही फारशी काही वेगळी परिस्थिती नाही. शिवाय कित्येक वेळा जुन्या बातम्या परत परत दाखवल्या जातात व शिळ्या कढीला ऊत आणतात. बातमीला तिखट मीठ लावून सांगणे त्यांना नवीन नाही.

या सर्वांचा परिपाक अर्थातच चांगला नाही. काहींच्या नकारात्मक वृत्ती जागृत होतात व उद्विग्नता भासून 'कशात काही अर्थ नाही' अशी निष्क्रीय भावना जाणवू लागते. लोकांची संवेदना बोथट होते. काहीजण असहायतेमुळे खिन्न होतात. एकूणच नकारात्मकतेचा प्रादुर्भाव वातावरणात कमी नसतो.

बरेचदा त्यावेळी मनात येते की आपल्या अवती भोवती काय फक्त हेच घडतंय आणि इतर चांगल्या गोष्टी अजिबात घडतच नाहीत का? पण एक नक्की की उदात्तपणा, संवेदनशीलता, माणुसकी, त्याग, आपुलकी, वैचारिक परिपक्वता, उत्तरदायित्व अशा अनेक सत्प्रवृत्ती आपल्यामध्ये अगदी वैयक्तिक व सामाजिक अशा दोन्हीही पातळ्यांवर खचितच आहेत व त्या जाणवतातही.

मग त्यांचा परिणाम म्हणून घडणाऱ्या सकारात्मक, उत्साहवर्धक, आनंददायक, उत्तेजक, शांतीदायक, प्रफुल्लित, समाजोपयोगी वगैरे स्वरूपाच्या बाबी, गोष्टी, घटना इत्यादी सर्वसामान्य माणसापर्यंत आवश्यक त्या गंभीरतेने व योग्य त्या तीव्रतेने पोहोचतात का? त्या तशा पोहोचणे हे सामाजिक स्वास्थ्य निरोगी ठेवण्यासाठी गरजेचे नाही का? मग समाजातील चांगल्या घटना / गोष्टी अधिकाधिक लोकांपर्यंत कशा पोहोचवता येतील जेणेकरून त्यांना उदात्तता, आनंद, स्फूर्ती व समाधान वाढत्या प्रमाणावर जाणवेल, त्यापासून स्फूर्ती येऊन काहीजण सकारात्मक पावलेही उचलू शकतील?

अशा प्रकारच्या वैचारिक मंथनातून जन्म झाला तो 'दि बेटर इंडिया' (The Better India) या संकल्पनेचा. 'दि बेटर इंडिया' ही १० जुलै २००८ रोजी कार्यान्वित झालेली एक वेबसाईट आहे. देशात घडणाऱ्या चांगल्या घटनांचे व उपक्रमांचे अस्तित्व लोकांपुढे आणणे हा त्यामागील मुख्य हेतू. अडचणींवर मात करून समाजात आवश्यक तिथे बदल घडवू पाहणाऱ्या धीरोदात्त मंडळींच्या सत्यकथा. अशी एखादी घटनासुद्धा चटकन मनाला स्पर्श करून जाते व उभारी आणून मनाला उल्हसित करीत नूर बदलवून टाकते. या वेबसाईटने एक दोन नाही तर तब्बल दीडशेहून अधिक उपक्रमांची पोतडीच आपल्यापुढे उलगडली आहे. फक्त तोंडी प्रसिद्धीवर अवलंबून असूनही वाचकांची संख्या ३० हजाराहून अधिक असून ती वाढतेच आहे.

देशात घडणाऱ्या व मानवी जीवनाशी निगडित सकारात्मक, विकासात्मक चांगल्या बातम्या, घटना यांना यथायोग्य प्रसिद्धी न मिळाल्यामुळे चांगल्या गोष्टींच्या जाणकारीपासून समाज वंचित राहतो. या गोष्टी लोकांच्या नजरेत भरणे दूरच, उलट दृष्टीआडच राहतात. त्यापासून समाजाला होणारा उपयोग त्यांच्या माहितीअभावी दुर्लक्षित राहतो. त्यामुळे समाजाच्या वेगवेगळ्या अंगांना होणाऱ्या फायद्यापासून दूर राहणे अभावितपणे वाट्याला येते.

या विचारधारेला अनुसरून ठाम आत्मविश्वासाने धीमंत पारेख आणि अनुराधा पारेख या एका उभरत्या उद्योग व्यवसायात कार्यरत आहेत. शिवाय ते लेखकही आहेत. समाजात चांगले बदल घडवून आणणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांना एक स्थान मिळवून देण्याकरता स्थापलेली ही साईट म्हणजे त्यांच्या व्यक्तिगत कल्पनांना मूर्त स्वरूप मिळवून देण्याचा एक उपक्रमच आहे. या साईटला स्वत:चे असे आगळे स्थान मिळवून देण्यात व जास्तीत जास्त लोकांच्या नजरेस ती आणण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. श्रीमती अनुराधा या रत्नपारख्याप्रमाणे आहेत. त्या सिव्हिल इंजिनियर व एम.बी.ए.असून केवळ बेटर इंडियाकडे लक्ष पुरवण्यासाठी त्यांनी मोठ्या पगाराची नोकरी सोडून दिली. याशिवाय एका स्वयंसेवी संस्थेतही त्या अर्धवेळ नोकरी करतात. संगणक क्षेत्रात अभियंते असलेले श्री. धीमंतही एम.बी.ए.असून एका संगणक कंपनीत वरिष्ठ पदावर कार्यरत आहेत.

या वेबसाईटद्वारा व्यक्ती, संस्था, कामे वगैरेतील लायक उपक्रमांना प्रसिद्ध करून प्रकाशात आणणे आणि लोकांपुढे मांडून त्यांच्या नजरेत भरवणे याबद्दलची त्यांची जाण उल्लेखनीय आहे. पहिल्या वर्षात वेबसाईटकरता विस्तृत प्रमाणावर लेखन करून त्यांनी या उपक्रमाला अत्यावश्यक असलेला भरीव श्रीगणेशा करून दिलेला आहे. त्यांना मोठ्या खाजगी उद्योग व्यवसायात तसेच स्वयंसेवी संस्थांतील कामाचा अनुभव असून त्याचा वेबसाईट चालवण्यास चांगला फायदा होतो.

या उपक्रमाचे एक मोठे वैशिष्ट्य असे की श्री. धीमंत व अनुराधा यांनी या वेबसाईटला व्यक्तिगत मालकीचे तसेच मक्तेदारीचे स्वरूप जाणीवपूर्वक येऊ दिले नाही. त्यांनी एक गोष्ट कायम मनात ठेवलेली आहे की हे काम आपण समाजाकरता करीत आहोत. समाजाने अधिक सुजाण व सुस्वरूप व्हावे म्हणून करीत आहोत. चांगल्या सकारात्मक विचारांना, कृतीला लोकांच्या नजरेस आणण्याकरता करीत आहोत. त्यामुळे समाजाच्या वेगवेगळ्या स्तरांतून प्रतिसाद मिळावा हे ध्येय व अपेक्षा ठेवून निरलसपणे व वस्तुनिष्ठपणे ते या कामाकडे पाहतात.

समाजाच्या उपयोगी ठरणारे विकासात्मक व सकारात्मक उपक्रम अगदी कोणीही वेबसाईटच्या व्यवस्थापकीय चमूकडे बिनदिक्कतपणे पाठवू शकतात. त्यात कोणत्याही प्रकारच्या मक्तेदारीला, वशिलेबाजीला वाव नाही समाजाच्या या उपक्रमात समाजातील वेगवेगळ्या घटकांनी सक्रियपणे सहभागी झाले पाहिजे असे त्यांचे ठाम मत आहे. ते निरनिराळ्या मंडळींना लेखन करण्यास उत्तेजन देतात. त्यात प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांचाही समावेश आहे आणि संसारात गुंतलेल्या गृहिणीही आहेत. समाजसेवक आपले योगदान देतात. स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते आहेत, नोकर मंडळी व अधिकारी वर्गही सहभागी होतात. पत्रकारितेत गुंतलेली मंडळी आहेत – अगदी हौशींपासून ते व्यावसायिकांपर्यंत.

वेबसाईटवर प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक मजकुराचे श्रेय त्या व्यक्तीचा लेखक म्हणून उल्लेख करून दिले जाते. अशा प्रकारचे लेखन करणाऱ्या लेखकांची अनाहूतपणे एक फळीच त्यांनी तयार केली आहे. या फळीचा वापर मुक्तपणाने व निरलसपणे या वेबसाईटचा उद्देश साध्य करण्यासाठी होत आहे.

वाचकांच्या प्रतिक्रियांची येथे खास नोंद घेतली जाते. मग त्या प्रतिक्रिया एकूण वेबसाईटच्या कार्याशी संबंधित असोत किंवा एखाद्या विशिष्ट लेखाबद्दल असोत. 'आमच्या वेबसाईटचे वेगवेगळ्या दृष्टीकोनांतून मूल्यमापन किंवा निकष लावून तपासणी करून प्रांजळपणे आम्हाला प्रतिक्रिया कळवा' असे प्रतिपादन धीमंत व अनुराधा वाचकांना सातत्याने करीत असतात.

या वेबसाईटमध्ये समाविष्ट केलेल्या निरनिराळ्या उपक्रमांचे ठळकपणे दिसून येणारे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा वेगळेपणा व त्यातील नाविन्यपूर्णता, ज्याला आपण 'हटके' असे म्हणतो तो आगळेपणा. अठ्ठावन्न उपक्रम (म्हणजे एक तृतीयांशाहून अधिक) या वर्गात मोडतात. ही एक अतिशय स्पृहणीय बाब आहे यात शंकाच नाही, कारण त्यामुळे सकारात्मक अंग असलेल्या वैविध्यपूर्ण व नवनवीन घटना व गोष्टी तीस हजारांहून अधिक लोकांच्या नजरेत प्रकर्षाने भरलेल्या आहेत.

जुलै २०१० पर्यंत एकूण १५० उपक्रमांची येथे नोंद झालेली होती. त्यातील प्रमुख विषय असे:

- सामाजिक विषय (३८ लेख), ग्रामीण विकास (१३), तंत्रज्ञान (१३), संगणकशिक्षण (साक्षरतेपासून उच्च शिक्षणापर्यंत)(१९), यात 'असीमा' या मुंबईतील स्वयंसेवी संस्थेने रस्त्यावरील दारिद्र्यपीडित बालकांसाठी चालवलेल्या शिशुवर्गाचा समावेश.
- अपंग व विकलांगांच्या समस्या (६).
- शाळकरी विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण व जैववैविध्याचा अभ्यास करणारा 'हरित शाळा' प्रकल्प.
- चंडिगडच्या झोपडपट्टीत ९ ते १५ वयाच्या मुलींनी आयांना साक्षर करण्याची यशस्वी मोहीम.
- मध्यम व लघुउद्योगांकरता आयआयटी व आयआयएमने मिळून चालवलेला जगातील सर्वोत्तम कार्यपद्धती शिकवण्याचा प्रकल्प
- आदिवासी आणि रस्त्यावरच्या मुलांसाठीची रस्त्यावर दिव्याखाली चालवलेली विपुल ठाकूर यांची शाळा.

  तसेच सार्वजनिक जीवनाशी निगडित असे काही नाविन्यपूर्ण उपक्रम उल्लेखनीय आहेत.
- आंध्र प्रदेश व गुजराथमध्ये वैद्यकीय मदत, अग्निशमन व पोलिसी मदत यांसाठी फोन नं. १०८ शी संपर्क साधल्यास आपत्कालीन सेवांद्वारे सुमारे २० मिनिटात तुमच्यापर्यंत मदत पोचते.

- भारतात लेखी लिपी नसणाऱ्या स्थानिक लोकभाषांचा अस्त रोखून त्यांना संजीवनी मिळवून देण्यात अग्रस्थानी असलेली गुजराथमधील लहानशी अकादमी.
- कर्नाटकातील मंड्या जिल्हातील एका ग्रामपंचायतीद्वारे प्रसिद्ध केले जाणारे वर्तमानपत्रक, ज्यात संबंधित प्रकल्पांची सद्य परिस्थितीची माहिती पारदर्शकपणे मिळाल्यामुळे झालेले भ्रष्टाचार निर्मूलन.
- महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पुस्तके विकणारे फिरते पुस्तकालय.
- कॉमिक्सचे सामर्थ्य सामाजिक बदलाकरता उपयोगात आणणारी शरद शर्मा यांची वर्ल्ड कॉमिक्स इंडिया ही संस्था.
- अधिकृत वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून न राहता त्याऐवजी सायकलीच्या वापरावर व उपलब्धतेच्या सोयी देणारे ठाण्याचे व्ही. रमेश, तसेच आरोग्य क्षेत्रातील काही नाविन्यपूर्ण उपक्रम वेबसाईटवर आढळतात.
- मोबाइल फोनच्या एसएमएस सेवेद्वारे रक्त हवे असणाऱ्या रूग्णाला व ते देऊ इच्छिणाऱ्या रक्तदात्याला एकमेकांच्या संपर्कात आणून देणारी इंडियन ब्लड डोनर्स ही संस्था.
- एचआयव्ही व एडसबद्दल जनजागृतीकरता धावणारी रेल्वेगाडी – 'दि रेड रिबन एक्स्प्रेस'
- हिंदुस्थान युनिलिवर कंपनीचा उपक्रम, ज्याद्वारे कर्मचाऱ्यांना स्वयंसेवी संस्थांमध्ये किंवा आत्मबळावर समाजाकरता काम करण्यास परवानगी इत्यादी.

अनाथ, रस्त्यावर जीवन जगणाऱ्या दारिद्र्यपीडितांचे जीवन जरासे सुसह्य व्हावे म्हणून कामे करणाऱ्या उपक्रमांचाही उल्लेख करणे आवश्यक आहे.

- दिवाळीतील फटाके या मुलांबरोबर उडवून त्यांना मनापासून आनंदी करणाऱ्या 'चाईल्ड लाईन' या संस्थेपासून सुरूवात करता येईल.
- अनेकदा मुलांना वाचायला काय द्यायचे हा नेहमी प्रश्न पडतो. भारतातील मुलांच्या साहित्याची छाननी व परीक्षण करून 'सॅफरॉन ट्री' या संस्थेने ही समस्या सोडवण्यात बरीच मदत केली आहे.
- कचरा गोळा करणाऱ्या मुलांकडून तो घेऊन त्याची योग्य किंमत त्यांना देऊन त्यापासून उपयुक्त वस्तू बनवणारी कंझर्व ही दिल्लीतील संस्था या मुलांची एक संघटना बांधण्याच्या प्रयत्नात आहे.
- बोलक्या बाहुल्या व त्यांचे खेळ या लुप्त होत जाणाऱ्या कलेला जिवंत ठेवण्याची जबाबदारी एका संस्थेने स्वीकारलेली आहे.
- अपंगांसाठीचे प्रकल्प : अपंग, विकलांग वर्गाकरता नवीन दृष्टीने होणाऱ्या प्रयत्नांमध्ये पुढील उपक्रमांचा उल्लेख करावा लागेल.
- संकेत भाषेद्वारा मोबाईल फोनवर उपलब्ध होऊ शकणारा शब्दकोश
- अपंगांकडून तयार केलेल्या उत्पादनांना बाजारात चांगला उठाव मिळावा म्हणून एका समान ब्रँडखाली विक्री करणे.
- दृष्टीहीनांना पुस्तके वाचता यावीत व आपापसात फिरवता यावीत म्हणून कार्यरत असणारी 'बुक बोले' ही वेबसाईट.
- दृष्टीहीनांनी फोटो काढणे ही संकल्पना असणारा बियाँड साईट फाऊंडेशनचा उपक्रम.

या आणि अशाच इतर अनेक प्रकल्पांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे हा समाजप्रबोधनाचा एक श्रेयस्कर मार्ग म्हणून यशस्वी झालेला दिसतो.

देशातील नामवंत वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेला व संस्थेच्या उद्दिष्टांना अनुरूप असलेला मजकूरही वेबसाईटवर प्रसिद्ध केला जातो. त्यात इंडियन एक्स्प्रेस, टाईम्स ऑफ इंडिया, हिंदू, हिंदुस्थान टाईम्स, डेक्कन हेराल्ड वगैरेंचा खास उल्लेख करावा लागेल. परदेशातील न्यूयॉर्क टाईम्स, गार्डियनमधील लेखही साईटवर समाविष्ट करण्यात आलेले आहेत. नुकताच या वेबसाईटचा दुसरा वाढदिवस झाला. लहानशा विचारातून सुरू झालेल्या या कामाने एवढ्या कमी कालावधीतच घट्ट मूळ पकडले आहे. अगदी सुरूवातीपासूनच देशविदेशातून सतत मिळत असलेल्या प्रतिक्रियांच्या ओघातून हे निर्विवादपणे स्पष्ट होते. हार्दिक अभिनंदनापासून 'महान कार्य, उदात्त विचार, मनापासून शुभेच्छा, मनाला उभारी देणारा प्रकल्प, नाविन्यपूर्ण संकल्पना 'अशा प्रकारचे कौतुक तर शेकडो वाचकांनी केले. अनेकांनी सक्रिय व विनामूल्य सहकार्य देण्याची तयारी दाखवली.

या वेबसाईटने वाचकांमध्ये एक प्रकारचा वेगळा विश्वास व आपुलकी निर्माण केलेली आहे. यातील काही वाचकांना समाजसेवा करावीशी वाटते परंतु नेमके काय करू? असा प्रश्नही ते पारीख दांपत्यापुढे मांडतात व पारीख मंडळीही

'तुम्ही तुमचे पहा, आमचा काय संबंध?' अशी ताठर भूमिका न घेता त्यांना शक्य ती मदत करतात.

वेबसाईट एखाद्या उपक्रमासंबंधी माहिती देताना शीर्षक, थोडक्यात प्रस्तावना, उपक्रम नेमका काय आहे त्याची संक्षिप्त माहिती, आत्तापर्यंत झालेले काम (महत्त्वाच्या बाबी एक दोन चौकटीत छापून त्याकडे लक्ष वेधले जाते), पूर्ण लेख कुठे वाचायला मिळेल त्याचा संदर्भ, लेखकाचे नाव व ईमेल, साईट असल्यास वेबसाईटचा पत्ता व प्रतिक्रियांसाठी आवाहन असा आराखडा वापरला जातो. या वेबसाईटवर जाहिरातीही समाविष्ट केल्या जातात – अगदी उपलब्ध नोकऱ्यांच्या संधीसहित.

लेखांवरील वाचकांच्या प्रतिक्रिया नुसत्याच अभिनंदनपर किंवा गौरवपूर्ण नसतात. बरेचदा त्यातून काही वेगळे व नवीन शिकायला मिळेल अशा स्वरूपाच्या असतात. त्यामुळे पारीख मंडळींनाही या प्रतिक्रियांचा चांगलाच फायदा होतो. उदाहरणार्थ, केळीच्या झाडाच्या बुंध्यापासून कागद तयार करणाऱ्या प्रक्रियेवर ५० पेक्षा जास्त वाचकांनी रस दाखवला व आणखी माहिती मागवली, अगदी व्यावसायिक व व्यापारी मुद्यांबद्दलदेखील.

समाजातील सुशिक्षित व उच्चभ्रू वर्गाने 'दि बेटर इंडिया' ची दखल घेतल्याचे ठळक उदाहरण म्हणजे आय. आय. एम. अहमदाबाद या प्रथितयश संस्थेने पारीख मंडळींना बोलावून आपल्या तज्ज्ञ वर्गाला संबोधित करायची विनंती केली .

'दि बेटर इंडिया' ला इतर संघटनांशी विधायक स्वरूपाचे सहकार्य करण्यात आनंदच आहे. 'बियाँड प्रॉफिट : न्यू सोशल एंटरप्राइज मॅगझिन ' या उपक्रमाशीही त्यांनी हातमिळवणी केलेली आहे. त्यांचा हेतूही सामाजिक उद्योगधंद्यांतील चांगल्या असाधारण गोष्टी लोकांपुढे मांडणे हाच असल्याने ही भागीदारी पूरक ठरेल.

अशी आहे ही आगळीवेगळी वेबसाईट व तिचे समाजोपयोगी नाविन्यपूर्ण काम!

❀❀